श्रीगजानन. कान्य र८०

# गिरिवासी काव्य.

भाग पहिला.

कवि

कै. बापूजी वैजनाथ पतकी

माजी नायब शिरस्तेदार, कमिशनर आफीस,

वऱ्हाड.

प्रकाशक

रामराव बापूजी पतकी.

REFBK-0001052

सन १९१४.

REFBK-0001052

मुंबई, श्रुतिबोध मुद्रामंदीर.

किंमत १॥ रुपया.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ...
ठाणे.

परमपूज्य

कै. वा. तीर्थरूप बापूसाहेब पतकी

यांचें

# गिरिवासी काव्य

व

कै. वा. गोविंद रामराव पतकी

यांनीं अत्युत्कृष्ट उत्साहानें प्रसिद्ध करण्याचें काम हातीं
घेतलें होतें पण त्यांच्या अकालीं निधनामुळें अपुरें
राहिलें ह्मणून उभयतांचें स्मारक ह्मणून
हें प्रसिद्ध करीत आहे.

रामराव बापूजी पतकी.

---

( सर्व हक्क प्रकाशकानीं राखून ठेविले आहेत. )

---

ग्रंथ संग्रहालय

# श्रुतिबोधाचे आश्रयदात्यांस.

यंदाची दिवाळी गोड करण्याकरितां आम्हीं जीं तीन पुस्तकें प्रसिद्ध केलीं त्यांची अल्प माहिती आम्ही अगोदर थोडीशी दिलेलीच होती. आम्हीं जीं पुस्तकें प्रसिद्ध करतों त्यांत **विविधता** व **उपयुक्तता** ह्या दोन गोष्टींकडे आमचें विशेष लक्ष्य असतें. यंदाच्या तिन्हीं पुस्तकांतही हेंच तत्त्व आम्हीं डोळ्यांपुढें ठेवलेलें होतें. आमच्या तीन पुस्तकांपैकीं पहिलें

## गिरीवासी काव्य

आज प्रत्यक्षच वाचकांपुढें आहे. ह्या काव्याचा कर्ता आपला ऐहिक संसार संपवून जगांतून चालता झाल्यास अनेक वर्षें होऊन गेलेलीं आहेत, परंतु त्यानें आपली **अनुपम कृति** मागें ठेवलेली होती व ती **श्रुतिबोधाचे** पत्रांतून रसिकवृन्दापुढें ठेवण्याचा पहिला मान श्रुतिबोध–संस्थेस मिळाला ही आम्ही सुदैवाची कृपाच समजतो. "प्राचीन काव्य" ह्या सदराखालीं जो अनुपम ग्रंथसागर महाराष्ट्र वाङ्मयांत हेलावला आहे त्यांत **गिरीवासी काव्यचा** नंबर किती वरती लागेल हें पारखणें सुज्ञ वाचकांकडे आहे. ह्या पुस्तकाचा **दुसरा भाग** अजून प्रसिद्ध व्हावयाचा असल्यामुळें व तो सभ्यांचे वर्गणीदारांस ज्यास्ती **कोणतीही किंमत न पडतां** मिळावयाचा असल्यामुळें, तूर्त आम्ही इतकेंच सांगतो कीं ह्या काव्यावरून **अमृतराय** अथवा **मोरोपंत** ह्यांचें वाचकांस स्मरण झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. दुसरा भाग असाच रसाळ आहे व त्यांत श्री. **खापर्डे ह्यांची प्रस्तावना**, ग्रंथसंशोधक रा. रा. **आसनारे वकील** ह्यांचा फोटो वगैरे महत्त्वाच्या गोष्टी येणार आहेत.

## युरोपांतील युद्ध

हें आमचें दुसरें पुस्तक होय. पहिल्या पुस्तकांत जर आम्ही ईश्वरभक्तीची सोय केली असली तर दुसऱ्या पुस्तकांत मानवी विकारांच्या कलहाचा आधुनिक वृत्तांत दिलेला आहे व ह्याप्रमाणें एक अगदीं जुनें व दुसरें अगदीं नवें अशीं **दोन पक्कानें** वाचकांस समर्पण करून मध्यंतरी रुचिपालट होण्यास अवसर मिळावा म्हणून अत्यंत परिश्रमपूर्वक मुद्दाम तयार केलेलें

## श्रुतिबोध–पंचांग

दिलेलें आहे. वेदांचें निर्विघ्न प्रकाशन हा आमचा मुख्य उद्देश असल्यामुळें ह्या महत्कार्याचे

जे अभिमानी असतील त्यांची ह्याप्रमाणें आम्हीं इमानेंइतबारें सेवा चालविली आहे. आमच्या अजमासापेक्षां **गिरिवासी काव्य** अतिशय मोठें होऊन त्याचे **दोन भाग** काढण्याची जर आमच्यावर पाळी आली नसती तर भगवद्गीता **सार्थ** देण्याचा आमचा संकल्प आम्हांस पुरा करता आला असता; परंतु **गिरिवासी काव्याचीं** पृष्ठें अजमासापेक्षां फारच वाढल्यामुळें केवळ **दोन रुपयांत तीन ग्रंथ** देणें मुद्राच्या महर्गतेमुळें अशक्य झालें असतांही आम्हीं आपलें वचन तडीस नेलें आहे. फक्त भगवद्गीतेचें भाषांतर देण्याऐवजीं

## गिरिवासी काव्य भाग दुसरा

हेंच पुस्तक आह्मी तयार झाल्याबरोबर सध्यांचे वर्गणीदारांस **फुकट** देण्याचें ठरविलें आहे. हा दुसरा भाग अजमासें सुमारें **तीन महिन्यांनीं** प्रसिद्ध होईल, व तो तयार झाल्याची आगाऊ सूचनाही देण्यांत येईल.

**मॅनेजर, श्रुतिबोध ४७, काळबादेवी, मुंबई.**

॥ श्री लक्ष्मीव्यंकटेश प्रसन्न ॥

# भक्तिसुधारस.

## गिरिवासि ( व्यंकटेश ) स्तव.

( यांत प्रभुचें गुणवर्णन व स्वतःची लघुता कवीनें वर्णन केलेली आहे. पण, कवीनेंच आर्या २४, २५ यांत म्हटल्याप्रमाणें, प्रभुच्या नामस्मरणाच्या स्फूर्तीनें कां होईना, काव्य प्रासादी व यमकयुत झालें आहे. कविता सोप्या व सरळ असल्यामुळें यांवर विशेष टीपांची जरूरी नाहीं. )

---

### आर्या.

वाटति हरिगुण गावें, परि करुणाकर हरीच रसनेला[1] ।
वळविल, तरि लाधे जो कविंनीं कवनीं भरूनि रस नेला ॥ १ ॥
पार नसेचि गुणांचा, तरि विश्वासेंकरूनि जो गातो ।
होतो भक्तिबळें त्या भगवद्यशवर्णनाचि[2] जोगा[3] तो ॥ २ ॥
शीलचि आहे प्रभुचें तो मूकालागिं गीष्पती[4] करितो ।
ऐसें नसतें तरि मग करितां स्तुति स्वाननें[5] कसा करि[6] तो ॥ ३ ॥
पंगुँहि[7] गिरि लंघुनियां जाय त्वरें ज्याचिया कृपालेशें ।
तो कां करिल उपेक्षा स्तविला जो साधुमुनिनृपालेशें ॥ ४ ॥
यास्तव यथामतिनें हरिगुणगणवर्णनासि लागावें ।
मुख चातकें उघाडिल्यावरि न लगे अंबुदासि[8] मागावें ॥ ५ ॥
कृत्याचि हें जीवाचें वाचेला नाम नित्य यावें गा ।
भावें गातां ह्मणणें लागेना या करा दया वेगा ॥ ६ ॥

---

१ जिव्हेला. २ भगवत्–यश–वर्णना=भगवंताचें यश वर्णन करण्याला. ३ योग्य. ४ बृहस्पति. ५ स्व–आननें–आपल्या मुखानें. ६ गजेंद्र. ७ लंगडा. ८ मेघास.

वर्णिति बुध जन स्पष्ट प्रभुचा भावार्थ हाचि ‘ मज गावें ’ ।
नरतनुचें साधन हें केल्यावांचूनि व्यर्थ न जगावें ॥ ७ ॥
व्हावें शरण प्रभुला निर्व्याजत्वें अनन्यभावानें ।
नावानें कां न करी प्रेक्षण करणार जो स्वभावानें ॥ ८ ॥
रामदयाघन वळल्यावरि भवतापासि ठाव[३] कां राहे ।
त्यावांचुनि दुःखप्रद वाटे सुजनांसि स्पष्ट कारा[४] हे ॥ ९ ॥
नामें तरले बहु जन गेले संसारसिंधुच्या पारा ।
सारासार विचारा[५], करितां अन्यत्र काय व्यापारा ॥ १० ॥
रामयशोमृतपानें जातो भवजन्य रोग सारा हो ।
सारा[६] हो संसारा उमगा ज्यांचा[७] असे पसारा हो ॥ ११ ॥
ध्यावें नित्य हरीला गावें गुण आननीं[८] सतत वाटे ।
दाटे प्रेम हृदब्जीं तरि मग लागेल भक्तिच्या वाटे ॥ १२ ॥
जों जों भाव दृढावे तों तों भगवत्कृपाचि समजावी ।
समजावी[९] देव तया कीं तन्मतिची[१०] स्पृहा[११] विषम[१२] जावी ॥ १३ ॥
देव दयाळू ऐसा दीनोद्धारार्थ काळजी वाहे ।
वाहे सन्निध तरि कां न भजावें सर्वकाळ जीवा हे ॥ १४ ॥
विनवावें नित्य असें वृत्ती सकला वसोत तव चरणीं ।
स्मरणी हेंचि मना दे होइन कृतकृत्य या शुभाचरणीं[१३] ॥ १५ ॥
वाटो दे हेंचि मना कीं घालावीच नित्य कव[१४] चरणीं ।
भवतरणीं[१५] तेचि अह्मां रक्षक वीरासि जेविं कवच रणीं ॥ १६ ॥

---

१ निष्कपटपणानें. २ सर्व साक्षी असल्यामुळें ज्याला अगोदरच सर्व दिसत आहे, त्यालाच नांव घेऊन जर हांक मारली तर तो करुण दृष्टिनें पाहील यांत शंका नाहीं. वामन पंडित:— ‘ आधींच साक्षि सकळासहि पाहताहे । जो नाम घे करुण होउनि त्यास पाहे ॥ ’ ३ जागा. ४ बंदीशाळा. ५ विचार करा. ६ दूर करा. ७ ज्या परमात्म्याचा. ८ मुखानें. ९ समजूत घाली. १० ज्याचा दृढभाव झाला त्याच्या बुद्धिची. ११ इच्छा. १२ दुष्ट वासना. १३ शुभ आचरणानें. १४ मिठी. १५ संसार तरून जाण्यास

पडलों असे प्रवाहीं भवनदिच्या[1], त्वरित धांव बा पाहे ।
दीनजनावन[2] करणें होय न अन्यासि कार्य बापा हें ॥ १७ ॥
संकटकाळीं भक्तां पावसि हें ब्रीद ऐकिलें कानीं ।
सत्य करुनि दावावें नागविलें बंधुदारलेकांनीं ॥ १८ ॥
काकुलती नच करितों जरि भवपाशांत मी न सांपडलों ।
रडतों मनीं कशाला दीन जळावीण मीनसा पडतो ॥ १९ ॥
परि काय करूं देवा षड्रिपुंनीं[3] स्पष्ट घात हा केला ।
बुडतों भवांबुडोहीं[4] तुजविण पावेल कोण हाकेला ॥ २० ॥
दृढतर निश्चय आतां प्रभुजी मन्मानसेंचि हा केला ।
कीं अळवावें तुजला भक्तांच्या गुंतलासि भाकेला ॥ २१ ॥
झालों त्रस्त ह्मणुनियां आठवितों नित्य याचि पायांस ।
सायास अन्य न घडे अनुसरलों सुलभ या उपायास ॥ २२ ॥
आहे हेत मनाचा पुरवाया तूंचि एक क्षम[5] असती ।
वाणी तुझीच देवा अंतःकरणींहि स्पष्ट तूं वससी ॥ २३ ॥
भावें या गुण गातों तूंचि प्रासादि वर्ण सुचवीसी ।
सुचवीसी[6] घालुनियां प्रेमळजनमानसांसि रुचवीसी ॥ २४ ॥
यों दृढ विश्वासावरि मग पडलें वांकुडेहि यमकास ।
नाम निरंतर वदनीं येतां घालील काय यम कास ॥ २५ ॥
ज्यांत हरीचे गुणगण दोष न त्या देति साधु कवनासी ।
भवनाशीं लक्ष सदा त्यांचें, करितील कां न अवनासी ॥ २६ ।

१ संसाररूपी नदीच्या. २ दीन जनांचें संरक्षण करणें. ३ काम, क्रोध, इत्यादि सहा शत्रूंनीं. ४ संसाररूपी पाण्याच्या डोहांत. ५ समर्थ. ६ सु-चवी—चांगली रुचि. ७ साहित्य शास्त्राचा असा नियम आहे कीं यमक प्रास इत्यादि दोषांनीं युक्त असी जर कविता झाली तर कवीला यमपुरी पाहावी लागते. त्याला उद्देशून कवीनें ही आर्या लिहिली, व मी तुझ्या वर निष्ठा ठेऊन कविता करीत आहे ह्मणून त्या कवितेंत जरी दोष असले तरी मला यमाची भीति नाहीं असें कवी ह्मणतात. ८ रक्षण.

कवनाची गाति नेणें तरि मी लागेन साधुंच्या पायां ।
वायां हेतें[1] न करितां देतिल दावूनि मार्ग सोपा या ॥ २७ ॥
वाटे पूर्ण भरंवसा मजला त्यांची कृपाच तारील ।
वारील भवजलातें भीति मनाचीहि दूर सारील ॥ २८ ॥
मग निर्भय चित्तानें गाइन हरिच्या गुणांसि बहुधा मी ।
सज्जनपदप्रसादें उद्धरले अज्ञ जनहि बहु धामीं[2] ॥ २९ ॥
आहे मन या वाटे तरि वाटेनाचि भरंवसा याचा ।
कीं याचा हा राहिल प्रभु चरणीं नित्य भरं[3]वसायांचा[4] ॥ ३० ॥
चंचलता अति याची, यांची[5] विषयादि भोग भलतेची ।
चळतेंचि[6], प्रभु-चरणीं वसणें तरि या जिवासि बल तेंची ॥ ३१ ॥
कथिलें जरि बहुतर तरि बहु तरंतरि[7] या जिवासि विषयाची ।
याची[8] तेंवि दिसे परि सांडुनि अमृतासि जेंवि विष याची ॥ ३२ ॥
याकरितां हे देवा हेवा न करोचि हा सदा साचा ।
साचा तूंचि कळाया, करि या दासासि दास दासाचा ॥ ३३ ॥
नाहीं तरी पतगसा[9] धांवे दीपावरी मरायातें ।
यातें कोण निवारी सांगें तुजवीण रामराया तें ॥ ३४ ॥
बहुवार जन्ममरणा भोगुनियां कष्टला तरी गायें[10] ।
विषयातेंचि, वळेना दे जैशी कष्ट लातरी गाय ॥ ३५ ॥
लावावें सुपथीं या, हीच असे हे दयाकरा विनती ।
प्रणतिप्रिय तूं भगवान् सांडुनि कवणास क्या करावि नंती[11] ॥ ३६ ॥
प्रभुजी घाल हवाला सुजनांचा, तरि पडावया पायां ।
आहे सिद्धचि, तेही करितिल करुणार्द्र दूर तापा या ॥ ३७ ॥

---

१ इच्छा. २ धरीं ( संसारांत राहून ). ३ दृढ इच्छा. ४ राहण्याचा. ५ यांचा करी. ६ चलन पावतें. ७ तळमळ. ८ त्या चरणाचा अन्वय असा:–'याची तेंवि परि दिसे जेंवि अमृतासि सांडुनि विष याची.' याची अशी रीत दिसते कीं, जसें अमृताला टाकून विष मागावें. ९ पतंगासारखा. १० गायन करी. ११ नमन.

परि अवधी अत्यल्पाचि ह्मणवुनि भीती मनासि बहुतर ती ।
वाटे, वाटेसि कसा त्या मी लागेन जन बहू तरती ॥ ३८ ॥
ठेवा अभयकरातें शिरिं याच्या, त्वरित कार्य साधेल ।
बाधेल भव कशाला ? सहजचि सन्मार्ग यासि लाधेल ॥ ३९ ॥
धरिली त्या समयाची आस मनीं पुरविणार तूंचि हरी ।
धरिशी रूपें बहुधा वात्सल्यें, भवभयासि त्वरित हरी[1] ॥ ४० ॥
दीनानें हीनानें विनवावें काय तुज तरी गावें ।
धांवे पावें द्यावें दर्शन दासासि वंदितों भावें ॥ ४१ ॥
टपतो काळ निरंतर ग्रासायाचा मनीं धरुनि भाव[2] ।
होइल काय प्रभुजी दीनाचा या स्थळीं मग निभाव ॥ ४२ ॥
झाली अधीरता बहु ह्मणवुनि करितों पुनःपुन्हां नतिला ।
यावें, दर्शन द्यावें, पावें त्वत्प्रेक्षणें जगद्राति[3]ला ॥ ४३ ॥
त्यांत तुह्मां हा भारी जड गमला कांय काय ताराया ।
तरि गज[5]पतिचें आणा वृत्त मनीं सकल-देवता-राया ॥ ४४ ॥
काळाचें भय पोटीं येतां होतोंचि घाबरा जीव ।
यास्तव दयार्द्रचित्तें दावावें त्वरित पादराजीव[6] ॥ ४५ ॥
काल जगद्रक्षक तो, यांची[7] धरणार भीड काशाला ।
योजीलचि मत्कंठीं अवधी सरतांचि तूर्ण पाशाला ॥ ४६ ॥
धांवा, पद या दावा, भावानें विनवितों, नसे कावा ।
ठावा दास असावा, घेतों नांवा, न दूर टाकावा ॥ ४७ ॥
होईल कृपाचि जेव्हां नाहीं धरणार भीति यम कां ही ।
यमं[9]कांहीं गुण वर्णिन जरि मज ठावा नसे नियम कांहीं ॥ ४८ ॥

---

१ हरण करी. २ हेतू. ३ चंचलगती, चतुर्थ चरणाचा भावार्थ–तुझ्या दृष्टीनें चंचल स्थिति नाहींशी व्हावी ह्मणून. ४ देह. ५ गजेंद्राचें. ६ पदकमल. ७ साक्षी. ८ ढोंग. ९ आर्या २४ वरील टीपेंतील नियम पाहावा. कवीनें ती कल्पना येथें जास्त स्पष्ट केली आहे. कवी ह्मणतो तुझी कृपा झाल्यावर यमच मला भिणार आहे. तेव्हां जरी मला काव्याचे नियम माहीत नाहींत तरी मी निर्भयपणानें वाटेल तशा यमकांनीं तुझे गुण वर्णन करीन. १० यमकांनीं.

तोंवरि लावा सुपथीं देंउनि दीनासि या सुमति कांहीं ।
रति[1] कांहीं उपजाया वाटचि देवा अनन्यगतिका ही ॥ ४९ ॥

मग कां तरि ही राहिल भीती मन्मानसांत जी भरते ।
भरतें प्रेमासि[2] न कां येइल, नामीं अखंड जीभ रते[3] ॥ ५० ॥

गिरिवासिस्तव–आर्या झाल्या संपूर्ण याचि पन्नास ।
प्रभुनें स्वयें विरचिल्या गातां करितील भवविपन्नास[4] ॥ ५१ ॥

त्याचा तोचि वदवितो कैचें सामर्थ्य पामरा जीवा ।
करितो कृतार्थ दासा चित्तीं वसवूनि पादराजीवा[5] ॥ ५२ ॥

---

१ या आर्येचा भावार्थ–यमाला माझी भीति वाटेपर्यंत मला कांहीं सुमति देऊन सन्मार्गाला लावा. कारण तुझ्या स्तवनाची प्रीती मनांत उपजण्याकरितां देखील तुझी कृपा हीच केवळ एक वाट आहे दुसरी नाहीं. २ प्रेम. ३ रमते. ४ संसार-संबंधी विपत्तीचा नाश. ५ पदकमला.

# श्रीहनुमंत प्रार्थना.

( यांत कवीनें शंका समाधान फार उत्तम तऱ्हेनें केलें आहे. )

---

## आर्या.

वा मारुते दयाळा तारावें या भवाब्धि[1]पतितासी ।
घालिति औदार्यें बहु भोजन समयीं अल्यासि अतितासी ॥ १ ॥
श्रीरामें तरि तुजला जनकल्याणार्थ ठेविलें मागें ।
मांगे[2] तें पुरवावें, भजका धावें न काय तो मागे ॥ २ ॥
घेसी नाम जयाचें त्यां रामाचीच नाममुद्रा[3] ही ।
वाहे दास मुखीं कीं उतरुनि देणार भवसमुद्रांही ॥ ३ ॥
मुद्रां कीर्तकासि[4] सत्वर तारावें हा निदेश रामाचा ।
आहेचि, तरी मग तो करणें बहु वेळ काय कामाचा ॥ ४ ॥
नामाचा महिमा जरी आहे अद्यापि, तरिच तार[5] कसा ।
तारक[6] सारे ह्मणती न दिसे यालाचि तो उतार[7] कसा ॥ ५ ॥
जरि[8] ह्मणसी भावानें नाम न घेईल तो कसा तरतो[9] ।
तरि तो नसेल कथिला. राम दयाळूच. दे न अंतर तो ॥ ६ ॥
पाहुनि मुद्रा प्रभुची तारावें तूर्ण[10] बहु बरें दिसतें ।
उपकृति घडे जनावरि मानावे कां न बहु बरे दिसं[11] ते ॥ ७ ॥

---

१ भवसमुद्रांत पडलेल्यास. २ मागेल. ३ कवी अहोरात्र **"आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदां × ×"** हा प्रसिद्ध श्लोक नेहमीं ह्मणत असत. ४ नामस्मरण करणारास. ५ उद्धार कर. ६ तारणारा. ७ उतरून जाण्यास मार्ग. ८ भावार्थ—असें ह्मणशील कीं, जो नाम घेत नाहीं तो कसा तरावा? तर असा कोणाही रामप्रभुनें सांगितला नसेल. कारण तो दयाळू आहे आणि कधींही कोणाला अंतर देत नाहीं. ९ उद्धरून जातो. १० सत्वर. ११ दिवस—या आर्येचा अर्थ असा दिसतो कीं, ज्या दिवशीं जनांवर उपकार होतो ते दिवस चांगले कां बरें मानूं नयेत ? शिवाय प्रभुची मुद्रा 'आर्या ३ मध्यें सांगितलेली' पाहूनि तारावें हेंच ठीक आहे.

या भवपारोवारीं[1] मार्गचि दिसता, कशास मग नमितों ।
क्रमितों मार्ग सुखें, परि शक्य[2] तरायासी बा असे न मि तो ॥८॥
यास्तव दया करुनियां तारावें या दिनासि, इच्छितसें।
इच्छित सेवन करविसि अन्यहि देईल काय इच्छि तसें ॥ ९ ॥
तुज वांचुनि इतरांतें प्रार्थुनि होणार काय सांग मला ।
विमलांतःकरणानें तारिसि ऐसाचि भरवंसा गमला ॥ १० ॥
परि लाविसी उशिर, याकरितां थाराहि संशयें धरिला ।
कीं तारुनि इतरांतें दीनाचि अद्यापि कां न उद्धरिला ॥ ११ ॥
आहे श्रुत रामानें तुजला या योजिलें असे कामीं ।
कामीजनांसि तारिसि, सांगे त्यासमहि वा नसे कां मी ॥ १२ ॥
किंवा पापि[3] मुखीं या बसली मुद्रा ह्मणूनि तिज लागीं ।
आली उणीवता तरि दिधली त्या प्रभुवरेंचि मजलागीं ॥ १३ ॥
नामचि घेतां प्रभुचें तरती सर्वत्र हें जगा ठावें ।
तरि उद्धरणा[4] अपुल्या जाउनि कवणासि आजि गांठावें ॥ १४ ॥
वाटे या नामाला झाले बहु दिस ह्मणूनि गुण त्यजिला ।
तरि होईल व्यर्थ कसें नामचि वदनीं धरुनि प्रभु यजिलां[5]॥ १५॥
नामें[6] मुखीं असल्यावरि मग तो पापी असो नसो, सुकृती[7] ।
विकृती होइल कैसी धरिली ज्यानें सुसाधुची प्रकृती[8] ॥ १६ ॥

---

१ भवसागर तरून जाण्याला. २ तिसऱ्या चरणाचा भाव–मार्ग असला तरी मी तो तरावयास समर्थ नाहीं ३ कवीचें आडनांव पतकी आहे. पतकी व पातकी एकच, अर्थ घरून कवी ह्मणतात कीं, या मुखीं पापी मुद्रा–पतकी नांव आहे ह्मणून उणीवता आली असें ह्मणाल तर तें नांव मला प्रभुनेंच दिलें आहे. ४ उद्धार करण्याकारितां. ५ पूजिला. ६ या आर्येचा भावार्थ–मुखांत नाम असल्यावर मग तो पापी असो अथवा नसो त्याला सुकृतीच गणावा. चांगल्या साधूचें सोंग जरी आणलें तरी त्यापासून विकृती कशी होईल ? होणार नाहीं. त्यापासून त्या सोंगाड्यास फायदाच होईल. ७ पुण्यवान. ८ सोंग.

ग्रंथालय नं. ५६ 
ता.

प्रभुचें नामचि तारी, वारी भवबंध, आपदा[1] हारी[2] ।
मारी रिपुषट्कातें[3], बसवी नेऊनि सुरवरा-हारीं[4] ॥ १७ ॥
कां गेला नामाचा गुण, न कळे जाहलें कसें विरसं[5] ।
सुरसपणाही[6] त्यजिला, करितें दासासि कां असें विरस[7] ॥ १८ ॥
किंवा वदलों स्वमुखें 'घेतों नामासि रामरायाच्या'
गर्वोक्तिस्तव लपल्या तुमच्या युक्ती दया करायाच्या ॥ १९ ॥
तरि हें मन्मूर्खत्व, प्रभु तू दोषज्ञ[8] जरि असा असती ।
जगदुद्धारालागीं होउनियां सिद्ध मग कसा बससी ॥ २० ॥
आलों अनन्यभावें शरण तुला हा भवाब्धि उतराया ।
उतराया तूंचि क्षम तरीचें[9], ह्मणती जनासि उतरा या ॥ २१ ॥
प्रभुनें अंतर न कधीं दिधलें भजकां असेंचि जन गाती ।
जाती[10] न पाहिली कीं गोष्टहि ठावी असेल तुज गा, ती ॥ २२ ॥
प्रभुला[11] जें प्रिय असतें त्याचा स्वीकार सूज्ञ जन करिती ।
तूं तरि प्रियपात्रचि कीं, त्यागावी काय सांग जनकरिती[12] ॥ २३ ॥
प्रभुचा भाव असा कीं सर्वांवरि सारखी दया करुनी ।
तारावें दीनजनालागीं भवसिंधुमाजि करें[13] धरुनी ॥ २४ ॥
या करितांचि चिरंजिव करुनि तुला ठेविलें असावेंची ।
वेंची[14] प्राणाचि अपुले, तरि तो जन-पातकें कसा वेंची ॥ २५ ॥

---

१ कष्ट. २ हरण करतें. ३ कामक्रोधादि सहा शत्रूंस. ४ सुरवरांच्या पंक्तींत ५ रसरहित. ६ गोडी. ७ खट्टू. ८ दोषज्ञ-विद्वान् विपश्चित् दोषज्ञः-अमरकोश. ९ समर्थ नौका. १० जात. ११ भावार्थ-प्रभुला जें आवडतें त्याचा स्वीकार शहाणे लोक करतात. तूं प्रभुला प्रियच आहेस ह्मणून आमच्या वाडवडिलांनीं तुझें अवलंबन केलें आहे. मग ती रीत मी आतां कशी सोडावी ? १२ वडिलांची रीत. १३ हात. १४ आपले प्राणच जो वेंचूं लागतो ह्मणजे आपल्या' प्राणांचीच जो पर्वा करतो तो दुसऱ्यांच्या पातकांचें निरसन कसें करील ? जनांचीं पातकें वेंचून काढून टाकण्यांत प्राणांचीही पर्वा करणार नाहींस ह्मणूनच तुला चिरंजीव करून ठेवलें असावें-असा भाव.

जगतीवरि[1] या राहुनि दुरितें[2] जनांचें समस्त वारावें ।
तारावें पतितांसी, दिवस अशा सुक्रमेंचि सारावे ॥ २६ ॥
तरिहि उपेक्षा करिसी यांचें मज फारसें नवल वाटे ।
कीं[3] वाटेवरि असतां जावें अनभिज्ञ[4] काय अडवाटें ॥ २७ ॥
रामप्रभुला ऐसी अलक्षंता[5] काय गोड वाटेल ।
दाटेल प्रेम हृदयीं, तुज विषयीं मात्र चित्त फाटेल[6] ॥ २८ ॥
जरि ह्मणसी प्रियकर मी प्रभुचा, मज अन्य काय करणार ।
तरि तो असे दयाळू, करितां बोभाट हात धरणार ॥ २९ ॥
यापरि[7] वदतांचि घडे त्वदतिक्रम-दोष काय सामान्य ।
निंदास्पद झाल्यावरि प्रभुला होइल तरी कसा मान्य ॥ ३० ॥
त्वदतिक्रमेंचि घडतें कारण प्रभुलागिं अंतरायाचें ।
याचें फल तेंचि सदन पहावें लागेल अंतकायाचें ॥ ३१ ॥
न वदावें म्यांहि असें परि झाली बहु अधीरता[8] यासी ।
तव पदयुगुलीं व्हावें सुकृतचि निर्मळ अधीं रतायासी[10] ॥ ३२ ॥
उरली अवधी किंचित् यालागीं चित्त घाबरें होतें ।
हो[11] तें[12] उद्धरले जन, ह्मणतां वाटे न या बरें हो तें ॥ ३३ ॥
घडि घडि नाश वयाचा होतो, नाहींच भरंवसा याचा ।
तुझिया पायां वांचुनि ठाव दिसेनाचि मज वसायाचा[13] ॥ ३४ ॥

---

१ पृथ्वीवर. २ पातक. ३ भावार्थ—मी वाटेवरच असतांना, जसें काय ठाऊकच नाहीं अशा रीतीनें, आड वाटेनें निघून तूं जावेंस काय? ४ अज्ञानी. ५ हेळसांड. ६ बिघडेल ७ वरील आर्येमध्यें कवीनें हनुमंताला अलक्षतेबद्दल दोष दिला. पण, पुढें कवी ह्मणतो, हा दोष देण्यांतही मी तुमचा अतिक्रमच करीत आहे, आणि अशा तऱ्हेच्या अतिक्रमानें निंदास्पद झाल्यावर प्रभुची कृपा होणार नाहीं, व यमाचें घर पहावें लागेल. तथापि कवी आर्या ३२ मध्यें ह्मणतो, मी तरी काय करूं? मी तुह्माला असें बोलूं नये, पण—८ अमर्यादा. ९ यमाचें. १० रममाण होण्यास. ११ अहो १२ पुष्कळ लोक. अन्वय—होते जन उद्धरलें ह्मणतां या तें बरें न वाटे हो. अर्थ—अहो पुष्कळ लोक उद्धरले असें जर ह्मणाल तर तें मला बरें वाटत नाहीं हो. १३ राहण्याला.

तारिसि अन्य जनाला, दाखवि यालाहि तो उपाय बरें ।
काय बरें ते तारिति एका अन्या न तेचि पाय बरें ॥ ३५ ॥
दोष[1] न तो पायांचा; याचा यालाचि भाव हा फळतो ।
मळतो अंतःकरणें, त्या लागीं शोध, काय हा कळतो ? ॥ ३६ ॥
नसतों अपराधी मी अप[2]राधी कासया मनीं धरितों ।
करितों चित्त विमल तरि तूंही ह्मणतासि आजि उद्धरितों ॥३७॥
काय करावें म्यां तरि, स्थिरता नाहींच या मना हो ती ।
होती शुद्धी तरि मग सहजाचि संपूर्ण कामना होती ॥ ३८ ॥
चंचलता अति याची, झालों असमर्थ आवरायाला ।
याला पुसतों हें कीं झालें तुज काय बाव[3]रायाला ॥ ३९ ॥
ह्मणतों मनासि बा तूं जीवाला बंधमुक्तहेतु[4]कर ।
हें तूं कर कार्य[5] सख्या रामाच्या दर्शनासि हेतु कर ॥ ४० ॥
होइल कृतार्थता तरि भेटहि देईल राम तो यातें ।
मग तें काय अशक्याचि उतरुनि जाणें भवाब्धितोयातें[6] ॥ ४१ ॥
तरि निश्चलता न धरी मन, याचें पूर्व कर्म बळकट कीं ।
वळ कटकीं[7] एकाचें चालेना, गोष्ट ही नसे लटकी ॥ ४२ ॥
या करितांचि सहाया सन्मति या लागिं दे दया-निलया[8] ।
विलयां[9] जाइल पातक होइल संशुद्धि मानसीं किलें[10] या ॥ ४३ ॥
अंतचि बघसी जरि तूं धीर नसे यास हें मनीं आण ।
जाणसि अंतर तरि मग वाहुनि सांगूं कशास मी आण ॥ ४४ ॥

---

१ ही शंका स्थापित करणारी आर्या दिसते. कवी ह्मणतात तुह्मी ह्मणाल तर कवी उत्तर देतात कीं हा पायांचा दोष नाहीं. याचाच भाव याला फळतो. ‘ यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ’ मनानें हा मळतो. त्याला अगोदर शोध. शुद्ध कर. तर कवि उत्तर देतात कीं ही गोष्ट याला काय कळते ? २ कुबुद्धि. ३ चंचल होण्याला. ४ बंधाला व मुक्तीला कारण. ५ इच्छा. ६ संसार समुद्राचें पाणी. ७ सैन्यामध्यें. ८ दयेचें आगर अशा. ९ नाहींसें होईल. १० खरोखर.

जरि ह्मणसी " अधिर असा होउनि वदतोसि फार धीटपणें
तरि हा दोष न याचा काळाचें जाचतें मनीं टपणें ॥ ४५ ॥
या लागीं विनवीतों वदलों अतिरिक्त तें क्षमा करिसी ।
धरिसी करीं तसें या भगवंतें तारिलें जसें करिसी ॥ ४६ ॥
दीनत्राणार्थ तुझा अवताराचि या जगीं असें गाती ।
गा ती गोष्ट न लटकी सुरवरमुनिजनमुखीं असे गा ती ॥ ४७ ॥
हरले यत्न सकल, हा झाला बहु दीन, दास सांभाळ ।
भाळलिखित खोडाया शक्ताचि तूं, ठेवितों पदीं भाळ ॥ ४८ ॥
तारावें पतितासी या वांचुनि अन्य कामना नाहीं ।
नाहीं अशक्य, तरि मग तुझिया येणार कां मना नाहीं ॥ ४९ ॥
दृढतर भाव असावा तव चरणीं हेंचि दान दे गा या ।
गा या मति बहु सरसी अनुदिनि भगवत्गुणासि दे गाया ॥५०॥
हनुमंतस्तवनाच्या झाल्या आर्या समग्र पन्नास ।
अनुदिनिं गातां सत्वर तारिति भवसागरीं प्रपन्नास ॥ ५१ ॥
गिरिवासी रामाच्या पदपंकजीं मारुति भ्रमर झाला ।
झाला पूर्ण मनोरथ नमितों मीं त्याचिया पदरजाला ॥ ५२ ॥

---

१ अधिक उणें. २ हातीं. ३ गजेंद्रास. ४ गातात. ५ अगा. ६ नशिबीं लिहिलेलें. ७ मस्तक. ८ इच्छा. ९ शरणागतास. १० पदकमलीं.

# अपराध निवेदन व उद्धारार्थ ईश-प्रार्थना.

[library stamp]

( हें प्रकरण कवीनें वृद्ध वयांत रचलेले दिसतें. यांत कवीच्या चरित्राचे कांहीं कांहीं प्रसंग सुचित केलेले दिसतात. आर्या सोप्या व सरळ आहेत. या आर्या अपूर्ण असाव्यांत असें दिसतें. कारण कवीच्या पद्धती प्रमाणें ' गिरिवासी ' हें पद शेवटीं आलें नाहीं. पण आहेत त्याच कविता फार उत्तम आहेत. )

---

## आर्या.

या सम हा अपराधी दुसरा कोणी नसेल आढळला ।
वळला, तथापि तव पद्मासीपासूनि पुनरपी ढळला ॥ १ ॥
पडलें श्रवणीं याच्या हरिगुण गानेंचि विश्व हें तरतें ।
परि तें सारुनि परतें ग्राम्य गितचि गाइलें निरंतर तें ॥ २ ॥
ऐसे अन्याय किती केले, त्याला नसे मिती कांहीं ।
नाहींच मनीं धरिलें जरि मज उपदेशिलें कितीकांहीं ॥ ३ ॥
केला घात असा म्यां अपुला, कथितों पदासि धीटपणें ।
नीटपणें वदल्यावरि करिशिल तूं ही दया अवीटपणें ॥ ४ ॥
विनवीतों यासाठीं तुजविण कोणी नसे दयाळु बरा ।
ह्मणसिल कदापि न असें 'वृद्धपणीं प्रार्थितो पहा लुबरा' ॥ ५ ॥
झाला अपराध खरा तव पायीं हा निवेदितों सारा ।
सार असारा मानुनि भजलों मीं या अनित्य संसारा ॥ ६ ॥
कळलें स्पष्ट अतां मज कीं बुडतों या भवांबुडोहींच ।
नीच असुनि उद्धरिला हरिनें वार्ता जगीं उडो हीच ॥ ७ ॥
तूं न उपेक्षा करिसी विनवीतों मोकळ्या मनेंचि पदा ।
सुपदासि पाववी मज वारुनिया जन्ममृत्युची अपदा ॥ ८ ॥

---

१ संख्या. २ न कंटाळता. ३ प्रसिद्ध होवो. ४ कष्ट.

आंतर सर्वांचें तूं जाणसि तरि सांगणें हि काशाला ।
पाशालाचि यमाच्या भीतों, दावी पदप्रकाशाला ॥ ९ ॥
वय घालविलें वाया, न सुचे आतां उपाय तो यास ।
काळानें आंवतिलें[१], उतरूं कैसा भवाब्धितोयांस[२] ॥ १० ॥
आठवतें मात्र मनीं देवा सेवा तुझी नसे घडली ।
पडली भ्रांति निरंतर क्षणिक सुखाची स्पृहा[३] असे जडली ॥११॥
लेश सुखाचाहि नसे तरि मन चरणाकडे न लागे हें ।
मागें हेंच अखंडित धन सुत दारा असो मला गेहें[४] ॥ १२ ॥
तरि ही चित्ता जोगें प्राप्त न झालेंचि फळ कधीं हो तें ।
तळमळ शमल्या वांचुनि हरि तव प्राप्ती उगी कशी होते ॥ १३ ॥
असतों अधींच सावध तरि भवपाशांत कासया पडतों ।
परि झालें अमिषानें[५] मीन जसा त्या गळांत सांपडतो ॥ १४ ॥
जरि मज कळलें होतें सत्सहवासें असंख्य जन तरले ।
तरि मोघाशा[६] वळकट यास्तव त्यांचेहि पाय अंतरले ॥ १५ ॥
यत्न न केलाच कधीं मन तव चरणाकडेस वळवाया ।
पळ वायाहि न जावें घालविलें म्यां असें सुवय वाया ॥ १६ ॥
देवा होसि दयाघन मन तव चरितामृतांत दे वाहो ।
लाहो हाचि पुरे मज केव्हां ह्मणसील सांग देवा हो ॥ १७ ॥
केले उपकार तुवां दीनावरि ते न काय मानावे ।
वानावें नित्य, परी स्मरलों नाहींच मीं तुझीं नांवें ॥ १८ ॥
सद्वंशीं जन्म दिला अति दुर्मिळ जें द्विजत्व तेंहि तसें ।
हित सेवन चरणाचें असतांही, मानिलें न तें हितसें ॥ १९ ॥

---

१ बोलाविलें. २ संसाररूपी समुद्राचें पाणी. ३ इच्छा. ४ घरें. ५ मांसाच्या गोळ्याचा लोभ. ६ पोकळ आशा. भावार्थ—सत्सहवासानें असंख्य जन तरले हें जरी मला कळालें तरी पोकळ गोष्टींची आशा मनाला बळकट लागलेली होती ह्मणून त्यांचेही पाय अंतरले.

पुर्विल कर्मे देवा आलों उदरासि मी स्वजननीच्या ।
वांचविलें त्वां तेथें रक्षुनि प्राणासि याहि जन नीच्या ॥ २० ॥
सांगावें दुःख किती, उपमा नाहींच द्यावया जगतीं ।
करिसी दया सदय तूं ह्मणवुनि प्राणी अशा स्थळीं जगती ॥ २१ ॥
कां न कृतघ्न ह्मणावा मळमूत्रामाजिं वास जंव घडला ।
स्मरला नित्य कसा हो बाहिर येतांचि कां विसर पडला ॥ २२ ॥
काय स्वतंत्रपणा तथिं होता संप्राप्त जाहला यासी ।
केवळ लुलितवपुच कीं नव्हतें सामर्थ्यही हलायासी ॥ २३ ॥
तरिही मातेच्या स्तानें पय निर्मियलें अशांसि वांचाया[1] ।
मोहें माता पाजी, नसतां तरि सोसिती न जाचा या ॥ २४ ॥
समजावी बहु रडतां क्षणहि उपेक्षा करीच ना मा[2]या ।
वायां श्रम कां करि ती वाटे संपूर्ण ही तुझी माया ॥ २५ ॥
मायेनें जग पाळिसि स्पष्टचि दिसतें समस्त लोकांस ।
जरि तव माया नसती पुसती माता कधीं न तोकां[3]स ॥ २६ ॥
ऐसे अन्याय सकळ घालुनि पोटांत पाळिलेंस मज ।
झालों थोर क्रमानें आली कांहीं हळूं हळूं समज ॥ २७ ॥
तेव्हांहि हा न वळला भर तारुण्यांत का[4]यदे वाची ।
सेवा वृद्धपणांतचि ह्मणवुनि निःशंक काय देवाची ॥ २८ ॥[5]
सोडुनि पाय तुझे हरि भजलों कीं त्या धनांध लोकांस ।
वोकां[6]स खर्चिलें धन पाळाया आप्त-दा[7]र-तोका[8]स ॥ २९ ॥
सद्व्यय नसेचि घडला देवातिथिपूजनाचिया कामीं ।
विन्मुख होऊनि सदा स्मरला वेश्यादिकांसि हा का[9]मी ॥ ३० ॥

---

१ वांचतात. २ माता. ३ मुलांस. ४ कवी कमीशनरचे शिरस्तेदार होते. त्या वेळेस त्यांनां कायद्याचा अभ्यास करावा लागे. त्याला अनुलक्षुन हें आहे. ५ अन्वय,–देवाची सेवा वृद्धपणांतचि ह्मणवुनि काय निःशंक, अर्थ–देवाची सेवा ह्मातारपणींच करावी असें ह्मणून जणूं काय हा निःशंक बसला. ६ घरास. ७ स्त्री. ८ मुलांस. ९ कामातुर.

होती काय जरा बहु दूर, तिनें गांठिलेंचि मग या हो ।
अवधी सरतां नेतिल ह्मणातिल यमदूत काय मग याहो ॥ ३१ ॥
यासाठीं बहु भीतों देवा तुजला असो दया माजी ।
उरली अवधी किंचित् जप तप होणार काय या माजी ॥ ३२ ॥
दावी उपाय सत्वर नसतां बुडतोंचि पापडोहांत ।
उद्धरिले जन पुष्कळ या दीना तोंचि सांपडो हात ॥ ३३ ॥

### पृथ्वी छंद.

जसा भ्रमर[2] सारसा[3] हुडकितो[4] तसा हा जन[5] ॥
प्रभो द्रवुनियां[6] करा स्वपद[7]–सारसा–भाजन ॥
असे न गति या दुजी पदरजीं[8] धरी आसरा[9] ॥
मरेल मिन[10] घातिल्या मधु दुधाचिया ही सरा[11] ॥ १ ॥

---

१ माझी. २ भिंगोटा. ३ कमलास. ४ शोधून काढतो. ५ हा दास. ६ दयार्द्र होऊन. ७ आपल्या पदकमलीं रहाण्यास पात्र. ८ चरण–धूलिकेंत. ९ आश्रय. १० मासा. ११ सरोवरांत. या चरणाचा अर्थ,–मधाच्या अथवा दुधाच्याहि सरोवरांत मासा टाकला तरी तो मरेल.

# मल्हारि आख्यान.

## कथा-सारांश.

मणी व मल्ल असे दोन राक्षस ब्रह्मदेवानें दिलेल्या वरामुळें पृथ्वीवर फार उन्मत्त झाले होते. त्यांनी गाई व ब्राह्मण यांनां फार त्रास दिला. तेव्हां ब्राह्मण त्रस्त होऊन इंद्राकडे गेले, व त्यास त्यांनीं आपली हकीकत सांगितली. इंद्र ब्राह्मणांसह वैकुंठीं गेला. व त्यानें सर्व हकीकत श्रीविष्णूस सांगितली. विष्णूनें सांगितलें कीं, ते राक्षस महादेवाशिवाय मरावयाचे नाहींत. नंतर सर्व कैलासास गेले, व त्यांनीं सर्व प्रकार श्रीशिवास निवेदन केला. शिवानीं त्या राक्षसांचें पारिपत्य करण्याचें अभिवचन दिलें; व प्रेमपुरास, म्हणजे बिदरा नजीक मैलार म्हणून खंडोबाचें स्थान आहे तेथें, अवतार घेऊन त्या दैत्यांचा वध केला. ही कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

आद्ययुगीं मुनिपुंगव[1] असती मणिचूल पर्वतां शिखरीं ।
तपती तीव्र, जयांची भीती होणार वासवासि[2] खरी ॥ १ ॥
ऐसें असतां समयीं आले मणिमल्ल यातुधान-पती[3] ।
आज्ञा करिति वळांतें[4] विप्र-च्छलनार्थ ते महाकुमती ॥ २ ॥
करिती घोष महा ते छेदिति निकुरें[5] महीरुहांस[6] तदा ।
झळकति शस्त्रें उज्वल मिश्रित अर्कांशु-मंडलें[7] शतदा[8] ॥ ३ ॥
पाश गळां घालुनियां भूसुर[9] वापींत[10] मज्जिले[11] सकल ।
तर्जुनि[12] तत्वाळांतें द्विजवनितालाहि ते करिति विकल ॥ ४ ॥
कर्म करुनियां ऐसें गेले चंडाळ ते दळासहित[13] ।
करिती विचार द्विज मग योजावें काय निजकुळास हित ॥ ५ ॥

---

१ मुनिश्रेष्ठ २ इंद्रास. ३ राक्षसांचे स्वामी. ४ सैन्याला ५ निकरानें. ६ झाडें. ७ सूर्य किरणांची मंडलें यांनीं ८ अनेक वेळ. सूर्य किरणाचें प्रतिबिंब व पुनः त्यांचें एका शस्त्रांतून दुसऱ्या शस्त्रांवर पडलेलें प्रतिबिंब, याप्रमाणें अनेक प्रतिबिंबांनीं मिश्रित झाल्यामुळें त्यांचीं तीं शस्त्रें उज्वल दिसत होती. असा भावार्थ. ९ ब्राह्मण. १० विहिरींत. ११ बुडविले. १२ कापून टाकून. १३ सैन्यांसह.

ले कष्ट बहुतसे त्राता नाहींच कीं अहो जगतीं ।
दिकां अनावर भूपति समरांत काय हो जगती ॥ ६ ॥
शापुनि भस्म करावें हानि तपाची निशंक होणार ।
यास्तव भितों चित्तीं अभय तरी आजि कोण देणार ॥ ७ ॥
झाले यापरि सारे भय-विव्हल मानसीं धरामर[1] ते ।
करिते कोण तयाला परतें[2] जरि लंघुनि कडा[3], मरते ॥ ८ ॥
दुःखाकुल मुनिवर ते घेउनि स्वकुटुंब धेनु कळपाला ।
जाती स्थलांतरातें मिळविति काष्ठें पलाशें[4] मुळ-पाला ॥ ९ ॥
घाला घालायाला येतिल मंडप उगाचि हो घाला ।
नव्हतें श्रुत दृष्ट कसें आणिलें विधिनें तसेंचि ओघाला ॥ १० ॥
तेथुनि अमरावतिला जाउनियां कळविती सुरेशांही[5] ।
कीं व्हावें अजि दर्शन भाळीं होती असी सुरेशा[6] ही ॥ ११ ॥
देव ह्मणे काय कसा झाला वृत्तांत तो अर्थी कळवा ।
तप तेज बहू तुमचें झालिं शरीरें असीं कसीं पळवा[7] ॥ १२ ॥
ह्मणती मुनि अमरेशा काय वदों त्या श्रमां सिमा नाहीं ।
नाहीं घडलें ऐसें जगतीवरि गोष्ट तथ्य माना ही ॥ १३ ॥
येउनियां मणिमल्लें देवा संत्रासिलें[8] न तें कथवें ।
होते राक्षस पुष्कळ भीषणरूपीं सवें[9] अनेक थवे ॥ १४ ॥
व्हावा नाश तयांचा आलों प्रार्थावयासि या करितां ।
होइल सुकीर्ति देवा दीन जनांला करांबुजीं धरितां ॥ १५ ॥
बोले पुलोमजांपति[10] विधि-वरदानें अजिंक्य ते असती ।
यास्तव श्रीहरिलागीं प्रार्थावें युक्तिही वरी दिसती ॥ १६ ॥

---

१ ब्राह्मण. २ निवारण. ३ कडेलोट करून घेऊन जरी त्यांनीं आपले प्राण दि
असते तरी त्यांनां निवारण करणार होते. ४ इंधन, पळसाच्या मुळ्या आणि पाल
५ इंद्राला. ६ चांगली रेघ. ( सुरेषा ) आपलें दर्शन व्हावें अशी आज आमच
कपाळीं चांगली रेषा होती. ७ क्षीण. ८ फार त्रास दिला ९ बरोबर. १० इंद्र.

मग ते द्विजवर तेथुनि जाती नारायणां कथायास ।
चित्तीं लगबग सर्वां मानी तरि कोण हो पथायास[1] ॥ १७ ॥
पाहति भूसुर[2] अवघे भद्रासनिं शोभला रमावर[3] हो ।
सृष्टिस्थितिलय कारण सत्ता करणार जो यमावर हो[4] ॥ १८ ॥
दुसरेहि मुक्ति[5]भाजन असती चक्री गदी कमल-धारी ।
अतसीकुसुम[6]समप्रभ पीतांबर नेसले कनकधारी[7] ॥ १९ ॥
पाहुनि जगतिसुरांला[8] उठला सिंहासनावरील हरी ।
नमन करी साष्टांगें नयनीं प्रेमांबुच्या विपुल लहरी ॥ २० ॥
येणें किमर्थ केलें यातायातींत कष्ट बहु पडले ।
धरिलें असेल चित्तीं श्रवणीं तें तूर्ण[9] पाहिजे पडलें ॥ २१ ॥
देवा मणिमल्लांहीं दिधले जे कष्ट त्या तुला[10] नाहीं ।
योग्य न तें कळवाया ऐकायातें तसेंचि कांनाहीं ॥ २२ ॥
देव ह्मणे ते यातुप[11] असती विख्यात हो जगाभितरीं[12] ।
वरदानबळें मानिती देव द्विज भूपही सकळ भितरीं[13] ॥ २३ ॥
आराधिलें विधीला तपः प्रभावेंकरूनि असुरांनीं ।
असती अवध्य सकळां करिल सदाशिव तयास व्यसु[14] रानीं[15] ॥ २४ ॥
जाउनि शिवासि गाठूं वळवूं वृत्तांत सर्व कळवूनी ।
येतों समागमें मी चित्त करा स्वस्थ भीति पळवूनी ॥ २५ ॥
यावरि श्रीहरि संगें गेले कैलास पर्वतावर ते ।
दिधलें अभय शिवानीं इतरांतें दैत्य काय आवरते ॥ २६ ॥

---

१ रस्त्याचे श्रम. प्रवासाचे श्रम. २ ब्राह्मण. ३ विष्णू. ४ होय. ५ मुक्ती ४ प्रकारची आहे. सलोकता त्या लोकास जाणें, समीपता जवळ राहणें, सरूपता विष्णूसारखें रूप प्राप्त होणें, सयोगता एकरूप होणें. यापैकीं सरूपता मुक्ती ज्यांनां मिळाली ते विष्णूप्रमाणें चक्र, गदा, कमल धारण करणारे तेथें होते असा भावार्थ. ६ जवसाच्या फुलांप्रमाणें ज्यांचा वर्ण असे. ७ जरीकांठी. ८ ब्राह्मणाला. ९ लौकर. १० सीमा. ११ दैत्य. १२ जगांमध्यें. १३ भित्री, भ्याड. १४ प्राणरहित. १५ रणांगणीं.

बोले गिरिजावल्लभ[1] जावें निर्भयपणें स्वसदनासीं ।
येउनि सहसेना मी त्या दुष्टांच्या करीन कदनासीं[2] ॥ २७ ॥
पूजा करुनि यथोचित सन्मानें प्रेषिलें द्विजांला हो ।
लाहो[3] त्यालाचि न तो झाला संपूर्ण ही प्रजाला हो ॥ २८ ॥
यावरि प्रभुनें केली क्रोधें निर्माण एक घृतमारी[4] ।
भारी सर्व जगां ती दैत्यचमूला कसी न मग मारी ॥ २९ ॥
घेउनि सेना भारी आले मणिमल्ल ज्या स्थळीं हो ते ।
येती वार्ता ऐकुनि दैत्यहि एकेक वीर बलि होते ॥ ३० ॥
झालें युद्ध प्रबळ त्या उपमा नाहींच द्यावयालागीं ।
चालेल कसी मग तरि कविची विस्तर करावयाला गीं ॥ ३१ ॥
मणिकासुर अधि वधिला, मागे वरदान तो शिवाला हो ।
राहो प्रेत पदतळीं आहे संपूर्ण यांत मज लाहो ॥ ३२ ॥
मल्लासुर मग वधिला तोही वरदान द्या ह्मणे देवा ।
यावें मम नाम अधीं ऐसें अभिधान आपुलें ठेवा ॥ ३३ ॥
वर दिधले मग प्रभुंनीं तोषुनि स्तवनासि दैत्यराजांच्या ।
होत्या[6] मति विपरीता झाल्या शिवदर्शनें विमल जांच्या ॥ ३४ ॥
पंच कुमर मल्लाचे राज्यपदीं स्थापना करूं पाहे ।
परि ते मायकतीं जड केले पर्वत समस्त लवलाहे ॥ ३५ ॥
अवतार प्रभुचा तो ह्मणती मल्लारि देवही ज्याला ।
गोचर सकळांलागीं चंपाषष्ठीस संभ्रमें झाला ॥ ३६ ॥
यात्रार्थ येत सुरगण भूसुर[7] अन्यत्रही प्रजा सकळ ।
भावें पूजिति ज्याचा महिमा ब्रह्मादिकांसही अकळ[8] ॥ ३७ ॥
अज्ञस्थान तयाचें प्रेमें पालीस[9] त्यावरी आला ।
गेला नळदुर्गा मग जेजूरीमाजि तो प्रगट झाला ॥ ३८ ॥

---

१ सदाशिव. २ वधास. ३ सुख, आनंद. ४ या नांवाची एक कृत्या. ५ वाणी. ६ त्यांच्या मती विपरीत होत्या पण शिवदर्शनानें त्या शुद्ध झाल्या असा भाव. ७ ब्राह्मण. ८ न कळणारा. याचा भावार्थ–त्याचें स्थान अज्ञ ह्मणजे माहीत नाहीं असें आहे तो प्रेमानें ह्मणजे भक्ताकरितां पाली नांवाच्या गांवीं आला ह्मणजे तेथें अवतरला. तेथून नळदुर्गी आला व तेथून जेजुरींत प्रकट झाला. ९ पाली नांवाचें गांव आहे.

## याच आख्यानाचीं पदें.

पद्–राग जोगी–त्रिताल. ( मजला वरिल सुभद्रा काय–या चालीवर. )

( ब्राह्मण खिन्न होऊन आपणांसीं विचार करितात. )

व्याकुळ झाले मुनिवर ते, करिती खेद बहू ॥ धृ० ॥ म्हणती अतां करावें काय ॥ धरावें अह्मी कुणाचे पाय ॥ देइल कोण असा प्रभु ठाय[1] ॥ करील न्याय हा अमुचा ॥ १ ॥ रुष्टला[2] कां तरि तो यदुराय ॥ घडला काय असा अन्याय ॥ केलें ब्रीद आपुलें काय ॥ न दिसे ठाय जायासी ॥ २ ॥ दिधले कष्ट स्त्रियांसीं फार ॥ ओढिले धरूनि कबरी[3]–भार ॥ ताडिलीं मुलें अती सकुमार ॥ नाहिं विचार हो त्यांसीं ॥ ३ ॥ बुडाविलें कूपीं[4] अमुचे काय ॥ जीवित आशा होती काय ? ॥ रक्षिता गिरिवासी प्रभुराय ॥ भेटेल काय आजि बरें ॥ ४ ॥

पद्–पिलु–त्रिताल. ( उद्धवा शांतवन कर जा–या चालीवर )

( विप्रस्त्रिया विलाप करतात. )

कां देव क्षोभला नकळे, काय चुकलों अह्मि सेवेला ॥धृ०॥ किति तेज तपाचें यांच्या, मालवलें कैसें बाई ॥ काय सांगावी तरि प्रौढी, मृग व्याघ्रहि एका ठायीं ॥ जलपानालागीं करिती, नसे वैरपणा सहसाही ॥ चाल ॥ तें तप बळ गेलें कोठें ॥ आह्मि दुःख भोगिलें मोठें ॥ दिसें कर्म आपुलें खोटें ॥ पू० चाल ॥ लोटेल काळ तरि कैसा, नाहिं नाश तयांचा झाला ॥ १ ॥ ताडिलें किती बाळांसीं, नाहिं आली करुणा कांहीं ॥ वांपींत[4] बुडविले मुनिला, नाहीं भ्याले ते कवणांहीं ॥ केलें विकळ अह्मां सकळांतें, कांहिं धरिली शंका नाहीं ॥ चाल ॥ भस्मिलें[5] न कांहो त्याला ॥ सोडिलें कसें कितवाला[6] ॥ काय तप बळ नव्हतें याला ॥ पू०

---

१ थारा, आश्रय. २ कोपला, रागावला. ३ केश, वेणी. ४ विहिरींत. ५ जाळिलें, भस्म केलें. ६ दुष्टांला.

चाल ॥ झालाचि घात सर्वस्वीं, नाहीं कोणी त्राता उरला ॥२॥ पूजितों नित्य देवांसीं, सुमसुमनें[1] सद्भावेंसीं ॥ काय विसर पडावा अमुचा, ओढितां धरुनियां केशीं ॥ व्यर्थ हो दयाघन ह्मणती, नाहिं सदयपणा त्यापाशीं ॥ चाल ॥ शयं[2] जोडुनि नमिलें त्यासीं ॥ नाहीं आलि दया त्या कैसी ॥ काय नसे जगीं गिरिवासी ॥पू० चाल ॥ नाशिल कोण दुष्टातें, कां निष्ठुर[3] इतुका झाला ॥ ३ ॥

पद्-त्रिताल.

( ब्राह्मण आपल्याच ठिकाणीं प्रभूची प्रार्थना करितात. )

मुकुंदा कशि करुणा त्यजिली ॥ पाउलें नित्य तुझीं यजिलीं[4] ॥ धृ० ॥ जो भजेल मजला नित्य चालविन योगक्षेम[5] त्याचा ॥ या वचनावरि राहिलों काय हा परिणामचि त्याचा ॥ अनुदिनीं मूर्ति तुझी पुजिली ॥ १ ॥ अह्मि ब्राह्मण बहुताचि दीन पीडिलें दुष्ट जनीं बापा ॥ काय कळलें नाहीं तुला पावलों अति दुर्घट तापा ॥ ही सृष्टि तुवां निर्मिली ॥ २ ॥ तूं ह्मणसी[6] अपुल्या मुखें प्रतियुगीं अवतारचि धरितों ॥ रक्षितों संत सज्जना नाश मी दुष्टांचा करितों ॥ निष्ठुरता अजि कां आणिली ॥ ३ ॥ जरि होय अधर्माचरण स्थापना धर्माची करितो ॥ आहे नेम असा हरि तुझा दवडिला आजचि कां तरि तो ॥ गिरिवासि आस[7] तुझी धरिली ॥ ४ ॥

---

१ पुष्पें, शुद्ध मन व सद्भाव यांनीं. २ हात. ३ निर्दय. ४ पूजिली. ५ योग-नसेल ते, मिळवून देणें. क्षेम-मिळालेल्याचे, रक्षण करणें. " अनन्याश्चितयंतो मां ये जनाः पर्युपासते ॥ तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं ॥ ( भगवद्गीता अ. ९ श्लोक २२ ) या श्लोकास अनुसरून हें कडवें आहे. ६ " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ॥ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ( भ. गी. अ. ४ श्लोक. ८ ) या वचनाला उद्देशून हें व पुढील कडवें आहे. ७ आशा.

पद–साकी

( ब्राह्मण आणखी खेद करितात. )

प्रभो तुह्मारी सुनी प्रतिज्ञा गोब्राह्मण–परिपालनकी ॥ वो आजि छांड दई तुम कैसी दुष्ट–जनन–संहारनकी[1] ॥ १ ॥ कौन हमारो वाली प्रभुजी तुम बिन इस जगतनमो ॥ जाय शरण हम किसे बतलावो देव–धरामर[2]–भूपनमों ॥ २ ॥ मत करियो महाराज उपेछा[3] ब्रीद न छांडो अपनारी[4] ॥ व्याकुळ होत प्राण अब हमको सूख भयो है सपनारी[5] ॥ ३ ॥

पद–( गव्यांनो कृष्णगडी–या चालीवर )

( इंद्र ब्राह्मणास ह्मणतो. )

पूछत मघवा[6] मुनि जनसे ॥ भयो है अगमन अज कहांसे ॥ कहो जो कारन हो अपना ॥ काहेको छांड दियो तपना[7] ॥ मुखश्री म्लान भई सबकी ॥ गई सोभा क्यंबर्कर[8] तनकी[9] ॥ हुई पिडाजि न दुर्जनसे ॥ कहो मत डरियो तुम उनसे ॥ और जो इच्छा हो मनमें ॥ करूं पूरन एक लव पलमें[10] ॥ १ ॥

पद–घनाक्षरी.

( ब्राह्मण इंद्रास ह्मणतात. )

सुनो बासव[11] महाराज ॥ सबहि भूपनके[12] ताज ॥ आये जिस कारन आज ॥ तुह्मे काज बतावूं ॥ १ ॥ असुर दोनों मणिमल्ल ॥ भये मस्त बडे मल्ल[13] ॥ हात जिनके है भल्ल[14] ॥ सदा फुल्ल[15] बदन है ॥ २ ॥ चढे पर्वत मणिचूल ॥ अये सेना संकूल[16] ॥ किये हमको व्याकूल ॥ सबहि कूल हमारो ॥ ३ ॥ सबहि जज्ञके[17] अगार ॥ दिये तोड ताड डार ॥ कहि न बैठनको थार[18] ॥ नहि अधार किसीको ॥ ४ ॥

---

१ संहार करण्याची. २ ब्राह्मण. ३ उपेक्षा, हयगय. ४ आपलें. ५ स्वप्नासारखें. ६ इंद्र. ७ तप करणें. ८ कशामुळें. ९ शरीराची. १० एका क्षणांत, एका निमिषांत. ११ इंद्र. १२ सर्व राजांचे मुकुटमणी. १३ दांडगे. १४ भाल्याप्रमाणें. १५ प्रफुल्लित. १६ सेजेसहित. १७ यज्ञांचीं मंदिरें. १८ जागा.

पद-( गव्यांनो कृष्ण गडी-या चालीवर. )

( ब्राह्मण व विष्णू यांचा संवाद. )

ब्राह्मण ह्मणती जगदीशा[1] ॥ पुरवि आलों धरूनी आशा ॥ धृ० ॥ असुर[2] मणिमल्ल जगीं असती ॥ इंद्रादिकांसि नावरती ॥ काय मग भूपांची गणती ॥ शर्म[3]-श्रवणें बहु घाबरती ॥ करि तूं हरि त्यांच्या नाशा ॥ १ ॥ पीडिलें प्रभु त्या असुरांनीं ॥ रक्षिलें तुवांचि असु[4] रानीं[5] ॥ पुरविलें लक्षहि न सुरांनीं[6] ॥ करणें काय भूसुरांनीं[7] ॥ प्रार्थितों ह्मणउनि कमलेशा[8] ॥ २ ॥ वर्तन तुला सकळ कळतें ॥ मनाहि तुझें कीं कळकळतें[9] ॥ जगीं या यातुप[10] अविकळ[11] ते ॥ कोण मग अशासि आकळते[12] ॥ विनवुनि काय सुराधीशां[13] ॥ ३ ॥ ह्मणे हरि जाउनि कैलासीं ॥ विनवूं प्रभु तो गिरिवासी ॥ त्याविण अजिंक्य सकळांसीं ॥ दिधला वर विधिनें[14] त्यांसी ॥ येइल करुणा सर्वेशा[15] ॥ ४ ॥

पद-( काफी-भोलानाथ दिगंबर-या चालीवर. )

( विष्णू शंकरास ह्मणतो. )

सुनियो विनती हमारि ॥ नाथ तुम ॥ धृ० ॥ मस्त भये मणिमल्ल जगतमों उनको कौन संहारे[16] ॥ नाथ ॥ १ ॥ ब्रह्मानें वरदान दियो है मृत्यु नहीं औरनसे[17] ॥ नाथ ॥ २ ॥ गोविप्रनको दुःख भयो है कहि ये कौन निवारे ॥ नाथ ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभू नहि है तुम बिन त्राता तीनों[18] जगतमों ॥ ४ ॥

---

१ जगाच्या स्वामी नारायणा. २ दैत्य. ३ नांव. ४ प्राण. ५ अरण्यांत. ६ देवांनीं. ७ ब्राह्मणांनीं. ८ लक्ष्मीपति विष्णो. ९ द्रवतें. १० राक्षस. ११ बलवान. १२ आवरतें. १३ इंद्राला. १४ ब्रह्मदेवानें. १५ शंकराला. १६ संहार करील. १७ दुसऱ्याकडून. १८ स्वर्गमृत्यु पाताळ या तीन लोकांत.

पद—कटिबंध.

( शंकर युद्धास निघाले त्याचें व युद्धाचे वर्णन. )

कोप अला शंकरासि भारी ॥ त्याचा त्याविण कोण नि-वारी ॥ जटा ताडिल्या भूपाठारीं[1] ॥ क्रोधें ,निर्मियली धूतमारी[2] ॥ अकाश भूमी व्यापुनि सारी ॥ उभी राहिली कराल[3]—वदना ॥ दुष्ट जनांच्या करील कर्दना[4] ॥ मदनारीनें[5] सर्वे घेतली ॥ चामुंडा-सहि आज्ञा दिधली ॥ गजानना अधि षडाननातें[6] ॥ नंदी भृंगीर-टादिकातें[7] ॥ बाण रावणा चंडीशातें ॥ भूतगणातें पाचारुनियां ॥ सप्त कोटिगण मुख्य घेतले ॥ करितिल दुष्टावर ते घाले[8] ॥ भाले[9] पट्टिश शक्ति कुंतले ॥ घेउनि सत्वर युद्धा आले ॥ कोण करिल वीरांची गणती ॥ भीषणरूपी अनेक असती ॥ नानाविध रण-वाद्यें वाजति ॥ रिपु सैन्यातें मारूं ह्मणती ॥ प्रतिपक्षाचे वीर धांवले ॥ येउनि शिव—सैन्यांत मिसळले ॥ भले भले विरं[10] असती गेंडे[11] ॥ ह्मणती भेटातें[12] घालूं दाढें ॥ रगडूं त्यांचे काय पवाडे[13] ॥ मुखद्वयाचे चतुरानन किति षडाननाचे ॥ दीर्घ—जिव्ह किति लंबो-ष्ठाचे ॥ हेती[14] घेऊनि रणीं धांवती ॥ रथनागाश्व तसेचि पदाती[15] ॥ परस्परातें घाव हाणिती ॥ चतुरंगदळ[16] सेना मोठी ॥ वीर निमाले[17] अनेक कोटी ॥ युद्धाचें घनचक्र लागलें ॥ भीरू[18] त्यांतुनि कितिक पळाले ॥ सबळ शूर युद्धांत भागले[19] ॥ यापरि मणिमल्लातें मा-रुनि सर्व जनां तोषवीलें ॥ श्रीमल्लारि—ह्माळसानाथें निजभणत जना वांचविलें ॥ १ ॥

---

१ पृथ्वीच्या पाठीवर. २ या नांवाची एक कृत्या. ३ विकाल तोंडाची. ४ संहार. ५ शंकरानें. ६ कार्तिकस्वामी. ७ हीं गणांचीं नावें आहेत. ८ हल्ले. ९ हीं शस्त्रांचीं नांवें आहेत. १० वीर, योद्धे. ११ प्रबळ. १२ योद्ध्यांला. १३ काय कथा. १४ तरवार. १५ पायदळ. १६ चार प्रकारची सेना, रथ, हत्ती. अश्व व पायदळ. १७ मेले. १८ भित्रे. १९ थकले.

# श्री रामचंद्रांनीं मारुतीचा गर्व परिहार केला तें.

## कथा–सारांश.

एकदां एका चातुर्मासांत दररोज एक हजार सुवर्णकमलें आणून श्रीरामचंद्राची पूजा करावी असें श्रीसीतेचें मनांत आलें. परंतु हीं कमलें फक्त बिंदु–सरोवरांत असल्यामुळें दररोज इतके दूर जाऊन कमलें कोण आणील अशी तिला चिंता उत्पन्न झाली. इकडे लंकेंत जो पराक्रम केला होता त्यामुळें मारुतीला गर्व झाला होता, त्याचा परिहार रामाला करावयाचा होता. तेव्हां रामांनीं सीतेस चिंतेचें कारण विचारून मारुतीची स्तुति करून त्यास कमलें आणण्याकरितां पाठविलें. मारुती त्या सरोवराचें काठीं गेला, व त्यानें कमलें तोडण्याकरितां कमलांस आपलें शेपटीचा वेढा दिला. रामानें मारुतीचें सर्व बळ आकर्षण करून कमलांचे देठांत घातलें होतें. यामुळें एकहि कमळ तुटलें नाहीं. उलट मारुतीचे शेपटीचा शेंडा मात्र तुटला. तेव्हां मारुती अगदीं निर्बल झाला. इतक्यांत भिल्लीणीचा वेष घेऊन व ब्रह्मदेवाला मूल करून जेथें मारुति होता तेथें राम आले व या मुलाला संभाळ म्हणजे कमलें तोडून आणून देतें, असें म्हणाले, मारुतीनें मुलाला मांडीवर घेतलें, पण तें मूल मारुतीला फार जड वाटूं लागलें. त्याचा भार सहन होईना व त्यामुळें त्याची मांडी मोडली. आतां अयोध्येला कसें जावें या चिंतेंत मारुति पडला. तेव्हां भिल्लीणीनें आपल्या डोक्यांतील एक ऊ काढून तिच्यावर मारुतीला बसवून अयोध्येला धाडिलें.

## आर्या.

असतां प्रभु साकेतीं[1] सीता निजमानसीं असे भावी[2] ।
कीं हे मास--चतुष्टय दशमी पासाव जे असे भावी[3] ॥ १ ॥
श्रीमद्राम–प्रभुला सुवर्णकमळें अणूनि पूजावें ।
प्रारंभ उद्यापासुनि तरि हें व्रत सिद्धिला कसें जावें ॥ २ ॥
कंजें[4] सहस्त्रदल तीं एक सहस्राचे[5] अणूनि नेमानें[6] ।
देईल कोण प्रत्यहि[7] भृत्य असा शेवटासि नेमा[8] नें ॥ ३ ॥

१ अयोध्येंत. २ विचार करी. ३ दशमीपासून जें पुढें येणारें तें. आषाढ शुद्ध १० ला चातुर्मासाला आरंभ होतो. ४ कमळें. ५ हजार पाकळ्यांचीं. ६ नियमानें. ७ दररोज. ८ नियमाला, व्रताला.

ऐसी सचिंत-मानस महिजा[1] निजमंदिरीं विचार करी ।
कीं प्रेषावें कवणा घेइल हें कृत्य कोण चार[2] करी ॥ ४ ॥
राम पुसे आजि तुझा कांते वदनेंदु म्लान कां, गे, हा ।
गे हा तव सन्निध कीं उचित दिसे काय सांडणें गेहा[3] ॥ ५ ॥
चाल गृहांतरि, पडलें संकट तरि आजिं कायसें तुजला ।
बुजलों[4] समुद्र प्लवगीं नाठविसी आज काय सेतु-जला ॥ ६ ॥
सीता ह्मणे प्रभुवरा आलें मन्मानसीं असें स्मरण ।
कीं पूजावें कमलें नाम-सहस्रें करूनि हे चरण ॥ ७ ॥
चिंताकुल यासाठीं नेइल सिद्धीस कार्य कोण पहा ।
सांगा असेल ठावा जरि या कीशांत कीश कोणप[6] हा ॥ ८ ॥
तों पातले अकस्मात् नारदमुनि जेथ जनकजा होती ।
पूजा करुनि तयाची सांगे वृत्तांत आपुला हो ती ॥ ९ ॥
सीते वायुसुताचा विक्रम[7] नाहीं तुला कसा ठावा ।
मानिति रक्षोगण या केवल वत्सरचि काय साठावा[8] ॥ १० ॥
सांगावें मारुतिला तरि तो गर्वे करूनि हो फुगला ।
सुगलासि[9] वदावें तों तो या श्रवणींचि होतसे उगला ॥ ११ ॥
मग त्या वायुसुताचें लंकादाहोत्थ[10] वृत्त आठवुनी ।
शंसेनें[11] पाठविलें गर्व[12] तयाचा मनांत साठवुनी ॥ १२ ॥

---

१ पृथ्वीची मुलगी सीता. २ दूत. ३ घर. ४ या चरणाचा अन्वय—प्लवगीं बुजला समुद्र सेतु जला काय नाठविसी. भावार्थ,—तुला संकट पडलें तेव्हां मी वानरांनीं समुद्र बुजवून टाकला. तो समुद्र, तो सेतु, व तें जल तुला आठवत नाहीं काय? मग तुला यावेळेस सचिंत बसण्यासारखें कोणतें संकट पडलें आहे? ५ वानर. ६ कोणाचे रक्षण करणारा. लढाईंत व्यूह बांधला ह्मणजे त्याचें कोण पाहून त्यावर रक्षक एक एक अधिकारी नेमलेले असतात. त्याला कोणप असें ह्मटलेलें आहे. ७ पराक्रम. ८ साठावा संवत्सर क्षय नांवाचा. ९ सुग्रीवाला. १० लंका जाळल्याचें वृत्त. ११ स्तुतीनें. १२ याला फार गर्व झाला आहे ही गोष्ट मनांत ठेऊन.

लंघुनि सप्त–समुद्रा गेला ह्मणतात्ति बिंदु–सर जाला ।
काढी एक शतभरी कमलें तो कष्टवूनि कर[2]जाला ॥ १३ ॥

बळ कर्षुनि मारुतिचें पंकज–नालांत घातलेंचि खरें ।
यास्तव [3]त्या तैशाची खुडितां बहु दुखवलीं अहो नरवरें ॥ १४ ॥

धाडी पुच्छ त्वरेनें कमलें आणावयासि तो सरसीं ।
नाल न एकहि तुटलें तुटलें पुच्छाग्र कर्षणासरसीं ॥ १५ ॥

झाला सगर्व चित्तीं प्रभुला तो भक्त काय आवडतो ।
वागेल निरभिमानें तोचि सदा तत्कृपाचि सावडतो ॥ १६ ॥

प्रभुनें बळ कर्षियलें पवनसुताचें समस्त होतें जें ।
तेजें भानु लपविता केलें ऐशासि हीन हो तेजें ॥ १७ ॥

न चलेचि वायुजाचा विक्रम ऐशांत पुच्छही तुटलें ।
फुटलें कपाळ यास्तव राम प्रभुचेंहि पद मला सुटलें ॥ १८ ॥

वायुज खिन्न मनानें बैसे मग त्या सरस्तटीं उगला ।
सुगलादिकासी स्वमनीं आठवि तैसेचि रामपद युगुला ॥ १९ ॥

आली करुणा प्रभुला निज दासाचे हरावया क्लेश ।
ह्मणउनि धरिते झाले समर्थी त्या वृद्धभिल्लिणी वेश ॥ २० ॥

बाळ करी द्रुहिणातें बाहे स्कंदावरीच ती शबरी ।
आली सरस्तटीं त्या पाहे न्याहळूनि तीस कीशें बरी ॥ २१ ॥

वृद्धा ह्मणे असा कां खिन्न मनानें तटस्थ वसलास ।
सांग मला मी करितें कार्य तुझें तूं करीत नसलास ॥ २२ ॥

मारुति ह्मणे दयाळे कमलें देशील जरि सहस्र मला ।
जाईन साकेतपुरीं यातायातींत हा बहु श्रमला ॥ २३ ॥

---

१ ज्याला. २ नखां ग. ३ एवढा बलवान मारुती होता तरी त्याचीं. ४ नखें
५ सरोवरांत ६ ओढल्याबरोबर. ७ गोळा करतो. ८ जो तेजानें सूर्याला लपविणार
९ ब्रह्मदेवाला. १० खांद्यावर. ११ १२ मारुती वानर.

जरठा ह्मणे निजांकं[1]-स्थित या बाळासि रक्षिशील[2] तरी ।
देतें आणुनि तुजला कंजें ह्मणऊनि ती तळीं उतरी ॥ २४ ॥
मारुतिनें अति प्रेमें उचलुनि बाळासि घेतलें अंकीं ।
शंकितं[3] मनहीं झाला देऊं लोटूनि काय या पंकीं ॥ २५ ॥
वरचेवर हा बहु जड गमतो असमर्थ वागवायासी ।
सांगूं तरि कवणातें क्षणभरि तरि तुह्मिच वागवा यासी ॥ २६ ॥
भारानें या शिशुच्या जाइल वाटे रसातळा मांडी ।
ह्मणउनि उचलायाचा स्वबळें तो यत्नही तसा मांडी ॥ २७ ॥
परि न ढळेचि अणुहि तो-यास्तव अत्यंत घाबरा झाला ।
मारी हका तिला बहु चित्तीं अठऊनि रामराजाला ॥ २८ ॥
आली वृद्धा घेऊनि कमलें तों मारुती नयन[4] फिरवी ।
जिरवी गर्व असा ती अंगावरुनीहि हात मग फिरवी ॥ २९ ॥
केलें सावध जरि तरि उचलूं न शकेचि एक पाउल तो ।
आहे दूर अयोध्या चित्तीं स्मरतांचि ऊर हा उलतो ॥ ३० ॥
मग ती वृद्धा काढी निज केशांतूनि षट्पदा[5] ऊंला ।
सांगे इजवर बैसुनि जावें जरि टाकवें न पाऊला ॥ ३१ ॥
वायुज[6] तिजवरि बैसुनि साकेतपुरी समीप जों आला ।
भेटे नारदमुनि त्या मार्गीं ह्मणऊनि खिन्न बहु झाला ॥ ३२ ॥
सांगे नारद जाउनि सत्वर हें वृत्त जानकीशातें ।
आले सीतेसह ते घेउनि सुगलादि सर्व कीशांतें ॥ ३३ ॥
लज्जित होय मनीं बहु वाटे पवनात्मजासि मरण बरें ।
माहित नव्हतें कवणा केला बोभाट याचि हो निंबरें[7] ॥ ३४ ॥

---

१ माझ्या मांडीवर असलेल्या. २ संभाळशील. ३ माझ्या मांडीवर घेतल्यावर तो जड वाटूं लागला ह्मणून त्याला वाटलें कीं याला या चिखलांत फेंकून द्यावें. सरोवराच्या काठीं बसला असल्यामुळें तेथें चिखल असणें साहजिक आहे. ४ घाबरल्यामुळें डोळे फिरवूं लागला. ५ सहापायाची ऊ. ऊला सहा पाय असतात. ६ वायु पुत्र मारुती. ७ निबरानें, जरठानें.

सांत्वुनि राम ह्मणे त्या वा तूं श्रमलासि गर्व कां धरिला ।
केलें कृत्य सकल हें म्यांचि तुझा गर्व सर्व परिहरिला ॥ ३५ ॥

### याच आख्यानाचीं पदें.

पद—साकी.

( सीता विचार करते. )

सोचें[2] करें सीता मनमें जब राम अजुध्यावासी ॥
कौन वरतसे जनम जनम मैं रामकी होऊं दासी ॥ १ ॥

पद २ जलद घनाक्षरी—दादरा.

( सीतेला राम चिंतेचें कारण विचारतात व सीता सांगते. )

प्रिये ऐशी कां तूं दंग ॥ आज आला काय प्रसंग ॥ आहे आमुचा तुला संग[3] ॥ कांगे घावरसी, शब्द न बोलसी, कोणी केला मनोभंग[4] ॥ १ ॥ कोण ऐसा तो निःसंग[5] ॥ सारे त्वत्पद्‌कमलीं भृंग ॥ खिन्न दिसतें अंतरंग ॥ सांगे मजपासि, त्वरीत नीवसि, जरी व्यथा कारि अनंग[6] ॥ २ ॥ प्रभो सांगतें तुह्मा वर्म ॥ आहे तुमच्या संगें शर्म[7] ॥ मानिं उदेला माझ्या धर्म ॥ कमलें आणवावि, पूजा निवेदावि, चालो चातुर्मास हें कर्म ॥ ३ ॥ कोण पुरविल माझें वर्म ॥ तुह्मि जाणतां कर्माकर्म[10] ॥ करिन उपानह[11] हें चर्म ॥ जाईल कैसें सिद्धी, कुंठित हे बुद्धि, मानिं चिंता अंगीं घर्म[12] ॥ ४ ॥

---

१ सांत्वन करून, समाधान करून. २ विचार. ३ सोबत, सहवास. ४ मनाला विक्षेप. ५ निर्भीड. तुझा मनोभंग करणारा असा कोण उर्मट आहे. ६ मदन. ७ सुख. ८ उत्पन्न झाला. ९ इच्छित. १० काय करावें काय करूं नये हें. ११ जोडा. या चरणाचा भावार्थ—तुमचे मजवर इतके उपकार आहेत कीं मी आपल्या शरीराचें कातडें काढून त्याचा जोडा जरी करून तुह्मांला दिला तरी ते फिटणार नाहींत. १२ घाम.

पद ३ ( गड्यांनो कृष्ण गडी अपुला— )

(विषय तोच.)

पुसती राम जनकजेसी ॥ कां तूं म्लान वदन दिससी ॥ ॥ धृ० ॥ लागली चिंता काय तुला ॥ सांडिलें कां नग[1] सीसफुला ॥ डोइचा भांग दिसे बुजला ॥ धम्मिलें[2] विगलित[3] कां रुचला ॥ उचित हा शोक काय तुजसी ॥ १ ॥ वस्त्रें अमोलिक त्यजिलीं ॥ पातळ चोळी कशि रुचली ॥ टाकुनि दिव्य सेजे[4] अपुली ॥ भूमिची शय्या कां सुचली ॥ घडिघडि उठोनियां बससी ॥ २ ॥ ठेउनि वनवासीं दृष्टी ॥ असावी अतां तुला तुष्टी[5] ॥ आमुची त्यांत असे पुष्टी ॥ तरि कां अझूनिहि कष्टी ॥ असी कां क्षणोक्षणीं रुससी ॥ ३ ॥ विनवणी गिरिवासी रामा ॥ असे मी सुखी घनःश्यामा ॥ दशशत कमलें नितें[6] नेमा ॥ पुरविल कोण अशा कामा ॥ वाटते ही चिंता मजसी ॥ ४ ॥

पद ४—कटिबंध.

( मारुती कमळें आणण्यास कसा निघाला त्याचें वर्णन. )

श्रीरामें[7] पवनसुताचा पहा कैसा गर्व हरीला ॥ धृ० ॥ वातात्मज तो गगनपथानें ॥ जाय सवें निज मनोरथानें ॥ गर्वित जो बहु अंजनिथानें[8] ॥ कंशास मग तो राम कथा नें ॥ पहात पहात तो अनेक स्थानें ॥ बहुत त्वरेनें ॥ कधीं कधीं उतरूनि धरेनें ॥ जात लगबगा नगानगानें ॥ जळें तळें भरपूर खगानें ॥ पाहुनियां कधीं गात गाणें ॥ डगाडगानें ॥ ढगासि सांडुनि वरती जाणें ॥ उड्डाणाची चमक दाविणें ॥ विक्रम अपुला मनीं भाविणें ॥ नयन फिरविणें ॥ जळावरूनि कधिं स्थळावरी ये ॥ पळांत मग चपळासि गांठणें ॥ कळादावि बुबुळासि काढणें ॥ बळासि मानुनि करित गर्जना ॥ भुभुःकार करि उरुस तर्जना ॥ देखुनियां जल करित मार्जना ॥

---

१ डोकीवरचे फुलें वगैरे दागिने. २ वेणी. ३ अस्ताव्यस्त. ४ सुंदर बिछाइत. ५ संतोष. ६ नित्यनियम चालविण्याला. ७ यांतील वर्णन उत्तम असून अगदी सोप्या शब्दांत आहे. ८ अंजनी—मारुतीची आई—इनें लहानपणीं पाजिलेल्या दुधानें.

जना विसर्जुनि विजना जावें ॥ क्षुधा लागल्या फळमुळ खावें ॥ कोप अल्या मणिवंधा चावे ॥ माकड चेष्टा करुनि प्रतिष्ठा ॥ भावी न गणी इष्टानिष्टा ॥ कष्टावांचुनि कोण अरिष्टा ॥ मानि, वरिष्टा अवमानुनि तो बिंदुसरतटीं पावला ॥ श्रीरामें पवन सुताचा पहा कैसा गर्व हरीला ॥ १ ॥

पद ५—घनाक्षरी.

( रामचंद्र भिल्लीण झाले तें वर्णन. )

होत भिल्लन रघुराज ॥ अपने भक्तनके काज ॥ दियो छांड सीस[1]ताज ॥ महाराज दयाल है ॥ १ ॥ उमर पोंहोची सै[2]त साल ॥ भये पिंगट सब बाल ॥ लाठि हातमें चलि चाल ॥ साडिलाल पेहेनके ॥ २ ॥ किया ब्रह्मको बाल ॥ लियो खांधे[3] जंजाल[4] ॥ अई बिंदूसरपाल[5] ॥ कमल नाल देखती ॥ ३ ॥

पद ६—अंजनी गीत.

( मांडीवर घेतलेल्या मुलाच्या भाराने घाबरून जाऊन मारुती शबरीस ह्मणतो. )

मारुती ह्मणे दिसतो बाळ ॥ परि हा ब्रह्मांडाचा काळ ॥ बाई तुझा तूं सांभाळ ॥ उचलुनि घे कडिये ॥ १ ॥ जरि मी वानूं याचे गुण ॥ तरि तूं काढीशि हंगुन[6] ॥ नाहीं फळही सांगून ॥ राहो तें आतां ॥ २ ॥ गमतो तुजला हा चिमणुसा ॥ मी ही नव्हतों या मानुसा[7] ॥ येवढ्या मुला परमाणुसा ॥ मानित मी होतों ॥ ३ ॥ पुष्कळ पाहीलीं म्यां बाळ ॥ कोठें न मिळें याचा तार्ळ[8] ॥ एवढा वामन त्रिभुवनपाळ ॥ नसेल जड ऐसा ॥ ४ ॥ वाटे मज अवतीलें[9] काळें[10] ॥ मांडी मोडीली या बाळें ॥ शिशु-लालनाचे चाळे[11] ॥ पुरले गे बाई ॥ ५ ॥

---

१ डोक्यावरचा मुकुट. २ वर्षे १०० ची. ३ खांद्यावर. ४ एक प्रकारचें हत्यार. ५ बिंदु सरोवराच्या काठीं. ६ टोंचटोंचून बोलशील. ७ मलाहि याचें कांहीं वाटलें नाहीं. ८ जोडी. ९ बोलाविलें. १० यमानें. ११ हौस.

पद ७ ( जोगी–माझा भरत देखिला काय. )

( मारुती रामाचा धावा करतो. )

रामा दावा पदयुगुलां, श्रमलों फारच कीं ॥ धृ० ॥ अजवरि केला तुह्मिं सांभाळ ॥ चरणीं ठेवित आलों भाळ ॥ अज हें कृपा–विहिन आभाळ ॥ असि आबाळ[1] कां माझी ॥ १ ॥ तुमच्या पायांचा प्रताप ॥ झाला नाहीं कधींच ताप ॥ येवढा आजिच कां संताप ॥ माझें पाप वडवडलें[2] ॥ २ ॥ तुमची कृपाचि कीं बहुसाल[3]॥ वर्णिति कविजन सालोसाल[4] ॥ ती तुह्मीं आजिच कां नासाल ॥ येत असाल मजपासीं ॥ ३ ॥ धरिला आतां म्यां दृढभाव ॥ तारि कां कृपेचा अभाव ॥ दूजा कोण करिल नीभाव ॥ आहे स्वभाव मज ठावा ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु तरणोपाय ॥ दावी झालों गलित–उपाय[5] ॥ होउं न द्यावा जी अपाय ॥ धरितों पाय मी आतां ॥ ५ ॥

पद ८ पिलु–त्रिताल.

( जाण्यास सामर्थ्य नाहीं असें पाहून सचिंत होऊन मारुति मिळ्णीस ह्मणतो. )

बाई कैसा गे जाऊं आतां ॥ धृ०॥ होतें बळ कांहीं बाहीं ॥ गेलें, उरलेंचि नाहीं ॥ आहे वेळ तरि कांहीं ॥ नाहीं मजला कोणि त्राता ॥ १ ॥ आलें संकट असें ॥ पुर[6] निकट नसें ॥ करूं विकट दिसें ॥ बाई चुकवी या अघातां[7] ॥ २ ॥ राम कां न मज मारी ॥ झालें दुःख आज भारी ॥ गेली लाज होती सारी ॥ वारि माझि गे भय चिंता ॥ ३ ॥ गिरिवासी तूंचि माय ॥ पंकीं पडे जसि गाय ॥ दूर करुनि अपाय ॥ दावि माझि गे राम सीता ॥ ४ ॥

पद ९ ( विडा घ्याहो नारायणा. )

( मारुती रामाचा धांवा करतो. )

धांवरे रामराया, किति अंत पहासी ॥ प्राणांत मांडिलासे, नये करुणा कैसी ॥ धृ० ॥ पाहीन धर्णि–वरी ॥ चरण झाडिन

---

१ उपेक्षा. २ उभें राहिलें, उतू आलें. ३ पुष्कळ. ४ वर्षेच्या वर्षे, निरंतर. ५ निरुपाय. ६ नगर, अयोध्या. ७ संकटाला. ८ तृप्त होईपर्यंत.

मी केशीं ॥ नयन शिणले वा ॥ अतां केधवा येसी ॥ १ ॥ अन्याय काय माझा ॥ देवा वाटला तुजसी ॥ ह्मणूनि त्यजिलें त्वां ॥ तरि विनवूं कवणासी ॥ २ ॥ वाटे दुःख हें मजलागीं ॥ भक्तां इच्छिलें देसी ॥ कठोर इतुका कां ॥ मजविषयिं झालासी ॥ ३ ॥ गिरिवासि तूं असतांना ॥ व्हावी गति कां ऐसी ॥ धावूनि येई आतां ॥ दया सांडिली कैसी ॥ ४ ॥

पद १० पिलु–त्रिताल. ( उद्धवा शांतवन कर जा. )

( रामाची भेट झाल्यावर मारुती सकरूण होऊन रामाची प्रार्थना करतो. )

कां रोष मजवरी ऐसा, श्रीरामा पूर्ण–परेशा ॥ धृ० ॥ अज इतुका कां बरें केला, अपमान माझा रामा ॥ बाळानें हट जरि धरिला, दे सांत्वुनि जननी आ[1]मा ॥ अंतराय कधिं तरि पडला, मज पासुनि आपुल्या कामा ॥ चाल॥ नसे दयाळ प्रभु तुज परता ॥ तूं त्रैलोक्याचा भर्ता ॥ कां कोप तरि मज वरता ॥ पू० चाल ॥ कर्ताचि विध्यंडां[2]चा, होसी तूं धरणिसुतेशा[3] ॥ १ ॥ गर्विष्ठ असा तुज दिसला, कां शासन केलें नाहीं ॥ जरि चुकलों मी सेवेला, कां केलि उपेक्षा पाही ॥ मानिलें नसे वचनाला, कां बोध न केला कांहीं ॥ चाल ॥ निग्रहानुग्रह[4]–कर्ता ॥ ठेविली कुणाची उ[5]र्ता ॥ नाहिं विचार केला पु[6]र्ता ॥ पू० चाल ॥ धूर्तासि आधिं शिक्षावें, हा धर्मचि सकलजनेशा[7] ॥ २ ॥ शिक्षणार्थ याच्या तुजला, जरि शंका होती पोटीं ॥ एकांतीं नेउनि मजला, नाहिं निषेधिलें कां ओं[8]ठी ॥ नायके असा धिट दिसला, कां कान न पिळिला बोटीं ॥ चाल ॥ तरि काय तुजपुढें ठरतां ॥ हा तत्का[9]लचि कीं मरतां ॥ पाहिजे कशाला गेर्ता ॥ पू० चाल ॥ सं[10]रतां देहापासुनियां, हें करणें काय नरेशा ॥ ३ ॥

---

१ स्तन. २ ब्रम्हांडाचा. ३ धरणिसुता जी सीता तिचा पती. ४ शासन व पाळन करणारा. ५ भीड. ६ पूर्ण. ७ सर्व जनांचा स्वामी. ८ ओठांवर बोट ठेवून. ९ खळगा. १० निराळा झाला असतां.

# गजगौरी आख्यान.

## कथा–सारांश.

एकदां गांधारीनें मातीचा हत्ती करून त्याजवर बसून कुंतीला वायन दिलें. वायन दिल्यानंतर गांधारी कुंतीला ह्मणाली कीं हें वायन परत दिलें तर पुढचे जन्मीं इंद्राचा ऐरावत मिळतो. नाहीं दिलें तर अखंड वैधव्य प्राप्त होतें. हें एकून कुंती सचिंत झाली, व तिनें भीमाला सांगितलें. भीमानें हत्ती करण्याकरितां माती आणण्यास सुरवात केली, व गावांबाहेर जाऊन मातीचा एक एक गोळा गावांत फेकूं लागला. त्याच्या योगानें गांवांतील घरें पडूं लागलीं. तेव्हां अर्जुन ह्मणाला, मातीचा हत्ती कशाला ? याच जन्मीं ऐरावत आणून देतों; त्याजवर बसून वायन दे. असें त्यानें आपल्या आईला–कुंतीला सांगितलें. नंतर भीमाला इंद्राकडे पाठवून ऐरावत आणिला. त्यावर बसून कुंतीनें थाटानें गांधारीस वायन दिलें. ही गोष्ट कौरवांचे मनाला फार लागली. तेव्हां पासून कौरवपांडवात वैर उत्पन्न झालें. ही कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

जनमेजय नृपति पुसे वैशंपायन मुनीस पद नमुनी ।
पडला द्वेष कशास्तव कौरव पांडव कुळां मुनीन–मुनी ॥ १ ॥
त्यासि ह्मणे मुनि–पुंगव ऐके वृत्तांत सांगतों तुजला ।
सौबालिनें मृण्मय गज काळीं एक्या करूनि तो पुजला ॥ २ ॥
तें व्रत गजगौरीचें केवल सौभाग्यवर्धना करितें ।
करितें करूनि यास्तव देती वायन स्त्रिया घरोघरिं तें ॥ ३ ॥
शृंगारूनि गजातें बैसुनि त्यावरिच वायनें देती ।
उसणें त्वरिताचि द्यावें पावे वैधव्यतेसी नेदे ती ॥ ४ ॥
जरि सांगता व्रताची, जन्मांतरिं पावती सुरेश–गजा ।
दे सौभाग्य निरंतर होउनियां सुप्रसन्न ती नगजा ॥ ५ ॥

---

१ ऋषींतील श्रेष्ठ ऋषे. २ मुनिश्रेष्ठ. ३ गांधारीनें. ४ हत्तीला. ५ ऐरावत. ६ पार्वती.

यापरि गांधारीनें दिधलीं वानें सुवासिनिस आधीं ।
मग जाउनि कुंतीच्या पारुषवचनें मनासि दे आधी ॥ ६ ॥
बोले निष्ठुरसी बहु उसणें द्यावें तुवांहि सत्वरतें ।
परतें या काय वदूं न दिल्या येतोंचि दैन्य सत्वर तें ॥ ७ ॥
चिंताक्रांत पृथा[3] मग बैसे होऊनि खिन्न–मानस ती ।
आला कालविपर्यय[4] यावीं विघ्नें असींच ह्यो नसतीं[5] ॥ ८ ॥
शतपुत्र त्या सतीचे माझीं बाळें समस्त पांच किती ।
करितिल केंवि गजातें केलों अजि त्यावरीहि जाच किती[6] ॥ ९ ॥
भीम ह्मणे मातेला गमलें तुज कठीण कार्य कां गे हें ।
टाकिन गोल क्षितिचा ग्रामावरि पडति मग न कां गेहें ॥ १० ॥
फेकीं राजद्वारीं गोल तसा अन्य ग्राम–द्वारासीं ।
भ्याले पुरवासीजन ह्मणती अमुच्याचि विघ्न कां रांसीं[7] ॥ ११ ॥
करिती कोलाहल बहु परि गवसेनाचि वर्म तें कवणां ।
श्रवणां येतांचि कळें वार्सवितें[8] मातृसुश्रुषप्रवणा[9] ॥ १२ ॥
येउनि मातेसि ह्मणे आणविली मृत्तिकाहि काशाला ।
तुझिया पदप्रसादें देणारचि धीर हा अकाशाला ॥ १३ ॥
जन्मांतराहि नको घे ऐरावत देतसे अणूनि तुला ।
अमुच्या सामर्थ्याची आहे करणार सांग कोण तुला[10] ॥ १४ ॥
पत्र लिहुनि बाणाग्रीं[11] वार्सविनें[12] वासवासि[13] पाठविलें ।
आहे व्रत कुंतीचें यास्तव ऐरावतासि आठविलें[14] ॥ १५ ॥
श्रृंगारुनि गजातें सत्वर या गजपुरासि[15] धाडावें ।
होइल व्रत सांग, तरी सुज्ञांहीं कां उगेंचि भांडावें ॥ १६ ॥

---

१ दुःख. २ सत्वाची रति जिला आहे अशी तूं. ३ कुंती. ४ उलटा काळ. ५ नसलेलीं. भलतींच. ६ भावार्थ–आणि सांप्रत त्यांनां जाच ह्मणजे संकटही किती आहे. ७ राशाला, वाट्यांला. ८ अर्जुनाला. ९ आईच्या सेवेला तत्पर अशाला. १० बरोबरी. ११ बाणाच्या टोंकावर. १२ अर्जुनानें. १३ इंद्रास. १४ स्मरण केलें, मागितलें. १५ हस्तिनापुरास.

वाचुनि पत्र सुरगुरु[1] सांगे उत्तर लिहावयासि असें ।
कीं न्यावें गजपतिला वांच्छा[2] व्रतलोकनीं अभ्यासि असे ॥ १७ ॥

येतां उत्तर ऐसें बाणांचा सेतु बांधिला सधट[3] ।
मार्गें त्याचि वृकोदर जाय असा मनुज देखिला न धट[4] ॥ १८ ॥

जाउनि अमरावतिला अमरपतीला स्ववृत्त तो कळवी ।
मळवी यश अमरांचें ऐरावतिचाहि[5] गर्व मग पळवी ॥ १९ ॥

म्हणती निर्जर[6] सारे नेतो गज नेउं द्यांच भूमिवर ।
परि ताडितो[7] कशास्तव, ऐसा कधिं पाहिला न भूमिवर[8] ॥ २० ॥

अवमानुनी गजातें नेणें तरि उचित हें दिसेना कीं ।
पूजिति देव सकळ या उदधिमथित[9] रत्न हें असें नाकीं[10] ॥ २१ ॥

चालेना सुपथानें भूमीवरि नाग[11] लोळणाच करी ।
यास्तव भीमें केला बांधुनि चरणासि झोळणा[12]च करी[13] ॥ २२ ॥

दिधला श्रृंगारुनि मग अमरांनीं नागराज भीमकरी[14] ।
भीम करी ताडण त्या कांपे चळचळ असाहि भीमें[15] करी[16] ॥ २३ ॥

मार्गें त्याचि पुन्हां तो घेउनि ऐरावतासि गजग्रामीं[17] ।
आला, त्या म्हणती जन भुवनत्रयिं हा अजिंक्य संग्रामीं ॥ २४ ॥

त्यावरि बैसुनि कुंती वानातें देत गजपुरीं[17] फिरली ।
अवलोकुनि या कृत्या गांधारी निजमनीं बहु विरली ॥ २५ ॥

मग त्या दिवसांपासुनि वाढत गेलाचि द्वेष उभय कुळां ।
कौरव सर्पचि नाशूं म्हणती त्या भीम अर्जुना नकुला ॥ २६ ॥

---

१ बृहस्पती. २ व्रत पाहण्याची. ३ मजबूत. ४ धोट. ५ इंद्राचा. ६ देव. ७ मारतो–भीम ऐरावताला ताडन करूं लागला म्हणून देव म्हणतात. ८ पृथ्वीवरील राजा. ९ समुद्रमंथन करून काढलेलें रत्न. १० स्वर्गांत. ११ हत्ती. १२ झोळी. १३ हातीं. १४ भीमाचे हातीं. १५ भयंकर, मोठा. १६ हत्ती. १७ हस्तिनापुरास.

## याच आख्यानाचीं पदें.

पद ( गडयांनो कृष्ण गडी अपुला. )

( [illegible] संवाद. )

सांवळी सांगे कुंतीला ॥ उसणें देई वाण मला ॥ धृ० ॥ मानव-देहा जारे यावें ॥ व्रत हें सकृत आचरावें ॥ मृण्मय-गजासि पूजावें ॥ घरोघरीं वाण असें द्यावें ॥ पहा गज श्रृंगारूनि अ-र्पिला ॥ १ ॥ माझिया पुत्रांनीं माती ॥ अणुनि हा गज केला रातीं ॥ आलें मी बैसुनि या वरती ॥ वाद्यें वाजति विविधगती ॥ जाहलें श्रुत हें अवघ्याला ॥ २ ॥ एकशें एक तनय माझे ॥ त्यांच्या योगें पुर साजे ॥ असती कोण असे राजे ॥ शत्रुंच्या मनांत यश डोंजे ॥ वर्णूं काय प्रतापाला ॥ ३ ॥ कुंती ह्मणे एक बाई ॥ देइन उसणें तुज पाही ॥ बोलुनी अर्थ नसे कांहीं ॥ येईल प्रत्यय तुजला ही ॥ जाइ तूं आपुल्या सदनाला ॥ ४ ॥

पद ( जलद घनाक्षरी. )

( कुंती विचार करते. )

मोठें संकट दिसें आज ॥ माझें करिल कोण हें काज ॥ कशि राखिल हरी लाज ॥ करूं गत कैसी, सांगुं कवणासी, पंडु-राजाची मी भाज ॥ १ ॥ असति पुत्राहि नसें वांझ ॥ काय तो वडील धर्मराज ॥ त्याला आवडे सत्समाज ॥ वरकड बाळें चारीं, पडति विचारीं, धावें पावें यदूराज ॥ २ ॥

दिंडी.

( भीम कुंतीला ह्मणतो. )

भीम बोले मातेसि अशी कां गें । संचितचि तूं बसलीस मला सांगें ॥ करिन आतां जें कार्य तुझें पाही । नको होऊं व्याकूळ सर्वथाही ॥ १ ॥ व्यर्थ करणें हा घोर कशासाठीं । असे मजसम या कोण धरापाठीं ॥ जरी ह्मणसी तूं इंद्र चंद्र आजी । आणि, येथें तरि अणिन क्षणामाजी ॥ २ ॥

---

१ माझें वाण मला परत दे. २ एकदां ३ एका रात्रींतून. ४ निरनिराळ्या प्रकारानें. ५ शोभतें. ६ खुपतें. ७ भार्या. ८ साधुसंतांचा समागम. ९ कृष्ण. १० चिंता. ११ पृथ्वीच्या पाठीवर.

पद—साकी.

( कुंती भीमास ह्मणते. )

माई पृथा कहे सुनो वृकोदर गांधारी गज लाईरे ॥ कियो बरत अज दियो बान मुझे गजपर वो चढ आईरे ॥ १ ॥ पलट दिजो फिर बान करो गज माटी बहोत जमावोरी ॥ बरत करो यही और जनममों ऐरावत तुम पावोरी ॥ २ ॥ बान न दे तो विधवा होकर जनम जनम दुःख भोगोरी । तबसे भई हुं व्याकुल क्या कहुं बहोत मोहे² डर लागोरी ॥ ३ ॥

पद–( उद्धवा शांतवन कर जा. )

( कुंती भीमास ह्मणते. )

ह्मणे कुंती अज बहु मोठें ॥ मज संकट गमतें भीमा ॥धृ०॥ एकशें एक सुत तिचे, गज केला रातोरातीं ॥ तुह्मी बाळें पांच कशी तीं, बरें अणाल सांगा माती ॥ वाटतें मनीं बहु चिंता पाहुनि ही कोमल कांती ॥ चाल ॥ म्यां काय करावें आतां ॥ कोणि दिसेचिना कीं त्राता ॥ बहु तळमळ वाटे चित्ता ॥ पू०चा०॥ सोडितां नये हें सहसा, जरि आयुष्याची सीमा ॥ १ ॥ मज चिन्ह दिसेना बरवें, झालि कुंठित मति बहु आजी ॥ जरि त्याग करूं देहाचा, तरि होईल अकीर्ति माझी ॥ वांचुनी वाण नच फिटलें, तरि फजिती दुसरी ताजी ॥ चाल ॥ यासाठीं मनिं मी झुरतें ॥ वा पाहि विचारुनि पुरतें ॥ यश कोठुनि मग हें उरतें ॥ पू० चाल ॥ मरतंच तरी कां छळिती, ही ईषणा गुणधामा ॥२॥

पद–पिलु त्रिताल.

( नगरवासी जन आपसांत घाबरून विचार करतात. )

अजि दिसतें विघ्न कांहीं ॥ धृ० ॥ नाहीं जावयासि वाट ॥ जन करिती बोभाट ॥ किती लावूनि कपाट ॥ हेट केला बंद

---

१ माती. २ मला. ३ नवी. ४ इच्छा, वासना, भावार्थ मी मेलेच असतें तर ही वासना कशाला छळती ? ५ बाजार.

त्यांहीं ॥ १ ॥ लोक घाबरले फार ॥ कोणि केली वारासार ॥ कांहीं करिति विचार ॥ थार आतां कोठें नाहीं ॥ २ ॥ असे थवे जागोजाग ॥ जरि काढिताति माग ॥ कांहीं लागेनाचि लाग ॥ भाग आलें मरण काई ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ कांहीं न सुचे उपाव ॥ आह्मा धरणि न दे ठाव ॥ मावळल्या दिशा दाही ॥ ४ ॥

पद–( माझा भरत देखिला काय. )

( अर्जुनानें इंद्राला पत्रिका लिहिली, व भीमानें ऐरावताला आणिलें. )

धाडा सुरगज गजग्रामीं ॥ होइल आनंद मातेसी ॥ धृ० ॥ अर्जुनें पत्र लिहून ऐसें ॥ धाडिलें बाणाच्या सरिसें ॥ पाहुनि देवगुरु हांसे ॥ ह्मणे कैसे मानव हे ॥ १ ॥ सुचविलें गुरुनें इंद्रासीं ॥ लिहावें उत्तर विजयासीं ॥ न्यावें तुह्मी गजेंद्रासीं ॥ आहे मानसीं हेत ऐसा ॥ २ ॥ ऐकुनि उत्तर हें कानें ॥ बांधिला सेतु सायकानें ॥ प्रेषिलें भीमासीं त्यानें ॥ वहु मानें सुरपुरिला ॥ ३ ॥ जाउनि आणिलें गजपातिला ॥ भीमें अनंद बहु झाला ॥ स्तविती किती अर्जुनाला ॥ वायुजाला पुरवासी ॥ ४ ॥

कटिबंध

( कुंतीनें वाणें दिलीं त्याचें वर्णन. )

भीमें अणिलें देवगजाला ॥ नागपुरीं मग अनंद झाला ॥ दानें दिधलीं सकल द्विजांला ॥ उणें काय त्या विडौजजाला ॥ नटउनि दिधलें इभराजाला ॥ रत्नभूषणें ज्या साजाला ॥ झूल झालरी मुक्तें ज्याला ॥ कोण वर्णितो कवि तेजाला ॥ नवल वाटलें सकल प्रजांला ॥ अवलोकुनि जरतरी ध्वजाला ॥ गळां किती सुमनांच्या माळा ॥ बळासहित गज पळांत आणुनि ॥ अबलासह

---

१ पत्ता. २ अर्जुनाला. ३ बाणानें. ४ स्वर्गाला. ५ भीमाला. ६ नगरचे लोक. ७ हस्तिनापुरांत. ८ बिडौजा इंद्र. त्याचा पुत्र अर्जुन त्याला. ९ हत्तींतील राजा ऐरावत.

वरी कुंति बैसली ॥ वाद्यांची बहु झोड लागली ॥ दिनमणि जाउनि रजनी झाली ॥ तम नाशाया दीपा अणिल्या ॥ सुगंध तैलें मग पाजळिल्या ॥ चंद्रज्योतिनें दिशा उजळल्या ॥ निशा असुनि किति पिशापरी दिनदेशा भाविती ॥ अशा तशाची नसेचि गणती ॥ विशाल शाला पाहुनि ठरती ॥ सर्व मशाला दुशाल जरि ती ॥ खुशाल घेउनि अंगावरती ॥ घरोघरीं अशि शिरती झाली ॥ सुवासिनीला वाणें दिधलीं ॥ गांधारीच्या सदना आली ॥ थाट पाहुनी मनीं विराली ॥ गांठ घालितां पाट कशाचा ॥ नाट भावि घरघाट भाविचा ॥ समजुनियां बहु खिन्न मनानें ॥ बाहेर येउनि तांबुलादि दिधलें ॥ वासविनें सुरगज आणुनि गजगौरी–व्रत संपविलें ॥ १ ॥

---

१ मशाली. २ दिवस आहे असें मानूं लागले. ३ विस्तीर्ण. ४ मंदिरें. ५ पुढें होणाऱ्या घराच्या नाशाचा नाट-वाईट शकुनच तिला वाटला. ६ अर्जुनानें.

# द्वापारयुगांत गरुडाचा गर्व परिहार मारुतीनें केला तें आख्यान.

## कथा-सारांश.

एकदां द्वापरयुगांत गरुडाला आपले बळाचा गर्व झाला होता. तो हरण करण्याचें श्रीकृष्णानें मनांत आणिलें. एकदां मारुति द्वारकेस आला, व सुवर्णाची नगरी पाहून ही लंकाच आहे असें त्याला वाटलें. इतक्यांत नारद तेथें आला. त्याला मारुतीनें विचारिलें कीं, येथें राजा कोण आहे, व ही नगरी कोणती ? त्यानें सांगितलें येथें बळीराम राजा आहे, व ही द्वारका आहे. आपल्या रामापेक्षां बळीराम कोण आहे, त्याचा समाचार घ्यावा म्हणून 'आपलें नांव सोडून दे. नाहींतर युद्धाला ये' असा मारुतीनें नारदाहातीं बळीरामास निरोप पाठविला. बळीराम सैन्य घेऊन आला, त्याचा मारुतीनें पराभव केला. नंतर श्रीकृष्णानें गरुडास मारुतीला बोलावून आणण्याकरितां पाठविलें. गरुडानें त्याला उद्धटपणानें बोलाविल्यामुळें मारुतीनें गरुडाच्या तोंडांत चापट मारिली. तेव्हां गरुड कृष्णाजवळ येऊन पडला. कृष्णानीं पुन्हां गरुडास पाठवून मारुतीस बोलावून आणून रामरूप दाखविलें. ही कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

पवन-तनय हा एका समयीं सोडुनि सेतुबंधातें ॥
आला द्वारवतीला रामाच्या गात सत्प्रबंधातें ॥ १ ॥
निरखुनि बाह्य प्रदेशीं नगरीच्या विपुल धेनु कळपाला ।
तोषें जाय उपवनीं सेवन करि कंद मूळ फळ पाला ॥ २ ॥
आले नारदमुनि त्या स्थानीं जेथें कपी असा रमला ।
वंदुनि म्हणे मरुत्सुत प्रभुविण सारेंचि हें असार मला ॥ ३ ॥
ही नगरी कवणाची भासे लंकाचि सागरामाजीं ।
शंका हीच निवारा, सत्वर कारुण्य-सागरा माजी ॥ ४ ॥
मुनि त्यासि म्हणे येथें नांदतसे नाम ज्यासि बळिराम ।
आहे कीर्ति जगत्रयीं यासम कैचा तुम्हाहि बाळि राम ॥ ५ ॥

---

१ पुण्यकारक कथा. २ करुणासागर. ३ माझी.

हें एकतांचि कोपें बोले मुनिं नारदासि जा हो जा ।
सांगा नाम त्यजावें नसतां युद्धासि सिद्ध जा होजा ॥ ६ ॥
सांगे नारदमुनि तो बळिरामातें जसें हरी वदला ।
त्यागी नामचि अपुलें अथवा जाऊनियां हरीव दला ॥ ७ ॥
राम ह्मणे कपि भेणें सोडूं नामासि मी कसा वा, जी ।
ऐसें बोलुनि सांगे निजबळ पातें त्वरें कसा वाजी ॥ ८ ॥
आणिन बांधुनि येथें मर्कट लागेल एक पलही न ।
आहे तो एकाकी त्यांतहि वानर अशस्त्र बळहीन ॥ ९ ॥
होउनि सिद्ध बळासह गेला बळिराम वानरानिकट ।
तो टाकी नग त्यावरि केला ज्या सैनिका—नरांनिं कट ॥ १० ॥
पाहुनि युद्ध पळे तो सत्वर बळिराम निज दळासहित ।
जाय पुरीं लगबग करि मानी सर्वोपरी पळास हित ॥ ११ ॥
कृष्ण ह्मणे हो दादा अणिलें बांधूनि काय त्या हरिला ।
धरिला, बराच वाटे गर्वहि त्याचा असेल परिहरिला ॥ १२ ॥
राम वदे तो केवळ वानर अज्ञान टाकितो शिखरी ।
वरचेवर, यासाठीं न चले बळ युक्ति आजि त्याशि खरी ॥१३॥
श्रीहरिनें दूतकरीं सत्वर विनतासुतासि आणविलें ।
घेउनि ये कपीला जा आधीं, मग वृत्त सर्व जाणविलें ॥ १४ ॥
गरुड ह्मणे हें निंद्यचि कर्म तरी मोडवेल कशि आज्ञा ।
सुज्ञांहींच विचारुनि प्रेषावें, आणितों तया अज्ञा ॥ १५ ॥
बोलुनि सगर्व गेला पक्षिप तो वानरा अणायाला ।
शंकां धरील तरि कां, मर्कट ह्मणतां मुखीं हणायाला ॥ १६ ॥

---

१ वानर, मारुती. २ सैन्याचा पराभव करून घे. ३ पाते लवत नाहीं तोंच, एक क्षणांत. ४ घोडे. ५ पर्वत. ६ ज्या सैनिकांनीं समूह केला होता त्याच्यावर. कट—समूह. ७ एकेक क्षण महत्वाचा आहे असें मानी. ८ पर्वत. ९ गरुड. १० अन्वय—मर्कट ह्मणतां मुखीं हणायाला शंका तरी कां धरील.

हणितांच मुखीं चडकुण् पडला येउनि सभांगणीं हरिच्यां[1] ।
वरिच्यावरि जरि सांवरि होती बहु वेदना परोपरिच्या ॥ १७ ॥

येउनि समीप श्रीपति फिरवी अंगावरुनियां कर तो ।
करितो दया प्रभू परि शिणवुनि दासासि बहु दयाकर तो ॥१८॥

प्रार्थी विगर्व विपती उचित तुह्मालागिं हें न देवा जी ।
सांगावी तीच तया वाटे सर्वांस योग्य सेवा जी ॥ १९ ॥

होतों मीच ह्मणुनियां आलों परतूनि आजि या ठायां ।
कथितों शपथपुरःसर प्रभुचरणीं सत्यसत्य वाटाया ॥ २० ॥

देव पुन्हां त्यासि ह्मणे 'जा वद दाशरथि राम बाहतसे ।
येइल सत्वर कपि तो तोंवरि येथेंचि मार्ग पाहतसे'॥ २१ ॥

गरुड ह्मणे निःसंशय आलें कीं मरण वाटतें मजला ।
यास्तव प्रभुहि पुन्हां मजलागीं प्रेषावयासि तो सजला ॥ २२ ॥

जाय हळुहळू भीतचि पक्षिप तो वानराचिया जवळीं ।
बाहे तुज दाशरथी ह्मणतां तत्काल तत्पदां कवळी ॥ २३ ॥

आलिंगूनी ह्मणे बा दाखवि रघुराज आज लौकरि तो ।
करि एवढी कृपा मजवरि तुज शतवार मी नमन करितों ॥ २४ ॥

इकडें सभेंत आधीं प्रभुनें भामेसि शीघ्र आणविलें ।
आला असे मरुत्सुत होई सीता असेंचि जाणविलें ॥ २५ ॥

जरि शृंगार करी बहु न दिसे सीतसमान रूप तिचें ।
रुक्मिणिला हो सीता ह्मणतां मन मोहिलें तिनें पतिचें ॥ २६ ॥

आला घेउनि सत्वर मारुतिला तो खगेंद्र परि दचके ।
कीं रामरूप नसतां तोडिल माझेचि हा पुन्हां लचके ॥ २७ ॥

झाले कृष्ण रघूत्तम सीता झालीच रुक्मिणी देवी ।
बळिराम होय लक्ष्मण यास्तव वायुज पदींच शिर ठेवी ॥ २८ ॥

---

१ कृष्णाच्या.

बाण धनू करि साजे लक्ष्मण सीताहि उभय बाजुकडे ।
पाहे नमन करुनि वरि देखे कृष्णाख्य दिव्य तें रुपडें ॥ २९ ॥
झाला चकित मनीं बहु मारुतिला ह्मणति राम बापा हें ।
द्वापरयुगांत दिधलें दर्शन तुजलाचि आजि वा पाहे ॥ ३० ॥

## याच आख्यानाचीं पदें.

पद ( गड्यानो कृष्ण गडी या–च लीवर. )

( नारद व मारुति यांचा संवाद. )

नारद सांगे मारुतिला ॥ ह्मणती द्वारवती पुरिला ॥ धृ० ॥ ह्मणसी कनकमयी लंका ॥ ही तरि वृथा तुझी शंका ॥ वाजतो सर्वत्रीं डंका ॥ वर्णिल कोण इच्या वंका[1] ॥ दुसरी पुरी नसे सरिला[2] ॥ १ ॥ येथिल राजा बळिराम ॥ गाजतें जगत्रयीं नाम ॥ काढिना[3] काय तुझें काम ॥ आपुलें जवळ करि धाम[4] ॥ होइल सौख्य तरी तुजला ॥ २ ॥ सोडिल नाम कशासाठीं ॥ असतां सैन्याच्या थाटीं[5] ॥ त्यजावी त्वां अपुली धाटी[6] ॥ न लागे या कृत्या पाठीं ॥ भांडतां फल न दिसें मजला ॥ ३ ॥ वायुज कोप-भरें बोले ॥ उपडुनि नगरीला झोले ॥ देइन तत्पतिला टोले ॥ न कां मग मान तुझी डोले ॥ दावितों पहा विक्रमाला ॥ ४ ॥ गिरिवासी तो प्रभुराम ॥ पुरविल मम सकलहि काम ॥ नको यावेळ जरा थाम[7] ॥ स्मरतों पद अष्टहि याम[8] ॥ भरंवसा मी त्याचा धरिला ॥ ५ ॥

## अंजनीगीत.

( नारद मारुतीस ह्मणतो. )

मारुतिराया तूं बळकट ॥ केली यातुपा[9] कटकट ॥ लंका करुनी जळकट ॥ तोषविली सीता ॥ १ ॥ शक्ती लागली लक्ष्मणा ॥ वा तूं गेलासी तत्क्षणा ॥ झडकरि अणिलें गिरिद्रोणा ॥

---

१ महत्व. २ तोंडीला, बरोबरीला. ३ तुझी खोड मोडणार नाहीं काय ४ घर. ५ समूह. ६ रीत. ७ थांब. ८ प्रहर. ९ राक्षसांस.

रक्षीलें त्यासीं ॥ २ ॥ ऐसे रामावरि उपकार ॥ झाले तूझेची कीं फार ॥ यांच्या गर्वाचा परिहार ॥ करिशिल तूं आतां ॥ ३ ॥ आहे मजलागीं हें ठावें ॥ तूझें गुण तरि किति म्यां गावें ॥ जाउनि सांगतों त्यागावें ॥ बळिनाम आपुलें ॥ ४ ॥ वाटे येईल युद्धासी ॥ देइल पराभूती[1] त्यासी ॥ होइल आनंद रामासी ॥ करि एवढें काज ॥ ५ ॥

### दीपचंदी

( श्रीकृष्ण व बळिराम यांचा संवाद. )

यदुवीर पूसतसे बळिरामा ॥ धृ० ॥ तो कपि केवळ मूर्ख-शिरोमणि, मानिल कां वरें सामा[2] ॥ १ ॥ युक्तीनें जरि त्यासि धरावें, साध्य न तें गुण[3]--धामा ॥ २ ॥ यापरिचा तो अविनय वानर ॥ अणितां नवलचि आह्मां ॥ ३ ॥ राम ह्मणे कपिटा कितसे गिरी[4], आणुं कसा घन-श्यामा ॥ ४ ॥ गिरीवासी प्रभू ऐकुनि हांसत सोडुनि द्या निज-धामा ॥ ५ ॥

### पद ( उद्धवा शांतवन कर जा-- या चालीवर.)

( गरुड कृष्णास ह्मणतो. )

ह्मणे पक्षिप[5] यदुवीरासी, कां केली पातळमाया ॥ धृ० ॥ हें काय तुह्मां बरें गमलें, पाठविणें कीशापासीं[6] ॥ मी जाउनि कांहिं तरि वदलों, वाटाया विपरित त्यासी ॥ व्यर्थ हो ताडिलें मजला, नाहिं झटलों मी शरिरासीं ॥ चाल ॥ किति कठोर कर हो त्याचा ॥ जरि असतां दुसरा कांचा[7] ॥ सोसिता कसा या जाचा ॥ पू० चा० ॥ वाचाळपणा नसे केला, प्रभु कथितों तुमच्या पायां ॥ १ ॥ जरि भाषण कांहीं तरि करितां, मी उत्तर देतों त्यासीं ॥ आहे रीत अशी या लोकीं, तें काय कळें मूढासीं ॥ मर्कट तो अविनय मोठा, समजेना हो बोलासीं ॥ चाल ॥ काकासि ह्मणेना काका ॥ ऐशासि मारिल्या हांका ॥ तो काय मानितो

---

१ पराभव. २ सख्य. ३ हे सद्गुण संपन्ना. ४ पर्वत. ५ गरुड. ६ वानर. ७ कच्चा.

धाका ॥ पू० चाल ॥ नाकासि[1] धरुनियां बसतां, तरि मरणें येते वायां ॥ २ ॥ हा विचार अधिं तुह्मि करितां, कां होतां मजला शीण ॥ पहा झाली किति तनु माझी, या योगे प्रभुजी क्षीण ॥ हें वर्म कळेना मजला, कां झालों इतुका दीन ॥ चाल ॥ हें करणें तुमचें देवा ॥ नसतें तरि घडती सेवा ॥ काय कपिचा तारि हो केवा ॥ पू० चाल ॥ खेवांसि[2] देत गिरीवासी, प्रभु करुनि कृपेची छाया ॥ ३ ॥

पद–( जलद त्रिताल. )

( गरुड श्रीकृष्णाची प्रार्थना करतो. )

हरि मजला चालवेना ॥ धृ० ॥ मला वाटे येती भोंड ॥ पहा सुकलें किं तोंड ॥ कोठें निवाऱ्यांत कोंड ॥ धोंडें[4] परि हीं साहवेना ॥ १ ॥ मज आलें मरण कळुन ॥ आतां जातें कसें टळुन ॥ गेले हातपाय गळुन ॥ पळुन सहसा जाववेना ॥ २ ॥ नाहिं करित मी सोंग ॥ घेऊं कशासाठीं कोंग ॥ तुज वाटों न हें ढोंग ॥ ओंगळा त्या पाहवेना ॥ ३ ॥ गिरीवासी प्रभु सांग ॥ कांहिं जीवनाचा थांग ॥ जसा खातो कोणि भांग ॥ अंग जड हें उडवेना ॥ ४ ॥

पद–( जलद घनाक्षरी. )

( श्रीकृष्ण गरुडाचें सांत्वन करितो. )

झाली गती अशी काय ॥ रडासि मोकलुनी धाय ॥ बावा लागला कोठें धाय ॥ मोठा शूर पाही, कोणि तुजसम नाहीं, घडला कसा तूज अपाय ॥ १ ॥ आतां उठुनि कांहीं खाय ॥ घेई विश्रांति तरी जाय ॥ हात कुरवाळी, श्रम दुरवाळी, प्रभु खरा तो बाप माय ॥ १ ॥

---

१ माझें नाक धरून बसला असतां तर मला मरणच आलें असतें. गरुडाचें लांब नाक आहे. २ विशाद. ३ आलिंगन. ४ दगड, धोंडा.

### अंजनीगीत.

( नारद सत्यभामेला सांगतो. )

नारद बोलीले भामेसी ॥ कां तूं व्यर्थची शिणतेसी ॥ जें जें होतें त्या सीतेसी ॥ सांगतों तुजला ॥ १ ॥ कानीं घाली तूं बेसरं ॥ याचा न पडावा वीसर ॥ जरि ह्मणती त्या हतसरं ॥ घालावे पायीं ॥ २ ॥ वाळे घालीगे हातांत ॥ बुगडी असों दे नाकांत ॥ वांळि एकची केशांत ॥ घालुनि थे बाई ॥ ३ ॥ वरकड तुजला सांगुं काई ॥ सीतेची त्या एकचि बाही ॥ ऐशा सुंदर रूपा पाही ॥ लंकेश भुलला ॥ ४ ॥

### कटिबंध.

( रामरूपाचें वर्णन. )

रतन मुकुट है शिरपर डाला ॥ भाल लगायो मृगमद काला ॥ सोहत गले मोतनकी माला ॥ शाम तनूसे होत उजाला ॥ बांधे कटि पीतांबर पीला ॥ वोढे प्रभु भरजरी दुशाला ॥ पहेनालियो अंगा मखमलका ॥ सरलपटा सरपेंच बांका ॥ नोक झोंकसे लोक भुलावे ॥ ले धनु हातें बान उठावें ॥ लछमन सीताकोभी बुलावे ॥ जग सारा हैरतमें डुबावे ॥ अजब तजेला भया उजाला ॥ चलो चलो रघुराज सजेला ॥ देख आवें दशरथ लाला ॥ सबही निकसे बाल गोपाला ॥ भई भीडतब गई सुध हरलई प्रभूनें ॥ कई बार अई सुरत नजरपर ॥ दई धई नहि हुई शांती ॥ फिर ताके मूरत ॥ ज्याकी कीरत बेद बखानत ॥ देख देख मनमों पछतानत ॥ यह रूप सुंदर ऐसो मंदर ॥ कंदर गिरिके बैठत अंदर ॥ उनको न मिले चंदर क्या है ॥ इंदरकोभी पारन जिसका ॥ मार लियो दस कंधर अज वो ॥ बंदर खातर रूप बनो है ॥ इतनेमें वो कपिसर आया ॥ सीस नमाकर देखलीया ॥ सब ठान मान प्रभुराम चरनपर ॥ मिठी मारजो देखा ऊपर ॥ किशनरूप महाराज दिखायो ॥ कहत अंजनी सुतसे द्वापरजुगमें तुमको दरसन दियो है ॥ महाराज जदुबिर ऐसो रूप सुंदर राम बनो है ॥ महाराज ॥ १ ॥

---

१ हीं दागीनें आहेत. २ कस्तूरी. ३ आचंबा.

# लोपामुद्राख्यान.

## कथा–सारांश.

एका राजाचा मुलगा तरुण असून रूपानें फार सुंदर होता. तो मृगयेकरितां अरण्यांत गेला असतां फार श्रमला, व अगस्तीचे आश्रमांत आला. त्याचें रूप पाहून अगस्ती मोहित झाला, व राजपुत्रास ह्मणाला माझी बायको हो. राजपुत्र फार रागावला, व त्यानें अगस्तीचा उपहास केला. अगस्तीनें त्या राजपुत्राचें अंगावर पाणी मंत्रून टाकिलें, तेव्हां तो स्त्री बनला. नंतर त्याचा बाप तेथें आला त्यानें अगस्तीस 'शिक्षा करीन,' ह्मणून धाक दाखविला. 'तुलाही सासू करितों' असें ह्मणून अगस्तीनें हातांत उदक घेतलें. तेव्हां राजा घाबरला, व त्यानें त्या स्त्री बनलेल्या मुलाचें व अगस्तीचें लग्न लावून दिलें. त्या स्त्रीची पूर्वींची मुद्रा (रूप) लोपली. तेव्हांपासून तिचें नांव लोपामुद्रा असें पडलें. ती स्त्री फार पतिव्रता होती ही कथा या आख्यानांत आहे.

## आर्या.

कांता कुंभजमुनिची लोपामुद्रा असे जगन्मंहित[1] ।
चरित तिचें अति पावन श्रवणें होईल कां न जन्माहित ॥ १ ॥
तीच कथा सुत सांगे शौनक-प्रभृती ऋषीस अदरानें ।
कीं तो रस हास्य बहू झांकालाचि निज मुखांसि पदरानें ॥ २ ॥
ह्मणती मुनिजन सारे तरि मग श्रवणासि येउं देच अधीं[2] ।
सांगे समूळ कथन श्रवणें जावोत सर्वही आधी ॥ ३ ॥
सांगे सुत सकलांतें सुरस कथा ही नमूनियां महिला ।
द्या चित्त एकदाची सारे आकर्णनासि यांम[3] हिला ॥ ४ ॥
आद्ययुगीं मुनि कुंभज वैसुनियां काननीं तपासि करी ;
झालें भय अमरातें त्यांतहि चिंता बहूत पांशि[4] करी ॥ ५ ॥
प्राशिल नीर उदधिचें तरि मग यावेंचि दैन्य यादांसीं[5] ।
यांस्तव चिंता वाटे प्रभुवर कां कोपलासि या दासीं ॥ ६ ॥

---

१ जगतांत पूज्य. २ दुःखें. ३ प्रहर. ४ वरुण. ५ जलांतील प्राणी.

भ्याले सुरगण अवघे ह्मणती तप-तेज काय हो याचें ।
पाठविल्या जरि युवती शक्रानें विघ्न काय होयाचें ॥ ७ ॥
झालें तप प्रखर बहु मुनिचें लोकत्रयासि कांपवि तें ।
मग तोंहि निज पदासह नाहीं देणार इंद्र कां पावितें ॥ ८ ॥
इकडे भूमंडलिं हो काय चमत्कार जाहला परिसा ।
होइल कनक न कां तें तत्कालचि लोह लागल्यां परिसा ॥ ९ ॥
नगरी कुंभक नामा दक्षिण देशांत जी असे महित ।
नांदे नृपवर तेथें बाहूबळ ह्मणति सर्व ज्या महित ॥ १० ॥
भार्या रूपवतीला पुत्रहि सुकुमार तो सुतनु जाला ।
जाला मोहित मुनिवर पाहुनियां त्याच राजतनुजाला ॥ ११ ॥
वय वर्षें सोळाचें रुप सुंदर वर्णितां नये कविस ।
बहुधा नसेल दुसरा भुवनें जरि धुंडिलींच एकविस ॥ १२ ॥
ऐका अद्भुत हें किति जरि होता कुमर तो मदनसाच ।
ह्मणउनि काय तयाचें चुंबावें मुनिवरें वदन साच ॥ १३ ॥
तो एकदां नृपात्मज घेउनि निज सैन्य काननां गेला ।
मृगयार्थ भ्रमला बहु अप्राप्तिस्तव मनांत रागेला ॥ १४ ॥
हरिणापाठीं भ्रमला श्रमला ऐशांत दिन बहु क्रमला ।
गमला ताप अर्धीं मग पाहुनि दिव्याश्रमासि तो रमला ॥ १५ ॥
सोडुनि सेना मागें घेउनि निज भृत्य राज-नंदन तो ।
गेला एकाकीं त्या पाहुनि मुनिला करीत वंदन तो ॥ १६ ॥
देखुनि राजसुतातें झाला व्याकुळ मुनींद्र मदनानें ।
वदनानें स्तौत्य करी लालन-पर तो तसाचि सदनां ने ॥ १७ ॥
बोले मुनी हळुच बग कांता होतोसि काय तूं माजी ।
मौंजी कर्व घालुनियां चुंबी परि तो न जाहला राजी ॥ १८ ॥

---

१ व्हावयाचें. २ बजाला. ३ पूज्य. ४ पृथ्वीत. ५ राजाचा लेक. ६ स्तुति, तारीफ. ७ कमरेला. ८ मिठी.

झिडकारिलें तयानें रोषें त्या मुनिवरासि तरि तो ये ।
ऐकेनाचि असा जंव पाहे मंत्रूनि सिंचिलें तोयें ॥ १९ ॥

काय तपाचें बळ हो केलें तत्काल कामिनी–रत्न ।
भृत्यहि दासी झाल्या सरले त्यांचे समस्त मग यत्न ॥ २० ॥

गेलें सैन्य सकल तें नगरां परि तो कुमार कां नाहीं ।
म्हणउनि शोधित फिरले आलें दुर्वृत्त घेत कानाहीं ॥ २१ ॥

भीती सेवक-जनही राजातें सर्व वृत्त कळवाया ।
कोणी म्हणती सांगूं, जातें हें एक एक पळ वायां ॥ २२ ॥

मग ते सैनिक अवघे जाउनि भूपासि सांगती कथन ।
घडलें अघटित कीं हें व्हावें त्याचें अतां कसें मथन ॥ २३ ॥

भूपहि सचिंत झाला योजूं तरि कोणत्या उपायासीं ।
आहे कोण असा क्षम वंदूं त्याच्याचि आज पायासीं ॥ २४ ॥

कांता रूपवतींही ऐकुनियां बहु करी विलापातें ।
समजेना कवणांही भूवरि प्राणांत दाविला पातें[2] ॥ २५ ॥

मग तो नृपाल सत्वर घेउनि निज सैनिकांसि कोपानें ।
गेला त्यासंनिध जो निज कुमराच्या तनूसि लोपा नें ॥ २६ ॥

भेटुनि तयासि बोले करणें तुज काय हें बरें घटजा ।
हो सावध ना तरि मी जाळिन तुज आणि या तुझ्या उटजा ॥ २७ ॥

पलटवि रूप सुताचें आहे कल्याण यांत हें समज ।
करिशिल विलंब तरि मग स्थानीं रिपुच्याचि तूं अहेस मज ॥ २८ ॥

कोपें बोले मुनिवर मूढा मज भिववितोसि कां वाया ।
करितों सात्तु तुलाही लवहि नको स्त्रीस्वरूप पावाया ॥ २९ ॥

ऐसें बोलुनि घेतां झाला निज हस्तकींच तोयास ।
अभिमंत्रुनि टाकावें आली छुरिकेत स्फूर्ति तों यास ॥ ३० ॥

---

१ निरसन. २ संकट पडून. ३ कुंभज, अगस्ती. ४ झोंपडी. ५ सुरी.

नमुनि ह्मणे मुनिवर्या चुकलों अपराध हा क्षमा कर गा ।
झाली मम पुत्राची कन्या ती तरि असे तुझ्या कर[1]गा ॥ ३१ ॥
बोले मुनिवर आतां द्यावी कन्या यथाविधान मला ।
इतरीं नसे मदात्मा ईच्या ठायींच हा असे रमला ॥ ३२ ॥
मग त्या भूपें मुलिच्या पाणिग्रहणासि करविलें विधिनें ।
होतें असेंचि लिहिलें भाळिं सुताच्या ह्मणे पहा विधिनें ॥ ३३ ॥
तें पासुनि हें झालें लोपामुद्रा तिचें असें नांव ।
गाती कीर्ति जगत्रयिं भवतरणाचीच ती असे नाव ॥ ३४ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

पद–( घनाक्षरी. )

( राजपुत्र अरण्यांत शिकारीस जातो. )

चली सेना सब सात ॥ लियो सायक धनु हात ॥ भई शुद्ध जब प्रभात ॥ कुंवर जात विपिनमो ॥ १ ॥ उमर सोलाकी साल ॥ कुटिल सिरमेके बाल ॥ बदन चांदकी मिसाल ॥ मोतन माल गलेमो ॥ २ ॥ रूप सुंदर सुकुमार ॥ नजर आवे जैसो मार ॥ कमर लटके तलवार ॥ है दलभार संगमी ॥ ३ ॥

पद–( गडयानो कृष्ण गडी. )

( ऋषी मोहात होऊन ह्मणतो. )

मुनिवर ह्मणे सुतनु आजी ॥ कांता होई तूं माझी ॥ धृ० ॥ रमलें चित्त तुझ्या ठायीं ॥ यास्तव ह्मणतों मी पाही ॥ पडेना न्यून कधीं कांहीं ॥ होइल आनंद तुजलाहीं ॥ सत्वर होउनियां राजी ॥ १ ॥ आश्रम पहा आहे कैसा ॥ नाहीं भुमंडलिं ऐसा ॥ इच्छित वस्तू दे जैसा ॥ पुरविना सुरतरुही तैसा ॥ हें तूं अणुनि मनामाजीं ॥ २ ॥ मी ही तरुण अहे कसला ॥ द[2]इन पदार्थ जो नसला ॥ दिससी मजलागीं रुसला ॥ असा काय राग मनीं

---

[1] हातांत. [2] मदन.

घुसला ॥ सांग रे मनांत जें डाजी ॥ ३ ॥ इच्छा नसे इतर कांहीं ॥ मोहलों रूप-ललामाहीं ॥ असे तूं स्वस्थचि या गेहीं ॥ आठवी गिरिवासीलाही ॥ पुरविल वांछा तुज जी, जी, ॥ ४ ॥

पद-( जलद घनाक्षरी. )

( राजपुत्रानें झिटकारल्यावर मुनी ह्मणतो. )

नको होऊं ऐसा दंग ॥ घडो देईं अक्षयीं संग ॥ कांरे करिसी मनोभंग ॥ राहे मजपाशीं, सुख तूं भोगिसी, सोडी अतां सारे ढंग ॥१॥ कळुं दे तुझें अंतरंग ॥ नको झिडकारू रे अंग ॥ कांरे लायकसी, हटची धरिसी, समजुं नको मज भणंगे ॥ २ ॥

पद-( घनाक्षरी. )

( राजपुत्र रागावून मुनीस ह्मणतो. )

करिन ह्मणसी मज नार ॥ चुंबन दिधलें शतवार ॥ तुवां केला अविचार ॥ क्षमा फार आमुची ॥ १ ॥ दिलें तुजला जिवदान ॥ क्षेम यांतचि तूं मान ॥ करुनि घेशिल अवमान ॥ नाहिं भान तुजमधें ॥ २ ॥ मुढा भ्रमलासी फार ॥ तुला न कळे नर नार ॥ झालासि जन्मुनि भूभार ॥ जननि फार श्रमविली ॥ ३ ॥ अहे मि राजाचा सूत ॥ पाहा माझे किति दूत ॥ तुला आणतिल हे मूत ॥ राहिल ऊत मग कसा ॥ ४ ॥ कशी नाहीं तुज लाज ॥ ह्मणसि होईं मज भाज ॥ किती विपरीत हें काज ॥ करिन माज दुर तुझा ॥ ५ ॥

पद-( जलद त्रिताला. )

( राजकुमार स्त्री झाल्यावर आपल्या स्त्री झालेल्या भृत्यास ह्मणतो. )

अतां येथें मी करूं काई ॥ धृ० ॥ होतों सुखी किहो घरीं ॥ व्यर्थ आलों वनांतरीं ॥ येथें झालि ऐसी परी ॥ दुरि राहिली बाप आई ॥ १ ॥ माझें कर्म दिसे खोटें ॥ नाहिं मार्ग जाऊं कोठें ॥ कैसें अन्न-पाणी घोटें ॥ मोठें विघ्न हें आलें बाई ॥ २ ॥ हें मी सांगु कवणापाशीं ॥ कोण करितो काय या-

---

१ दुःख देते. २ दरिद्री. ३ माजोरेपणा. ४ बायको.

ीं ॥ आले वाटे होणें दासी ॥ ऋषी पडला असे डोई ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धाव ॥ सत्वर तुं तरि अतां पाव ॥ नाहीं तिहीं लोकीं ठाव ॥ नांव अपुलें राख पाही ॥ ४ ॥

दीपचंदी–काफी–( भोळानाथ दिगंबर. )

( पुन्हा म्हणतो. )

दुःख हें सांगूं आतां कवणासी ॥ पुरुषाची मी नार का झालें खंती हेचि मनासीं ॥ धृ० ॥ लज्जा वाटे मजला भारी ॥ तोंड कसी दाऊं जनासीं ॥ अंतरलें मी आईबापातें ॥ इतरहि गोतगणासीं ॥ १ ॥ मुकलें कीं मी राज्यपदातें ॥ अन्यहि मान धनासीं ॥ गिरीवासी प्रभू पाव अतां मज ॥ नमितें मी चरणासीं ॥ २ ॥

पद–( मजला वरिल सुमद्रा काम. )

( राजा देवाची प्रार्थना करतो. )

पडलें संकट हें भारी, रामा धांव किरे ॥ धृ० ॥ होता मजला एकचि सूत ॥ कन्या झाली हें अद्भुत ॥ करिन हा देह अतां मी दूत ॥ वेळ बहूत राहवेना ॥ १ ॥ विधिनें लिहिलें कसें भाळीं ॥ सदोदित हेंचि मनीं जाळीं ॥ एवढें विघ्न अतां टाळी ॥ ये काळीं पाव मला ॥ २ ॥ सुचेना उपाय तो कांहीं ॥ जाहली असि गति तोकां ही ॥ सांगतों जरी सैनिकांहीं ॥ थिर नाहीं त्या लागीं ॥ ३ ॥ गिरीवासी तूं प्रभुराय ॥ दावी आतां तरणोपाय ॥ वंदिन अखंड तव मी पाय ॥ होसी माय तूं आमुची ॥ ४ ॥

साकी.

( राजाची स्त्री विलाप करते. )

सुनी खबर जब कुंवर बिपिनमों कांता रूप बनो है ॥ सोंच करे माता मनमों हे भाई दुःख घनो है ॥ १ ॥ अब मैं कैसी जाऊं बिपिनमों धुंडुं बालक अपनारी ॥ कहूं किसे दुःख अब सार

---

१ हशाला. २ मलाप.

मै हुवा मुझे सुख सपनारी ॥ २ ॥ अवतो जानो नही वचूं मै जहर खाय मर जाऊंरी ॥ बालक मेरो परो विपिनमो कौन जुगतसे काऊंरी ॥ ३ ॥

पद-( उद्धवा शांतवन करजा. )
( राजाची स्त्री विलाप करते. )

कां देव क्षोभला तरि हो, गति झाली बाळा कैशी ॥धृ०॥ बजलाही भुल कशि पडली, मतिबंधाचि केला नाहीं ॥ काय मृगये वांचुनि होता, उपवास पडला गेहीं ॥ कसें करूं सुचेना आतां सुचें उपाय याचा कांहीं ॥ चाल ॥ बाई अनर्थ झाला मोठा ॥ या आग लागो दे पोटा ॥ काय मृग मांसाला तोटा ॥पू० चाल॥ खोटाचि काळ हा गमतो, झालि अघटित घटना ऐसी ॥ १ ॥ कोणतें पाप वडवडलें, मज विपाक नकळें पाही ॥ नसे घात कोणाचा केला, मन माझें देतें गाही ॥ कां बाळ मला अंतरलें, सुख शोधुनि काढा कांहीं ॥ चाल ॥ मी वनासि कैसी जाऊं ॥ बाळाला कोठें पाहूं ॥ हें दुःख कसें हो साहूं ॥ पू० चाल ॥ बाहूंसि बळ कवणाच्या, करि सुटका पहिल्या ऐसी ॥ २ ॥ यासाठीं विचार पडला आहे मार्थूं मी कवणासीं ॥ कोण हो दयाळू ऐसा, सोडवितो त्या बाळासी ॥ मज चिन्ह दिसेना बरवें कोण शिक्षा करितो त्यासी ॥ चाल ॥ हें अरिष्ट आलें मोठें ॥ बाइ कर्मचि अपुलें खोटें ॥ गिरिवासि आहे तरि कोठें ॥ पू० चाल०॥ बोटेंच कानिं घालुनि कां बसला हें नकळें मजसी ॥ ३ ॥

पद-( काफी-दीपचंदी. )
( राजाची स्त्री विलाप करते. )

अब मै कैसी करूं मेरी माई ॥ धृ० ॥ बालक ऊठा वन जा बैठा ॥ नाहि मै उसे न्हलाई ॥ १ ॥ ना उसे बोली ना मै चाली॥ ना मै रोटी खिलाई ॥ २ ॥ लरका मेरा मुनिनें घेरा ॥ अवहि कोता बनाई ॥ ३ ॥ किस बन जाऊं कहां उस पाऊं ॥ बडी अफत सिर आई ॥ ४ ॥ गिरीवासीसे कोन जा बोले ॥ मुनिको करे मनाई ॥ ५ ॥

( कटीबंध. )

( राजाचा मुलगा—लोपामुद्रा—कसा दिसला. )

अजब रूप है इस कामिनका ॥ पडत उजाला सबही तनका ॥ माल नही उर्वशी मेनका ॥ कहां गुजारा फिर औरनका ॥ मारे जिनको बान नयनका ॥ घायल कर दे तन मन उनका ॥ कूच सघन घन चपला जैसी ॥ अगन गगनमें चमके वैसी ॥ कुटिल बाल है निटिल देसके ॥ उपमा इसको कौन दे-सके ॥ सीस फूल है सिरमें डाला ॥ हार गले मोतनकी माला ॥ वोढे अंगपर लाल दुशाला ॥ सोहे हात फुलोंका झेला ॥ पहेन लिई साडी जरतारी ॥ चोली कीमतमें है भारी ॥ नग सिरके सब सिरमे डारी ॥ नाक नथनिया हातों चूडा ॥ सोहत सिर बालोंका जूडा ॥ भाल तिलकसे चमके मुखडा ॥ रंग लाल पानोंका वीडा ॥ जडाव कंगन पावों पैंजन ॥ डार दियो है आंखों अंजन ॥ दांत मिसीका सोहे मंजन ॥ कंजनयन सब संज बनी है ॥ छांड दियो हाथी-दल भंजन ॥ वैठी करत मुनी-मनरंजन ॥ अजब नसीबेके है ताले ॥ इसी तऱ्हे पडते है घाले ॥ कछु नहि होता बोले चाले ॥ कोन पडे फिर इसके पाले ॥ डोले मुनि उस देख देखकर ॥ बोले मनमें सोंच सोंचकर ॥ रहो खुषीसे काम किसीसे ॥ नहि मत डरना धरना धीर ॥ भरोसा दे दे कामिनको समजाया ॥ देखो ये मुनिनें कैसी पुरखाकी नार बनाया ॥१॥

( अंजनी गीत. )

( राजा अगस्ती ऋषीस ह्मणतो. )

बोले भूपाळ मुनिवरा ॥ आहे अपराधी मीं खरा ॥ पहलें अंतर क्षमा करा ॥ वंदीतों पायां ॥ १ ॥ तुमच्या तपाचें हें बळ ॥ ठावें असतें मज सकळ ॥ करितों तरी कां मी छळ ॥ जाणूनि ऐसा ॥ २ ॥ पडला होता मज भ्रम ॥ तुह्मि तो निवारिला श्रम ॥ चालू केला राज्यक्रम ॥ उपकार तुमचा ॥ ३ ॥ केला बाळानें अन्याय ॥ मनीं धरीना ती माय ॥ तैसा केला तुह्मी न्याय ॥ रक्षिलें मजला ॥ ४ ॥ केला होता आपुला घात ॥ तुह्मिं टाळिला हातोंहात ॥ आतां मी झालों निवांत ॥ कृपेनें तुमच्या ॥ ५ ॥

# श्रीशिवरात्र कथेचें आख्यान.

( कथा प्रसिद्ध असल्यामुळें सारांश दिला नाहीं. )

## आर्या.

नरवर शशिदंत करी जगतीवरि राज्य निज–प्रियासहित ।
पंचशता जरि कांता वांछिति दोघी निजप्रियास हित ॥ १ ॥

वरकड असती साऱ्या परपुरुषीं रत सदा मदानें हो ।
ग्राह्य करी नच कोणी ह्मणती वश त्यास दामदानें[1] हो ॥ २ ॥

त्या पापें नरपतिचें गेलें पुण्य क्षयासि होतें जें ।
नाहीं तरि लोपवितां शशिसूर्यांच्या कळांसि हो तेजें ॥ ३ ॥

पावे भूप मरण तो करिती सहगमन कामिनी हो त्या ।
ज्या पतिसेवेलागीं अति तत्पर दिवसयामिनी होत्या ॥ ४ ॥

पापें कुरंग झाला पति झाल्या त्या कुरंगिणी कांता ।
शांता दांता कांता परि रंजविती सुरंगिणी कांता ॥ ५ ॥

इन्द्रसभेमाझारीं सुमती गंधर्व गायनीं चुकला ।
हो व्याध असें ह्मणतां तत्कालचि निजवपूसि तो मुकला ॥ ६ ॥

होउनि व्याध धरेवरि विचरे धनुबाणही जवळ वसवी ।
पसरुनि वागुर[2] विजनीं[3] बहुधा हरिणांसि अनुदिनीं फसवी ॥७॥

माघीं कृष्णचतुर्दशिदिवसीं तो व्याध वनिं बहु श्रमला ।
भ्रमला परंतु न मिळे मांस मृगाचें, अशांत दिन क्रमला ॥ ८ ॥

वागुर पसरुनि भूतळिं बिल्वतरुवरिं चढूनिया बसला ।
चित्तीं ह्मणे पहा अजि दैवें हा उगवला दिवस कसला ॥ ९ ॥

नेत्रांअडील[4] तोडुनि बिल्वदळें भूतळासि तो टाकी ।
घडलें लिंगार्चन, त्या भक्ताचा प्रभुवरासि तोटा कीं ॥ १० ॥

उपवास दिवा पडला रात्रौ लिंगार्चनादि विधि घडला ।
झडला मळ पापाचा ह्मणवुनि यमधर्म दृष्टिला पडला ॥ ११ ॥

---

१ द्रव्य देऊन. २ जाळें. ३ अरण्यांत. ४ डोळ्या आड आलेले.

बोले यमधर्म तया वा ये बैसे विमान हें तुजला ।
आणिलें प्रभ्वाज्ञेनें पाहुनि तव पूजनासि तो रिझला ॥ १२ ॥
व्याध ह्मणे मी पापी शिव तरि मज कासयासि आणवितो ।
घडलें दर्शन तुमचें, द्या मज वर दोन हेंचि जाणवितों ॥ १३ ॥
भाषा कळो मृगांची, मृगमांसाचें अखंड भोजन हो ।
यापरतें जें कांहीं त्याचें मजला नसें प्रयोजन हो ॥ १४ ॥
पूर्वज्ञान मृगातें, करुनि उपोषण तृषार्त तोयास ।
आला सरस्तटीं त्या पाठी व्यसनांत व्याध तो यास ॥ १५ ॥
लागे वेळ बहुतसा ह्मणवुनि धुंडीत त्या प्रिया फिरल्या ।
आल्या सरोवरीं मग व्यसनीं दयितासि पाहतां बिरल्या ॥ १६ ॥
ह्मणती निजपतिला त्या, या बाहिर व्याध तो जवळ नाहीं ।
जलपानातें करुनी जाऊं हळुं हळुं असेंचि वळणांहीं ॥ १७ ॥
वृक्षीं बैसुनि लक्षी कक्षीं धनुबाण सर्वदा रक्षी ।
पक्षी-मृग-पैल-भक्षी वक्षीं ताडावयासि ओपेक्षी ॥ १८ ॥
रडती प्रिया वियोगें हरिणी वर्णील कोण गाहिंवर तो ।
भाषण ऐकुनि उतरे व्याधहि वृक्षांवरुनि माहिवर तो ॥ १९ ॥
करुनि उपोषण आला सरतटिं त्या पारणा करायासी ।
घे पलें अमुचें देतों जाऊं दे आपुल्या घरां यासी ॥ २० ॥
वाटे भार तुला जरि मांसाचा न्यावयासि गेहातें ।
येतों चाल तुजसवें, मारीं सदनींच, शस्त्र घे हातें ॥ २१ ॥
मरती सुवासिनी ज्या पावति कैलास लोक त्या धन्या ।
अन्या गति आह्मातें देउं नको, समज आपुल्या कन्या ॥ २२ ॥
बाळें ह्मणती आह्मां मारुनि घे मांस कोवळें खारें ।
सोडी या जरठाच्या मांसाचा यापुढें न लेखा रे ॥ २३ ॥

१ संकटीं. २ घाबरल्या. ३ वळणावळणांनीं. ४ मांस. ५ टपलेला आहे.

व्याध ह्मणे त्या सर्वां मानूं विश्वास केविं सांगा तें ।
सोडिन तरीच मृग तो शशंकास्थित[1] अणाल सांगातें ॥ २४ ॥

ठेउनि साक्षी त्यातें मुक्त करिन निश्चयेंसि मग जाणा ।
त्यावांचुनि हें न घडे पुष्कळ जरि वाहिल्या तुह्मी आणा ॥ २५ ॥

ह्मणती मृगी तयासीं ठेवी विश्वास आमुच्या वचनीं ।
विश्वासघातकी जन पडती जाऊनियां नरक-पचनीं ॥ २६ ॥

वाटे आश्चर्य तया, पशुलाही धर्म हा सकळ कळतो ।
असतो मूढ, अजवरी मीही पाहून यास कळकळतों ॥ २७ ॥

व्यर्थ जिणें हें माझें पशुतुल्यहि योग्यता नसे माजी ।
राजी देव कसा मग, केली हिंसाचि काननांमाजीं ॥ २८ ॥

त्याळी वसें अपुलीं अयुधें टाकून देतसे धरणीं ।
मार्थी शिवासि मग तो प्रभु आतां ठाव दे ह्मणे चरणीं ॥ २९ ॥

असडुनि पाश मृगाचा सोडी तो जीवनार्थ कासारीं ।
होतां शिव-पद-लीनाचि जातिल दुःखेंहि मग न कां सारीं ॥ ३० ॥

स्नान करुनियां मृग ते जलपानातें करीत जों होते ।
आलें विमान घणणण घंटा शिवदूत वाजवित होते ॥ ३१ ॥

आज्ञा असे शिवाची सत्वर बैसून पुष्पकांत चला ।
ह्मणती मृग ते येतों व्याधासहि द्या सवें, चला, उचला ॥ ३२ ॥

वदती शिवदूत तया आलें होतें विमान यासि खरें ।
मागुनि पलमात्रचि हो त्यजिलें मूढाचिया पहा शिखरें ॥ ३३ ॥

मग ते ह्मणती व्याधा शिव-भजनीं तूं अखंड राहेच ।
येसिल कैलासातें अंतीं तुज सांगणें असे हेंच ॥ ३४ ॥

नेले मृगपंचक तें स्वर्गीं अद्यापि ऋक्ष-गणपाळीं ।
पाहति सर्वहि जन त्या शिव निजभक्तां असाचि प्रतिपाळी ॥ ३५ ॥

---

१ चंद्रावर असलेला. २ बरोबर. ३ फक्त मांसच. ४ शिरोमणी. ५ नक्षत्रसमुहांत.

अनुदिनिं गाती ध्याती प्रभुमृत्युंजय असाहि जरि यजिती[1] ।
पावति पूर्ण-पदातें जन्मजरामृत्युच्या भया त्याजिती ॥ ३६ ॥

वदले शिव सकलांतें मजलागीं भक्त कोण आळवितो ।
श्रवण करूं द्या पुरतें सत्य असें कीं उगाचि चाळवितो ॥ ३७ ॥

मग त्या पंचमृगांनीं तत्कालाचि विनविलें शिवाला हो ।
उरला व्याध तसाची झाला पदप्राप्तिचा न त्या लाहो[2] ॥ ३८ ॥

तोचि असेल तुह्मांतें चित्तापासून नित्य आठवित ।
बाटे मोह तयाचा, प्रभुच्या हृदयांत प्रेम दाटवित ॥ ३९ ॥

देव ह्मणे दूतांतें सत्वर आणाचि व्याध या ठायां ।
गेले विमान घेउनि, लागे त्या वेळ काय गाठायां ॥ ४० ॥

ह्मणती चाल विमानीं बैसुनि नेतों तुला शिवापाशीं ।
होइल दर्शन आजिच राहिल कोठूनि ठाव पापासीं ॥ ४१ ॥

नेलें शिवसन्निधची धरवुनियां रूपही भवाचें[3] त्या ।
झाली कृपा भवाची करितें मग काय भय भवांचें[4] त्या ॥ ४२ ॥

## याच आख्यानाचीं पदें.

साकी.

( व्याधाचें पूर्ववृत्त. )

इंद्र सभामों एकदिन सुमती[5], गावें ताल वजावेरी ॥ भूल गयो गत गायनकी तब, इंदर शाप सुनावेरी ॥ १ ॥ व्याध होय विचरे धरनी मुढ, मस्त भयो मद गर्वनसे ॥ सुमती छांड देत तनु अपनी, व्याध्र बनगयो तवसेरी ॥ २ ॥ तरुन होय विचरे धरनी धनु, बानही हातमें लेवेरी ॥ धुंडत मांस मृगनका भटके, नित दिन बिपिन बसावेरी ॥ ३ ॥

---

१ पूजितात. २ लाभ. ३ शंकराची ४ संसाराचें. ५ या नांवाचा गंधर्व.

साकी.

( यम व्याधा समीप कसा आला. )

विमान लेकर अंतक[1] आयो, घननन घाट बजावेरी ॥ कहे व्याध तुम चढो चलो अब, भोलानाथ बुलावेरी ॥ १ ॥ व्याध कहे जमराज हुं पापी, काहेकु नाथ बुलावेरी ॥ दर्शन भये तुमारे मुजको, ये दो वर मिल जावेरी ॥ २ ॥ भाखा समजपरे मृगन-नकी, मांस मृगन नित पाऊरी ॥ नही मुझें औरनसे, कारन काहेकुं सरग मै जाउंरी ॥ ३ ॥

अंजनीगीत.

( यम व्याधास बोलतो. )

ह्मणे अंतक व्याधासी ॥ काल तुं होतासी उपवासी ॥ निशिथीं[2] करूनि पुजनासी ॥ तोषविलें देवा ॥ १ ॥ रात्रीं होतों मी कैलासीं ॥ प्रभुनें कथिलें हें सर्वांसीं ॥ पूर्णभक्त माझा त्यासी ॥ आणवितों आतां ॥ २ ॥ आज्ञा केली मजलागुनी ॥ आलों पुष्पका घेउनी ॥ सत्वर चलावें बैसूनी ॥ कैलासा लागीं ॥ ३ ॥ देव फारची तोषला ॥ ह्मणतो काय मि देउं त्याला ॥ एवढा उपकार वाटला ॥ बा तुझा त्यासीं ॥ ४ ॥ पुजितो अखंड शुनाशीर[3] ॥ नम्र करूनियां शिर ॥ तरि त्या लावितो उशीर ॥ फळ नाहीं ऐसें ॥ ५ ॥ कां तूं करितोसि मग वेळ ॥ चाले विमानाजवळ ॥ त्याच्या कृपा-तरूचें फळ ॥ घे आलें हातां ॥ ६ ॥

पद ( जलद घनाक्षरी. )

( पुन्हां यम बोलतो. )

कांरे झालासी तूं दंग ॥ कळुं दे तुझें अंतरंग ॥ कां तूं चोरितोसी अंग ॥ सांग झडकरि, झालें काय तरि, घडतो प्रभूचा कीं संग ॥ १ ॥ याहुनि दुसरा कोण प्रसंग ॥ होई पदांबुजीं भृंग ॥ चाल लवकरि, विमानाभीतरि, सोडी वरकड सारे संग ॥ २ ॥

---

१ यम. २ रात्रीं. ३ इंद्र.

पद ( गड्यानों कृष्ण गडी या—चालीवर )

( व्याध अंतकाला बोलतो. )

बोले व्याध अंतकाला ॥ करूं या काय विमानाला ॥ध्रु०॥ नलगे जाणें कैलासीं ॥ पाहूं कशास शैलांसी ॥ घालूं गांठचि बैलांसी ॥ पुसेल कां क्षुधित जेवलासी ॥ अंचवलों मृगमांसाला ॥ १ ॥ बाळें माझीं लहान घरीं ॥ कांता बहुतचि प्रेम करी ॥ करूं मी कैसा त्यांस दुरी ॥ असा काय तेथें लाभ तरी ॥ सोडूनि अशा प्रपंचाला ॥ २ ॥ जाहलें दर्शन अनयासी ॥ मागणें आहे तुमच्यापासी ॥ दोनचि वर द्या दासासी ॥ असेना दुसरी आंसोसी ॥ निवेदन करितों चरणाला ॥ ३ ॥ भाषण कळो श्वापदांचें ॥ भोजन मिळो मृगमांसाचें ॥ याहुनि कारण अन्याचें ॥ नसें मज कथितों हें साचें ॥ मानितो गिरिवासी तुजला ॥ ४ ॥

पद—( उद्धवा शांतवन कर जा— या चालीवर. )

( हरिणी विलाप करितात. )

बहु विलाप करिती हरिणी, पति सुटका होइल कैसी ॥ ॥ ध्रु० ॥ दैवाची गति पहा कैसी, वडवडलें पातक अमुचें ॥ हा नरपति होता कीं हो, आहे ज्ञानहि पूर्व भवींचें ॥ जाहलें स्त्रियांच्या योगें, हें जन्महि यास मृगाचें ॥ चाल ॥ नसे गणती हो सैन्याची ॥ संपदा किती तरि याची ॥ शत्रुलाहि भीती ज्याची ॥ पू० चाल ॥ त्याचीच अवस्था अज ही ॥ दैवानें जाहली ऐसी ॥ १ ॥ पांचशें प्रिया कीं याच्या, राज्यही होतें भारी ॥ पुण्यही अचरला मोठें, धन दानें यज्ञागारीं ॥ वाटिलीं बहू विप्रांतें, व्रत नेमही याच प्रकारीं ॥ चाल ॥ तो पडला कीं अजि पाशीं ॥ कोण सोडवितो बरें यासी ॥ जाहला दीन गुणराशी ॥ पू० चाल ॥ रासीस कोण ग्रह याच्या, ये नकळे गति कां ऐसी ॥ २ ॥ अजि प्रार्थावें तरि कवणां, कोण करील मुक्त

१ पर्वताला, कैलासाला. २ नंदीशी. ३ इच्छा.

प्रियासीं ॥ अलें संकट हें बहु मोठें, न सुचे उपाय कीं यासीं ॥ वाटतें दुःख शोकीं या, आहे मरणें आज आह्मासीं ॥ चाल ॥ नाहिं त्राता हो या काळीं ॥ पाडसें कोण सांभाळीं ॥ कसें लिहिलें विधिनें भाळीं ॥ पू० चाल ॥ टाळील कोण विघ्नातें, तुज वांचुनि या गिरिवासी ॥ ३ ॥

पद ( गडथांनो कृष्ण गडी अपुला. )

( हरिणी व्याधास ह्मणतात. )

बोलती हरिणी व्याधासी ॥ सोडुनि दे पतिरायासी ॥ धृ० ॥ होता पूर्वीं मृग राजा ॥ जाहलों आह्मि याच्या भाजा ॥ पावला मरण जयीं बीजा ॥ निधालों सति आपुल्या काजा ॥ ह्मणुनियां झालों कीं दासी ॥ १ ॥ अला हा जल-पानासाठीं ॥ धुंडित आलों या पाठीं ॥ केली बहुत अटाआटी ॥ धरिली पाशानें घाटी ॥ पाजी तूं तरि जिवनासी ॥ २ ॥ उपोषण होतें शिवरात्रीं ॥ विकळता अली दिसे गात्रीं ॥ ठेवितों साक्षि सूर्य धात्रीं ॥ असें दे पूर्ण तुला खात्री ॥ सत्वर येइल तुजपासीं ॥ ३ ॥ होसि व्याधा तूं सज्ञान ॥ वचन इतुकें अमुचें मान ॥ देइ पतिलागिं जीवदान ॥ पावसी कैलासीं सन्मान ॥ तोषेल तुजवर गिरिवासी ॥ ४ ॥

पद-( धरि मना साधुजनांचा संग. )

( मृगांचीं बाळें व्याधास ह्मणतात. )

वदतीं बाळें मधुर व्याधासी ॥ धृ० ॥ आईबापांनीं केलें उपोषण ॥ बोलवेना पाहा त्यांसीं ॥ १ ॥ उदकासाठीं व्याकुळ बहु तीं ॥ पाजि त्वरें जीवनासीं ॥ २ ॥ घे अमुचें हें मांस तूं कोमळ ॥ सोडुनि दे जरठासी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तोषुनि तुजला ॥ नेईल निजपापासीं ॥ ४ ॥

दिंडी.

( व्याध मृगास ह्मणतो. )

व्याध बोले मी केविं पाश तोडूं ॥ नित्य अपुला व्यवसाय कसा सोडूं ॥ तुह्मां सोडुनियां पुण्याचि मी जोडूं ॥ मुलाबाळांची

---

१ मायका. २ नरडें.

अशा कशी मोडूं ॥ १ ॥ क्षुधित असतिल तीं आजि घरीं बाळें ॥ येउनि बसतिल कीं पुढें घेउनि थाळें ॥ काय सांगूं मी त्यांसि तुह्मी सांगा ॥ नाहिं अणिलें आजि मांस येथुनि पांगा ॥ २ ॥ टाकुं हातिचा हा लाभ जवळ आला ॥ घालुं बाळावरि आजि कसा घाला ॥ पुण्य जोडुनि मी काय करूं त्यासी ॥ व्यर्थ मरणें येईल ऊपवासी ॥ ३ ॥

पद–( जलद त्रिताल. )

( पुन्हा मृग ह्मणतात. )

कशि करुणा रे, तुला नाहीं ॥ ध्रु० ॥ देतों मांस तुजप्रती॥ तुझि फिरेनाचि मती ॥ झालि कशि काय गती ॥ पति पडला विकळ पाही ॥ १ ॥ दोन्हि बाळें उपवासीं ॥ नाहिं चारा पाणी त्यांसीं ॥ प्रिती एकाची एकासीं ॥ फाशिं पडलीं असीं वा हीं ॥ ॥ २ ॥ झाले कंठ शुष्क आतां ॥ नको करूं पतिघाता ॥ नाहिं तुजविणें त्राता ॥ धाता आमुचा तूंचि पाही ॥ ३ ॥ गिरिवासि प्रभुराय ॥ होसि जगाची तूं माय ॥ रडतों मोकलुनि धाय ॥ काय पाहासी अंत तूं हीं ॥ ४ ॥

पद–( जोगी. )

( व्याध पश्चात्तापानें बोलतो. )

हर हर पातक बहु केलें, केवळ मूढच कीं ॥ ध्रु० ॥ आहे या पशु-जातीला ज्ञान ॥ मानव होउनि मी अज्ञान ॥ शिणविली व्यर्थचि जननी जाण ॥ प्यालों थान दिवसनिशीं ॥ १ ॥ ठाउकें या-लागीं जे धर्म ॥ नकळे मज मूढातें वर्म ॥ कसें हें अघटित माझें कर्म ॥ होइल शर्म कोठुनियां ॥ २ ॥ अजवरि केली हिंसा फार ॥ नाहीं केला कधिंच विचार ॥ घेतला पापाचा शिरीं भार ॥ देईल थार प्रभु कैसा ॥ ३ ॥ गिरिवासी तूं प्रभुराय ॥ दाखवी मजलागीं निज पाय ॥ घाली पोटीं हे अन्याय ॥ होसी माय तूं माझी ॥ ४ ॥

---

१ ताटें. २ निघा, पळा.

कटिबंध ( विमानाचें वर्णन. )

शिवमूर्तीच्या करुनी ध्याना ॥ करीत होते मृगजल-पाना ॥ गगनीं घंटा वाजे घनाना ॥ पाहती वरते करूनि माना[1] ॥ घेउनि आले दूत विमाना ॥ ह्मणती करुनी बहु सन्माना ॥ चला नका करुं उशीर, मा॑ना ॥ दिव्य देह तत्काल धरिले ॥ पन्नग भूषण भस्म चर्चिलें ॥ सर्वांगीं रुद्राक्ष शोभले ॥ गज-चर्मांबर ही पांघरलें ॥ केवळ ते शिवरूपी केलें ॥ स्त्रियांसहित त्या पूर्व-मृगातें ॥ आग्रह करिती बसावयातें ॥ ते ह्मणती आधिं त्या व्याधातें ॥ तरीच येऊं आह्मि सांगातें ॥ जाणें त्याविण नसें स्वर्गातें ॥ वदले दूत शिवाचे त्यासीं ॥ आलें होतें विमान त्यासीं ॥ मागुनि या पलेमात्र[2] यमासी ॥ या मूढानें व्यर्थ सोडिलें ॥ पापरुपि वरदान जोडिलें ॥ यासाठीं आह्मि ह्मणतों ऐका ॥ भवसिंधूची अणिली नौका ॥ वसा चला लागेना पैका ॥ श्रवण करुनि दूताची उक्ती ॥ मृग सारे व्याधासि बोलती ॥ शिव-पूजन तूं नित्य करित जा ॥ अखंड त्याचें ध्यान धरित जा ॥ नलगे खटपट दुसरी वाया ॥ सोडुनि दे तूं अवघी माया ॥ माया[3] प्रभुच्या येइल पाया ॥ उशिर नको मग स्वर्गा जाया ॥ असें बोलतां विमान गेलें ॥ झरझर तें मग गगनीं भरलें ॥ भरभर तें कैलासिं उतरलें ॥ मग ते सारे मृग त्या काळीं ॥ नमिति शिवाचें पदाब्ज भाळीं ॥ नेउनि ठेवी भगणा[4] पाळीं ॥ पाहती जन सर्वदा त्रिकाळीं ॥ यापरि भक्तां तारिलें ॥ प्रभुनें त्या पंच मृगांचें पहा कैसें संकट हरिलें ॥ १ ॥

पद-( व्याधानें शिवाचा धांवा केला तो )

( विडा घ्याहो नारायणा )

पावरे चंद्रचूडा, कां रे अंत पहासी, नयन वेधले बा, मज कधवा नेसी ॥ धृ० ॥ आलें विमान मजलागीं, मी ऐसा अभागी,

---

१ मान्यकरा. ऐका. २ मांसच. ३ दया. ४ नक्षत्रांच्या पंक्तींत.

अन्हेर बहु केला, नाहीं कळलें मजसीं ॥ १ ॥ मृग ते पशुजाती, परि तुज ते गाती, ह्मणूनि निज-सदनीं, नेलें झडकरि त्यासी ॥ ॥ २ ॥ शरण तुजला मी, नेइ मजला धामीं, अखंड नमितों कीं, प्रभु तुझ्या पदासीं ॥ ३ ॥ गिरिवासी तूं प्रभुराय, झालों दिन मी गाय, नको उशीर लावूं, नये करुणा कैशी ॥ ४ ॥

( शिव दूतांचा आणि व्याधाचा संवाद. )

घनाक्षरी.

ह्मणति व्याधा शिवदूत ॥ बापा झालासी पूत[1] ॥ केलें पाप तुवा हूत[2] ॥ तरिच नूंत[3] आजिं तुं ॥ १ ॥ नको लावूं तूं वेळ ॥ आहे प्रभू उतावेळ ॥ आह्मां होइल आवेळ ॥ तरी मेळ कायसा ॥ २ ॥ व्याध बोले मी दीन ॥ मुळीं जातीचा हीन ॥ आहे तुमच्या आधीन ॥ जळीं मीन हा तसा ॥ ३ ॥ शासन घडलें एकवार ॥ कसें करिन वारंवार ॥ जसी नंगी तलवार ॥ तसा रहित संग मी ॥ ४ ॥ तया दिधलें शिवरूप ॥ दिसें भाग्याचि आमूप ॥ ह्मणुनि शिवचरणीं हूंप[4] ॥ धरी भूप मृग जसा ॥ ५ ॥ करुनि बहुतांचि सन्मान ॥ घेउनि गेले विमान ॥ करित अवघे शिवध्यान ॥ सन्निधान तयाच्या ॥ ६ ॥

१ पवित्र. २ दग्ध. ३ स्तुत, स्तविलेला. ४ ईर्ष्या, हुरूप ( ? )

# श्रीकृष्णांनीं अर्जुनाचें सारथ्य केलें तें आख्यान.

## कथा-सारांश.

धर्मराजाचे घरीं पितृतिथि होती, ह्मणून त्यानें भीमास श्रीकृष्णाला बोलावून आणण्याकरितां पाठविलें. कृष्णांनीं भीमाची थट्टा केली, व मी येत नाहीं असें सांगितलें, तेव्हां भीम परत आला, व त्यानें झालेली हकीकत धर्मराजास सांगितली. नंतर धर्मराजानें नकुळास कृष्णाकडे पाठविलें, त्याच्याशींहि कृष्णानें भीमाप्रमाणेंच वर्तन केलें. यामुळें त्या दोघांचें युद्ध झालें. त्यात कृष्णाचा पराभव झाला. नकुळानें कृष्णास रथावर बांधून टाकिलें. तेव्हां कृष्ण, कांहीं वर माग, असें नकुळास ह्मणाला. नकुळही कृष्णास त्याच प्रमाणें ह्मणाला. तेव्हां कृष्णानें मी सांगितल्याखेरीज शस्त्र धरूं नको, ह्मणून नकुळास वर मागितला. नकुळानेंही अर्जुनाचें सारथ्य करीन असा कृष्णापासून वर मागून घेतला. ही कथा या आख्यानांत आहे.

## आर्या.

वर्णी युद्धप्रसंगा वैशंपायन मुनी जया कालीं ।
सांगे सारथि होउनि कृष्णहि विजयास नित्य सांभाळी ॥ १ ॥
हें ऐकतांचि बोले जनमेजय नृप मुनीस सांगा तें ।
श्रीकृष्ण सारथी कां, मित्र असावाचि पृथक सांगातें ॥ २ ॥
बोले मुनिवर्य तया आहे इतिहास मी तुला कथितों ।
श्रीकृष्ण नकुळ दोघां झाला संकेत एकदां पथिं तो ॥ ३ ॥
होती पितृ-तिथी या साठीं तो धर्मराज सहदेवा ।
सांगे नागपुरां[1] जा आणी भीष्मादि-वृद्ध-गुरु-देवा ॥ ४ ॥
भीमाहि मग पाठविला द्वारवतीला हरीस अणवाया ।
प्ार्थी जाउनि परि तो देव ह्मणे वाहतोसि अण[2] वाया ॥ ५ ॥
बोले देव विनोदें आली तिथि कोणत्या पित्याची ती ।
तूं हि सुरापचि असती शाश्वत माति कोणत्या पित्याची ती ॥ ६ ॥

---

१ हस्तिनापुराला. २ आण, शपथ. ३ भीम हा वायुतनय व पंडुतनय, ह्मणून कृष्णानेंही थट्टा केली. ४ पित्याच्याची. दारुबाजाची.

भीम ह्मणे यदुपतिला सांग तुझा बाप कोणता आधीं ।
देसी पारुष वचनें कां तरि आह्मांसि व्यर्थ तूं आधीं ॥ ७ ॥
ऐसें बोलुनि परते सांगे धर्मासि कृष्ण येत नसे ।
करितो हेलन बहुतचि मानी निज मानसांत हे तनसे ॥ ८ ॥
धाडी धनंजयातें आणाया हरिस यादवासहित ।
विनवी पुष्कळसा जरि, तोही झालाचि त्या दवास हित ॥ ९ ॥
येत नसे मी सांगे, जावें भीमें कशास रागानें ।
नाहीं शीत विमल जल तरि मग व्यर्थचि अशा सरां गानें ॥ १० ॥
नाहीं येत हरी तो धर्मासहि फाल्गुनाननें कळलें ।
कळलें वर्म तया मग प्रभुचें मन भक्तिनेंचि आकळलें ॥ ११ ॥
प्रेषी नकुळातें कीं युक्तीनें प्रभुवरासि आणावें ।
ऐकेनाचि तरी मग विहित अतिक्रम असेंहि जाणावें ॥ १२ ॥
तोही प्रार्थी बहुतचि देवा धर्में तुह्मासि आणविलें ।
घ्यावें यादव सारे वेळ न व्हावा असेंही जाणविलें ॥ १३ ॥
तरि देव ह्मणे नाहिं येत असें स्पष्ट ऐकिलें कानीं ।
नेइन बांधुनि तुमच्या, करणें तें काय बंधु-लेकांनीं ॥ १४ ॥
ऐसें वदतां चढला प्रभुलाहि कोप नावरे साच ।
सांगे यादव वीरां रक्षावें आजि नांव रे साच ॥ १५ ॥
झाले युद्ध प्रबळ तें उपमा नाहींच द्यावया कोठें ।
खेचर अस्त्रें नकुळें बाणांनें फोडिलेंचि हो कोठे ॥ १६ ॥
निघती बाणापासुनि बाण तयांची नसेचि हो गणती ।
लागति यादववर्मी धनु नसतांहि उगेचि झणझणती ॥ १७ ॥
आला बळराम जरी चालेना युक्ति त्यापुढें कांहीं ।
झाला गतगर्व असा काय करावें तयासि आणिकांही ॥ १८ ॥

---

१ तन तृण, गवत गवतासारखे. तो आह्माला क्षुद्र समजतो, हा भावार्थ. २ दव थंडीच्या दिवसांत पडते ते. त्या दवाला हितकर, ह्मणजे थंड झाला. ३ भावार्थ-ज्यां सरोवराचें पाणी थंड नाहीं त्याचें वर्णन करणें व्यर्थ होय. ४ योग्य मार्ग मोकळा असें समजावें. ५ कोठारे.

सोडी सुदर्शनासहि प्रभु त्या वीरा अणावया जवळ ।
परि माहेश्वर योजुनि अणिलें तें चक्र आपणाजवळ ॥ १९ ॥
गेलें चक्रहि हतिचें पाहे प्रभु मग उगाचि वदनास ।
बांधी पाशीं हरिला वरुणाच्या, न्यावयासि सदनास ॥ २० ॥
नेत रथावरि घालुनि अवमानें नकुळ देवरायास ।
प्रेक्षक ह्मणती अनुचित मागति सुर नित्य दे वरा यास ॥ २१ ॥
मार्गीं जातां भेटे नारद बोले कसें असें करिसी !
धरिसी पाय न कां तूं प्रभुनें या तारिलें असें करिसी ॥ २२ ॥
नकुळ ह्मणे मुनिवर्या विनवीलें प्रभुस म्यांहि बहु आजी ।
राजी न होय यास्तव करणें आलेंचि यासवें आजी ॥ २३ ॥
धर्माज्ञेनें नेतां माझा अपराध काय सांगावें ।
सांगावें किति सांगा जो जैसा त्या तसेंचि वागावें ॥ २४ ॥
करणें अतिक्रम असा प्रभुचा तुजला नसेचि बा विहित ।
कर्महि तेंचि करावें अनुदिनिं होणार ज्यांत भावि हित ॥ २५ ॥
देव ह्मणे देव-ऋषे भक्ताधिन मी असें तुला ठावें ।
पुरुषार्थ पाहिला हें झालें विपरीतसें न वाटावें ॥ २६ ॥
भावी देव मनीं मग दिसतो पार्थापरीस बळकट कीं ।
अवतार कृत्य आमुचें होइल त्याच्या करीं कसें कटकीं ॥ २७ ॥
बोले नकुळातें हरि झालों मी सुप्रसन्न वर मागे ।
इच्छित देतों वारे भजका द्यावें न काय तो मागें ॥ २८ ॥
नकुळ वदे देतों वर मागावें जें असें अभीष्ट तुला ।
देइन विशंक तें मी न मिळें कल्पांतिंहि शतक्रतुला ॥ २९ ॥
देव ह्मणे इतुकें दे कथिल्या वांचूनि शस्त्र न धरावें ।
यापरतें मज नलगे त्वां हें व्रत मनिं धरूनि अचरावें ॥ ३० ॥
दे वर तुझाहि देवा सारथि होऊनि पार्थ सांभाळी ।
हें इतुकेंचि पुरें मज लिखित विधीचें असो कसें भाळीं ॥ ३१ ॥

---

१ गजेंद्रासी. २ युद्ध. ३ पुढच्याकाळीं. ४ सैन्यांत.

दिधलें परस्परांनीं वर मग ती पितृतिथिहि सारून ।
गेला देव निजपुरा कथिला इतिहास तुज पसारून ॥ ३२ ॥
यापरि सारथि झाला भक्ताधिनता पहा किती हरिची ।
होता निमित्त-मात्रचि अर्जुन सेना वधावया अरिची ॥ ३३ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

( भीम श्रीहरीस ह्मणतो. )

### अंजनीगीत.

भीम बोले यदुवीरांसी ॥ धर्में आणविलें तुह्मांसी ॥ सत्वर चला परिवारेसी ॥ आहे श्राद्धदिवस ॥ १ ॥ ह्मणउनि आलों मी विनवाया ॥ करणें तुह्मांविण तें वाया ॥ करितों नमस्कार पायां ॥ घ्या यादव सारे ॥ २ ॥ आहे दीवस उद्यांचा ॥ कथितों मीं ही सत्याचि वाचा ॥ शब्द धर्माच्या मुखींचा ॥ आण वाहतो तुमची ॥ ३ ॥ माझी ऐकावी ही वाणी ॥ उठा चला [1]चक्रपाणी ॥ धर्म होइल केविल-वाणी ॥ कां करितां वेळ ॥ ४ ॥

झुलना ( श्री हरी भीमास बोलतो )

### घनाक्षरी.

ऐकुनि भीमाचें बोल ॥ हरी मनचा बहु खोल ॥ पाहुनि नातें समतोल ॥ कसा बोल बोलतो ॥ १ ॥ जरी बोलसी प्रमाण ॥ खरें वाटेना जाण ॥ कां बरें वदनाची घाण ॥ मद्यपान करितसी ॥ २ ॥ यश धर्माचें धवल ॥ अशा कर्मानें सबल ॥ पान करणें त्या भंवल ॥ याचें नवल कायसें ॥ ३ ॥ बाप तुमचे तरि फार ॥ वास स्वर्गी करणार ॥ उद्यां कोणाचा वार ॥ कथी सार हें मला ॥ ४ ॥

---

१ चक्र आहे हातांत ज्याच्या तो. श्रीकृष्ण. हे कृपणी. २ कोपेल

साकी ( भीम बोलतो. )

कोप चढे वॄकोदरको तब अखियां लाल बनायारी ॥ कहत जदुपती तुमही बोलो कौन तुह्मे जनमायारी ॥ १ ॥ पिता तुह्मारा मुझे बतलावो तबही बोलूं साचारी ॥ काहेकुं करो नयनमों उंगली आपहि हो जब काचारी ॥ २ ॥ पापं बठो है यही मुरारे औरनको दुःख देनारी ॥ तुमही जानो नही किसीसे दुष्ट बचन कह सुननारी ॥ ३ ॥

दिंडी ( अर्जुन देवास बोलतो )

धर्म धाडी बोधूनि अर्जुनासी ॥ जाउनि आणी प्रभु द्वारकौंनिवासी ॥ नमुनि प्रभुच्या तो पादनलीनासी ॥ कथी धर्माची झालेसा तयासी ॥ १ ॥ देव बोल तो भीम कसा गेला ॥ कांहो नाहीं अणुमात्र वेळ केला ॥ जेणें आदराचा ठाव पुसुनि नेला ॥ अशा ठायीं नाहींच हा सुकेला ॥ २ ॥ नसे आतां मी येत तुला कथितों ॥ जरी आला वासॅव हि या पथीं तो ॥ तुला ठावें दुष्टांसि मीच मंथितों ॥ भक्तिधारक त्यांचीच माळ ग्रथितों ॥ ३ ॥ असें बोलुनि तत्काल तया फिरवी ॥ भक्ति-रहितासी जसा मनीं विरवी ॥ भीम विजयाचा गर्व असा जिरवी ॥ निराभिमानी या नित्य शिरीं मिरवी ॥ ४ ॥ जाय अर्जुन तेथूनियां उगाची ॥ प्रभू सदना कां नये हेंचि जाची ॥ होत प्रभुचा या नेमही असाची ॥ भक्त वाचा अखंड करी साची ॥ ५ ॥

झुलना- ( अर्जून धर्मास बोलतो )

( घनाक्षरी )

कहत अर्जुन तब जाय ॥ नही आवत जदुराय ॥ उसे कौन जुगतं लाय ॥ ये समझ्याथ मुझे कहो ॥ १ ॥ भयो रुष्ट जदूनाथ ॥ नही सुनत कोई बात ॥ कैसो आवे फिर हात ॥ कहो तात क्या

---

१ भीम. २ कच्चा. ३ पापाचयपरपीडनम्. ४ द्वारकेंत राहाणारा. ५ पाद-नलीन, पदकमलास. ६ इच्छा. ७ इंद्र. ८ संहार करितो. ९ अर्जुनाचा. १० युक्ती.

करें ॥ २ ॥ नहीं बिनतीको काज ॥ कहो क्या करे इलाज ॥ कौन लावेगो आज ॥ गई लाज हमारी ॥ ३ ॥

पद– ( धर्मराज ह्मणतो. )

जलदत्रिताल.

हरि कां बरें नये आजी ॥ धृ० ॥ नये भीमा अर्जुनासीं ॥ आतां धाडूं कवणासीं ॥ कोण शांत करी त्यासी ॥ कसि चिंता हरे माजी ॥ १ ॥ मग बोले नकुळासी ॥ बापा जाई हरिपासीं ॥ सांग विनवणि त्यासी ॥ असि, झडकरी होय राजी ॥ २ ॥ जरी नायकेचि हरी ॥ हाव युद्धाचीच धरी ॥ करी पराभव तरी ॥ हरि आणसी करीं आजीं ॥ ३ ॥ प्रभु झाला गिरिवासी ॥ तरि करितो काय तुजसी ॥ नको भिऊं रे मानसीं ॥ अशि अज्ञा दिली नाजी ॥ ४ ॥

पद ( नकुळ कृष्णाचा संवाद )

( उद्धवा शांतवनकरजा )

ह्मणें नकुळ यदूवीरासी, कां केली पातळ माया ॥ आजि धर्म विकळ बहु झाला, नाहिं भोजन केलें देवा ॥ ह्मणें देव असा कां रुसला, काय चुकलों तरि मी सेवा ॥ रक्षिलें आजवरि हरिनें, काय आमुचा होता केवा ॥ चाल ॥ धाडिलें मला विनवाया ॥ दिसे सर्व तुह्माविण वाया ॥ सांडिली कशी हो माया ॥ ॥ पू० चाल ॥ ठायासि चलावें अमुच्या, मीं नमितों प्रभुजी पायां ॥ १ ॥ प्रेषिलें अर्थी भीमासी, अवमानचि केला त्याचा ॥ आशि काय तरी तो वदला, हरि सांगा निष्ठुर वाचा ॥ बरें अर्जुन त्यावरि आला, त्यासहि फाडा नन्नाचा ॥ चाल ॥ अशि काय अवज्ञा केली ॥ कशि दया मनांतुनि गेली ॥ ममता ही कोणी नेली ॥ पू० चाल ॥ ठेलीच उपोषित सदनीं, ती द्रुपद-सुता प्रभुराया ॥ २ ॥ मग देव वदे नकुळासी, नाहिं आदर जेथें कांहीं ॥ कां जाउं अशा बरें सदनीं, अपमानें तेथें पाही ॥ नाहिं येत अतां मी

---

१ सामर्थ्य, पाड.

सहसा, तूं येथूनि सत्वर जाई ॥ चाल ॥ नसे पहिलि रीत हो तुमची ॥ हेळणा करितसा अमुची ॥ बोलिला भीम परोपरिची ॥ पू० चाल ॥ अरिची न असी गिरिवासी, कां सोसूं वचनें वाया ॥ ३ ॥

झुलना. ( नकूळ बोलतो. )

घनाक्षरी.

अह्मा देउनियां दोष ॥ आपण होसी निर्दोष ॥ बळें आ-णुनि मनिं रोष ॥ मोडिसि तोष आमुचा ॥ १ ॥ आज आहे मासिं गांठ ॥ तुझा चालेना काट ॥ धरी दावितो हि वाट ॥ व्यर्थ हाट[1] करुं नको ॥ २ ॥ नेइन बांधुनि मी आज ॥ होवो झाली तरि सांज ॥ करिन अपुलें मी काज ॥ घाली तोज[2] मस्तकीं ॥३॥ फार झालासी दांडे[3] ॥ गर्व आपुला तूं सांड ॥ टाकि सत्वर पुढें पांडें[4] ॥ घरीं भांड आमुतें ॥ ४ ॥ भीम अर्जुन ते थोर ॥ करित बसले घरिं घोर ॥ नाहीं दाखविला जोर ॥ तसें पोर हें नव्हे ॥५॥

कटीबंध ( युद्धाचें वर्णन. )

नकुळ-यदुविरा युद्ध मांडलें । यादव ते सारेचि धांवले । रणीं एकत्र पाहुनि सगळे । करिती कोलाहल ते अगळे । वाद्यांची बहु झोड लागली । सेना चहुनि तशांताचि आली । नकुळ बैसला होता खालीं । उठुनि रथावर उडीच घाली । बाण सोडिती यादव सारे । वीर-पणाचें अंगीं वारें । आणूनि ह्मणती यासि धरा रे । सत्वर मग भुज-बद्ध करा रे । मुक्त करुनि अवघेचि फरारे[5] । रथिं वाहुनीयां यासि फिरारे । पडातिल रिपुवरि सहज ददारे । न्या मम प्रभुच्या अर्थी धरा रे, मानीना तरि युद्ध करा रे । असेंचि सारे बडबड करिती । परस्परें माना डोलविती । यापरि हाव धराया धरिती । परि गति नकुळाची त्यांवरती । जों जों मार्गण[6] सोडुं लागला । तों तों त्यांसि विचाराचि पडला । बहुतेकांनीं पळहि काढला । बाणा

१ हट. २ मुकुट. ३ दांडगा. ४ पाऊल. ५ निशाणें. ६ बाण.

पासुनि बाणचि नीघती । करवेना कोणासहि गणती । कसें करावें यादव ह्मणती । श्रीकृष्णें मग चक्र सोडिलें । तेंही त्या वीरानें धरिलें । चक्र सुदर्शन हतिचें गेलें । यास्तव प्रभु उगलेचि राहिले । नकुळानें मग नवलचि केलें । श्रीकृष्णासी पाशिं बांधिलें । यादव टकमक पाहूं लागले । युक्ति न चाले यास्तव थकले । नारदमुनि मार्गींच भेटले । ह्मणती त्वां हें काय केलें । सोड सोड या ह्मणउनि प्रभुसी तत्कालचि सोडवीलें । किति नकुळें अघटित केलें । श्रीहरिला पाशीं खिळिलें ॥ १ ॥

पद–( नारद नकुळास ह्मणतात )

चाल–गड्यानों कृष्ण गडी अपुला.

नारद बोले नकुळासीं ॥ बांधिलें हरिला कां पाशीं ॥धृ०॥ सुरवर नमिती कीं याला ॥ तुला अजि कां बरें भ्रम झाला ॥ ठाउक नाहीं काय तुला ॥ जाळितें[1] नाम पातकांला ॥ विदित हें प्रखरचि जगतांसीं ॥ १ ॥ प्रगटला स्तंभीं हाचि हरी ॥ रक्षिलें प्रल्हादा कुसरीं[2] ॥ याची करितो कोण सरी[3] ॥ नाहीं प्रतिमा या दुसरी ॥ तारिलें पहा गजेंद्रासी[4] ॥ २ ॥ प्रभू हा चराचरीं[5] भरला ॥ भक्तालागीं अवतरला ॥ गोकुळीं अखंडित फिरला ॥ गोवर्धन गिरि उचलीला ॥ मानिलें नाहीं इंद्रासी ॥ ३ ॥ असा हा पुण्यश्लोक[6] हरी ॥ उचित हें तुजला काय तरी ॥ सांगतों अतांचि मुक्त करी ॥ नेई सन्मानेंसि घरीं ॥ करुनि घे प्रसन्न गिरीवासी ॥ ४ ॥

१ "अजितनाम वदो भलत्या मिषें, सकलपातक भस्म करीतसे" वामन पंडित. २ युक्तिनें. ३ बरोबरी. ४ गजेंद्राला नक्रापासून भगवंतानें सोडावलें व त्याचा उद्धार केला अशी कथा आहे. ५ "न तदस्ति विना यत्स्यान्मया भूत चराचर." ( भ. गी अ. १० श्लोक ३९ ) "न घडकीं मजविणें कांहीं होय चराचर." वामन पंडीत. ६ चार पुण्य श्लोक आहेत. "पुण्य श्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ॥ पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः" नळ. धर्मराज, जनक आणि जनार्दन. पुण्य श्लोक पवित्र आहे कीर्ति ज्याची.

पद–( नकुळ नारदास बोलतो )

जोगी.

सांगा माझा तरि अन्याय, नारदा काय बरें ॥ धृ० ॥ प्रभु हा विश्वंभर साचा ॥ नाहीं मज संशय याचा ॥ काढिन कां मी अशि वाचा ॥ आहे त्याचा दासचि कीं ॥ १ ॥ जाणतों याचें मी महिमान ॥ परि मज धर्माज्ञाचि प्रमाण ॥ केला आधीं बहु सन्मान ॥ नाहींच भान यास किंहो ॥ २ ॥ मजला निदेश धर्माचा ॥ मानिना हरि जरि तुझि वाचा ॥ पराभव करुनियां त्याचा ॥ आणि साचा त्यासि बरें ॥ ३ ॥ आला युद्धासी प्रभुराय ॥ करावें म्यां तरि हो मग काय ॥ धरिलें नाहिं तयाचे पाय ॥ हा अन्याय मज लावा ॥ ४ ॥ सोडितों गिरिवासीला मीं ॥ आज्ञा प्रमाण मज स्वामी ॥ नेतो सन्मानें धामीं ॥ करिन कां मी हेलना[2] हो ॥ ५ ॥

पद–( श्रीहरी नारदास ह्मणतात )

अंजनीगीत.

बोले यदुवीर नारदा ॥ माझी भक्ताधीनता सदा ॥ हरितों त्यांची मी आपदा ॥ तुज वर्म ठावें ॥ १ ॥ वा हें नसेंची विपरीत ॥ आहे माझी आसीच रीत ॥ भक्त-महिमान मी त्वरित ॥ वाढवितों ऐसें ॥ २ ॥ कां तुज गमलें हें अविहीत[3] ॥ करितों भक्ताचें कीं हीत ॥ पांडव सार्‍ेची भ्रम रहित ॥ प्रिय–भक्त[4] माझें ॥ ३ ॥ ह्मणउनि कथितों मी तुजलाही ॥ आवडतें मज दुसरें नाहीं ॥ एक्या भक्तीवांचुनि पाहीं ॥ सारेंची तुच्छ ॥ ४ ॥ माझा ममता[6] तुजला ठावी ॥ इतरांशीं काशि खरि वाटावी ॥ भक्ती सर्वांतरिं दाटावी ॥ असें वर्म यार्चे ॥ ५ ॥ कुंती आत्याव ई ख-ी ॥ मजला माद्रीहि त्यापरी ॥ गोष्ट हि ऐसी आहे जरी ॥ जन करितिल कुच्छा[7] ॥ ६ ॥ अपुल्या

१ घरीं. २ अपमान. ३ अयोग्य. ४ " भक्ती जसा महात्मा देहीं हि तसा न दारुका रमला । या पार्थ वेद वचना द्यावा लागे सदा रुकार मला " मोरोपंत. ५ " भक्तिविना वश नोहे वीण्यानें वा मृदंग नादानें." ६ समोऽहं सर्व भूतेषु नमे द्वेष्योऽस्ति न प्रियः ( भ. गी. अ. ९ श्लो. २९ ) सम मी सकळां भूतीं, न द्वेषी मज न प्रिय, वामन पंडित. ७ निंदा.

आतेचें महिमान ॥ वाढवि पुत्रा दे सन्मान ॥ दोघे माद्रीचे हे जाण ॥ अव्हेर यांचा ॥ ७ ॥ लांछन गमलें हें मजला ही ॥ ह्मणउनि केली युक्ती बा ही ॥ जिंकुनि घेतलें अजिपा ही ॥ कथिलें गुज आतां ॥ ८ ॥

---

## यक्षप्रश्नाख्यान.

### आर्या.

सरला वनवास तरी द्वैतारण्यांत पंडुसुत होते ।
विप्रांसि आधि दे त्या हरिणांच्या मारणीं टपत होते ॥ १ ॥
शृंगाग्रेंचि हरिण तो नेतो अरणी असेंचि पाहून ।
धांवति ते त्या मागें स्कंदीं धनु बाण सज्ज वाहून ॥ २ ॥
भ्रमले उष्णांत अर्थी दैवें मग लाधलाचि एक वट ।
बैसती छायेसी त्या-पांचाहि होऊनि श्रांत एकवट ॥ ३ ॥
लागे धर्मासि तृषा ह्मणउनियां धाडिलें अर्थी नकुळा ।
परि तो नयेचि जेव्हां धाडी सहदेव अर्जुना सकळां ॥ ४ ॥
फिरला नकुळ वनीं बहु धुंडित उदकासि सांपडें सरतें ।
होतां यम धर्म जया स्थानीं पाहतांचि आयु ज्या सरतें ॥ ५ ॥
'न करी पान जलाचें' बोले नकुळा असेंचि प्रतिपादीं ।
'द्यावें या प्रश्नाचें उत्तर आधीं' ह्मणोनि प्रतिपादी ॥ ६ ॥
परि न गणुनि त्या वचना प्राशन करि नीर तो बळें नकुळ ।
मृत जाला तत्कालचि जग-भक्षक पाहतो कशास कुळ ॥ ७ ॥

---

१ सरोवर. २ आयुष्य. ३ संपतें. ४ प्रत्येक पावलीं. ५ सांगता झाला. ६ मृत्यु. हा कुळ गोत्र वय वगैरे कांहीं पहात नाहीं.

त्या मागुनि ते सारे गेले एकेक त्याचि कासारीं ।
प्याले नीर तसें चीं झाली गति शेवटीं हि त्या सारी ॥ ८ ॥
पाहे मार्ग युधिष्ठिर परि परतेनाचि एक चवघांत ।
जाय सरीं त्या झाला जलपानें बंधुचाही अपघात ॥ ९ ॥
पाहुनि गतासु सारें धर्महि निज मानसीं विचार करी ।
न कळे कां सांपडले बंधु यमाच्या असेही चार करीं ॥ १० ॥
बोले धर्म अहा म्यां मंदें चवघांसि व्यर्थ घालविलें ।
होते स्नेहायुभरित दुःखद वातें प्रदीप मालविले ॥ ११ ॥
जन्मापासूनि कधीं दिधलें नाहीं सुख स्वभावांस ।
चाले उपाय सर्वां परि करितो काय तो स्वभावास ॥ १२ ॥
विष भरिलेंचि ह्मणावें उदकीं कमलें प्रफुल्ल कां असती ।
त्यजिती भ्रमर न कां त्या बंधूंचीं आननें मलिन दिसती ॥१३॥
अत्यद्भुत हें झालें विजयानें जिंकिलें शिवाला हो ।
पडलें तें वपु कैसें व्हाया अज काननीं शिवां लाहो ॥ १४ ॥
परि ती तृषा करी बहु व्याकुळ राहेचिना उपाय शतें ।
शोधूं जल प्राशुनि कां बुडतें प्रभुचें असें कृपा यश तें ॥ १५ ॥
ऐसें बोलुनि गेला प्राशाया जों जला तयां सरसी ।
बक रूपी यक्ष वदे मागें आजूनि कां न तूं सरसी ॥ १६ ॥
रे धर्मा म्यां केले अनुज तुझे प्रेतरूप हे चवघे ।
अवघेचि कसें मरतां जिविताची अल्प तूं तरी चव घे ॥ १७ ॥
दे उत्तर प्रश्नाचें आधीं जा मग जलासि सेवाया ।
त्या वांचुनि हें करणें स्पष्टचि मजला तुझें दिसें वाया ॥ १८ ॥
धर्म ह्मणे कां केलें कर्म असें; नाम आपुलें कळवी ।
पळवी शंका मानिची लोकोत्तर कर्म कोण हें टळवी ॥ १९ ॥

---

१ सरोवरीं. २ चौघे. ३ हातीं. ४ आपल्या बंधूंनां. ५ कोल्ह्यांना. ६ लाभ ७ टाळी.

मी यक्ष असें कळवी प्रकटी मग शरिर पर्वतासम जें ।
धर्म करी नमनातें चित्तीं हा दंड[1]धर असें समजे ॥ २० ॥
धर्म ह्मणे जें पुससी सांगाया शक्य मी असेन तरी ।
सांगेन असुखसिंधू उतराया तुजविणें दिसे न तरी[2] ॥ २१ ॥
यम धर्म पुसे बापा भानु कसा उगवतो बरें सांग ।
बोले युधिष्ठिर तया ब्रह्मापासात्र[3] निजकरें सांग ॥ २२ ॥
मावळतो कैसेनी कोण प्रतिष्ठा करी तयाची, तो ।
धर्में होय प्रतिष्ठित अस्ता जाया अयुष्य यांची, तो ॥ २३ ॥
असतो कोण सवें त्या हेंही शोधूनि सांग लवकरसा ।
बोले देव गणाचा पाळी सेवेंत नित्य नवकरसा ॥ २४ ॥
क्षत्रिय कुळिचें दैवत धर्म कसा मनुज भाव पाप कसें ।
धनु बाण, यत्न धीरहि शरण्य तरि मग नसेचि तापकसें ॥ २५ ॥
सर्वा जलांत पावन काय असें, अल्प तें बहू होतें ।
पावन जल जलदाचें, होतें विप्रा दिल्या बहू हो तें ॥ २६ ॥
पूज्यांत पूज्य काई फळ सांगें श्रेष्ठ जें असें पाही ।
धेनू वंद्य पुराणीं, पुत्रापरतें दिसें न फळ कांहीं ॥ २७ ॥
कोण गुरूच्या स्थानीं दैवत, पवनापरीस चंचल तें ।
बाप गुरू दैवत ही माता, मन शतगुणें चपळ पळतें ॥ २८ ॥
पातें कोण न लावी उपजे निपजूनि कोण तें सांग ।
मत्स्य न लावी पातें, पुनरपि अंडजहि होतसे सांग ॥ २९ ॥
हृदय नसें कवणातें जल-वेगें वाढतें असें काय ।
हृदय नसें उपलासी जल नदिचा वाढवीतसे काय ॥ ३० ॥
मित्र कुटुंबा सांगे घरबारी रोगिया मरे त्यास ।
अर्थचि मित्र सभार्या औषध धनदान इष्ट मरत्यास ॥ ३१ ॥
विचरे एकाकी तो जन्मुनि जन्मासि येतसे कवण ।
विचरे एकचि भानू शीतांशू जन्म तो करी श्रवण ॥ ३२ ॥

---

१ ( यमधर्म ) २ नाव. ३ त्या सूर्यास ब्रह्मापासून सर्व किरणें क्ष० तेज प्राप्त झालें आहे. ४ ( तत्तेजोंवि द्रुमामकम् भ. गी. ) ५ मागतो. ६ दगड. ७ चंद्र.

हीमाचें औषधही सांगे सर्वांसि स्थानें जें असत ।
भेषज होय धनंजय धरणी वांचूनि काय हो दिसतें ॥ ३३ ॥
उत्तम धनासि सांगे धान्या लाभा सुखासि उत्तम जें ।
दक्षपणा तसि कृषिता[1] उत्तम आरोग्य तोष[2] हें समजे ॥ ३४ ॥
यमधर्म ह्मणे राया झालों मी सुप्रसन्न वर मागे ।
तुजसम ज्ञानी भूवरिं झाला कोणी नसेंचि यामागें ॥ ३५ ॥
धर्म ह्मणे नकुळातें उठवी आधीं, तिघांसि त्या मागें ।
इच्छित हें पुरवावें द्यावें भजकासि कां न तो मागे ॥ ३६ ॥
बोले अंतक[3] धर्मा वर्णावें यश तुझेंचि लोकांहीं ।
परि ह्मणसी नकुळा कां नाहीं भावार्थ समजलों कांहीं ॥ ३७ ॥
धर्म वदे कुंतीचा एकचि उरलों असें मनीं समज ।
यास्तव आधीं नकुळा उठवी नाहींच इष्ट अन्य मज ॥ ३८ ॥
उठले तत्कालचि ते धर्माचे बंधु पाहतां चवघे ।
करिती नमन यमपदीं धर्मासह पंडु पुत्र ते अवघे ॥ ३९ ॥
आहे कृतांत[4] जातों गेलों अरणीस मीच घेऊन ।
बापा चरित्र तुमचें लोकन केलें धरेसि[5] येऊन ॥ ४० ॥

---

१ शेतकीचा धंदा. २ संतोषवृत्ति. ३ यम. ४ यम. ५ पृथ्वी.

## याच आख्यानाचीं पदें.

पद-( धर्मराज भावा- ह्मणतात. )

जलद त्रिताल.

मज लागली तृषा पाही ॥ धृ० ॥ धर्म वदे नकुळासी ॥ च ळासीं सांगु नको लाऊं रे पळासी ॥ जाइ झारी घे जळासी ॥ च ळासीं सांगु काहीं ॥ १ ॥ होती व्याकुळ हे प्राण ॥ धीर धरवेना जाण ॥ बापा जाई जल आण ॥ पान करवी लवलाही ॥ २ ॥ वेळ लागे नकुळासीं ॥ जाय ह्मणे माद्रेयासी ॥ तया मागें अर्जुनासी ॥ धाडि जिवना आण जाई ॥ ३ ॥ बापा भीमा तिघ भाऊ ॥ गेले वाट किति पाहूं ॥ कसें दुःख हें मी साहूं ॥ पाजि तूं तरी जल कांहीं ॥ ४ ॥ ह्मणें झाला कांहीं घात ॥ नये कोणि चव घांत ॥ कसा चुकेल आघात ॥ गिरिवासी तूंचि पाही ॥ ५ ॥

( नकुळ धर्मराजास ह्मणता )

( अंजनी गीत. )

नकुळ बोलतो धर्मासी ॥ कां तरी निंदीता कर्मासी ॥ पाहूं आपण शेमासी ॥ हरि आहे आपुला ॥ १ ॥ जातो आणाया उदकासी ॥ तुह्मी असा बंधूपाशीं ॥ नका धरूं हो उदासी ॥ जळ अणितों आतां ॥२॥ सत्वर येतो मी परतून ॥ चिंता सांडा मनांतून ॥ जळ या आणितों वनांतून ॥ लागेना वेळ ॥ ३ ॥ आह्मी असतां चवघे जण ॥ नाहीं चिंतेचें कारण ॥ संकट होइल निवारण ॥ कां करितां घोर ॥ ४ ॥

( धर्मराज सहदेवास बोलतात. )

घनाक्षरी.

झालें नकुळातें काय ॥ पाहे सहदेवा जाय ॥ वाटे चुकला तो ठाय ॥ आणि प्रीय अपुला ॥ १ ॥ पाहात बसलों मी वाट ॥ वाटे धरिली अडवाट ॥ कशी आजची पहाट ॥ दिसे नाट लागला ॥ २ ॥ जाई याचिरे वनांत ॥ पहा कोठें लवनांत ॥ असेल छाया भुवनांत ॥ दिसेल तेथें धुंडिता ॥ ३ ॥ जरी न पडेची गांठ ॥ नको पाहूं मग वाट ॥ पाहुनि विहिर नदी पाट ॥ धरी वाट जळाची ॥ ४ ॥

---

१ सहदेव. २ मुखाला. ३ सखोल जागा. ४ भुवन, पाणी, पाण्यांत.

साकी. ( अर्जुन बोलतो )

कहत धनंजय सुनो युधिष्ठिर नकुलहि धुंड मिलाऊं ॥ जल थंडा भरलाउं प्रभुजी तुमरी प्यास बुझाऊं ॥ १ ॥ अबहि जात हुं झारी भरके इतनमें फिर आऊं ॥ एक घडी मोहे अवसर दीजो काहेकु देर लगाऊं ॥ २ ॥

साकी. ( भीम बोलतो )

भीम कहे अब सोंच न करियो एक पलख मै जाऊं ॥ भाई अपने धुंड धांडकर जलहीको भर लाऊं ॥ १ ॥

पद–( धर्मराज आपल्यास निंदितो. )

( उद्धवा शांतवन )

वदे धर्मराज बहु शोकें, कसें प्राक्तन फिरलें अमुचें ॥ ध्रु० ॥ असे भूळवि मी या तापा, नाहिं दिधलें सुख कवणासी ॥ तरि बंधु भळ ते चवघे, नाहिं अंतर दिधलें यासी ॥ किति कृतघ्नपण हें माझें, नाहिं स्मरलों निजकर्मासी ॥ चाल ॥ मी काय करूं तरि आतां ॥ लागली मला बहु चिंता ॥ वारिल कोण या घाता ॥ पू० चाल ॥ त्राताचि दिसेना कोणी, आहे सामर्थ्यहि कवणाचें ॥ १ ॥ वारिलें जरी वृद्धांनीं, नाहिं वचन मानिलें त्यांचें ॥ खेळलों द्यूत अविचारें, तें कारण या असुखाचें ॥ जाहलों दीन कीं आतां ॥ कोण करितो साह्य अशाचें ॥ चाल ॥ होते बंधु वीर बहु मोठे ॥ पहा कर्म कसें तरि खोटें ॥ गेले उदकासाठीं कोठें ॥ ॥ पू० चाल ॥ लोटेल दिवस हा कैसा, मज नकळे धोरण याचें ॥ २ ॥ गेला नकुळ अधीं उदकासी, नाहिं परतुनि आला ठायां ॥ माद्रेय धाडिला दुसरा, त्या नकुळातें हुडकाया ॥ मग अर्जुन भीमही गेला, तो सत्वर उदक अणाया ॥ चाल ॥ लागली तृषा मज भारी ॥ कोण भरूनि आणिल झारी ॥ कोण दुःखांपासुनि तारी ॥ पू० चाल ॥ हारीस यावया जोगे, ते बंधुहि नव्हते साचे

---

१ दुःखाचें.

॥ ३ ॥ मग धर्महि तेथुनि गेला, जल धुंडित त्याचि सरोसीं ॥ पाहिलें भीम नकुळातें, तसें अर्जुन सहदेवासी ॥ सारेचि गतास दिसले, अलि मूर्छाही धर्मासी ॥ चाल ॥ काय जलांत विष या भरलें ॥ प्राशितां प्राण कसे गेले ॥ हें नवलचि येथें झालें ॥ ॥ पू० चाल ॥ सरलेंचि सरो आयु करितों, गिरिवासी पान जळाचें ॥ ४ ॥

पद.–( धर्मराज देवाची प्रार्थना करितो )

जोगी.

देवा कां रुसवा केला, मजवरि सांगा हो ॥ ध्रु० ॥ बंधू माझे हे गुणवान ॥ आले करावया जलपान ॥ झाले अवघेची गतप्राण ॥ न दिसें त्राण मज कोठें ॥ १ ॥ केला सर्वांचा सांभाळ ॥ केली आजचि कां आबाळ ॥ कुंती ह्मणेल कवणा बाळ ॥ कसें अभाळ कोसळलें ॥ २ ॥ देवा तुमचे कीं हे दास ॥ मोजित नव्हतेची कवणांस ॥ घालुनि अजवरि वदनीं घास ॥ आजिच निराश कां केले ॥ ३ ॥ कांहो गिरिवासी प्रभुराय ॥ तुमचे धरिले होते पाय ॥ व्हावा काय असा अन्याय ॥ तुह्मींच न्याय हा निवडा ॥ ४ ॥

पद–(धर्मराज यक्षास बोलतो )

जलद त्रिताल.

कसि तुजला रे दया नाहीं ॥ ध्रु० ॥ धर्म वदे निजबापा ॥ हाचि धर्म काय बापा ॥ कसा भीईनासि पापा ॥ आपा साठीं [illegible]ली दाही ॥ १ ॥ मज तृपा झाली फार ॥ बंधु पाठविले चार ॥ धुंडावया जलगार ॥ ठार केले कसें पाही ॥ २ ॥ वाटे नवल हें आजी ॥ ज्याणें शिव केला राजी ॥ असे निपुण युद्धांमाजीं ॥

---

१ सरोवरास. २ मृत, मेलले. ३ हे गिरिवासी व्यंकटेशा, अयुष्य सरलें तर सरो ह्मणजे मरण येईल तर येवो, परंतु मी पाणी पितोंच. ४ यमास. ५ उदकासाठीं

गांजी असतां दशा कांहीं ॥ ३ ॥ गिरीवासी प्रभुराय ॥ अशा कर्मे तुष्टे काय ॥ भूतदया केली काय ॥ कां रे नाहीं विचार कांहीं ॥ ४ ॥

पद ( यम-धर्म धर्मास बोलतो )

गड्यांनो कृष्ण गडी अपुला.

वदे यमधर्म धर्मराया ॥ कां जलपान करिसि वाया ॥धृ०॥ पडले बंधु तुझे चवघे ॥ टाकुनि शूरत्वहि[1] अवघे ॥ अशा कर्माचि कोण चव घे ॥ सांगतों विश्रांती लव घे ॥ आहे किति शीतल ही छाया ॥ १ ॥ ह्मणसी बंधु फार बरवे ॥ तरि न कां शस्त्र तया धरवें ॥ पुरतें वाक्य न ज्यां करवें ॥ कसें मजपुढें सांग ठरवे ॥ रक्षी तूं तरि निज काया ॥ २ ॥ पुसतों धर्माहि यम-धर्मा ॥ कळूं दे तुझ्या नाम-कर्मा ॥ प्रवर्तासि अशाही अधर्मा ॥ पावसिल कसा बरें शर्मा ॥ सोडुनि देई चेष्टा या ॥ ३ ॥ बोले अंतक धर्मासी ॥ सांगतों आपुल्या शर्मासी[2] ॥ तूंही चतुरचि व-र्मासी ॥ जाणसिल सहजचि कर्मासी ॥ ह्मणती कृतांत धर्मा या ॥ ४ ॥ करितों प्रश्न तुला जे मी ॥ उत्तर दे कसे लाजे मी ॥ पावतों तुष्टि जसा जेंवीं[3] ॥ करिन मग कां बरें कज्जे मी ॥ आठ-विन गिरिवासी राया ॥ ५ ॥

( यमधर्म धर्मास बोलतो )

अंजनीगीत

बोले अंतक धर्मासी ॥ झालों संतुष्ट वचनांसी ॥ असे हेत जो मानसीं ॥ निवेदी आतां ॥ १ ॥ बा तूं होसी काल-ज्ञानी ॥ कोण अन्यथा हें मानी ॥ यावरि नव्हेसी अभिमानी ॥ आजे कळलें बापा ॥ २ ॥ मागे तुजला देतों वर ॥ माहित नव्हतें कीं अजवर ॥ सांगे आतां मज सत्वर ॥ पुरवीतों वांछा ॥ ३ ॥ आधीं उठवूं मी कवणासी ॥ झडकरि सांगावें बा मजसी ॥ होसी फारची गुणरासी ॥ आलि करुणा मजला ॥ ४ ॥

---

१ शूर योद्धा. २ नांव. ३ भोजनांत, भोजनानें. ४ यम.

( धर्मराज यमास ह्मणतो )

घनाक्षरी.

करी सावध सकळांस ॥ त्यांत आधीं नकुळास ॥ करुनि पान जीवनास ॥ जाउं स्थळास आपुल्या ॥ १ ॥ झाला होता आजि घात ॥ परी वारीला अघात ॥ होतें लांछन चवघांत ॥ राहूं गात गुण तुझें ॥ २ ॥ तुझे झाले उपकार ॥ अठव देतिल हे फार ॥ उठवि बंधू तूं चार ॥ वारंवार नमितसें ॥ ३ ॥ करिसि सर्वांचा नाश ॥ घालुनि अपुले तूं पाश ॥ नाहीं केली नीराश ॥ ऐेचि लक्ष आमुतें ॥ ४ ॥

( अतंक धर्मास बोलतो )

दिंडी.

बोले अंतकही एक धर्मराया ॥ एक शंका मोठीच उदेली या ॥ ह्मणसि नकुळासीं उठवि आधि ऐसें ॥ आहे कारण यालागिं काय कैसें ॥ १ ॥ धर्म बोले तूं सुज्ञ तरी कथितों ॥ हीच ताता मी माळ मनीं ग्रथितों ॥ जसें कुंतीचे पुत्र आह्मीं तीघे ॥ तसे माद्रिचे हे हि जाण दोघे ॥ २ ॥ असे उरलों मी एक तिघां माजीं ॥ उठवि माद्रीचा सुत हाचि आजी ॥ असा रक्षो-सिल तिघांसही बापा ॥ नको माद्रीच्या सुता देउं तापा ॥ ३ ॥ नसे विपरित या माजि एक कांहीं ॥ अशय चित्ताचा निवेदिला पाही ॥ करी आतां हें कार्य त्वरें ताता ॥ करुनि जिवनाचें पान लावि आतां ॥ ४ ॥

# मारुति अर्जुनाच्या ध्वजस्तंभीं बसला तें आख्यान.

## कथा–सारांश.

अर्जुन एकदां रामेश्वरास गेला. तेथें रामांनीं समुद्रावर सेतु बांधिला, अशी कथा रामायणांत निघाली. तेव्हां रामानें बाणांचा सेतु न बांधितां दगडाचा सेतु कां बांधिला, असा प्रश्न अर्जुनानें काढला. तेथें मारुति वृद्ध ब्राह्मणाच्या वेषानें बसला होता. तो ह्मणाला एक एक वानर फार मोठा होता, त्याचे भारानें बाणांचा सेतु सहज मोडून गेला असता. यामुळें रामांनीं दगडाचा सेतु बांधविला. अर्जुन ह्मणाला ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. मारुति ह्मणाला पाहिजेल तर प्रचीति पहा. तेव्हां अर्जुनानें बाणांचा सेतु केला. त्या दोघांत असा पण ठरला कीं, मारुतीनें सेतु मोडिला नाहीं, तर मारुतानें अर्जुनाचें दास्य करावें, व मोडला तर अर्जुनानें मारुतीचें दास्य करावें. मारुतीनें सेतु मोडिला तेव्हां अर्जुन चिंतेंत पडला. इतक्यांत कृष्ण ब्राह्मणाचा वेष धरून तेथें आला. त्यानें अर्जुनास पुन्हां सेतु करण्यास सांगितलें. अर्जुनानें तसें केलें, कृष्णानें सेतूच्या खालीं सुदर्शन घातल्यामुळें मारुतीच्यानें सेतु मोडला नाहीं. तेव्हां कृष्णानें आपलें रूप प्रगट करून मारुतीस अर्जुनाचें ध्वजस्तंभीं बसण्यास सांगितलें. अशी कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

जनमेजय प्रश्न करी वैशंपायन मुनीस तें कळवा ।
पार्थ-वाजिं मारुति कां आहे शंका अशी मनीं, पळंवा[1] ॥ १ ॥
सांगे मुनि पार्थानें बाणांचा सेतु एकदां रचिला ।
होता नेम[2] प्रभुचा दास्य करिल मारुती न तो खचिला ॥ २ ॥
तीर्थें हिंडत गेला अर्जुन रामेश्वरा नमायाला ।
पाहे तंव त्या स्थानीं होते जन लागले जमायाला ॥ ३ ॥
पौराणिकही येउनि लागे रामायणा कथायास ।
श्रवण करी अर्जुन तें झाला होता जरी पथायास ॥ ४ ॥

---

१ निवारण करा. २ नियम. प्रभुनें असें ठरविलें होतें.

आलें श्रवणीं त्याच्या श्रीरामें सेतु बांधिला उपलें[1] ।
उतरी वानर दळ, हें पार्थांतरिं वचन बाणसें खुपलें ॥ ५ ॥
राम धनुर्धर कीं हो बाणांच्या सेतुनेंचि लंकेला ।
गेला कां न बरें तो, दूर करा या मदीय शंकेला ॥ ६ ॥
बोलति नानाविध जन कीं तरले दगडही जलांवरते ।
निजसामर्थ्य असें प्रभु दावी सर्वांस भूतलांवर तें ॥ ७ ॥
ह्मणती अन्य असें ही जल उदधीचें अशुद्धसें गमलें ।
केवळ मूत्रचि यास्तव टाकुनि पाषाण मार्ग आक्रमले ॥ ८ ॥
कोणी ह्मणती प्रभुनें निज नामाचें महत्व दाखविलें ।
वदती अन्य नळातें किर्ति-सुधेच्या रसासि चाखविलें ॥ ९ ॥
ऐकत होता मारुति बैसुनियां भिन्नविग्रहानें[2] तो ।
बोले गर्जुनि स्पष्टचि, कथितों वृत्तांत निग्रहानें[3] तो ॥ १० ॥
वानर बळिवंत कसे, बाणांचा सेतु काय हो करितो ।
या साठीं रघुरायें करवीला प्रस्तरें[4] नळाकरिं तो ॥ ११ ॥
हास्य करुनि अर्जुन तो बोले आहेसि कोण सांग मला ।
वदसी स्पष्टपणें, तरि याचा तुज निश्चयो कसा गमला ॥ १२ ॥
बोले मारुति दासचि प्रभुचा ह्मणतात वायुसुत ज्याला ।
होतों समक्ष यास्तव अवघा वृत्तांत हा विदित झाला ॥ १३ ॥
अर्जुन वदे मि असतां बाणांचा सेतु बांधितों अगळा ।
शतवार वानरांचा उतरुनि नेतो समूहही सगळा ॥ १४ ॥
वायुज या वरि बोले बाणांचा सेतु बांधिसी बरवा ।
मोडिन उड्डाणें मी त्याची मजला गमेचि ना परवा ॥ १५ ॥
हें ऐकतां धनंजय बोले जरि मोडिशील सेतूतें ।
दास्य करिन मी, नसतां व्हावें लागेल दास ही तूतें ॥ १६ ॥

---

१ दगडांनीं. २ निराळ्या वेषानें. ३ निश्चयपूर्वक. ४ दगडांनीं.

मारुति वदे न मोडिन सेतु, तुझा निश्चयेंचि मग दास ।
वाटें कडुवट जरि तें गदशमनां सेवणेंचि अगदास ॥ १७॥
ऐसें वदोनि दोघे त्वरिताचि गेले समुद्र-तीरासी ।
वायुज पुन्हाहि बोले ध्यावें विष कां त्यजूनि क्षीरासी ॥ १८ ॥
न पडावें या कर्मीं होईल कुत्सा जनांत बहुतर ती ।
परि नायके धनंजय सेतू-विषयीं जया बहूत रैंती ॥ १९ ॥
योजन-मात्रचि सेतू केला बळकट अमीत बाणानें ।
अर्जुन फारचि आग्रहि तो अपुला शेवटासि बाणा ने ॥ २० ॥
पाहुनि सेतु उडाला गेला गगनींच वाटला आधीं ।
येउनि मोडी जंव तो अर्जुन-चित्तांत दाटला आधी ॥ २१ ॥
चित्तीं ह्मणे धनंजय दैव कसें आजि आमुचें फिरलें ।
जय सांबापासुनि तें येथें सामर्थ्य आवघें जिरलें ॥ २२ ॥
चिंताक्रांत बसुनियां अर्जुन निज-मानसांत भावितसे ।
कीं हें वपु त्यागावें कळतें होणार आजि भावि तसें ॥ २३ ॥
आली दया प्रभूला झाला निजमित्र कीं ह्मणें कष्टी ।
यास्तव धांउनि आले ब्राह्मण वेषें करीं धरुनि यष्टी ॥ २४ ॥
देव पुसे ऐसा कां चिंतातुरसा उगाचि बसलास ।
करितों श्रवण सकल मी वृत्त तुझें कथींत असलास ॥ २५ ॥
पार्थ वदे बळकटसा बाणांचा सेतु या स्थळीं रचला ।
परि याचि वानराच्या उड्डाणें करुनि तो सकळ खचला ॥ २६ ।
होता नियम असा कीं जरि सेतू भंगिलाच कीशानें ॥
व्हावें दास, तसेंची केलें मज आज जानकीशानें ॥ २७ ॥
यास्तव सचिंत-मानस स्थानीं या बैसलों असें उगला ।
वानर पहा कसा तो गर्वानें निज मनीं असे फुगला ॥ २८ ॥

---

१ रोग निवारणार्थ. २ औषधास. ३ निंदा., उपहास. ४ इच्छा, ५ चिंता ६ पुढें होणारें. ७ पडला.

आहे साक्ष कवण या, वाटे मज सर्व कर्म हें खोटें ।
मोठें संकटहि नसें, सेतु करी, काय मोजिसी बोटें ॥ २९ ॥
बांधी सेतु धनंजय, कृष्ण सुदर्शन तयांतळीं योजी ।
चित्तीं ह्मणे न मोडो, कंदुकसा कपिच भूतळीं यो जी ॥ ३० ॥
मारुति गगनीं जाउनि पहिल्या परि मागुती उडी घाली ।
चेंडू उसळे जैसा पडला येऊनि सेतुच्या खालीं ॥ ३१ ॥
देव ह्मणे मारुतिला दास्य करावें, असें तुला विहित ।
मर्कटी रूपहि अपुलें जें होतें भिन्न-विग्रहें पिहित ॥ ३२ ॥
भेटे वायुसुतातें दावी मग रामरूपही हरि तो ।
सांगे भक्तांलागीं अवताराहि मी युगायुगीं धरितों ॥ ३३ ॥
आहे पार्थांकरवीं करणें मजलागि दुष्ट-संहरण ।
तूंही पार्थध्वज शिरिं बैसुनि याच्या भया करी हरण ॥ ३४ ॥
तें पासुनि हा स्तंभीं राहे युद्धांत सर्वदा याच्या ।
याच्या साह्यें केलें पार्थें हननासि सर्व दायांच्या ॥ ३५ ॥

---

१ बोटें काय मोजिसी, असा चिंतातुर का बसलास ? २ येवो. ३ झांकलें. ४ भक्ताकारितां, ५ भाऊबंदांच्या, कौरवांच्या.

## याच आख्यानाचीं पदें.

हनुमंत अर्जुनास ह्मणतो.

( अंजनी गीत. )

बोले हनुमंत अर्जुना । कां करितोसी वल्गना । होते वानर त्यांची गणना । करवेना शेषा ॥ १ ॥ अठरा पद्मांचीहि संख्या । पडली आहे ऐसी आख्या । परि जे आले होते संख्यां । मिति नाहीं त्यांची ॥ २ ॥ एकेकाचें महान कार्य । सेतु तुझा करितो काय । राम वेडा होता काय । करि कृत्य ऐसें ॥ ३ ॥ वानराचें फारचि दळ । वर्णूं त्याचें काय मी बळ । सेतु शराचा वरदळ । सोसीना बापा ॥ ४ ॥ सांडीना मी कधींच तथ्या । बोलुं कां मी आजचि मिथ्या । जरि हें पडेना तव पथ्या । कथितों तुज लागीं ॥ ५ ॥ जरि मी आहे एकाचि पाहतां । सेतु मोडीन मी आतां । जरि हें घडेना तत्त्वता । आहे दास तुझा ॥ ६ ॥ या वचनाचा धरि भरंवसा । सेतु बाणाचा करि कसा । हातींच्या कंकणा आरसा । लागेना जाणें ॥ ७ ॥

### कटिबंध.

मारुती रामाच्या सेतूचें वर्णन करतो.

वातात्मज सांगे ऐसा । श्रीरामें सेतू रचिला ॥ धृ० ॥ रामचंद्र जळ तटासि आले । नळ नीळादि कपी मिळाले । सुग्रिव अंगद तेहि धांवले । जांबवंत हनुमंत पावले । परि अवघेचि विचारीं पडले । ह्मणती उतरुनि जावें कैसें । शत गांवें जळ अपार भासें । त्यांत मूत्रही ऋषिचें ऐसें । बोलति वानर सुचेल तैसें । फिरती सर्व भ्रमिष्टचि जैसे । कांहीं त्यांत सचिंतहि बसले । श्रीरामें सर्वांसि बोाहिलें । उपळें अणाया लागिं योजिलें । देशो देशीं मग ते गेले । प्रस्तर घेउनियां जरि आले ।

---

१ ह्मण. २ लढाईला. ३ शरीर. ४ सैन्य. ५ आदळ आपट. ६ सत्य, खरें बोलणें. ७ खोटें. ८ अगस्तीनें समुद्र प्राशन केल्यावर मूत्रद्वारें सोडला अशी कथा आहे. ९ बोलाविलें आहे. १० दगड.

ह्मणती त्यासि पुन्हाही जारे । पुष्कळसे पाषाण अणारे । यापरि वदती जारे यारे । जाती अन्य किती परभारें । करीं शिरीं पुच्छाग्रीं भारे । बांधुनि आणिति वानर सारे । खेपा करिती अशा प्रकारें । प्रस्तर ते नामांकित केले । नळा करीं ते तसे जोडिले । उदकांवर ते तरूं लागले । सेतु रचाया अरंभ केला । दश योजन विस्तीर्ण योजिला । शत गांवें लंकेसि लांबला । चार दिवस अवकाश लागला । पंचम दिवसीं समाप्त झाला । एकेकाचा महान कार्य । सेतु शराचा टिकेल काय । विचार आपुला केला काय । बापा व्यालि कुणाची माय । त्या प्रभुची सरि होइल काय । अलौकीक हा खेळ तयाचा । सहजाचि सिद्धिस गेला । वातात्मज सांगे ॥ १ ॥

---

झुलना. ( अर्जुन मारुतीस बोलतो. )

घनाक्षरी.

कशाने हास्य वद पार्थ । तुझें बोलणें अपार्थ । योजन शतभरि अर्पार्थ । नको अर्थ फारसा ॥ १ ॥ तुला फार वंद्ह काय । सेतु बांधितों मी जाय । करी त्यासि तूं अपाय । धरिन पाय निश्चयें ॥ २ ॥ नको यासि फार वेळ ॥ आहे घटिकेचा खेळ ॥ नको होऊं उतावेळ । वृथा वेळ नाशिला ॥ ३ ॥ चाल आतांची ऊठ । बरा काढिलासि बूट । नको ठेऊं हुट हुट । नसें कूट फारसें ॥ ४ ॥ जरी मांडिसील पूल । करिन दास्य नसे भूल । पुढें टाकी पाऊल । नव्हें मूल हा बरें ॥ ५ ॥

---

१ श्रीराम या नांवानें मुद्रित. दगड बुडूं लागले, पण रामनाम त्यावर खोदतांच ते तरले अशी कथा आहे. २ शरीर. ३ अर्थरहित, व्यर्थ, फोल. ४ आप + अर्थ, पाण्याकरितां. ५ द्रव्य. भावार्थ, शंभर योजने पाणी तें काय, आणि त्याच्या करतां एवढा खटाटोप कशाला ? ६ विषय, प्रश्न.

मारुतीनें सेतु मोडल्यावर अर्जुन सचिंत होऊन
आपल्याशींच ह्मणतो.

( उद्धवा शांतवनकर जा )

मोडिला सेतु कीशानें गमें, नवलाचि हो या काळीं ॥धृ०॥ वदे अर्जुन निजमनिं ऐसें, किति अघटित घडलें आजी ॥ हा अशक्त वानर कीं हो, दिसे दुर्बळही त्या माजीं ॥ भंगिला सेतु तरि कैसा, चालेना बुद्धिच माझी ॥चाल॥ असें असतें माहित देवा ॥ कासयास करितो हेवा ॥ दिसे विचित्र संचित ठेवा ॥ पू०चाल ॥ सेवाचि करावी याची, असे लिहिलें विधिनें भाळीं ॥ १ ॥ वानरें बोध मासि केला, कीं न पडावें या छंदीं ॥ होणार प्राप्त यश कैसें, या पासुनि हें प्रतिपादीं ॥ परि नाहिं श्रवण तें केलें, लागलोंच कीं या नादीं ॥चाल॥ जरि बळकट सेतू ऐसा ॥ वानरें मोडिला कैसा ॥ वरि चेंडु पडावा जैसा ॥ पू०चाल ॥ तैसाचि उडुनि हा जावा, परि भाळ लिखित कोण टाळी ॥ २ ॥ मनिं गर्व असा हो धरिला, मोडेना सेतु कदापी ॥ बांधिलाचि तैं म्यां होता, भीम जाऊनि इंद्रापी ॥ ईभराज पहा किंहो अणिला, जो स्वर्गीं नित्य सुधा पी ॥ चाल ॥ तो धरुनि भरंवसा पाही ॥ निर्मिला सेतु लवलाही ॥ परि नचलें येथें कांहीं ॥ राहिला यत्न अवघाची, गिरिवासी तूं सांभाळी ॥ ३ ॥

पद–पुन्हां अर्जुन ह्मणतो.

जलदत्रिताल.

हरि कां नये लवलाही ॥ धृ० ॥ आला कठिण प्रसंग । झालों पाहुनि मी दंग । कपि करि सेतु भंग । अंग संगें नवल पाही ॥ १ ॥ हें मी सांगु कोणा लागीं । कोण होतोया विभागी,

---

१ सांगुं लागला. २ ऐरावत. ३ मागच्या व या चरणाचा भावार्थ असा—मी सेतू बांधला त्यावरून भीमानें स्वर्गाला जाऊन ऐरावताला आणिले असा तो मजबूत होता. तसा हा सेतू असून या वानरानें कसा मोडला ?

नाहीं बुद्धी माझी जागीं । जागी होइना करूं काई ॥ २ ॥ हरि युक्ती सुचवितां । आलें विघ्न वाचवितां । प्रभु विश्व नाचविता । दाखविता मार्ग कांहीं ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुराय । कोठें गुंतला कीं काय । कोण सांगेल उपाय । पाय दाविले ठायीं ठायीं॥४॥

पद—अर्जुन देवाची प्रार्थना करितो.

जोगी. मजला वरिल सुभद्रा काय.

देवा दावा पदयुगुला । गेली लाज वरें ॥ ध्रु० ॥ प्रभुजी तुमचे बहु उपकार । घडवा आजिच कां अपकार । प्रतिज्ञा केल्या वारंवार । त्यांतुनि पार मज केलें ॥ १ ॥ भरंवसा धरूनि तुमचा फार । करिताचि आलों वेडे चार । घेतला तुह्मीच माझा भार । नसे आधार कवणाचा ॥ २ ॥ जाणतां अंतरिचा तुह्मि भाव । ठावा मजला हा हि स्वभाव । त्याचा झाला आजि अभाव । होइल निभाव मग कैसा ॥ ३ ॥ धांव गिरिवासी प्रभुराय, नमितों शतदां तुमचे पाय । येवढा क्षमा करा अन्याय । हा आपाय दुर लावा ॥ ४ ॥

पद—भगवान् अर्जुनास ह्मणतात.

जलद घनाक्षरी.

कां रे अर्जुना तू दंग ॥ केला कोणीं[1] मनोभंग ॥ दिसे सोडिला व्यासंग । चिंता फार दिसे । आहे काय कसें । सांगे बापा तु निःसंग ॥ १ ॥ आला असा काय प्रसंग । कोणी सेतु केला भंग । कळुंदे झडकरी । वानर कोण तरी । याचें प्रफुल्ल अंतरंग ॥ कां रे० ॥ २ ॥

पद—अर्जुन उत्तर देतो.

जलद घनाक्षरी.

चित्तिं स्मरूनि श्रीरंग । तुह्मा कळवितों मनोरंग । श्रवण केला अजि प्रसंग । वानर मेळविले । उपल आणविले । प्रभु ह्मांकी

---

१ मनोगत.

जलतरंग ॥ १ ॥ मज तें गमलें सारें व्यंग । कथितों बुद्धीचे हे तरंग । राम धनुर्धर, बाणें सेतुवर, काय हें नव्हतें त्यासी अंग॥२॥ मध्यें वायुज दावी अंग । नव्हतें ह्मणे कांहीं व्यंग । जरि ते फळ–अहारि[1], वानर मोठ भारी, सेतू पावेना कां भंग ॥ ३ ॥ गेला बदलुनि माझा रंग । बदलों पुरे करी ढंग ॥ * सेतु रचियला, वानर उडियला, केला सेतू पाहा दुभंग ॥ ह्मणुनि झालों ऐसा दंग ॥ ४ ॥

पद–( भगवान् अर्जुनास पुसतात. )

गड्यांनो कृष्ण गडी अपुला.

पुसे श्रीरंग अर्जुनासी । दाखवी साक्ष कोण यासी ॥ धृ० ॥ सांगसी सेतू बाणांचा । बांधिला योजन वरि साचा । पहाया विक्रम कोशाचा । मोडिला क्षणांत अशि वाचा । पाहूं जरि पुनरपि तूं करिसी ॥ १ ॥ बापा असाक्ष[2] जें कर्म । ह्मणती अग्निहि तो धर्म । मागतों त्याचें तुज वर्म[3] । होइना प्राप्त कधीं शर्म[4] । मानिना मीहि सत्य त्यासी ॥ २ ॥ बोले मारुति श्रीहरिला । पाहिजे साक्ष[5] कासयाला । मोडिला दिसेचि नयनाला । कोणतें प्रत्यंतर याला । व्यर्थचि खटपट करवीसी ॥ ३ ॥ आहे अशि गोष्टहि सत्य जरी । करिल हा पुनरपि सेतु तरि । मोडिसिल तूं ही त्याचिपरि । असेना रित विपरित दुसरी । देइन साक्ष गिरीवासी[6] ॥ ४ ॥

---

१ फळें खाणारे. २ ज्याला कोणी साक्ष नाहीं असें. ३ बीज. ४ सुख. ५ पुरावा. ६ यापुढेंहि या आख्यानाचीं कांहीं पदें असावींत असें वाटतें. कृष्णांनीं मारुतीला रामरूप दाखवून त्याची समजूत घातली हा कथाभाग कवीनें पदांत गोंवला असला पाहिजे असें त्याच्या पद्धतीवरून दिसतें.

* येथें असें वाचावें काय ? "सेतू रचियेला अभंग ॥ वानर उडियेला, सेतू भंगियेला, ह्मणुनी झालों ऐसा दंग ॥"

# मुचकुंदाचें आख्यान.

## कथा-सारांश.

गर्गाचार्यास एका यादवानें आपली मुलगी दिली होती. तिला मुलगा झाला नाहीं. एके दिवशीं यादवांनीं भर सभेंत गर्गाचार्यांचा अपमान केला. यामुळें यादवांचा समाचार घेईल असा मुलगा व्हावा ह्मणून त्यानें तप केलें. सांबांनीं प्रसन्न होऊन, 'असा मुलगा तुला यवनीपासून होईल' असें सांगितलें. त्याप्रमाणें कालयवन उत्पन्न झाला. तो यादवांशीं युद्ध करण्याकरितां आला. त्याला पाहून कृष्ण पळाला. त्याच्यामागें कालयवन लागला. मुचकुंद ज्या गुहेंत निजला होता, तींत कृष्ण शिरला व त्यानें आपला पीतांबर मुचकुंदाचे अंगावर टाकिला. मागून काल यवन आला. त्याला वाटलें कृष्णच येथें निजला आहे; ह्मणून त्यानें मुचकुंदास लाथ मारली. मुचकुंद जागा झाला व त्यानें कालयवनाकडे पाहिल्याबरोबर तो भस्म झाला. नंतर कृष्णानें मुचकुंदास दर्शन दिलें, ही कथा ह्या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

एकया यादव-वीरें कन्या गर्गासी[1] अर्पिली हर्षें ।
जाणों त्या जगतीवर कृष्ण-कृपा-घन-दयांबु बहु वर्षे ॥ १ ॥
अत्यर्थ मनीं आणी पुत्राविण मानवा नसे स्वर्ग ।
यास्तव बहु काळ तिशीं रमला सुत[2]-काम तेधवां गर्ग ॥ २ ॥
विपुलात्मजार्थ[3]चि भजे त्या स्त्रीतें परि न एकही जाला ।
यादव सर्व विनोदें ह्मणति सभेंताचि नपुंसक तयाला ॥ ३ ॥
कोपें जाय वनातें तप करि पाहूनि एक शिव-सदन ।
प्रार्थी पुत्र-प्राप्तीस्तव तो मुनि दीन करुनियां वदन ॥ ४ ॥
इकडे फिरे घरोघर शोध करायासि वायको पतिचा ।
झाली त्रस्त, यदुकुळा वाटे जाळील काय कोप तिचा ॥ ५ ॥
हिंडे विलाप करि बहु मारितसे फिर फिरुनि हाकेला ।
चित्तीं ह्मणे नसे कीं स्वामींनीं आत्मघात हा केला ॥ ६ ॥

१ गर्गाचार्याला. २ पुत्राची इच्छा करणारा. ३ पुष्कळ पुत्र व्हावेत ह्मणून.

साध्वी गहिंवरूनि ह्मणें पाहूं जाऊनि कोणत्या गांवा ।
जरि विरह चिर असा तरि सत्वर आतांचि देह त्यागावा ॥ ७ ॥
मग ती निराश होउनि बाहे करुणास्वरें भवानीतें ।
वानी तेज तिचें बहु श्रवणीं आकर्णिलें भवांनीं तें ॥ ८ ॥
विनवी शिवा शिवातें[1] सत्वर पुरवा मनोरथास तिच्या ।
झाली व्याकुळ फाराचि नाहीं पोटांत अन्न त्या सतिच्या ॥ ९ ॥
देव ह्मणें देतों वर, सांगे प्रकटूनि जा सतीला गे ।
गेली वेळ न लागे ह्मणतां पायांस ती सती लागे ॥ १० ॥
माय जसी कन्येवरि प्रीति करी सर्व-मंगला[2] तेवी ।
दे सौभाग्य अभयवर देवी जी सर्व मंगलातें वी[3] ॥ ११ ॥
इकडे हिमगिरिवरि तो तपुनि तपातें शिव प्रसन्न करी ।
मागे पुत्र असा कीं हरि होउनि करिल यादवासि करीं ॥ १२ ॥
शंभु ह्मणे परहिंसक पुत्र असा क्रूर बा द्विजातीला ।
होय असा कोठें तरि झाले सुम कठिण काय जातीला? ॥ १३ ॥
तुज पासुनि जनुजाचें नीच कुळीं यादवासि तो भारी ।
होइल समरांत बुधा देवांसहि जेविं कंजनाभारी[4] ॥ १४ ॥
झाला वरहि शिवाचा होइल यवनीस पुत्र शूरवर ।
यास्तव तोषुनि खिन्नहि झाला दे धर्मि दृष्टि दूरवर ॥ १५ ॥
न चले उपाय यास्तव यवनी पण्यांगनेसि तो गांठी ।
सांगे हृत्गत अपुलें एकांतीं एकदां पडो गांठी ॥ १६ ॥
वेश्या ह्मणे मुनिवरा योग्य तुह्मांला नसेचि हें कर्म ।
धर्म बुडवितां कांहो ठावें असतां समस्त हें वर्म ॥ १७ ॥
तरि तो पुन्हाहि प्रार्थी द्यावें मजलागि हेंचि दान खरें ।
वेश्या ह्मणे तपाचें जातिल सारेचि एकदा नखरे ॥ १८ ॥

---

१ शंकराचें. २ सर्वमंगल भवानी. ३ विते, उत्पन्न करते देतें. ४ कंजनाभ, पद्म-नाभ, श्रीकृष्ण, त्याचा अरि ह्मणजे शत्रु; कृष्णाचा शत्रु.

गर्गापासुनि झाला यवनीला पुत्र काल-यवन खरा ।
कोण्याही वीराचा समरीं चालूं न देचि तो नखरा ॥ १९ ॥
असुरध्वंसक निजजनपालक वसुदेवसूनुतद्वैरी ।
बहु वेळ मागध चमू काळाग्नीच्या मुखांत जो वैरी[1] ॥ २० ॥
तो हा हरि यवन ह्मणें युक्ताचि जो नारदोक्त चिन्हांहीं ।
एकाकीच धरावा जोंवरि यातें सहाय बल नाहीं ॥ २१ ॥
मुचकुंद भक्तराया द्याया दर्शन, वधावया यवना ।
सुरवर[2] सत्य कराया निघतां झाला मुकुंदराय वना ॥ २२ ॥
कपट्या, चोरा, जारा, गवळ्या, भ्याडा, अतां कसा पळसी ।
टळसील मजपुढें जरि या समरीं त्वरित दुर्यशें मळसी ॥ २३ ॥
मागें यवन हरि पुढें पळतो जो वाग्मनासि गवसेना ।
तो काय सांपडे या ज्या हृदयीं भक्तिलेशहि वसेना ॥ २४ ॥
हस्तांतरे[3] पळे तो दूरचि सांडूनि शत्रु-सेनेला ।
सह्याद्रिकूट-शिखरीं मुचकुंदाश्रमपदींच तो नेला ॥ २५ ॥
पीतवसन[4] तें पाहुनि हरि-शंकेनेंचि ताडिलें त्याला ।
निज पादें मग त्याच्या नेत्रकटाक्षेंचि भस्म तो जाला ॥ २६ ॥
दिसतें पीत वसन हें श्रीहरिचें मजवरी कसें आलें ।
चित्तांत ह्मणें माझें अमृतघनें[5] दह्यमान वपु न्हालें ॥ २७ ॥
ज्याचें पीत वसन हें त्याचें दर्शन मला न कां घडलें ।
कींहरि दर्शन होइल निद्रांतीं सुर उगेंचि बडबडले ॥ २८ ॥
शोधी सर्व गुहे तें तों कोनीं[6] देखिला रमाकांत ।
तत्पदपद्म विलोकुनि झाला मुचकुंद तेधवा शांत ॥ २९ ॥
राजा ह्मणें शुकातें कोणाचा कोण हा महाभाग ।
ध्वांतीं[7] किमर्थ निजला जळला कां यवन हें मला सांग ॥ ३० ॥
राजा, इक्ष्वाकुकुळीं जन्मे मांधातृनाम जो राजा ।

---

१ टाकता झाला. २ देवांनीं दिलेला वर. ३ एक हाताच्या अंतरानें. ४ पीतांबर. कृष्णानें आपला पीतांबर मुचकुंदाचें आंगावर टाकला तो पाहून. ५ दह्यमान वपु अमृतघनें न्हालें असा अन्वय. ६ कोपऱ्यांत. ७ अंधारांत.

मुचकुंद पुत्र त्याचा हा नेती देव आपुल्या काजा ॥ २१ ॥
दैत्य-पराभव करितां जागर बहुकाळ होय रामाला ।
सेनापति गुह होता देती आज्ञा नृपा निजायाला ॥ २२ ॥
जावें स्वस्थ निजावें राया एकांत पाहुनी जागा ।
जा गाति सद्यशातें जळेल तुज नर करील जो जागा ॥ २३ ॥
ऐकुनि देवां वंदुनि निद्रा घेऊनि दिव्य सांगाती ।
निजला गुहेंत मुनि तो जन हे अद्यापि तत्कथा गाती ॥ २४ ॥

## याच आख्यानाचीं पदें.

चाल–गळ्यानों कृष्ण गडी अपुला.

पद–( यादव गर्गास ह्मणतात. )

यादव ह्मणती मुनिवर्या । तुमची कळुन आली चर्या ॥ धृ० ॥
मेहुण्या पहा विनोद करिती । भाउजी सदन सदां धरिती । खाउनि पोट बरें भरिती । दिसेना पुरुषाची रीती । पाहणें नकोचि मग धैर्या ॥ १ ॥ शालक तुमचे तेहि तसे । मानिती तुह्मा नपुंसकसे । वांचणें काय जगांत असें । कराना यमपुर जवळ कसें । दिसतो हाचि बरा पैर्या ॥ २ ॥ कथणें आलें सभेमाजीं । नाहिंच बळ तुमच्या माजीं । असली अतुरहि कामाजी । ह्मणेलाचि तुह्मासि मामाजी । दिसेना काय बरें आर्या ॥ ३ ॥ वदतां असें मुनिवर्यासी ॥ चढला कोप बहू त्यासी । आठउनि मनिं गिरिवासीसी । निर्मितो ह्मणे सुपुत्रासी । लोपाविल निज तेजें सूर्या ॥ ४ ॥

( गर्ग तपश्चर्येला गेल्यावर त्यांची पत्नी )

( उद्धवा शांतवनकर जा- )

कां वियोग दिधला मजला, मुनिवर्या, एकाएकीं ॥ धृ० ॥
कोणतें असें बरें पडलें, मजपासुनि अंतर कामीं । त्यासाठीं मज तुह्मीं त्यजिलें, होउनियां निष्ठुर स्वामी । एकटी आतां मी कैसी,

१ कार्तिकस्वामी. २ मार्ग.

दिन कंठू आपुलथा धामीं ॥ चाल ॥ हें काय तुह्मां बरें दिसलें ।
मी कधिंतरि होतें रुसले । कां नाहीं घरीं मज पुसीलें ॥पू०चाल॥
पिसिलेंचि कसें हो किटका, त्या गोधुमसंगे चाकीं ॥ २ ॥
वाटतें मला तुह्मीं करितां, कीं विनोद माझा आजी । हें तरी ह्मणावें
कैसें, ही गोष्टचि दिसती ताजी । असो अतां कष्टलें भारी ।
प्रभु येउं द्या करुणा माझी ॥ चाल ॥ मी वंदिन तुमच्या पायां,
छळुं नका अतां मज वाया । मी घेत नसे हो घाया ॥पू०चाल॥
जायासि प्राण हे पाहती, तरि भेटचि मज द्याना कीं ॥ २ ॥ असि
विलाप ती बहु करुनि, निंदितसे वृंष्णिकुळाला । कां केला प-
तिचा माझ्या, अवमान वेळोवेळां । गेला मज टाकुनि आतां,
करुं कैसी गति मी याला ॥ चाल ॥ हें असुख सांगु कवणासी ।
आहे पात्र कोण श्रवणासी । कोण करील हो अवनासी ॥पू०चाल॥
भवनासी मज जावेना, गिरिवासी तूंचि विलोकीं ॥ ३ ॥

पद—( गर्गमुनी शिवाची प्रार्थना करितो )

जोगी.

( माझा भरत देखिला काय- )

देतां वर तरि हा मज द्या, शंभो त्रिपुरहरा ॥ धृ० ॥
यादव प्रमत्त झाले फार । त्यांचा भूमीवरतां भार । करावा मम
पुत्रें संहार । आहे निर्धार हा माझा ॥ १ ॥ आजवरि सुत नाहीं
झाला ॥ ह्मणउनि अराधिलें प्रभुला । द्यावा सुत मजलागिं भला ।
करिल वाहिला नाश त्यांचा ॥ २ ॥ वदले भर्गहि गर्गासी ॥
देतों सुत जरि मी तुजसी । येईल निकृष्ट योनीसी ॥ यादवांसी
निवटाया ॥ ३ ॥ यापरि बोलुनि गिरिवासी । आणवी त्वरि-
तचि बैलांसी । बैसुनि गेले कैलासीं । निज-दारांसी घेउनिया ॥४॥

---

१ गव्हा बरोबर जात्यांत किडंहि रगडलें जावें असें मला झालें. २ यादवकुळाला.
३ रक्षणास. ४ घराळा. शंकर. ५ शंकर. ६ नंदीस. ७ पार्वतीला.

( घनाक्षरी )

( काळ यवन कसा आला त्याचें वर्णन. )

भया जवनीसे सूत । मानत सबही जन छूत । भेजे मथुरामें दूत । करे जुगत मारनें ॥ १ ॥ अया सेना सब सात । भई बानन बरसात । करूं नगरी झट हात । किशन नाथ बतावो ॥ २ ॥ सुनी इतनी जदुराज । पहेन लीयो सरताज[1] । दौरत जदुकुलके काज । दई लाज छांडके ॥ ३ ॥

पद-( वेश्या गर्गास ह्मणाली तें )

( गड्यानों कृष्ण गडी अपुला- )

वेश्या ह्मणें अचार्यातें । करिना या परिचर्यांते[2] ॥ ध्रु० ॥ जाणुनि वर्णाश्रमधर्मा । होणें उदित अशा कर्मा । पावले कोण कधीं शर्मा । पाहणें लागें यमधर्मा । सांडा तुह्मी अधैर्यातें ॥ १ ॥ मानव देहाचि दुर्मिळ तो । कसा मग श्रेष्ठ वर्ण मिळतो । पहाना बरें अजामिळ तो । असा[3] काय सर्वा अजा मिळतो ॥ सोडुनि धाया पर्यातें[4] ॥ २ ॥ त्यांतही वृद्ध दशा आली ॥ तुमची पत्नि काय झाली । कशी आजि त्रीडा[5] तुह्मीं त्यजिली । प्रभूची मूर्ति न कां यजिली । पहा त्या शुकादि आर्यातें ॥ ३ ॥ ह्मणें मुनि यथार्थ तूं वदसी ॥ बसतों मीहि ब्रह्मसदसीं[6] ॥ परि जो बसतो कैलासीं ॥ देत तो आज्ञा गिरिवासी । सांडणें भाग स्वचर्यातें[7] ॥ ४ ॥

दिंडी.

( पुत्र नसल्यामुळें गर्गाचार्याचे मनाची स्थिति )

गर्ग भावितसे मनीं व्यर्थ जीणें । नसे स्वर्गासी जाणें सुताबीणें । जरी कांतेसी बहुत काळ रमला । पुत्रकामें संतुष्ट न तो झाला ॥ १ ॥ अली मानसीं खिन्नता तयाला । ह्मणें योजूं मी कोण उपायाला । राखुं पुत्राच्या प्राप्तिनेंचि बाणी । कधीं त्यागावा देह असें मानी ॥ २ ॥

---

१ मुकुट. २ सेवा. ३ असें पूर्वज मिळणें सर्वांच्या नशिबी थोडेंच आहे ? ४ रीत ५ लाज. ६ ब्रह्मपदीं. ७ स्वधर्माला.

( नारद कालयवनास बोलतो. )

अंजनीगीत.

नारद ह्मणें कालयवनासी । जरि तूं कृष्णासि हुडकीसी । त्याची खुण तूजपासी । सांगतों ऐक ॥ १ ॥ शिरीं मुकुट घातिला । असे पीतांबर नेसला । गळां वैजयंती माळा । गांठावें त्यासीं ॥ २ ॥ शोभे कौस्तुभमणि गळां । भाळीं कस्तूरीचा टिळा । दिसे मेघापरि सांवळा । तोची रे कृष्ण ॥ ३ ॥ राहतो मथुरेमाजी खरा । न चले कोणाचा नखरा । वैसुनि हिंडतो पाखरा वरि अवघा वेळ ॥ ४ ॥ चारि भुजानें मंडित । सर्वां खळांसी दंडित । असे लक्ष्मी आखंडित । यदुवीरापासीं ॥ ५ ॥ आहे सुंदर त्याचें सद्म । शंख चक्र गदा पद्म ॥ वाहे हातीं हृदयीं छद्म । धरि ऐसी खूण ॥ ६ ॥

कटिबंध.

( यादवी सभेचें वर्णन. )

सभागार तें बहुत चांगलें । इंद्र सभेहुनि दिसें आगळे । भवतांली किति वृक्ष लागले । नारि केळ पोफळी आवळे । बकुळ मालती चंपक फुलले । पुष्पाचे त्या परिमळ वाहती । छाया शीतल, पक्षि बोलती । स्थळोंस्थळीं कारंजें उडती । स्फटिकांच्या किति भिंति बांधिल्या । कनक-रसानें संधि साधिल्या । शशिकांताच्या भूमि घोटिल्या । हटकवल्लि त्यावरी रेखिल्या । वरते साधुनि दिव्य बैठका । खांब सरूचे दिव्य हिऱ्याचे । तुळवट दिधलें इंद्रनिळाचें । मरकत मणिची दिली उथाळी । गरुड पाचुच्या कड्या घातिल्या । रक्तमणींच्या किलचा दिधल्या । रजताचा वरि पेंड घातिला । इंद्रनिळाच्या केल्या पुतळ्या । रत्न दीप करिं उभ्या राहिल्या । नृत्य गान त्या अलापें करिती । प्रेक्षक-जनमानसासि हरिती । दिवस-निशा त्या स्थळींच नसती । जळ

१ गरुडावर.

असतां तीं स्थळें भासती । स्थळशंकेनें त्यांताचि पडती । लज्जित होउनियां आड दडती । सिंहासन नवरत्नी मोठें । मध्य भागिं तें दिसें गोमटें । खणोखणीं पडदे मखमलिचे । किनखापी किति कार चोबिचे । रूगिर्घावरि काम जरीचें । लोड बनविले बहु परोपरिचे । यादव सारे सभेंत असती । देशोदेशिचे अनेक नृपती । उग्रसेन असे, मुख्य श्रीपती । सेवकजन बद्धांजलि होउनि लक्षीती । प्रभुच्या निदेशासही । यादवी सभे सम ऐसी त्रैलोकीं दुसरी नाहीं ॥ २ ॥

पद-( यादव कृष्णाची प्रार्थना करितात. )

( उद्धवा शांतवन कर जा- )

ते यादव ह्मणती सारे, हरि वांचवि आमुच्या प्राणा ॥धृ०॥ तो काळ यवन क्रुर मोठा, घेउनियां सेना भारी । अला मथुरापुर वेढाया, पाहा येउनि नगरद्वारीं । हरि संकट पडलें मोठें, तुज वांचुनि कोण निवारी ॥ चाल ॥ चतुरंग सेना मोठी । वीरही कोटिच्या कोटी । भय शिरलें यास्तव पोटीं ॥ पू०चाल ॥ खोटीच गोष्ट कां सांगुं, तुजपासीं जाण सुजाणा ॥ २ ॥ भीतिलाहि कारण दुसरें, आहे कथितों तें हरि तुजला । गर्गानें तप बहु केलें, शिवसांव तयावरि रिझला । वरदान असे त्या दिधलें, सुत यवनिज मारिल रिपुला ॥ चाल ॥ तो काळ आमुचा हाची । हरि सेना पडली कांची, हें मनांत बहुताचि जाची ॥ पू०चाल ॥ याचीच तोड तूं काढी, सांगितल्या खूणाखाणा ॥ २ ॥ श्रीहरी ह्मणें हो ऐका, करितों युक्ती करितों खासी । युद्धाची खटपट सहसा, लागेना करणें ज्यासी । निवडुनिया दुष्टालागीं, पळवीतो या सैन्यासी ॥ चाल ॥ पहा उगेचि कौतुक आतां ॥ योजितों तयाच्या घातां । कां ग्राम त्यजुनियां जातां ॥ पू०चाल ॥ त्राता हा सर्व जगाचा, गिरिवासी कां समजाना ॥ ३ ॥

---

१ प्रसन्नता. २ भीतींत, घोरांत.

पद–( राजा मुचकुंद ह्मणतो )

जलद त्रिताल.

हरि मज कांहो भेट देइना ॥ धृ० ॥ दिसे पीतपट[1] त्याचा ॥ येथें आला केंवि साचा । कोणी शोध लावा याचा । ज्याचा तोची कांहो नेइना ॥ १ ॥ आतां धुंडुं कोठें त्याला । केला झोपेनेंचि घाला । न कळे वेळ किती झाला । भ्याला तरि कां जवळ येइना ॥ २ ॥ स्वर्गीं देवा सकळांनीं । माझ्या घातिलें हें कानीं । निद्रा पूर्ण होतां क्षणीं । भेट, तरि कां धांव घेइना ॥३॥ गिरिवासी प्रभुराज । मूर्ति दाखउनि काज । करि भक्ताचें तो आज । तेज गगनीं समावेना ॥ ४ ॥

पद–( भगवान ह्मणतात )

( जलद घनाक्षरी )

बापा मुचकुंदा तूं दीन । जैसा जळाविणें मीन । दिसासि कां रे बा तूं क्षीण । बैस क्षणभरि । मशीं बोल तरि । झाली तनू मलीन ॥ १ ॥ काय वेळ अशि कठीण । कोणी केलें निद्रे[2]-विहीन ॥ चाल ॥ गुहांतरी । चिंता करि दुरि । होसी पहिल्या परी पीन[3] ॥ २ ॥

---

१ पीतांबर. २ मानस नाहीं. ३ लट्ठ, सतेज.

# सत्यभामेनें श्रीकृष्णास दान केलें तें आख्यान.

## कथा-सारांश.

नारद द्वारकेस आला असतां कृष्णाच्या परिवाराचा थाट पाहून आपण गृहस्थाश्रमी व्हावें असें त्यास वाटलें. त्यानें कृष्णास एक बायको मागितली. त्यानें कृष्णास एक बायको मागितली. ' जिच्या घरीं मी दिसणार नाहीं ती बायको तुह्माला दिली ' असें कृष्णांनीं त्यास सांगितलें. नारदानें सर्व घरें पाहिलीं, तेव्हा सर्व ठिकाणीं कृष्ण त्यास दिसला. नंतर श्रमून नारद सत्यभामेचे घरीं, बसला. सत्यभामेनें ' प्रतिजन्मीं कृष्ण पति मिळण्याकरितां कोणतें व्रत करावें असें नारदास विचारलें. त्यानें ' कृष्णदान कर ' ह्मणून सांगितलें. लागलींच सत्यभामेनें तसें केलें. पुढे ' कृष्णाची सुटका व्हावी अशी इच्छा असेल तर त्याचे भारंभार मला सोनें द्या' असें नारदानें कृष्णाचे इतर बायकांस सांगितलें. सर्वांनीं आपले दागीने व इतर जडजवाहीर पारड्यांत घातलें, परंतु कृष्णाचें पारडें वर उचलेना. शेवटीं रुक्मिणीनें एक तुळशीचें पान पारड्यांत घातलें, तेव्हां कृष्णाचें पारडें एकदम वर गेलें. ही कथा या आख्यानांत आहे.

## आर्या.

रहावे मास चतुष्टय ह्मणवुनि ये द्वारकेसि देव[1]मुनी ।
त्यांतचि रमला चित्तें जाणें इतर स्थळासि दे व[2]मुनी ॥ १ ॥
ब्रह्म*विणा करिं घेउनि श्रीहरिच्या गात तो प्र[3]बंधांस ।
आला प्रभु जेथें तो वारी स्मरणेंचि कर्मबंधांस ॥ २ ॥
होते प्रभु रुक्मिणिच्या सदनीं सवतींत मुख्य दारां[4]जी ।
पाहुनि इतरहि कांता मानी पति ईस सर्वदा रां[5]जी ॥ ३ ॥
पर्यंकास्थित होता उतरुनियां धांवला मुनी न[6]मना ।
पूजा सत्कार बहू करि प्रभु आनंद दे मुनीनँ[7]-मना ॥ ४ ॥
पाहुनि वैभव प्रभुचें नारद निज मानसांत हें भा[8]वी ।
कीं व्हावें गृहधर्मी, मग जें होणार हो सुखें भा[9]वी ॥ ५ ॥

---

१ नारद. २ सोडून, ३ गाणीं. ४ बायको. ५ खूष. ६ मुनीला नमन करण्याकरितां. ७ मुनिश्रेष्ठाच्या मनाला ८ विचार करी. ९ भविष्यकाळीं.

* नारदाच्या वीणेला ब्रह्मवीणा ह्मणतात.

यावरि प्रभुलाहि ह्मणे यांतुनि मज एक अंगना नामी ।
कामीं कुशल असी दे करिन तिसीं केलि-रंगना नामी ॥ ६ ॥
देव ह्मणें ती दिधली ज्या सदनीं मी असेचि ना जागा ।
गुणवति सुंदर अवघ्या विगुण ह्मणाया दिसेचि ना जागा ॥ ४
ज्या ज्या सदनीं पाहे श्रीहरि आहेचि बैसला कोठें ।
कोठें मुलासिं खेळे मुलिचाही पुरवितो लळा कोठें ॥ ८ ॥
कोठें सुनेसि आणी कोठें कन्येसि लावितो वाटें ।
कोठें विप्रा जेवावि कोठें देतोचि दक्षिणा वाटे ॥ ९ ॥
कोठें व्रतबंधकरी कोठें व्रत उजवितो लहान मोठें ।
कोठें विवाह मुलिचा कोठें पुत्रासि दापितो ओठें ॥ १० ॥
पाहे मुनिं नारद तो येउनि तत्काल सत्यभामेला ।
टेकें विश्रांतिस्तव श्रमतों उष्णांत फार घामेला[2] ॥ ११ ॥
होता मुकुंद तेथें बोलावी नारदासि याहो या ।
कांहो श्रमला इतुकें सांगा कारण असेल या होयां[3] ॥ १२ ॥
नारद होय चकित बहु या प्रभुच्या किति अगाध लीला या ।
भामा वदे तशांतचि सांगा व्रतदान शंकलीला[4] या ॥ १३ ॥
वाटें मजलागिं असें प्रतिभवीं[5] व्हावाचि हा हरी नाहो[6] ।
सांगाहो दान कसें द्या दूषण मग जरी करीना हो ॥ १४ ॥
अचरावें व्रत कैसें कळवा मजप्रति ह्मणेल जरि नाहो[7] ।
करिन यथोचित भावें दूषण द्या मग जरी धरीना हो ॥ १५ ॥
नारद बोले आहे दान तुला सांगतों प्रशस्त-पणें ।
आहे तव संन्निध तें नलगे व्रत-नेम-पुण्य[8] ज॰ तपें[9] ॥ १६ ॥
दिधला कश्यप मजला अदितीनें, दान पारिजातं[10] नग ।
शक्र दिला शचिनेंही, रोहिणिनें निजपती तसाच मग ॥ १७ ॥
आहे अनुकूल तुला पति अणवी पारिजातनग तोही ।
दे दान त्वरित मला याता यातींत वळे न गेतोंहि ॥ १८ ॥

---

१ उत्तम. २ घामानें भिजलेला. ३ असे होण्याला. ४ शंकित झालेल्या मला. ५ प्रतिजन्मीं. ६ नवरा, पती. ७ नाहीं हो. ८ पुण्यतीर्थं. ९ तपश्चर्या. १० पारिजातक नावाचें झाड. ११ आवों.

सांगुनियां मग प्रभुला आणवुनि सुरतरुस द्वारका पुरिला ।
लावी निज सदनांतचि ह्मणतें तिस कोण द्वारिं कां पुरिला ॥१९॥
सिद्ध करुनि सामग्री दे ती पतिदान नारदा विधिनें ।
चित्तीं ह्मणे मुरारी लिहिलें भाळीं असेंचि कीं विधिनें ॥ २० ॥
होतें मनीं प्रभूच्या कीं मजला हा मुनीच सोडील ।
करितो अशा कुचेष्टा आहे याचा स्वभाव खोडील ॥ २१ ॥
परि तो ह्मणें चलावें करणें लागेल आमुची सेवा ।
हेवा सोडुनि ठेवा देवा तुमचा नसेचि मज केवा ॥ २२ ॥
होते छात्र इतर जरि दे दाडुनि हरिशिरीं गवाळ्यातें ।
टाळ्यांतें वाजविती मुनि सेवक करुनि बहु दवाळ्यांतें ॥ २३ ॥
दिसतें द्रुपा कारण आजि अह्मीं ठकविलें द्विजाला हो ।
फिरला जरी घरोघर स्त्रीचा होऊं दिला न ज्या लाहो ॥ २४ ॥
घाबरला मग प्रभु तो हा तरि नेणार स्पष्ट मज कळतें ।
होइल सुटका कैसी आलें हें विघ्न अजि कसें टळतें ॥ २५ ॥
जायं जरी त्या सांगे परि हरिमार्गांत तो उभा राहे ।
पाहे सकळांसि ह्मणें मुक्त करुनि पुण्यगुढि उभारा हे ॥ २६ ॥
मग त्या रुक्मिण्यादी सकळ स्त्रियांचा जमूनि एक गट ।
ह्मणती हो कैसी तरि प्रभु-सुटकेची कराच गे लगट ॥ २७ ॥
पुसती त्या भामेला तुजला अधिकार तरि कसा गे हा ।
झाला मात्रा, द्विमूर्धा सर्वांच्या लाविला कसा गेहा ॥ २८ ॥
बाई तूंचि कसी गे देउनि बसलीस कृष्णदानास ।
हें न कसें कळलें कीं भावी होणार सर्वदा नास ॥ २९ ॥

---

१ आपुल्या द्वारांतच झाड कां लावलेंस असें तिला कोण ह्मणूं शकेल. २ विधिपूर्वक. ३ ब्रह्मदेवानें. ४ सोडकर. ५ शिष्य. ६ देवपूजेचें सामान बांधलेलें गाठोडें. ७ लाभ. ८ नारद कृष्णाला 'चल' ह्मणत असे पण कृष्णानें रस्त्यांतच अडून बसावें व लोकांना ह्मणावें मला सोडवून आपला पुण्याचा ध्वज उभारा. ९ समुद्र. १० अग्नि.

बोले देवकि माता नसतिल या कृष्ण–कामिनी अन्या ।
झालीस वरी त्रिजगीं देउनि पतिदान तूंचि गे धन्या ॥ ३० ॥
होता तुझाचि गे हा पति यांचा हरि नसेल तरिच असें ।
केलें, समज अतां तरि अणसिल यदुराज, क्षेम तरिच असे॥३१॥
या परि गांजिति सान्या पडली भ्रांतींत सत्यभामा ती ।
या ऐशा अपमानें होईना काय सत्यं भा माती ॥ ३२ ॥
ह्मणती देवकिला त्या जातों प्रभुलागिं सोडवायातें ।
सांगावें तरि कवणां होती बहु कष्ट सोडवा यातें ॥ ३३ ॥
येतों चाल तुजसवें ह्मणती जाऊनि नारदासीच ।
मानिसि हरिदास तशा याही मानी समस्त दासीच ॥ ३४ ॥
श्रीहरि वांचुनि आतां येथें तरि कोण नारदा पाळी ।
कोठें तरि जन्माची देणें आहेत्ति एकदा पाळी ॥ ३५ ॥
अथवा मुटकाचि करी सत्वर आतांचि देवरायाची ।
होसी सदय अखंडित होइल सौभाग्य दे वरा याची ॥ ३६ ॥
नारद ह्मणे समतुकीं कृष्णाच्या कनक घाल जरि अवघ्या ।
मुक्त करिन श्रीहरिला सुभगत्वाची तुह्मीहि मग चव घ्या ॥३७॥
मग त्या अवघ्याचि मिळुनि घालिति नग ताजव्यांत तोलाया ।
देउनि सर्वस्वातें भीतिल कां मग पतीस बोलाया ॥ ३८ ॥
केलें हें भामेनें झालों अह्मीच पात्र वाराया ।
दिधले नग होते जे करितिल याहून काय दारा या ॥ ३९ ॥
जरि घातिले स्त्रियानीं जे होते कनकमय समस्त नग ।
मुक्तांचे रत्नांचे देती अनमोल त्या समस्त मग ॥ ४० ॥
तरि पारडें हलेना ह्मणती हें कृत्य नारदानें च ।
केलें ठकवायातें मानी संतोष कृष्णदानें च ॥ ४१ ॥

---

१ खरें तेज. २ खऱ्या तेजाची माती कां बरें होणार नाहीं. ३ तूं स्वतःला हरीचा दास समजतोस तशाच आह्मीहि हरीच्या दासी आहोंत असें समज. ४ प्रार्थना करितों. ५ मारोमार. ६ दागिने. ७ बिनमोल.

म्हणती कितिक असेंही काढावीं भूषणें सकल हरिची ।
होइल न्यून जडत्वें वस्त्रें तरि कासया अहो जरिचीं ॥ ४२ ॥
इतुक्यांत येइ भैमी घाली आणूनि तुळसिच्या पाना ।
सत्याचि वदत्या कविचे काय तुह्मी इतर दोष ढांकाना ॥ ४३ ॥
होता प्रभु ज्यामाजीं आलें उचलूनि पारडें वरतें ।
फुंदे नारद हळुहळु होतें जणुं ठेविलें रडें वरतें ॥ ४४ ॥
यापरि अनंद सकळा झाला मुनि नारदासहि तसाच ।
परि वरि रोष तसा तो फणसाच्या अंतरांत हिंत साच ॥ ४५ ॥
बाइ रमे कथाया लोकां काहणाचि ही कसी केली ।
केली या विप्राच्या कनका हानीच, हो कसी केली ॥ ४६ ॥
झालें सकल जनांला आनंदाचेंचि तें महापर्व ।
वर्णिति किति भामेला कृष्णाला भैमिलाचि मग सर्व ॥ ४७ ॥
दानोद्यम भामेचा हरिनें नेलाचि शेवटांलागीं ।
ह्रद्गत कविचें पुरवुनि तो प्रभु नेतोचि शेवटांला गीं ॥ ४८ ॥

## याच आख्यानाचीं पदें.

### कटिबंध.

( द्वारकेचें वर्णन. )

नारद द्वारकेसि जंव पाहे । पद्मा सद्म करुनियां आहे । ऐसी शोभा नयनीं लाहे । सुंदर नीर गोमती वाहे । सरोवरें निर्मळ निरें ज्यांचें । मध्यें शोभे वन निरजांचें । सुवास जाती दुरवर त्यांचे । वर्णन करिती सुरनर ज्यांचें । भंवतालीं घनवृक्ष लागले । नारि केळ पोफळी आवळे । चूतनिंब दाळिंब शोभले । फळभारानें दिसती लवले । जाइ जुई पुन्नाग मालती । भ्रमर ज्यांवरी रुंजि घालिती । सुवर्ण चंपक बकुल शेवती । गुलाब फुलले सु-

---

१ जरतारी. २ सत्य बोलणाऱ्या कवींचें तुह्मी इतर दोष झाकणार नाहीं काय ? ३ झांकणें. ४ स्फुदूं लागला. ५ गोड. फणसाच्या वरून जरी कांटे असतात तरी आंत गोड असतें त्याप्रमाणें नारद वरून जरी रोष दाखवी तरी आंतून आनंदित झाला होता. ६ या ब्राह्मणाचें सोनें बुडविलें. ७ थट्टा, विनोद, मजा. ८ वाणी. ९ लक्ष्मी. १० घर. ११ नीर, पाणी. १२ नीरज म्हणजे [illegible]

गंध देती । नानापरिचे पक्षि बोलती । पाहत पाहत तो नगरा-माजी । गेला हरि मंदिरा समाजीं । सुवर्णमय गोपुरें साजिरीं । हिरे रत्न माणिकें ज्यावरी । अन्य मंदिरें तसींच सारीं । खणो-खणीं बैसुनियां नारी । हास्य विनोदें खेळती सारी । गाती गाणें कळा कूसरीं । नारद पाहुनि चकित जाहला । शिष्यासह हरिसदनीं आला । चित्तापासुनि तेथें रमला । ह्मणें किती वैभव या हरिचें । अन्य दिसेना स्थळ या सरिचें । व्यर्थ जन्म कीं अमुचें गेलें । अजवरि सौख्य नसे कधिं झालें । नानापरिचे कष्ट भोगिले । इष्ट काम कधिं नसती पुरले । मिष्टान्नांचें सेवन घडलें । नाहीं मन संतुष्ट जाहलें । यापरि चित्तीं चिंतित मग तो । हरि-लागीं भेटला । नारद मुनि द्वारवतीला । पाहुनियां बहुतचि रमला ॥ १ ॥

पद-( नारद श्रीहरीस ह्मणतो )

गड्यानो कृष्ण गडी अपुला.

नारद बोले श्रीहरिला । कांता देई एक मला ॥ धृ० ॥ सोळा सहस्र वरि आठ । दिसे तव कांतांचा थाट । भरलें मंदिर घनदाट । फुटेना जायासहि वाट । असें तरि काय अशक्य तुला ॥ १ ॥ करावी नूतन जरि नवरी । करूं मी काय जरी न वरी । बरें ती लहान असें जंवरी । आहे घरिं कोण तिला आवरी । मी तरि शिकवुं काय तिला ॥ २ ॥ यास्तव ह्मणतों मी देवा । करिल जी आतांचि मम सेवा । द्यावी शोधुनि मग जेवा । करीना दुसरीचा हेवा । राखिन तुष्ट सदा तिजला ॥ ३ ॥ प्रभु गिरि-वासी हास्य करी । ह्मणें मी नसेन ज्याच घरीं । न्यावी कांता तीच वरी । जाणती सर्व कळा कुसरी । पुसणें नकोचि इत-राला ॥ ४ ॥

---

१ हरीचीं मंदिरें ज्या ठिकाणीं आहेत तेथें. २ सारीपाट, चौपर. ३ बरोबरीचें. ४ जोंपर्यंत.

पद—( नारदास भामा पुसते. )

गड्यानो कृष्ण गडी.

भामा पुसे नारदासी । सांगा मज व्रत-दानासी ॥ ध्रु० ॥ कांता हरिला बहुत जरी । करितो मजवरि प्रेम तरी । असतो अनुदिनिं याच घरीं । नावडे मज सम त्या दुसरी । प्रति भवीं होइन मी दासी ॥ १ ॥ असावा अखंड पति हाची । करूं मी युक्ति काय याची । सांगा निश्चयरुप साची । असो मग असुलभ हो, यांची । अनुकुळ असें सर्व मजसी ॥ २ ॥ झालें मन माझें पळेंवा । नका करुं वेळ त्वरें कळवा । चिंता मनिची ही पळेंवा । सांगुनि प्रभुलाही वळवा । आहे गुणरासी गिरिवासी ॥ ३ ॥

( भामा नारदास विचारते )

पुछत भामा नारद मुनिसे । मोहे जुगत बतलावो री । जनम जनम हो पती हमारो । जदुबिर, दान सुनावो री ॥ २ ॥ बोले नारद तुझे बतलाऊं । दान करो पति अपनारी । होते सुहागही जनम जनममों काहेकु वरत करना री ॥ २ ॥

( नारद भामेला म्हणतात. )

अंजनीगीत.

नारद बोलीलें भामेसी । व्यर्थ चिंता कां करितेसी । दान आहे कथितों तुजसी । मग न करी वेळ ॥ १ ॥ जरि तुज व्हावा अखंड हरी । माझ्या वचनीं दृढता धरी । कृष्णदाना दे लौकरी । होइल तुज सौख्य ॥ २ ॥ जन्मोजन्मीं हरीच कांत । होइल तुजलागीं निश्चित । ऐके सांगतों वृत्तांत । पूर्वीचा तुजला ॥ ३ ॥ शचिनें केलें पतिचें दान । तैसें अदितीनें ही जाण । होती रोहिणी सुज्ञान । दे पति दानासी ॥ ४ ॥ हरि तुज आहेची अनुकूळ ।

---

१ अहो. २ प्रार्थना करितें. ३ चंचल, उत्सुक. ४ दूर करा. ५ सौभाग्य. ६ इंद्राची पत्नी. ७ देवमाता. ८ चंद्रपत्नी.

न दिसे वरकडही प्रतिकुळ । सुरतरु आणउनी समुळ । दे दान मजसी ॥ ५ ॥ मोठें पुण्य या दानाचें । होतें, तुजला कथिलें साचें । घेई अनुमत चित्ताचें । नसे आग्रह अमुचा ॥ ६ ॥

पद-( वरकड कृष्णकामिनी भामेस निंदितात. )

( उद्धवा शांतवन कर जा. )

त्या कृष्णकामिनी अवध्या । बहु निंदिति भामेलागीं ॥ ॥ धृ० ॥ कां विचार पुसिला नाहीं, आह्मी जवळाचे होतों बाई । जरि मत्सरभावें तुजला मनिं गर्वचि होता कांहीं । देवकी आदि बहु वृद्धा, त्या सन्निध होत्या पाही ॥ चाल० ॥ नाहिं पुसिलें कां बरें त्यासी । कसें रुचलें हेंचि मनासी । आर्पिला कृष्ण दानासी ॥ पू०चाल ॥ मानासी हानि आजि अमुच्या, त्वां केली आपुल्या जागीं ॥ २ ॥ आह्मि असतां इतुक्या कांता, कशि शंका धरिली नाहीं । काय तुलाचि गे तो होता, पति अर्पण केला बाई । कसि बसलिस स्वस्थपणानें, कां उत्तर देसि न कांहीं ॥ चाल ॥ सांगतों अतां बरें तुजसी । आहों कांता हरिच्या तुजसी । आणि सत्वर आतां प्रभुसी ॥ पू०चाल ॥ बससील असी जरि उगली । तरि होसिल दुःखविभागी ॥ २ ॥ घाबरलि मनीं बहु भामा, तिस विचार न सुचे कांहीं । ह्मणे काय करूं मी आतां, कसि पडली भुल मजलाही । दिस कंठूं मी तरि कैसी, प्रभु वांचुनि हो या ठायीं ॥ चाल ॥ अलें संकट अज बहु मोठें । दिसे कर्मचि आपुलें खोटें । नारदासी हुडकूं कोठें । बोटेंच मोडणें आलें, गिरिवासी प्रभु आपंगी ॥ ३ ॥

साकी. ( कृष्णाच्या इतर स्त्रिया भामेस ह्मणतात. )

किशन कामिनी सबही मिल अइ । भामाजीके मंदरमों । कहत तुह्मे पति दियो दान अब । जा बैठो गिरि-कंदरमों ॥ १ ॥

---

१ पारिजातक. २ मुळासुद्धां. ३ आहोंत. ४ जशी तूं आहेस. ५ अपंग. मी अपंग झालें आतां बोटें मोडण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

पति हमारा था जदुबिर नहीं । हमसे ब्याहानका नोरी । समजो अबही लावो प्रभु-तुमा छेम[2] इसीमें जानोरी ॥ १ ॥

पद–( देवकी ह्मणते )

जलद त्रिताल.

हरिला मी कोठें पाहूं ॥ धृ०[8] ॥ ह्मणती भामेनें हें काम । केलें बुडविलें धाम[3] ॥ नाहीं अला मना घाम । याम[4] झाला कोठें जाऊं ॥ १ ॥ येतो मनीं बहु त्वेष[5] । नाहिं मर्यादेचा लेश । करिती वडिलांचा द्वेष । यश बुडतें कशी साहूं ॥ २ ॥ आहे भामा मोठी दांड । तिचा सर्वांपुढें पांड । तसी तोंडाचिही भांड[6] । सांड[7] करुनि किती राहूं ॥ ३ ॥ आला भामेचा या वीट । पाहा बरें कशि धीट । नाहीं कोणाशींहि नीट । कोठवरि हें दुःख वाहूं ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभुसाठीं । लागुं कोणाच्या मी पाठीं । नेलि वृद्धांची या काठी । भेटिसाठीं किती धाऊं ॥ ५ ॥

पद–( कृष्णाच्या स्त्रिया नारदास ह्मणतात. )

जोगी.

( माझा भरत देखिला काय. )

नारदा सोड पती अमुचा । झालों दीनचि कीं ॥ धृ० ॥ घेतलें त्वां तरि कैसें दान । ठेविला नाहीं अमुचा मान । पती हा सर्वांचा कीं जाण । कैसें भान तुज नाहीं ॥ १ ॥ एकट्या भामेचा अधिकार । नसे हा विदितचि सर्व प्रकार । कां बरें केला नाहिं विचार । काय आधार तुज दिसला ॥ २ ॥ न सुचे यासि करावें काय । सांगे आतां तूंचि उपाय । देइना धरणी आह्मां ठाय । होसी माय तूं आमुची ॥ ३ ॥ सोडी गिरिवासी प्रभुराय । त्याविण आह्मि करावें काय । द्यावें कृष्ण-पालटे काय । धरितों पाय सांग बरें ॥ ४ ॥

---

१ लग्न. २ क्षेम, कल्याण. ३ घर. ४ प्रहर. ५ तोरा, ताठा, अहंकार. ६ भांडणारी. ७ हेळसांड, उपेक्षा. ८ कृष्णाबद्दल. कृष्णाच्या मोबदला आह्मी काय द्यावें तें सांग.

पद—( नारद कृष्णपत्न्यांस ह्मणतो )

जलद घनाक्षरी.

कांगे झाल्या ऐशा दंग । जरी व्हावा श्रीहरिसंग । कां मी करिन मनोभंग । द्या गे कृष्णा इतुकें, तोलुनि सोनें निकें, देतों सोडुनि रमारंग ॥ १ ॥ काय असें तुह्मां व्यंग । कळुं द्या तुमचें अंतरंग । नसें संकट कांहीं, तुह्मां उणें[1] नाहीं । आणा सोनें तोलुं श्रीरंग ॥ २ ॥ नाहीं अवघड कांहि प्रसंग । कां वरें कारितां मग दिरंग[2] । झडकरि जागे आतां, आणुनि सोनें हातां । व्हावें हरिपदकमलीं भृंग ॥ ३ ॥

झुलना. ( कृष्णाच्या स्त्रिया ह्मणतात. )

घनाक्षरी.

कनक दिधलें किति भार । न ये कृष्ण भारंभार । असा याचा किति भार । नकळे पार आमुतें ॥ १ ॥ कोणी ह्मणती नग फार । काढा सकल अलंकार । होइल न्यून कांहिं भार । दिसे विचार हा बरा ॥ २ ॥ वस्त्रें जरिचीं[3] जड फार । वाटे याचा ही भार । काढुनि दुसरीं द्या चार[4] । करा न्यून भार हा ॥ ३ ॥

---

१ उणें. २ दिरंगाई, उशीर, टाळाटाळ. ३ जरतारी. ४ चार, थोडीं.

# प्रभूंनीं नारदाचा गर्वपरिहार केला तें आख्यान.

## कथा-सारांश.

एकदां ऋषींच्या सभेंत शुकासारखा कोणी होणार नाहीं, असें सर्वांचें मत पडलें. ही गोष्ट नारदाला आवडली नाहीं. नारद ह्मणाला 'ज्याला स्त्रीचा अनुभव नाहीं अशा शुकानें रंभेला परत पाठविलें यांत मोठेसें नवल नाहीं; मी सुद्धां तसें करीन.' असें ह्मणून नारद तप करण्यास गेला. कांहीं दिवस शुकाप्रमाणें त्यानें तप केलें. त्याचें तप पाहून इंद्र घाबरला. त्यानें रंभेस सांगितलें. तिनें आपल्या एका दासीस नारदाकडे पाठविलें. तिला पाहून नारदाची धांदल उडाली. नारदाची स्थिति पाहून ती दासी निघून गेली. नारदाला वाटलें कीं, आपण रंभेला परत केलें ही गोष्ट सर्वांना कळवावी. प्रथम तो ब्रह्मदेवाकडेस गेला, व त्याला ती गोष्ट सांगितली. त्याला ही गोष्ट ऐकून आनंद झाला नाहीं. नंतर नारदानें तीच हकीकत विष्णूला व शिवाला सांगितली. शिवानीं आपले दोन गण गुप्तरूपानें नारदाबरोबर दिले. जातांना नारदाला एक नगर दिसलें. तेथें पुष्कळ तरुण स्त्रिया पाणी घेऊन जातांना दिसल्या. त्यांनीं राजाच्या 'मुलीचें स्वयंवर आहे याजकरितां पाणी नेतों,' असें नारदानें विचारल्यावरून सांगितलें. ती राजकन्या श्रीविष्णूस वरणार आहे असें समजल्यावर, नारद विष्णूकडे गेला, 'व थोडे वेळां करितां तुमचें रूप द्या' असें त्यास ह्मणाला. विष्णूनें नारदाचें सर्व शरीर आपल्या सारखें केलें. परंतु तोंड मात्र माकडाचें केलें, व 'आरसा पाहूं नका' असें नारदास सांगीतलें. नारद राजकन्येकडे गेला, तिनें त्याला आरसा दाखविला. तेव्हां नारद आपले मनांत लज्जित झाला, व त्यानें विष्णूला व शिवाचे दोनी गणाला शाप दिला. ही कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

गौतम कपिल महामुनि वसिष्ठ भृगु अंगिरा च्यवन राम ।
कश्यप भारद्वाजहि नारद देवल विशिष्ट[1]-गुणधाम ॥ १ ॥
उपराग[2]-पर्वकाळीं ऋषिगण संपूर्ण तीर्थ राजास[3] ।
आले स्नान कराया वंदिति सुरनरहि अप्सरा ज्यांस ॥ २ ॥

---

१ विशेष गुणांचीं आगरें. २ ग्रहण. ३ तीर्थश्रेष्ठ प्रयागास.

ह्मणति शुकासम नाहिंच दृष्ट श्रुत पुरुष अन्य कवणास ।
सांगा असेल ठावा येऊं द्या त्वरित शर्म श्रवणास ॥ ३ ॥

सत्यचि योगींद्र तया ह्मणती, नाहींच अन्यथा बोलें ।
कठिण-उरो-जा रंभा प्रार्थी, तरि काय अन्य थांबेल ॥ ४ ॥

कोपें बोले नारद यापरि येतांचि वाक्य श्रवणासीं ।
काय अशक्य असें हें सूज्ञ जना वेदशास्त्र-प्रवणासीं ॥ ५ ॥

बा नारदा नसे हें सुलभ, अती कठिण जाण तूं बरवें ।
वार्तांबु प्राशी जो त्यालाहीं सर्वथा न थिर धरवे ॥ ६ ॥

इतरांची काय कथा सूज्ञा तुजलागि काय सांगावें ।
दिसला धवल ह्मणुनि कां सांडुनि हंसासि वायसा गावें ॥ ७ ॥

नारद ह्मणे अतां मी जाउनि करितोंचि कीं तपारंभा ।
पाहणें असेल प्रत्यय, सिद्ध करुनि पाठवा तुह्मी रंभा ॥ ८ ॥

सामर्थ्य काय तीचें फटोविल या नारदासि निज-कुतुकें ।
जाइल व्यर्थ तिचें तें करणें हवभाव कृत्य जें तितुकें ॥ ९ ॥

यापरि बोलुनि नारद गेला तत्काल तो तपायासी ।
ह्मणती मुनिजन सारे कां हा पडतो वृथा तपायासी ॥ १० ॥

कांहीं काळ तपातें आचरला त्या शुकासमान मुनी ।
सुज्ञ कसें राव्यांतें ह्मणतिल हो त्या शुका समान मुनी ॥ ११ ॥

पडला इंद्र विचारीं आलें हें विघ्न तरि कसें टळतें ।
घेइल पद अमुचें तो नारद मजलागिं स्पष्ट हें कळतें ॥ १२ ॥

पाचारी रंभेतें कळउनि वृत्तांत हा वदे तीस ।
भंग तपाचा करणें अनुमत या लागिं काय देतीस ॥ १३ ॥

रंभा वदे सुरेशा जाणें नलगे मलाहि त्या ठायां ।
दासीच्या दासीसहि वेळ नको नारदासि गांठाया ॥ १४ ॥

---

१ नांव. २ शब्द. ३ वेदशास्त्रांत प्रवीण असाला. ४ वारा अथवा पाणी पिऊनच राहणारे. ५ फसवील. ६ तपाच्या आयासांत. ७ राघूला.

लघुतर कार्य असें हें वाहतसां व्यर्थ काय काळजिला ।
काय करीना सेवा रक्षण करितांचि सर्वकाळ जिला ॥ १५ ॥
रंभेनें पाठविलें सज्ज करुनि दासिच्याहि दासीस ।
झाला पाहुनि मोहित करिती सुरनम्र ज्या सदा सीस[1] ॥ १६ ॥
कळलें दासीस असें कीं हा मुनि जाहला व्यथित-काम[2] ।
कां मग व्यर्थ बसावें पूरित जाल्यावरीहि निजकाम ॥ १७ ॥
आली पलटुनि दासी सांगे रंभेसि तीहि शक्रास ।
पोळे क्षीर ह्मणुनियां फुंकुनि प्यावेंचि काय तक्रास ॥ १८ ॥
दासी गेल्यावरि मग चढला बहु गर्व नारदालाही ।
शक्य न झाली रंभा अवलोकायास मत्तपालाही ॥ १९ ॥
प्रगट करावें ह्मणउनि गेला मुनि ब्रह्मयासि कळवाया ।
परि तो ह्मणे शुकासम कोण असे, बोलसी सकळ वाया ॥२०॥
पुत्रोत्कर्ष[3] पित्याला इष्ट, कळेनाचि, यास कां नाहीं ।
नाहीं ज्ञान ह्मणावें, कीं झाला हा बधीर कानींही[4] ॥ २१ ॥
कळवूं शिवासि जाउनि वाटे सन्मान तो करिल कांहीं ।
आहे सर्वज्ञ प्रभु शंका तरि मानसीं धरिल कां ही ॥ २२ ॥
सांगे वृत्त शिवातें रुचलें त्याच्याहि तें मना नाहीं ।
नच दुखवुनि मन मुनिचें चेष्टा करितो कशी पहानां[5] ही ॥ २३ ॥
दूतद्वयासि सांगे गुप्त असावेंचि नारदा-निकट ।
कळवा येउनि मजला वृत्त सकळ कार्य हें नसें बिकट ॥ २४ ॥
मग तो वैकुंठातें गेला नारायणा कथायास ।
पूजा सत्कार बहू प्रभु करि, झाला ह्मणे पथायास ॥ २५ ॥
येणें कां अजि केलें सांगा आहेत कर्ण हे तृषित ।
नारद ह्मणे प्रभो म्यां केला होताचि पण असा ऋषित ॥ २६ ॥
कीं फिरविन रंभेतें अवमानुनि फिरविलें शुकानें हो ।
केलें तसेंचि तें म्यां घ्यावा वृत्तांत आशु[6] कानें[7] हो ॥ २७ ॥

---

१ मस्तक. २ कामानें पीडित. ३ नारद हा ब्रह्मदेवाचा मुलगा आहे ह्मणून नारद विचार करतो कीं,—४ कानांनीं. ५ पहा बरें ! ६ शीघ्र. ७ कानानें.

देव ह्मणे धन्य तुह्मी यापरि राहवेल काय अन्यास ।
वेष्टुनि काषायांबर बसती घेऊन व्यर्थ संन्यास ॥ २८ ॥
नारद बहु संतोषें मागे आज्ञा प्रभूसि जायातें ।
देव वदे जाउनियां पुनरपि करितां कशास ना या तें ॥ २९ ॥
यापरि बोलुनि प्रभु तो मुनिच्या मार्गांत पुर नवें वसवी ।
वाटे दाउनि माया अज्ञ जना समचि नारदा फसवी ॥ ३० ॥
गेला मुनि त्या स्थानीं पाहुनि उद्यान रम्य रमला हो ।
श्रमला होताचि अर्धी मानी चित्तांत तो परम लाहो ॥ ३१ ॥
इतक्यांत एक दासी आली तेथें भरावया पाणी ।
मदनें[1] व्याकुळ मुनिवर पाहे तीचा धरावया पाणी[2] ॥ ३२ ॥
वाटे मुनिलागिं असें पुनरपि रंभाचि काय ही आली ।
अथवा असेल दुसरी बहुधा गमतें तिचीच ही आली[3] ॥ ३३ ॥
सत्वर भरुनि जळातें दासी तेथूनि जावयां पाहे ।
वाहे नारद परि ती स्पष्ट वदे आपुल्या वयां पाहे ॥ ३४ ॥
नारद ह्मणे शुभांगे सांगे आहेसि कोण कवणाची ।
कां तूं जलासि आलिस इच्छा मजलागिं वृत्त-श्रवणाची ॥ ३५ ॥
दासी राजगृहींची उदका न्याया अलें विवाहातें ।
करितो नृप कन्येच्या, आहे वरणार ती विवां[4] हातें ॥ ३६ ॥
नारद जाउनि मागे कन्या भेटूनि त्या नृपा आधीं ।
आहे स्वयंवरीं, जा बोधुनियां कार्य आपुलें साधी ॥ ३७ ॥
गांठी कन्येलाही परि ती बोले हरीच मज नवरा ।
होइल सत्याचि जाणा मग मी कां हो वरीन अन्य वरा ॥ ३८ ॥
येइल हरि गरुडध्वज त्याच्या घालीन हीच माळ गळां ।
त्यावांचुनि मुनिवर्या त्याचि पित्यासम असेचि जन सगळा ॥ ३९ ॥
नारद येउनि पुनरपि स्तवनें नारायणासि तो वळवी ।
यामद्वयाचि पुरे, द्या सत्वर निजरूप मज असें कळवी ॥ ४० ॥

---

१ काम. २ हात. ३ सखी. ४ पती.

देव ह्मणे देइन परि मुख न पहावेंचि आरशामाजीं ।
जरिहि अवज्ञा केली केली ह्मणतील दुर्दशा माजी ॥ ४१ ॥
नारद पाहे निजतनु दिसली अनुरूप विष्णुची कार्या ।
चित्तीं ह्मणे अतां मज आहे भय काय तीस हटकाया ॥ ४२ ॥
आला नारदमुनि ज्या स्थानीं ती राजकन्यका होती ।
होती ध्यानीं हरिच्या सांडुनि नर वरिल अन्य कां हो ती ॥ ४३ ॥
नारद सन्मुख बैसे तरि ती अवलोकिनाचि वदनातें ।
वदनातें कीशाच्या केंवि भुले जी भुले न मदनातें ॥ ४४ ॥
तरि नारद सन्मुख ये आणविला मग अदर्श दासिकरी ।
दासिकरीं देउनियां सांगे, लज्जीत नारदासि करी ॥ ४५ ॥
पाहुनियां मुख अपुलें नारद निजमानसीं विराला हो ।
चित्तीं ह्मणे अतां मी दावूं मुख केविं हें सुराला हो ॥ ४६ ॥
नारद बोले कोपुनि देवा तुज सम असेचिना कपटी ।
अवमानिलें मला कां, ह्मणउनी भूमीवरीच कर अपटी ॥ ४७ ॥
मर्कटमुख आवडलें येतिल मर्कट तुझ्या सहायासी ।
होइल स्त्रीचाहि तुला वियोग येईन मी पहायासी ॥ ४८ ॥
शापी शिवदूतातें ध्यान शिवाचें तुह्मां अखंड जरी ।
रावण घटकर्ण असे होउनि पावाल मृत्यु राम करीं ॥ ४९ ॥
आहे सुरस कथा ही तुलसी रामायणीं पहाल तरी ।
गाल तरीच तरुनियां इतरां तारावयासि व्हाल तरी ॥ ५० ॥
गिरिवासीकृत आर्या झाल्या परिपूर्ण आजि पन्नास ।
पठण श्रवणें गवसे सद्गतिचा मार्गही प्रपन्नास ॥ ५१ ॥

---

१ माझी दुर्दशा केली असें ह्मणाल. २ विचारण्यास. ३ माकडाच्या. ४ आदर्श, आरसा. ५ विरला, थंड झाला. ६ कुंभकर्ण. गायन कराल तर. ७ नौका. ८ सांपडेल. ९ लीन झालेल्यांना.

# याच आख्यानाचीं पदें.

पद-( मुनि नारदास ह्मणतात. )

चाल. ( गव्यांनो कृष्ण गडी अपुला. )

दिसेना यांत अर्थ कांहीं। प्रतिज्ञा करिसि व्यर्थ कां हीं। ॥ ध्रु० ॥ ह्मणती मुनिजन ते सारे। जाणत मूढ तूं कसा रे। दिसेना भूवरि[1] ऐसा रे। त्यागिल कामिनि पैसा रे। तुझें मन देत असेल गाही ॥ १ ॥ शुकासम कोण जगीं आहे। नारदा तूं शोधुनि पाहे। असूया[2] वागविसी कां हे ॥ कळेना तुला कसें वा हें। मानसीं विचारुनि पाहीं ॥ २ ॥ जाणें दूर नको बापा। विचारी तूं आपुल्या बापा[3]। पावला इंद्र किती तापा। मारिल्या मदनानें टापा। विषय हा साधारण नाहीं ॥ ३ ॥ अशा या गोष्टि असुनि ठाव्या। कां वरें मग त्या विसराव्या। हरीच्या कीर्ति सतत गाव्या। मनाच्या वृत्ति आंवराव्या। आहे गिरिवासि सर्व ठायीं ॥ ४ ॥

अंजनीगीत.

( नारद ऋषीस ह्मणतो. )

बोले नारद मुनिजना। कां तुह्मि करितां हो वल्गना ॥ काय त्या शुकाची गणना। नारदापुढें ॥ १ ॥ अहो त्या रंभेची काय कथा। कां वरें भिवविता मज वृथा। आल्या वाटें लाविन पंथा। नसें संकट याचें ॥ २ ॥ शुकाचें त्या वर्णन काई। ज्याला स्त्रीचा अनुभव नाहीं। ऐसा स्थिरही राहे कांहीं। नवल नसें त्याचें ॥ ३ ॥ प्रमदासंगीं जो रातला। नाहीं निश्चयीं ढळला। वर्णूं त्याच्या आह्मि कीर्तिला। नवल करूं कांहीं ॥ ४ ॥ नाहीं बोलनियां फळ। येइल अनुभवा सकळ। जातो तपालागीं वेळ। कां करूं मी आतां ॥ ५ ॥

---

१ साक्ष. २ मत्सर. ३ ब्रह्मदेवाला. ४ लाथा. ५ रममाण झाला.

पद-( इंद्र रंभेस ह्मणतो. )

कालगडा त्रिताल-

जाई त्या विपिनासी, रंभे ॥ धृ० ॥ नारदमुनि बहु तीव्र तपे करि विघ्न त्वरें तपनासी । इंद्रपदातें ध्याया टपतो भीती हीच मनासी ॥ १ ॥ अजवरि ऐशीं विघ्नें टाळुनि सौख्य दिलें सकळांसी । याहि तपाचा भंग करुनि ये तोषवि गे अमरांसी[1] ॥२॥ जाउनि येई पुनरपि रंभे सत्वर या सदनासी । मार्ग तुझा अह्मि लक्षितसों गे लावुनियां नयनांसीं ॥ ३ ॥

झुलना—घनाक्षरी.

( रंभा इंद्रास ह्मणते )

अहो सांगा सुरराज । सोडुनि पुसतें मी लाज । काय दुर्घट हें काज । ह्मणुनि आज बाहिलें[2] ॥ १ ॥ कोठुनि नारदास धीर । होता कां तुह्मी अधीर । करा अपुलें मन स्थिर । करुनि दूर काळजी ॥ २ ॥ जाणें मज तरि कशास । कोण मानितें अशास । नको वेळ दुर्दशास । हा विश्वास दृढ धरा ॥ ३ ॥

पद-( चाल—गडचानों कृष्ण गडा. )

( रंभा पुन्हां ह्मणते. )

रंभा वदे दिवस्पतिला[3] । भ्याला काय नारदाला ॥ धृ० ॥ शुकासम तेज नसें याचें । कारण काय काळजीचें । व्यर्थ भय वागवितां त्याचें । असावें स्वस्थ मनीं साचें । प्रेषितें अतांचि दासीला ॥ १ ॥ नारद आहे अधिर भारी । येइल दासीच्या आहारीं[4] । पाहुनी श्रीहरिच्या नारी । इच्छितो व्हाया घरबारी । मानितो कोण बरें त्याला ॥ २ ॥ रंभा आपुल्या दासीतें । पाठवी शृंगारुनि तीतें । सांगे जाउनियां मुनितें । करावें मोहित निजकृत्यें । गौरविन सत्य जाण तुजला ॥ ३ ॥ गेली त्वरित

---

१ देवांना. २ बोलाविलें. ३ इंद्राला. ४ तडाख्यांत.

मुनीपाशीं । बांधिलें मोहजन्य पाशीं । अली मग पलटुनि रंभेसी । सांगे तीहि वासवासी । आहे कीं गिरिवासी अपुला ॥ ४ ॥

कटिबंध.

( रंभेच्या दासीचें वर्णन. )

अजब नार है छेलछबेली । बनमे कैसी अई अकेली । रुप रंगमे बहोत सजेली । है सोला सिंगार बनेली । सिंघ—कटीसम कमर पतेली । बांधेमेभी खूब गठेली । नहि पतिवर्ता किसे द-बेली । देख परे जस नार छटेली । गहिने गांठेसेभि लदेली । सि-रमे साहत फूल चमेली । नजर अवे रंभाकी सैली । उमक चम-कसे अइ नखरेसे । बोल चाल नहि कछु उसमुनिसे । हावभावसे मोह लिया मन । तबही सूध गई मुनि तनकी । मनकी लहर भई कामिनपर । खूल गई कौपिन मुनितनसे । दैत्यगुरू फिर उसी रहासें । आनिकसें तब कामिन हासें । जाय हकीकत कहे रंभासे । वोहि सुनावत देवदेवसे । कार भयो है आप आपसें । चिंता मत करियो महाराजा । शुकयोगी सम नहि है दूजा । गनती कौन करे नारदकी । मांगत फिरे नार जदुबरकी । कोन डरे बतलावो इसको । धीर नही घडि पललब जिसको । अब कछु धोका नहि है तुमको । रहो खुषीसे चैन करो मंदरमें अपने । इस तऱ्हे बासवको समज्याया । कामिनने तप नारदका देखो ये सबहि डुबाया ॥ १ ॥

अंजनीगीत.

( नारद ब्रह्मदेवास ह्मणतो )

नारद बोले कमलासना[3] । आहे माझी ही प्रार्थना । आ-णुनि येथें संक्रंदना[4] । प्रश्न करा आधीं ॥ १ ॥ नारद आहे शुका-सम । किंवा त्याहूनी उत्तम । रंभेचे तरि विफळ श्रम । उभयांनीं केलें ॥ २ ॥ जरि तो ह्मणेल तुम्हासी । नारद शुकाहुनि गुण-राशी । मग हे कळवा हो सकळांसी । कीर्ति जगीं व्हाया ॥ ३ ॥ होइल श्रमाचें या फळ । गातिल माझे गुण सकळ । मनही हो-ईल निश्चळ । नमितों त्यासाठीं ॥ ४ ॥

---

१ मोहापासून उत्पन्न झालेल्या पाशांत. २ शुक्र, रेत. ३ ब्रह्मदेवा. ४ इंद्राला.

पद–( रंभेला पाहून नारदाची स्थिति )
कालंगडा, त्रिताल.

तबही सूध गई मुनितनकी ॥ धृ० ॥ नार बिपिनमों जब आ निकली । अवाज अइ पैंजनकी ॥ १ ॥ गलित बसन जब जौबन देखे । आवत याद मदनकी ॥ २ ॥ तीर नयनका मोर खींचत । कमान जब भंवयनकी ॥ ३ ॥ नोक झोकसे करत इशारत । नार निकट आवनकी ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु करत अचंबा कौन गती औरनकी ॥ ५ ॥

पद–( ब्रह्मदेव नारदास बोलतात )
चाल–( गळ्यांनो कृष्णगडी )

ब्रह्मा ह्मणे नारदासी । प्रशंसा कां अपुली करिसी ॥धृ०॥ सांडुनी श्रीहरिची सेवा । करणें व्यर्थ असा हेवा । तुझा त्यापुढें नसे केवा । दिसेना शुभ संचित–ठेवा । सांगतों अभिमानें बुडसी ॥ १ ॥ होइल कुत्सा जगिं बा रे । तुला हें कसें कळेना रे । वल्गना करूं नको जा रे । नित्य श्रीहरिलागीं गा रे । यांताचि सौख्य असे तुजसी ॥ २ ॥ दिसेना यांत अर्थ कांहीं । बोलणें फोल गमें पाही । धुंडिल्या जरी दिशा दाही । शुकासम अन्य जनीं नाहीं । असें हें विदितचि सकळांसी ॥ ३ ॥ येथुनि जा सत्वर आतां । बोलवूं नकोचि यापरता । अजवरि भ्रम हा मज होता । नारदा आहेसि तूं ज्ञाता । ह्मणेलाचि मूर्ख गिरीवासी ॥४॥

पद–( नारद श्रीहरीस ह्मणतो )
( कालंगडा त्रिताल )

सुनो सुनो महाराज ॥ धृ० ॥ गहेनबिखे सब मिलकर आये । मुनिजन प्रभू प्रयाग । भई प्रतिज्ञा हमसे तबही । कहन तुमहिसे लाग ॥ १ ॥ शुक जोगींद्र पलटाये रंभा । निकली उनमें बात । बोल दियो हमही सब मुनिसे । तपको अबही जात ॥ २ ॥

१ मत्सर. २ ग्रहणप्रसंगीं.

पद-( देव नारदाची स्तुति करितात )
जोगी.

नारदा बहु तुमची थोरी। वर्णू काय बरें ॥ धृ० ॥ केला कोळी तो मुनिराय। वंदिति सुरनर ज्याचे पाय। असें बळ इतरीं आहे काय। व्यर्थचि काय[2] वाढविती ॥ १ ॥ शुकानें केलें कवणा काय। ह्मणती त्याला योगिराय। बदला रंभेली जरि माय। अघटित काय हें घडलें ॥ २ ॥ तुमचा पवित्र हा किति काय[2]। रंभा करिते यासी काय। वेडा झाला तो सुरराय। करितो काय छळ तुमचा ॥ ३ ॥ तुष्टला गिरिवासी प्रभुराय। ज्याच्या आनंद पोटिं न माय। ह्मणे तो देऊं यातें काय। वंदी पाय बहु अदरें[3] ॥ ४ ॥

पद—( नारद आणि दासीचा संवाद )
चाल-( उद्धवा शांतवन करि जा )

कां झिडकारिशि तूं मजला, शशिवदने हे गुणसरिते ॥धृ०॥ जाहलों श्रांत ह्मणउनियां, आज आलों येथें पाही। बैसलों रम्य भुवनीं या, झालि विश्रांतिहि मज कांहीं। देखिलें तशांतचि तुजला, बहु अनंद झाला हाही ॥ चाल ॥ परि इष्ट न बोलसि वाचे। हें कृत्य काय मोलाचें। या आँधिनें मन बहु कांचें॥ पू० चाल ॥ साचेंच सांग बरें मजला, तव मन कां त्रासचि धरितें ॥ १ ॥ तूं सभाग्य[6] दिससी नयनीं, कां आलिस उदकालागीं। हें चित्र[7] गमे बहु मजला, आहे भ्रांतित अपुल्या जागीं। काय नसतिल दासी अन्या, या कार्याच्या उपयोगीं ॥ चाल ॥ तूं सांग कोण कवणाची। लालसा वृत्तश्रवणाची। जरि त्वरा असे गमनाची ॥ पू०चाल ॥ साचीच तरि अर्थी कळवी, कां रोषचि गे मजवरतें ॥ २ ॥ ती ह्मणे अहो मुनिवर्या, वंदितसें तुमच्या पायां। मी दासी राजगृहींची, अजि आलें उदका न्याया। आहे

१ वाला नांवाचा कोळी मंत्र देऊन वाल्मीकि केला. २ शरीर. ३ आदरानें. ४ चिंतेनें. ५ घाबरलें. ६ भाग्यवती, श्रीमंत. ७ विचित्र.

विवाह नृपकन्येचा, ह्मणं तांतडे करितें जाया ॥ चाल ॥ योजितां मला ज्या काजीं । मी राजि नसे मग कां जी । पाजितां बळें मज कांजी । कां जिचें मनीं जें नाहीं, करवावें कां तिज करि तें ॥ ३ ॥ नारदा असें हें करणें, बरें योग्य तुह्मां तरि दिसतें । योगींद्र ह्मणवितां अपणां, मज ढोंगाचि दिसतें नुसतें । या अशा अचरणें सांगा, मग कोण तरी हो पुसतें ॥ चाल ॥ मुनिवरांत तुमची कोटी । मिरवितां प्रतिष्ठा मोठी । अशिं कर्में करितां खोटीं ॥ पू॰ चाल ॥ पोटींच कशीं गिरिवासी, घालितसें न कळे मज तें ॥ ४ ॥

१ ह्मणून. २ त्वरा.

# हरिश्चंद्राख्यान.

## आर्या.

क्षितिवरि संचार करुनि ये नारदमुनि समेत देवांच्या ।
जी कोप गाधिजा दे मोद[1] वसिष्ठा अशी वदे वाचा ॥ १ ॥
एक हरिश्चंद्र जगीं; दुसरा कोणी न पाहिलाच कधीं ।
दारिद्र्यदुःख कैचें ज्याच्या राज्यांत तृप्त याचकधी[2] ॥ २ ॥
श्रवणीं पडतांचि असे तुकवी माथा वसिष्ठ मुनिराय ।
विश्वामित्र ह्मणे, त्या स्तविसी निज शिष्य तो ह्मणुनि काय ॥ ३ ॥
बोले मुनि[3] कोण असा झाला मनुजेंद्र या महीवरता[4] ।
* वाटे प्रभु अवतरला जो कां शयना करी अहींवरता[5] ॥ ४ ॥
इतरीं काय असे गुण वर्णिति जन पुण्यकीर्तिला ज्याच्या ।
शोभन नित्य सुवासिनि जेथें करितात वृष्टि लाजांच्या[6] ॥ ५ ॥
नाहीं सत्त्वाढ्य असा झाला कोणी विलोकिला मागें ।
विपरीत कां गमे तुज आहे देणार जो जसें मागे ॥ ६ ॥
हरविन सत्त्व तयाचें तरिच ह्मणा यासि गाधिचा तनय ।
हांसति देव सकळही ह्मणति कसा जन्मला अजातनय[7] ॥ ७ ॥
मुनिवर ह्मणे जरी तो ढळला सत्त्वासि भूप छात्रवर[8] ।
ब्राह्मण्य त्यजिन हें मीं; गोत्रहि त्यजिल्यासि कासया प्रवर ॥ ८ ॥
विश्वामित्र ह्मणे, मी जातों येथूनि छळ करायासी ।
वाटे न भेटला कधिं कोणी मजसमहि छळक रायासी ॥ ९ ॥

---

१ आनंद. २ याचकांचीं मनें. ३ वसिष्ठमुनि. ४ पृथ्वीवर. ५ शेषावर ६ लाह्यांच्या. ७ ज्याच्या ठिकाणीं नय ह्मणजे नीति मुळींच जन्मलेली नाहीं असा. नीति ह्मणजे बरें कोणतें व वाईट कोणतें हें सांगणारी. ८ छात्र–शिष्य

* येथें 'प्रभु' हें उपमान आणि 'हरिश्चंद्र' हें उपमेय ह्यांचा अभेद वर्णिला आहे ह्मणून हा रूपकालंकार आहे.

परि न करावें श्रुत हें सहसा कोणीच वृत्त हो त्यासी ।
साधेल कार्य तरि हें यज्ञांतीं फल जसेंचि होत्यांसी ॥ १० ॥
ऐसें वदोनि गेला जेथें तो मनुजेंराय[2] वास करी ।
'घेइन हिरूनि आधीं राज्य,' ह्मणे, 'मग तसेंचि वास[3] करीं'॥११॥
सोडी व्याघ्रांसि वनीं; देती पीडा जनांसि ते भारी ।
धांवे ससैन्य भूपति लक्ष न देऊनि राज्यकरभारीं ॥ १२ ॥
हरिणांमागें लागे नेती ते लोभवूनि रायासी ।
दिव्याश्रमासि पावे; वंदन मुनिच्या करीत पायांसी ॥ १३ ॥
वेदपठण खग करिती; वैर न मृगव्याघ्र–उरग[4]नकुळांसीं ।
पाहुनि आश्चर्य करी परि न कळे विघ्न हेंचि स्वकुळासी ॥ १४ ॥
विश्वामित्र ह्मणे, त्या करिसी कां श्वापदांचिया हनना[5] ।
स्नेहें पाळितसें मी अदय कसा पावलासि रे जनना[6] ॥ १५ ॥
होतें एक शिवालय निजला तेथें श्रमूनि तो राजा ।
होता[1] टपूनि गाधिजें[7] बघणें लागे कधीं न होरा[8] ज्या ॥ १६ ॥
स्वप्नींच वदे जाउनि, दे राया ! दउत लेखणी खलिन[9] ।
चित्तीं ह्मणे, न देतां राज्य सकळ भूखलींच[10] मी खलिन[11] ॥ १७॥
जागृत होतांचि पुन्हां गांठी जाऊनियां नृपाळास ।
देउनि राज्य ह्मणे, त्वां आणिला वनवास निज कपाळास ॥१८॥
दे आतांचि नरेन्द्रा ! सोडीं संकल्प दक्षिणेसहित;
सार्धत्रयाचि पुरे दे भार[12] कनक जें नसेल तव महिंत[13] ॥ १९ ॥

---

१ होता=यज्ञकर्ता. २ राजा हरिश्चंद्र. ३ घर. ४ उरग=सर्प, नकुळ=मुंगुस. ५ वध. ६ जन्माला. ७ विश्वामित्र ८ मुहूर्त ९ लगाम. १० भूरूपी खलांत. ११ खल करीन. १२ चार तोळे ह्मणजे एक पल, शंभर पलें ह्मणजे एक तुला, अशा वीस तुलांचा एक भार असे साडेतीन भार (२८ हजार तोळे सोनें) १३ राज्यांत.

उसनेंहि त्वां न घ्यावें, राज्य सकल हें प्रजा असे माजी[1]; ।
निर्दोष यश असें घे कोणी लावी न शब्द[2] ज्यामाजी ॥ २० ॥
राजा ह्मणे, दयाळा ! देतों घ्या राज्य हें सकळ आजी ।
परि दक्षिणा नसे यासाठीं दिन सप्त अवधि द्यावा जी ॥ २१ ॥
आनंदवना[3] जाउनि मग तुमची दक्षिणाहि फेडीन ।
जाती[4] भलतीहि असो मी अपणातें विकूनि घेईन ॥ २२ ॥
हे वासें[5]-कटक-भूषण नेतां तूं लाजसी न कां राया ? ।
देणें नव्हतेंचि तरी करणें होतें अधीं नकारा यां[6] ॥ २३ ॥
शयं[7] जोडूनि ह्मणे, हो ! या दासाची अशी स्पृहा[8] नाहीं ।
वदतों गोष्ट खरी मीं चित्तीं शोधूनि कां पहाना ही ॥ २४ ॥
वल्कल[9] वेष्टुनियां मग जाती सत्वर निघूनि ते रानीं; ।
विश्वामित्रालागीं जाणविलें सकळ वृत्त हेरांनीं[10] ॥ २५ ॥
भूप हरिश्चंद्र पुढें तारामति रोहिदास त्यांमागें ।
सांगे, मातेसि ह्मणे, त्यजिलें त्वां आजि कां स्वधामा[11] गे ॥ २६ ॥
माता ह्मणे, शिशो[12] ! हें ! दिधलें विप्रासि राज्य बापानें ।
होऊं संतृप्त अतां गंगास्नानें तसेचि बा ! पानें[13] ॥ २७ ॥
जातां जातां विपिनीं[14] झाला मध्यान्हकाळ तापविता ।
करिता सूर्य दया तरि मुनिवर त्याचाहि काय[15] कांपविता ॥ २८ ॥
सांगे सूर्यासि, तपे पावति जेणें सुदीर्घ तापा हे[16] ।
निजरक्षणाचि[17] असे प्रिय, इतरांचें दुःख कोणता पाहे ॥ २९ ॥
द्वादश नयन[18] उघडिले रविनें नाहीं विचार हा केला ।
'कीं जनु[19] यांचें वंशीं अपुल्या; पावेल कोण हाकेला' ॥ ३० ॥
केली संतप्त धरा रविनें, वरुणेंहि[20] नीर आटविलें ।

१ माझी. २ बोल, दोष. ३ काशीला. ४ जात. ५ वस्त्रें, अलंकार. ६ मला. ७ हस्त. ८ इच्छा, वासना. ९ झाडांच्या सालीची वस्त्रें. १० जासुदांनीं. ११ आपल्या गृहास. १२ हे ! बाळा ! १३ प्राशनानें. १४ अरण्यांत. १५ देह. १६ हे त्रिवर्ग, हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास. १७ हा अर्थांतरन्यास नामक अलंकार आहे. १८ बारा कला. १९ जन्म. २० वरुण, जलदेवता.

सोमिरें[1] स्तब्धचि राहुनि कंठीं तत्काळ प्राण दाटविले ॥ ३१ ॥
माते! गंगा कोठें आहे एथूनि दूर किति काशी ।
नाशिल पाप कधिं ते न कळे [2]ही ग्रासिते[3] कितीकांशीं ॥ ३२ ॥
ऊर्वीतळ[4] बहु तापे, तापें या जाहलें असुख, पावे ।
धांवे देव न कांगे? आला जरि समय तो असु[5] खपावे[6] ॥ ३३ ॥
माता बाळासि ह्मणे, बापा! लपवूं तरी तुला कोठें ।
मोठें संकट पडलें; प्रभुनें श्रवणांत[7] घातिलीं बोटें ॥ ३४ ॥
आरडले बहु रडले झाले विगलीत काय हो! याचें ।
तरि पावला न कां हरि? उरलें याहूनि काय होर्याचें[8] ॥ ३५
छाया शीतल तरुंची, पक्षी मधुर स्वरेंचि बोभाती[9] ।
आश्रम रमणीय दिसे, वर्णिल तेथील कोण शोभा ती ॥ ३६ ॥
शीतल उदक सुगंधिक द्याया रायासि विनितें[10] ज्या रमणी[11] ।
देवांगनाचि केवळ; स्तवितां सोडील कोण जारमणी[12] ॥ ३७ ॥
भूप न पाहे तिकडे कळलें त्यालागिं वर्म जें त्यांचें ।
पाहुनि युवती सुंदर धांवे मन काय जितेंद्रियांचें[13] ॥ ३८ ॥
घेतां उदक प्रपेचें[14] सुकृतहानी असेचि रायास ।
ठावें; तरि कां सेविल झाला याहूनि जरि चिरायास[15] ॥ ३९ ॥
तारामति ये मागुनि; दावी मुनि तीस, 'भूप हा पाहें ।
करितो उदपानातें[16] याहुनि तव नेम कोणता आहे' ॥ ४० ॥
ती त्यास ह्मणे, देवा! भूपति प्राशील नीर[17] हें काय ।
यावरि असो कसें तें; सहसा स्पर्शों न देचि हें कार्य[18] ॥ ४१ ॥
आलें मागुनि बाळकें[19] दाखवि त्यालाहि जनक जननी ती ।
सेविति नीर निशंकेंचि[20] ठावी त्यांला न काय जननीति ॥ ४२ ॥

---

१ वारा. २ हीं गं ।. ३ नाश करते. ४ पृथ्वी. ५ प्राण. ६ नाश पावावे. ७ कानांत. ८ व्हावयाचें. ९ किलकिलाट करीत होते. १० नम्र. ११ स्त्रिया. १२ जारश्रेष्ठ. १३ जितेंद्रिय असतात त्यांचें. ( ज्यांनीं आपल्या मनोवृत्ति आपल्या ताब्यांत ठेविल्या आहेत त्यांचें ) १४ पाणपोईचें. १५ चिर आयास बहुत. कांळपर्यंत श्रम. १६ उद, उदक, पाणी. १७ उदक. १८ शरीर. १९ रोहिदास; २० निः संशय.

बाळ ह्मणे, हें सहसा न घडे मजलागिं ठाउकें वर्म ।
अनुचित[1] करितील कसें जाणति जे शास्त्रगत[2] सकल धर्म ॥ ४३ ॥
जाती तेथुनि विजनीं[3] एकामागूनि एक सत्वर ते ।
मुनि-मायिक[4]-उपचारा दिधलें नाहींच लक्ष *सत्वरतें ॥ ४४ ॥
मार्गी जातां जातां पडला अंधार दिवस मावळला ।
सुटला प्रभंजन तयीं मेघहि कल्पांतकाळसा[5] वळला ॥ ४५ ॥
चुकली मार्ग तशांतचि तारामति शोक बहु करी रानीं ।
धुंडी पतिपुत्रातें होती निःसत्व[6] जरि शरीरानीं[7] ॥ ४६ ॥
भेट न होय ह्मणुनियां मारिति हाका परस्परें शतदा ।
वारावें विघ्नहि तें परि तो लपलाचि हो ! परेश तदा ॥ ४७ ॥
या संकटांत मुनिनें पेटविला अग्नि काननांत अशा ।
कोण सुधी[8] जिवनाची[9] या समयीं धरिल हो ! मनांत आशा[10] ॥४८॥
घाबरली फारचि ती न कळे कर्तव्य काय तें तिजला ।
नव्हतें श्रुतींहि[11] असें कधिं 'दीनाच्या रक्षणीं हरी निजला' ॥४९॥
पोळे कृशानें[12] शरिरीं, झाले व्याकूळ प्राण फार तिचे ।
तन्वी[13] कोमल अंगीं, रूपहि लावण्य कायसें[14] रतिचें ॥ ५० ॥
आलें मरण बरें हें परि मीं मुकलें सपुत्र कांतासी ।
हारविलें ब्रीद जयें तो हरि पावे कसा अकांतासी ॥ ५१ ॥
विझवुनि पावक मुनि तो दावी, 'पतिपुत्र हे तुझे काय ।
मेले जळुनि अतां गे ! कैसें राहील हें तुझें काय' ॥ ५२ ॥
आक्रोश करी बहुतचि, 'ऐसा अन्याय काय तरि देवा ।
केला तुझा ! कळेना चुकलें मी सांग कोणती सेवा' ॥ ५३ ॥
व्याघ्रें तशांत नेलीं उचलुनि प्रेतें तिच्या समक्ष वनीं ।

---

१ अयोग्य. २ शास्त्रांत वर्णिलला. ३ अरण्यांत. ४ कपटाच्या. ५ प्रळयकाळ. ६ अशक्त. ७ शरीरानें. * सत्व—रत, सत्याचें ठिकाणीं ज्याची पूर्ण निष्ठा आहे असा—सत्यशील ८ विद्वान्, पंडित. ९ जगण्याची. १० आशा. ११ ऐकिलें. १२ अग्नि. १३ सुकुमार स्त्री. १४ कितीसें.

नकळे विलापरव तो वर्णावा या स्थळीं कसा कवनीं ॥ ५४ ॥
सूर्योदय झाल्यावरि भेटति एकासि एक मोदानें।
पडले व्यसनीं होते, नसतां देत अनेक गो-दानें ॥ ५५ ॥
आनंदवना तेथुनि गेले मार्ग क्रमूनि बहु तापें।
निरखिति भागीरथिला स्पर्शें हरणार जी महा पापें ॥ ५६ ॥
झाले शीतळ तीच्या स्नानें आधीं तसेचि मग पानें।
तों गाधिजमुनि गांठी, राया फिरलों तुझ्या मतापानें ॥ ५७ ॥
दे दक्षिणा अतां तरि जातों येथूनि आपल्या गांवा।
मजवरि केलासि बरा त्वां तरि उपकार काय सांगावा ॥ ५८ ॥
भूप ह्मणे, मज देणें आहे देईन दक्षिणा आजी।
दारसुतासह लाविन, स्वामी हा देह आपुल्या काजीं ॥ ५९ ॥
ऐसें वदोनि भूपें उचलुनि तृण घेतलें शिरावरते।
रडती पुरवासी जन झालें बहु दुःख त्यां अनावर तें ॥ ६० ॥
भूप ह्मणे, मज कोणी घेइल द्यावें सुवर्ण द्वयभार।
भारेक मोल सतिचें, पुत्राचें अर्ध हें नसे फार ॥ ६१ ॥
आल्या प्रथमचि कुंटिणि मागति तारामतीस द्या मोलें।
तेव्हां कर जोडुनियां विश्वामित्रास ती सती बोले ॥ ६२ ॥
स्वामी ! अन्य गृहीं द्या, वेश्यासदनीं मला न वोपावें।
मागतसें दान तुह्मां अन्वय जाणूनियां न कोपावें ॥ ६३ ॥
इतुक्यांत कालकौशिक-विप्रें देऊनि भार कनकास।
नेलें तारामतिला, धर्माची धरिति जन सुजन कास ॥ ६४ ॥
विप्रासि ह्मणे राज्ञी, देउनियां अर्ध भार हेमातें।
घ्यावें बाळालागीं, द्यावें इतुकेंचि दान हें मातें ॥ ६५ ॥
देउनि सुवर्ण तितुकें विप्रें बाळासि घेतलें मोलें।

---

१ आनंदानें. २ संकटांत. ३ काशीला. ४ कष्टानें. ५ प्राशनानें. ६ या वाक्यांत बाहेरून स्तुति दिसते परंतु वस्तुतः निंदा आहे म्हणून हा व्याजस्तुति नामक अलंकार आहे. ७ यानें. ८ संबंध. ९ सोनें.

झालें बरें विहित हें, ह्मणउनियां भूप अंतरीं डोले ॥ ६६ ॥
भारद्वय कनक तयीं दिधलें आणूनि वीरवाहूनें[२] ।
वाटे सर्वांसि अस गिळिलें चंद्रासि आजि राहूनें ॥ ६७ ॥
देउनि सुवर्ण मुनितें गेला डोंबासवेंचि हो राजा ।
प्रस्थानीं बहु सांगत होते शोधूनि विप्र होरा* ज्या ॥ ६८ ॥
मग तो भूपति जाउनि पाहे डोंबाचिया अगारा[३] हो ।
कंटाळे मन त्याचें त्यासि ह्मणे, कृत्य हें अगा राहो ॥ ६९ ॥
होता अजिंक्य भूपति जरि तो संपूर्ण लोकपाळांस[४] ।
परि करितो काय कसें विधिनें अणिल्या असें कपाळास ॥ ७० ॥
अणिला दास कसा हा ? दिसतो सकुमार फार नाजुकसा ।
पाक करावा कोणीं ? हा तरि ह्मणणार, हात भाजुं कसा ॥७१॥
ठेवा सदनीं यातें पूजुनि नैवेद्य दाखवायासी ।
या भोगमूर्तिला मी काय करूं ? मार्ग दाखवा यासी ॥ ७२ ॥
ऐसें निष्ठुर वदली जेव्हां ती वीरवाहुची कांता ।
चिंतावला बहू नृप, 'धांव' ह्मणे, संकटीं रमाकांता ॥ ७३ ॥
वाटे देतिल मजला माघारें त्या मुनीस नेऊन ।
काय करावें मग हो जरि तें याहून मोल येऊन ॥ ७४ ॥
मृण्मय घट त्या दिधला भागीरथिचें अणावया पाणी ।
फोडी गुप्तपणानें गाधिजमुनि तो हणूनि निज पाणी ॥ ७५ ॥
दिधला घट मग दुसरा, तिसरा, चवथा, असे किती पाडी ।
फोडी, यास्तव रागे ती कांता निजकरें तया ताडी ॥ ७६ ॥
दाखविला जो रांझण उदक भरायासि अंगणामाजीं ।
केलें छिद्र तयासहि, झाली आतां ह्मणे सिमा माजी ॥ ७७ ॥
इतुक्यांत वीरबाहू आला जेवावयासि निज सदनीं ।
नीर नसे यासाठीं त्यानें भूपासि ताडिलें वदनीं ॥ ७८ ॥

---

१ योग्य. २ नामविशेष डोंब. ३ घर. ४ राजाब. * मुहूर्त.

होता क्षुधार्त भूपति, त्यावरि बहु ताडिलेंचि हो डोंबें ।
व्याकुळ फारचि झाला, तें त्याच्या दुःख अंतरा झोंबे ॥ ७९ ॥
भूप ह्मणे, अनुकंपा करुनि मला शुष्क अन्न वोपावें ।
फावेल वेळ तेव्हां सेविन गंगातटीं, न कोपावें ॥ ८० ॥
गृहकृत्य नये करितां ह्मणउनियां ठेविलें स्मशानांत ।
रक्षी रात्रंदिन तें दैवें केली सिमा पहानात ॥ ८१ ॥
देती धान्य तया जें त्याचें तो दळुनि पानगे भाजी ।
मीठ न देती वर जे देतिल त्यालागिं काय ते भाजी ॥ ८२ ॥
काढुनि भाग अतिथिचा अर्ध दुजा आपणासि जरि ठेवी ।
तरि तो ब्राह्मणवेशें गाधिज संपूर्ण प्रत्यहीं सेवी ॥ ८३ ॥
ऐसें नित्य उपोषण घडतांही वर्ष लोटलें राया ।
खाया न मिळे यास्तव झाली त्याची बहूत कृश काया ॥ ८४ ॥
वदती चांडाळ असें, द्यावें याहूनि काय खायासी ।
त्यासि ह्मणावें आतां आहे अशुचेंचि कांय, खा यासी ॥ ८५ ॥
इकडे तारामतिला नेलें त्या कालकौशिकें सदनीं ।
करवी गृहकृत्यातें बोले बोलों नये तसें वदनीं ॥ ८६ ॥
एके दिनीं द्विजवरें समिधापुष्पें अणावयासाठीं ।
पाठविलें निज शिष्यां, बाळहि लागूनि जाय त्यांपाठीं ॥ ८७ ॥
माता बाळासि ह्मणे, बापा जाऊं नकोचि बाहेर ।
माता तात सुहृज्जन तुजविण आतां नसेचि बा ! हेरं ॥ ८८ ॥
बाळ वदे मातेला, येतों यांच्यासवें पुन्हां गेहा ।
गे ! हां ह्मण, मी जातों मुनिच्या कार्या; नकार कां गे हा ॥८९॥
ऐसें वदोनि बाळक गेला शिष्यांसवेंचि तो रानीं ।
हुडाकिति समिधादि किती केलीं स्नानें कितीक पोरांनीं ॥ ९० ॥
बाळ ह्मणे, बहु केला वेळ, घरीं मारितील हाकेला ।

१ दया. २ खाई. ३ दररोज. ४ शरीर. ५ पहा.

थाकेलासि अतां जरि मार्गीं तरि त्वां उशीर कां केला ॥ ९१ ॥
जाई सत्वर आतां कमलें आणावयासि या सरसीं ।
घेतों समिधा पुष्पें पर्णें मिळतील जीं हुतासरसीं ॥ ९२ ॥
बाळक जाउनि आणी कमलें जरि दाविल्याचि कांसारीं ।
तरि ते ह्मणती, थोडीं, आणिलीं तोडूनि तीन कां सारीं ॥ ९३ ॥
जाय पुन्हां बाळक तो कमलें तोडावयासि जंव सरसीं ।
केला दंश भुजंगें चरणीं पुच्छाग्र तुडविल्यासरसीं ॥ ९४ ॥
दुर्धर विष सर्पाचें, गेल तत्काल प्राण बाळाचे ।
गाधिज निर्दय मोठा धरिलें प्रत्यक्ष रूप काळाचें ॥ ९५ ॥
मग ते अवघेचि मिळुनि कथिती येऊनि वृत्त मातेसी ।
बाळ निमाला विपिनीं जाउनि रजनींत काय करितेसी ॥ ९६ ॥
परि ती शोकाकुल बहु जाय तशी त्या शवासि शोधाया ।
हिंडे आक्रोश करी विपिनीं तरि तीस कोण बोधाया ॥ ९७ ॥
* ध्वांतीं हिंडे अरडे रडे पडे अडखळोनि रानांत ।
प्रत्यय असतांहि तिच्या कृत्य मुनीचें नयेचि ध्यानांत ॥ ९८ ॥
इतुक्यांत विप्रवेशें भेटे गाधिज तिला निशाकाळीं ।
सांगे दहन करी या जोंवरि आहेचि प्राक्दिशा काळी ॥ ९९ ॥
सूर्योदय झाल्यावरि डोंबहि घेतील द्रव्य जाळाया ।
यास्तव करुणा आली कथिली तुज युक्ति विघ्न टाळाया ॥१००॥
गाधिज प्रेतासह तिज घेउनि आलाचि त्या स्मशानांत ।
घाली बाळ चितेवरि दहन कराया त्वरें कृशानांत ॥ १०१ ॥
दीप्तानल पाहुनियां भूप हरिश्चंद्र धांवला वेगें ।
देउनि द्रव्य कुणपं मग जाळिति तुजला कसें न ठावें गे ॥१०२॥
विध्वंसिलें सरण तें फेंकी करचरण तेहि लातेनें ।

---

१ सरोवरांत. २ मेला. ३ प्रेतास. ४ अरण्यांत. ५ सांत्वन करण्यास. ६ रात्रीं. ७ पूर्व दिशा. ८ अग्नींत. ९ पेटलेला अग्नि. १० प्रेत. * अंधारांत.

वर्णवतो काय बरें केला जो शोक बाळमातेनें ॥ १०३ ॥
हा दैवा! ऐसी ही व्हावी गति काय आज बाळाची ।
साकेताधिप[1] कीं हो! होता चर्या कळे न काळाची ॥ १०४ ॥
वळला पर्जन्य ह्मणुनि पुनरपि गाधीज पातला वेगें ।
कां गे श्रमसी व्यर्थचि नेतों तुज देउळीं चलावें गे ॥ १०५ ॥
आंतडिं घालूनि गळां नेलें तिजला शिवालयामाजीं ।
सांगे जनांसि हें कीं ग्रासित होतीच लाव[2] तनु मांजी[3] ॥ १०६ ॥
आलों धावुनि येथें दाखवितों मी पहा चला वेगें ।
कोणी तिलाच ह्मणती गिळिलीं पोरें तुवांच लावे गे ॥ १०७ ॥
वद्ती कितिक असेंही ही होती कालकौशिकासदनीं ।
कळलें नाहीं कवणा बाळें बहु घातलीं जरी वद्नीं ॥ १०८ ॥
सूर्योदय झाल्यावरि कळविति जाऊनि राजदरबारीं ।
आली लाव तिनें बहु केले अनपत्य[4] लोक घरबारी ॥ १०९ ॥
झाली आज्ञा तेथुनि शिर उडवावें अतांचि[5] हो तीचें ।
परि तें एका घायीं, कारण ठेवूं नयेचि दो तीचें ॥ ११० ॥
धांवति दूत त्वरेनें कथिती येऊनि वीरबाहूतें ।
ह्मणती जाउनियां किति सत्वर करितोसि कार्य पाहूं तें ॥१११॥
येउनि शिवालयीं त्या पाहे तों लाव बैसली होती ।
दाखवि सर्व जनांतें ह्मणती पूर्वीच पाहिली हो ती ॥ ११२ ॥
तत्काळाचि डोंबानें भूप हरिश्चंद्र वाहिला निकट ।
सांगे मस्तक छेदीं एका घायीं नसेंचि हें बिकट ॥ ११३ ॥
घेऊनि असिलता[6] करिं आला सत्वर समीप तो सतिच्या ।
सांगे स्नान कराया अठवाया मुख्य देवतास तिच्या ॥ ११४ ॥
आली स्नान करुनियां मार्थी देवासि, याचि नेमातें ।

---

१ अयोध्येचा राजा. २ डाकीण ३ माझी. ४ अपत्य-रहीत. ५ दोन तीन दिवसांचे. ६ तलवार.

चालविं, प्रतिजन्मिं हो पती हरिश्चंद्र, हेंचि दे मातें ॥ ११५ ॥
सुतहि असावा देवा जैसा आहेचि रोहिताश्व मला ।
विप्रहि गाधिजसा हो याचक जो आमुच्यामुळें श्रमला ॥ ११६ ॥
ऐकुनि वाक्य असें तो भूप हरिश्चंद्र फार गहिंवरला ।
परि करितो काय कसें परवशतेच्या मुळेंचि आवरला ॥ ११७ ॥
माराया हात करीं धरिला प्रभुनें तसाचि तो वरते ।
हरिस्मरणीं मन जोंवरि नाहीं होताति कष्ट तोंवर ते ॥ ११८ ॥
विश्वामित्रें प्रगटुनि भूप हरिश्चंद्र पोटिशीं धरिला ।
बापा नसेचि दुसरा कोणी भुवनत्रयीं तुझ्या सरिला ॥ ११९ ॥
दिधलें तप तें तुजला आचरलों जें बहूत कष्टानें ।
षष्ठिसहस्राब्दवरी केला निर्वाह लोहपिष्टानें ॥ १२० ॥
सावध करूनि बालक दासपणांतूनि मुक्त नृप केला ।
आशीर्धनं देउनिया राजातें गाधिचा तनय गेला ॥ १२१ ॥
पुनरपि साकेतापुरिं येउनि सिंहासनीं वसे राजा !
शोभनकाळीं युवती उजळिति दीपांसी उधळिती लाजा ॥१२२॥
षष्ठिसहस्राब्दवरी राज्यहि केलेंच मग यथानिगुती ।
* नेली स्वर्गासि पुरी पुनरपि होईल काय थांनिं गुंती ॥ १२३॥
गिरावासीकृत आर्या झाल्या हो एक शतहि तेवीस ।
गातां श्रवणहि करितां करितिल भवपार जरिहि ते वीस ॥१२४॥

---

१ आशीर्वाद हेंच धन. २ लाह्या. ३ स्तनीं. ४ गुंतणें. जन्ममरणाची फेरी

* राजानें सर्व नगरी स्वर्गाला नेली. अशाला पुनरपी थानीं गुती होईल काय ह्मणजे अशाला पुनः स्तनपान करावें लागेल काय ( जन्माला यावें लागेल काय ), अर्थात् नाहीं, असा भावार्थ.

# याच आख्यानाचीं पदें.

( मुनींच्या सभेंत विश्वामित्र ह्मणतो )

**घनाक्षरी**

गांधिज मुनि कहत जात । ऐसी कौन बडी बात । करूं राज्य सबहि हात । कहो दांत गिरावुं ॥ १ ॥ हरिश्चंद्र नहीं माल । करूं अबहि बुरे हाल । मै हुं कालनका काल । लावुं वाळ पकडके ॥ २ ॥

**दिंडी.**

गाधिज बोले ऐकाल वृत्त कानीं । राज्य हरुनी केलीच सत्त्वहानि । हरिश्चंद्राची काय कथा जाणा । मेती-सृष्टी करणार मनीं आणा ॥ १ ॥ * जरी नामान्वय असे तुह्मां ठावा । मनीं तुमच्या संदेह कां उठावा । नवल गमलें मजलागिं हेंचि आजी । कसा करिना तो पहा मला जी जी ॥ २ ॥

( राजा मृगया करीत विश्वामित्राचेआश्रमांत येतो. )

**कटिबंध.**

( आश्रमाचें वर्णन. )

पाहे दिव्याश्रमासि राजा । सांगे निज सैन्यासि फिरा जा । जागा पाहुनि, जा उतरा जा । येतों तोंवरि पाक करा जा । ऐसें बोलुनि उपवनिं गेला । केला बहु संचार, निवाला । पाहुनि शी-

---

१ विश्वामित्रानें ब्रह्मदेवाप्रमाणे सृष्टि निर्माण केली होती. २ विश्वं मित्रं यस्य-विश्वामित्रः ३ सुंदर अशा आश्रमास. ४ परिभ्रमण. ५ शांत झाला.

* विश्व + आमित्र, विश्वाचा शत्रु , असा सरळ अर्थ होतो, पण ' मित्रेचर्षौ ' या पाणिनीय सूत्रामुळें विश्व + मित्र असा समास सोडवावा लागतो. ऋषिवाचक शब्दांत मित्र शब्द पुढें आला तर मागील शब्द दीर्घ होते असा त्याचा अर्थ आहे. पाणिनीनेंही जणूं काय विश्वामित्राच्या भीतीनेंच हें सूत्र केलें आहे.

तळ तरु छायेला होते बहु घनदाट लागले । आम्र फणस दाळिंब आवळे । नारिकेळ पोफळी जांबळें । फळभारानें दिसती लवले । बकुल मालती चंपक फुलले । अन्य तरू पुष्पानें भरले । सुगंध ज्यांचे दूर फांकले । असती वृक्षीं पक्षि बैसले । पाहे शिखि[2] बक[3] हंस कोकिला । शुक-पारावत-समुह[4] देखिला । गाती सुस्वर हरिगुणमाला[5] । करिती पठण किती निगमाला[6] । अंतरिं ध्याती श्याम-तमाला[7] । राजा मनिं बहु चमत्कारला[8] । ह्मणे किती सुकृत[9] हो यांचें । जें नरदेहांत न होयाचें । कर्म काय हें याचि द्विजांचें[10] । वाचे वदती नाम हरीचें । साचें जन्म दिसे हो यांचें । सर्वांचि पाहे सर[11] तोयांचें[12] । मध्यें शोभे वन निरंजांचें[13] । सर्प नकुळें[14] ते एकया ठायीं । वसती व्याघ्राजवळिच गायी । परस्परांशीं वैरचि नाहीं । कांहिं वेळ तो असाचि फिरला । तेथुनि मुनि-आश्रमांत शिरला । भावें वंदन करुनि तयाला । बद्धांजलि तो उभा राहिला । बहु सुंदर आश्रम ऐसा । मुनिवर्यें निर्मित केला ॥ २ ॥

( स्वप्नांत राज्य दिल्यानंतर जागें झाल्यावर दक्षिणा मागितली तेव्हां राजा देऊं लागला. त्यावर विश्वामित्र ह्मणतो. )–

पद–( गव्ळ्यांनो कृष्ण गडी अपुला. )

गाधिज बोले रायासी । माझें मजला कां देसी ॥ धृ० ॥ दिधलें राज्य तुवां सारें । ओपिलें[15] हरिसि तुं जैसा रे । किमपी पापास न भीसी ॥ १ ॥ जाहलें राज्य अतां माझें । घेणें द्रव्य कसें साजे । कांहिं तरि मनिं आपुल्या लाजे । युक्तचि[16] कर अपुल्याला जें । देउनि पुन्हां कसा घेसी ॥ २ ॥ घेशिल करुनि प्रजा राजी । ती तरि धन दौलत माझी । लाविशिल जरि तूं या कांजीं[17] । घडेलचि

---

१ केळी. २ मयूर. ३ बगळे. ४ राघू व पारवे यांचे समुदाय. ५ हरीचे गुणानुवाद. ६ वेदाला. ७ श्याम आहे तमाल वृक्षाप्रमाणें जो म्हणजे श्रीहरी. ८ त्याला चमत्कार वाटला. ९ पुण्य. १० पक्ष्यांचें ११ सरोवर. १२ पाण्याचें. १३ कमलांचे. १४ मुंगुस. १५ दान केलेलें परत घेतोस. १६ योग्य. १७ कामीं.

पाप तुला आजीं । असा कां नयें विलया नेसी ॥ ३ ॥ ऐकिली कीर्ति तुझी राया । परि तूं योग्यचि टकवाया । दक्षिणा जरि नव्हती द्याया । सोडिलें कां जळ तरि वांया । वाटतें कोप करुनि घेसी ॥ ४ ॥ बोले भूप गाधिजाला । स्वामी उशिर तुह्मां झाला । तरि मी देइन द्रव्याला । तोंवरि द्या अवधी मजला । अहे प्रभु समर्थ गिरिवासी ॥ ५ ॥

( काशीला जावयास तिघे निघाले तेव्हां बाळ मातेस ह्मणतो )

जलद-घनाक्षरी.

माते कां गे ऐसी दीन । दिसे झाला बहु शीण । गमसि केवळ पराधीन । झालें काय तरि, कळुं दे लवकरि, झालिस कोण्या गुणें हीन ॥ १ ॥ होतें शरिर तुझें पीनें[3] । दिससी पाण्याविणें मीनें । त्यजिलीं वस्त्रें कां गे, कोण काय मागे, सांगें पडलें काय कठीण ॥ २ ॥ बापा बापें तुझ्या आज । दिलें विप्रालागीं राज । सरलें अतां येथिल काज । जाउं वारांणसी[6] । पाहुं विश्वे[7]शासी, राखिल तोची बापा लाज ॥ ३ ॥ त्यांनीं त्यजिला शिरताज । मी तरि त्यांची किं रे भाज । जैसा प्राक्तनयोग, भोगुं तैसे भोग, पाहुं गंगा-तिरें[11]-समाज ॥ ४ ॥

( तिघांना त्रास देण्याकरितां विश्वामित्राची योजना. )

दिंडी.

सांगे सूर्यासी तीव्रें[12] तपे आतां । करस्पर्शे[13] हो यांसि दुःखदाता । जरी करिसिल अनमान यांत कांहीं । तरि मजपासीं क्षमा द्या नाहीं ॥ १ ॥ ह्मणे वरुणा[14]सी नीर आटवावें करी वापी

---

१ नीति. २ शेवटास-नाशास नेतोस ह्मणजे सोडून देतोस. ३ पुष्ट. ४ मासा. ५ काम, कार्य. ६ श्रीक्षेत्र काशी. ७ श्रीकाशीविश्वेश्वर. ८ डोक्यावरील मुकुट. ९ भार्या. १० प्रारब्ध. ११ श्रीगंगेच्या तीरावरील जनसमुदाय. १२ कडक. १३ किरणांच्या स्पर्शानें. १४ जलदेवता वरुण त्यास,

कुप धान्य सांठवांवे[1] । ह्मणे समिरां[2] मनिं हेंचि आठवावें । प्राण त्यांचे कंठींच दाटवांवे[3] ॥ २ ॥

( तृषार्त होऊन बाळ मातेस ह्मणतो )

अंजनीगीत.

बोले मातेलागीं बाळ । जवळी आला अंतकाळ । केव्हां करील तो सांभाळ । विश्वेश[4] तूझा ॥ १ ॥ कंठ शुष्क झाला जाण । जाउं पाहती माझे प्राण । केव्हां होइल जळपान[5] । गंगेचें तूझ्या ॥ २ ॥ कां गे झालीस तूं भ्रांत । होइल अतांचि देहांत । कैचा पावतो तो कांत । गिरिजेचा[6] आह्मां ॥ ३ ॥ मजला येइना भरंवसा । धरिला निश्चय तरि त्वां कसा । शब्द फुटेनाची सहसा । व्याकुळ मी झालों ॥ ४ ॥ कैची गंगा कैचा शिव । वाटे जातो माझा जीव । कैची त्याला अमुची कींव । भ्रम झाला तुजसी ॥५॥

पद ( माता बाळास ह्मणते ).

जोगी.

बाळा काय करूं आतां । न सुचे यत्न मला ॥ धृ० ॥ न दिसे लपावयासी थार[7] । तपतो सूर्य किती अनिवार । जाहले कष्ट जिवाला फार । नसे आधार समिराचा[8] ॥ १ ॥ प्रार्थिलें देवासी म्यां जाण । रक्षीं आतां अमुचे प्राण । जाहलों दीन बहू नित्राण[9] तरि पापाण काय द्रवे[10] ॥ २ ॥ नाहीं भूवरि कोठें नीर[11] । त्वां तरि किती धरावा धीर । जाहलें फारचि मी अधीर । होइल थीर मन कैसें ॥ ३ ॥ होता गिरिवासी प्रभुराय । ह्मणउनि स्मरले त्याचे पाय । गेला कोठें झालें काय । होइल अपायें[12] दूर कसा ॥ ४ ॥

---

१ विहीरी व आड इतके कोरडे करावे कीं त्यांत धान्य सांठवितां येईल. २ वायूला. ३ अडवावे, कोंडावे. ४ श्रीविश्वेश्वर. ५ पाणी पिणें. ६ गिरिजेचा ह्मणजे पार्वतीचा कांत ह्मणजे पति महादेव. ७ ठिकाण. ८ वायूचा. ९ रक्षणकर्त्याविरहित. १० कींव येईल. ११ पाणी. १२ संकट.

( विश्वामित्राची आणखी योजना )

### दिंडी.

सूर्यकिरणें संतप्त धरा केली । सकल उदकें वरुणेंहि आटवीलीं । कंठिं उरले जंव प्राण त्या तिघांचे । प्रपा[1] निर्मी मुनि मूळ जें अघांचें[2] ॥ १ ॥ छाया शीतल बहु रम्य स्थान केलें । उदक निर्मळ अति स्वच्छ तें हि ठेलें[3] । युवति सुंदर प्रार्थिती पांथिकांला[4] । उदक सेवुनि येथेंचि वेळ घाला ॥ २ ॥

### घनाक्षरी.

जात आगू नरराज[5] । पाछे आवत है भाॅज[6] । ताके पीछे सुतराज[7] । करे खोज[8] * उगरका ॥ १ ॥ बडी छाव मजेदार । झारि हातमें थंडगार । लिये ठाड[9] भई नार । सकुमार बदन[10] है ॥ २ ॥ कहत लीजो महाराज । ठाडे[11] तुमहीके काज । बडे भाग[12] आये आज । हो सरताज[13] हमारे ॥ ३ ॥ बहोत सुंदर वहे[14] रूप । नही लछ[15] दियो भूप । जात आगे गुप चूप । धरे धूप बहोतसी ॥ ४ ॥ आई पीछूसे भाज । देखे बैठे पतिराज । पियो तुमही जल आज । ईमें[16] लाज कौनसी ॥ ५ ॥ आया तबही रोहिदास । बैठी जननी जनकपास । न करे दोनोंकी आस । धरे कास[17] धरमकी[18] ॥ ६ ॥

( तारामतीला मायेनें हरिश्चंद्र दाखवून मुनि बोलतो )

### पद–जोगी.

बाई निग्रह कां धरिसी । सांगतों एक आतां ॥ ध्रु ॥ अवघें जपतप पूजा ध्यान । कोणतें पतिव्रतेला आन । काय तो

---

१ पाणपोई. २ पातकांचें. ३ ठेवलेलें. ४ वाटसरूंना, रस्त्यानें जाणाऱ्यांना. ५ राजा हरिश्चंद्र. ६ भार्या तारामती. ७ पुत्र रोहीदास. ८ शोध. ९ उभी. १० देह. ११ उभी राहिली. १२ नशीब. १३ मुकुट. १४ तें १५ लक्ष्य. १६ यांत. १७ कमर. १८ धर्माची. * वस्तीचा. १९ आग्रह. हट.

पतिच कीं प्रधान्य । मग अनुमान कां करिसी ॥ १ ॥ बैसला पती तुझा हा जाण । जाणुनि होसी कां अजाण । जाहले व्याकुळ दिसती प्राण । वचन प्रमाण हें मानी ॥ २ ॥ सेवितो उदक शीत पाहीं । जाहला शांत दिसे कांहीं । पतीहुन अन्य धर्म नाहीं । देति गोही निगमांहीं ॥ ३ ॥ सोडी आग्रह हा आतां । श्रमसी फार पुढें जातां । नाहीं स्थळ ऐसें पाहतां । आलें हाता आजि तुझ्या ॥ ४ ॥ ह्मणे ती घडेल ऐसें काय । वेडा झाला तो पतिराय । वंदिते गिरिवासी प्रभुराय । न घडो अपाय हा ऐसा ॥ ५ ॥

पद–( विश्वामित्र नंतर रोहिदासास ह्मणतो. )

( गड्यांनो कृष्ण गडी )

गाधिज ह्मणे बाळकासी । भेटे जननी–जनकासी ॥ धृ ॥ जाहले कष्ट तुला भारी । माझें वचन तुं अवधारी । सेवुनि शितल हें वारी । रविचा तापहि नीवारी । छाया शीतळ पहा कैसी ॥ १ ॥ सेविती वीर उभयतांही । घेती विश्रांती पाहीं । आमुचें वचन ऐक तूंही । बैसे क्षणभर या ठायीं । कां तूं डावलुनी जासी ॥ २ ॥ बोले बाळ मुनीराया । करितों वंदन मी पायां । नका करुं आग्रह तुह्मी वाया । होतो उशीर मज जाया । शिवेना मी या सलिलासी ॥ ३ ॥ सेवितिल नीर कसे तेही । रक्षिती धर्मशास्त्र गेहीं । वाटतें नसतिल आजि देहीं ह्मणउनि घडलें त्यांस हेंही । राखो लाज गिरीवासी ॥ ४ ॥

( पति व पुत्र यांचा वियोग झाला तेव्हां तारामतीची स्थिति )

लावणी.

पतिसुतविरहें तारामतिला दुःख जाहलें किती । तयाची करिल कोण हो मिती ॥ धृ ॥ किंचित येथें कथितों आतां सुचलें

१ वरिष्ठ, श्रेष्ठ. २ साक्ष. ३ वेदादिक. ४ ऐक. ५ टाकून, सोडून. ६ उदकास. ७ घरीं. ८ देहावर नसतील ह्मणजे शुद्धीवर नसतील असें वाटतें. ९ संख्या, गणना.

जें या मती । कष्टली सती * चतुर्याम ती । अशा वनामधिं शिरली जेथें व्याघ्राचि किंकाळती । भावी सती अंतकाळ ती । निबिड नभांतचि फिरे अंतरीं घाबरली फार ती । विघ्नें कशीं ह्मणे वारती । नयनीं वाहे नीर जाहली शोकाकुळ तरि किती ॥ १ ॥ तशांत लावी अग्नि काननीं गाधिज मुनि येउनी । मरती पशु पक्षी अहोळुनी । मार्ग फुटेना तिला वाटलें तृणहि बहु त्या वनीं । नयनीं धूम्र भरे येउनी । झाडि दिसे घनदाट दाटली निघतां नये जेथुनी । पळावें कसें तिणें तेथुनी । राशि खगांच्या पडति जसें कां होमद्रव्य होमिती ॥ २ ॥ कांतारीं बहु श्रमली फिरतां दीन जाहली सती । सुचेना युक्ति काय तीस ती । मरण बरें हें ह्मणे परंतू अंतरले सुतपती । कळेना काय तयांची गति । नाहीं फिटलें द्रव्य द्विजाचें हाचि घोर संप्रती । येइना दया कशी त्यामती । गिरिवासी प्रभुलागिं गाइलें अजबारि त्यां हो किती ॥ ३ ॥

पद–( तारामती शोक करिते )

( मजला हें कळलें हें कळलें । ब्रह्म जगीं या भरलें )

देवा धांव अतां रे धांव अतां । लवकरि करिं दुर चिंता ॥ धृ० ॥ अग्नि पेटला भारी । तुजविण कोण अतां मज तारी ॥ वरचेवर हे घाले । येती बहुतचि मी दिन झालें ॥ २ ॥ मरण बरें मज आलें । परि ते पतिसुत मज अंतरले ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तूं कीं । गाजलि कीर्ति तुझी तिहिं लोकीं ॥ ४ ॥

पद ( व्याघ्रानें पति व पुत्र यांना नेलेलें पाहून तारामती शोक करिते )

( उद्धवा शांतवन करजा. )

हा धर्मा हा निज कर्मा, कसे पति सुत विलया नेले ॥धृ०॥ दैवाची गति तरि कैसी, मी चिंता करितचि होतें । वाटलें मनीं

---

१ बुद्धीस ( कवीच्या ) २ दाट. ३ निवारण होतील. ४ होरपळून. ५ धूर. ६ समूह. ७ पक्ष्यांच्या. ८ होमांत टाकण्याचे पदार्थ. ९ आहुति देतात. १० वनांत. ११ सांप्रत, हल्लीं. *चार प्रहर. १२ संकटें. १३ तिन्ही लोकांत. स्वर्ग, मृत्यु, पाताळ.

मज ऐसें, सूर्योदयिं येतिल हो ते । पहा कर्म कसें तें माझें, तीं नयनीं दिसलीं प्रेतें ॥ चाल ॥ आजि जळुनि कसे ते मेले । मज सोडुनि स्वर्गा गेले । असें काय पाप म्यां केलें ॥ पू०चाल ॥ नेलेचि तेहि वोढुनियां व्याघ्रानें, पाहातचि ठेलें ॥ १ ॥ म्यां काय करावें आतां, हें दुःख कसें सोसवतें । अरडती व्याघ्र विपिनीं या, पहा फिरती हो मजभंवतें । ग्रासिनात कां हे मजला, जरि संनिध जाउनि बसतें ॥ चाल ॥ हें काय जिणें तरि आतां । लागली मला बहु चिंता । नाहिं उरला कोणी त्राता ॥ पू०चाल ॥ आतांचि प्राण मी देतें, हरिनें हें अनुचित केलें ॥२॥ अशि विलाप करितचि कांता, विपिनीं जों हिंडत आहे । ऐकिला शब्द कोणाचा, ह्मणउनि ती मागें पाहे । देखिले पती-पुत्रातें, तो अनंद हृदयिं न माये । ह्मणे देव दयाळू मोठा । भक्तांचा त्याला तोटा । बाइ भावचि अपुला खोटा ॥ पू०चाल ॥ गोटाचि मानिला कीं हो गिरिवासी, नाहीं भ्यालें ॥ ३ ॥

( तिघांची भेट झाली त्या वेळेचें वर्णन. )

लावणी.

पति सुत करिती शोक सतीचा वर्णावा तो किती । वदनीं नाम तिचें घोकिती ॥ धृ० ॥ अग्नि जाहला शांत, काननीं जो होता पेटला । पित्यासी पुत्रहि मग भेटला । तारामतिचा वियोग दुःसह, उभयांसहि वाटला । अंतरीं गहिंवर बहु दाटला । शोध सतीचा करावया जरि वेळ किती आटला । फिरती संशय नच फीटला । श्रांत[2] जाहले फिरतां गहनीं[1] कष्ट बहू भोगिती ॥१॥ राज्य-वित्तही हरिलें विप्रें दुःख न त्याचें असे । जाहले सतिविरहीं हें जसें । पाहावें कोठें, जावें आतां, काय करावें कसें । सतीचा विपिनीं शोधचि नसे । हुडकायाची सीमा झाली जिव

१ अरण्यांत २ थकले.

व्याकुळ होतसे । आरडता बसले कीं हो घसे । अति कोमळ पाउलें नसे हो हिंडायाजोगिं तीं ॥ २ ॥ सूर्योदय तितुक्यांताचि झाला तीहि भेटली सती । परस्पर वृत्तहि मग पूसती । अनंदाश्रु बहु गळती नयनीं जरि श्रमले असती । क्षुधेनें पीडितसे दीसती । मार्ग मिळेना अडवाटेनें काट्यांताचि घूसती । शरीरीं त्यांच्या ते भोसती । गिरिवासी प्रभु पहा बरें तो अदय जाहला किती ॥ ३ ॥

पद-[ काशीचे जन ह्मणतात ]

जोगी.

पाहिला विप्र नसे कोणी, निर्दय यापरिचा ॥ धृ० ॥ घेतलें राज्य हिरुनि सारें । तरि द्या ह्मणतो पैसा रे । घालवूं यासि पिटुन सारे । न बैसा रे स्वस्थ उगे ॥ १ ॥ कसा हा पुष्ट तरी झाला । पिडितो व्यर्थचि गरिबांला । करावें ताडण हो याला । बहु झाला मस्त पहा ॥ २ ॥ न पाहावें दुःख आह्मां यांचें । आधिनें मन आमुचें काचे[1] । बोलतो अपशब्दहि वाचे । कसें याचें वर्तन हें ॥ ३ ॥ झांकिले हरिनेंही डोळे । घातले कानांताचि बोळे । लेंकरूं धुळींत कीं लोळे । तरि न वळे गिरिवासी ॥ ४ ॥

( तारामतीस कुंटिणी मागतात )

लावणी.

रूपवती अति सुंदर युवती पाहुनियां धांवती । कुंटिणी[2] सतीस त्या मागती ॥ धृ० ॥ तारामतिला हटीं[3] मांडिलें गाधिज मुनि बहु हटी । धांवले लोक तशा पाहटीं[4] । शालु चौकटी जरिचा नेसे पाहतां जी हरिकटी[5] । केली उभी अशी एकटी । येति कुंटिणी बहुत नेसल्या पितांबर ज्या धटी ॥ ह्मणती साधो येवढी

---

१ कचरतें. द्रवतें. व्याकुळ होतें. २ वेश्या ३ बाजारांत. ४ हट्टी. ५ सिंहकटी. ( सिंहाच्या कमरेसारखी आहे कमर जीची )

भेटी ॥ संसर्गानें जिच्या पावती वहु जन परमो गति ॥ १ ॥ ज्या त्या भाविति अपुल्या ठायीं काय रत्न हें शिंरा[3] ॥ जाइल हतिचें अंतरिं शिंरा ॥ अमोल्य असतां अल्प धनानें मिळतो कीं हो हिरा ॥ पाहतां काय सख्यांनों हिरो ॥ कोणी वदती भार[6] कनक[7] अह्नि दिधलें बाई, घरा ॥ चलावें, दुशाल ही पांघरा ॥ साध्वी असतां अशी तिची ही व्हावी चरमा गती ॥ २ ॥ वियोग पतिचा नसो ह्मणुनिया ताप जिनें साहिला ॥ समयीं तोहि न तिज राहिला ॥ गती कसी दैवाची हो त्या दासी शतशः जिला ॥ करणें सेवा आली तिला ॥ वेश्यांसदनीं मला न द्यावें ह्मणउनि मुनि प्रार्थिला ॥ नेलें काल-कौशिकें तिला ॥ गिरिवासी प्रभु दयाळ केव्हां होईल तिस मागतीं[10] ॥ ३ ॥

[ तारामतीला विकत घेणारा घेऊन चालला तेव्हां रोहिदासाचें व तिचें भाषण. ]

जलद घनाक्षरी.

माते जातिस कोठें आज ॥ कोण्या जागीं आहे कोंज ॥ ताहन लागली पाणी पाज ॥ वैसे क्षणभरि, स्तन देई तरी, ॥ ह्मणतो काय हा मुनिराज ॥ १ ॥ होसी राजाची तूं भाज[12] ॥ यानें सोडिली कशी लाज ॥ थांब थांब आतां, जाउनि कथितों ताता, यासी आला कोठुनि माज ॥ २ ॥ बाळा सांगतें तुला वर्म ॥ माझा पतिव्रताधर्म ॥ केलें जैसें पूर्वीं कर्म ॥ आलें भोगणें अतां, नाहिं कोणिच त्राता ॥ कैचें आतां बापा शर्म[13] ॥ ३ ॥ स्मरतां येतो अंगीं घर्म ॥ कोण चालवी माझें नर्म[14] । मुनिनें विकिलें मजला, मुकलें बापा तुजला, पाहे दुर्घट कैसें कर्म ॥ ४ ॥

---

१ येवढी भेटी साधो ह्मणजे इतकें इष्ट कार्य होवो. २ मोक्ष. ३ उत्तम. ४ घुसा. ५ दिसकावून घ्या. ६ १२० शेर=१ पल्ला २००० पल्ले=१ भार. ७ सुवर्ण. सोनें. ८ शेवटची. ९ नामविशेष ब्राह्मण. १० पुनः ११ काम. १२स्त्री. १३सुख. १४कौतुक

झुलना ( डोंबाची बायको पतीस ह्मणते )

घनाक्षरी

कसा आणिला हा दास । केला द्रव्याचा नासे[1] ॥ होइल पिशुनांमधिं[2] हांस[3] ॥ होत भास मज असा ॥ १ ॥ काय झाला भ्रम आज ॥ कशी वाटेना लाज ॥ आहे मोलकरिण भाज[4] । करिल काज गृहीचें ॥ २ ॥ दिसे नाजुक हा फार ॥ कसा घेइल शिरिं भार ॥ नीर पाहिजे अपार[5] ॥ पहा विचार आपुला ॥ ३ ॥ आतां सांगतें मी स्पष्ट ॥ करणें लागतलि कष्ट ॥ ह्मणाल मजलागीं नष्ट ॥ होइन इष्ट मग कशी ॥ ४ ॥

पद ( हरिश्चंद्र ह्मणतो )

( जलद त्रिताला )

करूं कैसें मी काय आतां ॥ ध्रु ॥ मला सुचेनाचि कांहीं ॥ कोणी गोत येथें नाहीं ॥ माझें मन देतें गाही ॥ नाहिं राहिला कोणि त्राता ॥ १ ॥ माझें कंटाळलें मन ॥ वाटे सेवुं काय वन[6] ॥ झालें जिणें पराधिन ॥ दिन जाहलों जळ[7] वाहतां ॥ २ ॥ गेले कांता पुत्र तेही ॥ वास चांडाळाचे गेहीं ॥ होती कष्ट बहु देहीं ॥ देई मरण तूं रमानाथा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुराया ॥ आलों शरण तुझ्या पायां ॥ ऐसें जिणें नको वाया ॥ वाया गेलें जन्म पाहतां ॥ ४ ॥

दिंडी ( डोंबाचे घरीं हरिश्चंद्राचा वेष )

कृष्ण दोरा बांधिला गळा त्याच्या ॥ शिरीं लपटाया देति एक काच्या ॥ दिली नेसाया चड्डि तेचि घाली ॥ इथुनि वसनाची अतां सिमा झाली ॥ १ ॥ एक दिधली घोंगडी फाटकीसी ॥ तीच शय्या रात्रीस हात ऊसी ॥ बहू यावी शोभाहि त्यासि तेव्हां ॥ शिरीं बैसे येऊनि कुंभ जेव्हां ॥ २ ॥

---

१ नाश. २ दुष्ट लोकांत ३ हंसें. ४ भाज ह्मणजे बायको मोलकरणीसारखी काम करण्यास आहे ह्मणून का असा दास आणिला असा भावार्थ. ५ पुष्कळ. ६ अरण्य. ७ पाणी.

झुलना ( हरिश्चंद्र ह्मणतो )

जलद घनाक्षरी

करूं आतां मी कैसें काय ॥ मज अंतरले गुरुपाय ॥ झालों आतां निरुपाय ॥ देवा धांव तरि, पाव लवकरि, केला कोणता अन्याय ॥ १ ॥ त्यजिला कसा तुवां न्याय ॥ एवढा दुर करि अपाय ॥ गेली विप्रसेवा, कैसा संचित–ठेवा, झालों दिन मी जैसी गाय ॥ १ ॥ झाले मजला कष्ट फार ॥ नित्य खाउं मी किती मार ॥ नाहीं कोणाचाहि आधार ॥ वास चांडाळ–गेहीं, असतां सुखही नाहीं, यांतुनि देवा मला तार ॥ ३ ॥ कोठें दिसे- नाची थार ॥ घेई माझा तूंची भार ॥ पुत्र कांता गेली, नकळे काय मेलीं, किंवा आहेत कोठें गार ॥ ४ ॥

पद [ हरिश्चंद्र म्हणतो ]

जोगी

देवा पाव अतां मजला, पाहसि अंत किती ॥ धृ ॥ गेलें राज्य सर्व पाहीं ॥ त्याची चिंता मज नाहीं ॥ मुकलों सुत- कांतेलाही ॥ नसे तेंही दुःख बहू ॥ १ ॥ लागली खंती मजला ही ॥ पडलों डोंबाच्या गेहीं[1] ॥ बसतो मार नित्य देहीं ॥ कष्ट तेंही बहु होती ॥ २ ॥ यांतुनि काढ अतां मजला ॥ अरडतां कंठ किती सुजला ॥ प्रस्तरीं[2] सिंधु त्वांचि बुजला ॥ कठिण तुजला काय असे ॥ ३ ॥ प्रार्थितों गिरिवासी राया ॥ असो हें वंदन तव पायां ॥ शिणली माझी बहु काया ॥ नको वाया हेत[4] करूं ॥ ४ ॥

पद ( माता बाळकास ह्मणते )

जोगी

बाळा जाउं नको विपिनीं, सोडुनि मजलागीं ॥ धृ० ॥ नाहीं गोत अतां मज जाण ॥ ठेविला तुजवरि अवघा प्राण ॥ माझें वचन एवढें मान ॥ घालितें आण मी अपुली ॥ १ ॥

१ स्वस्थचित्तानें. २ घरीं. ३ दगडांनीं. राम अवतारी रामानें समुद्रावर सेतु बांधला होता. ४ हेतु=इच्छा. हेत वाया करूं नको=इच्छा पूर्ण कर.

जाशिल विहिरीवर तूंही ॥ देतिल ढकलुनि पोरें हीं ॥ पोहणें येत तुला नाहीं ॥ कठिण तेंही मज वाटे ॥ २ ॥ चढशिल तरुंवरि एखाद्या ॥ असती ठिसुळ बहू खांद्या ॥ आरडशिल मला हात द्या द्या ॥ कोण खांद्यावरि तुज घे ॥ ३ ॥ बोले बाळक मातेसीं॥ येतों त्वरिताचि तुजपासीं ॥ व्यर्थ तूं चिंता कां करिसी ॥ नसे गिरिवासी काय तुझा ॥ ४ ॥

( उशीर झाला ह्मणून रोहिदास इतर मुलांस ह्मणतो )

घनाक्षरी.

पाहा झाला किति वेळ ॥ चला पुरे करा खेळ ॥ होइल माय उतावेळ ॥ बहू वेळ लागतां ॥ १ ॥

पद ( तारामती म्हणते. ]

जोगी

बाळा कां झाला तुज वेळ, न कळे मजलागीं ॥ धृ ॥ वदलें जाउं नको रानीं ॥ चिथविलें परि तुज पोरांनीं ॥ तुडविलें असेल ढोरांनीं ॥ कीं रानीं फिरतोसी ॥ १ ॥ कळविति पोरें मातेला ॥ भुजंगें दंश पदा केला ॥ बाळ तो तात्काळचि मेला॥ काय तुजला सांगावें ॥ २ ॥ बहुताचि दुर्धर विष पाहीं ॥ लागला क्षणहि त्यास नाहीं ॥ राहिला दिवस नसे कांहीं ॥ फळ नाहीं जाउनिया ॥ ३ ॥ ऐकतां घाबरली ती माय सुचेना तिला करावें काय ॥ रडतसे मोकलुनी धाय ॥ करीत हाय ती गेली ॥ ४ ॥ ह्मणतसे गिरि-वासी प्रभुराय। करणें तुला उचित हें काय॥ केली दया आजि ती काय । रक्षिलें कांय गजेंपतिचें[२] ॥ ५ ॥

लावणी. ( तारामतीचा विलाप )

तारामति आक्रोश करितसे प्रेत पुढें घेउनी ॥ गेला सुत शोका देउनी ॥ ६ ॥ भूप हरिश्चंद्राचा सुत हा, काय जाहली दशा ॥ गेली विलया सारी अशा ॥ प्राक्तनयोगचि असा, व्रतांसी

---

देह. ( जीव ) २ गजेंद्राचे.

आचरलें कस कशा ॥ करितिल काय दुजा तरि अशा ॥ इश्वर कां क्षोभला कळेना नित्य प्रार्थना जशा ॥ केल्या नसातिल कोणी तशा ॥ भावें केलें ध्यान तयाचें लक्ष पदीं ठेवुनी ॥ १ ॥ पाप तरी कोणतें उदेलें कांहिं न उमजे मला ॥ ज्यास्तव घात असा जाहला ॥ भावें-गर्भंही काय असावा मज न कळे यांतला ॥ यमानं हात कसा घातला ॥ या जन्मीं तरि नसोचि सहसा दोष असा लागला ॥ वाटतो गतं[२]-भवींचा जागला[३] ॥ अनुचित केलें हरिनें बहुतचि अजि बाळा नेउनी ॥ २ ॥ पतिविरहाचें दुःख तशांतचि हाहि समय पातला । तिला तो कल्पांताचि भासला ॥ विलाप करि बहु सती गहिंवरे कंठ तिचा दाटला ॥ ब्राह्मणवेशें मुनि भेटला ॥ चाल उगी कष्टसी कशाला दिवस नसे उगवला ॥ प्रभातीं द्रव्य पाहिजे तुला ॥ गिरिवासी प्रभु कसा जाहला अदय तीस पाहुनी ॥ ३ ॥

पद ( तारामती म्हणते )

( उद्धवा शांतवन कर जा )

हा बाळा कशि गति झाली, नाहिं सार्थक झालें पाही ॥ध्रु॥ कोणतें दुःख तरि सांगूं, हें जन्मचि गेलें वाया ॥ किति वैभव तरि मम पतिचें, डोंबाघरिं विकिली काया ॥ घेतलें मलाही मुनिनें, असि केली ही तुझि माया ॥ चाल ॥ मारिलें अणुनि या ठायीं । अशि निर्दय दुसरी नाहीं नाहिं। उपाय केला कांहीं॥पू०चाल॥ गाहीच मला मन देतें, वाचतासि दुसऱ्या ठायीं ॥ २ ॥ कसें मरण अलें तुज बाळा, या अल्प वर्षांतचि पाही ॥ भोगिले कष्ट बहु त्वां कीं, नाहिं सौख्य दिलें तुज कांहीं ॥ वळाविलेंस गृह दुसऱ्याचें, कधिं ताप दिला मज नाहीं ॥ चाल ॥ ते काय तुझे गुण वाणूं ॥ आठवतें मनिं कशि नाणूं[४] ॥ कसें दुःख मनांतिल

१ आशय, हेतु. २ पूर्व जन्मींचा. ३ जागृत झाला, उभा राहिला. ४ न+आणूं. आणूं नको.

खाणूं ॥ पू०चाल ॥ जाणूनि घात म्यां केला, हें म्हणणें विपरित नाहीं ॥ २ ॥ जाहलें निधनें या जागीं, नाहिं झाली गति तुझि बाळा ॥ ठेवितें बोल मी आतां या कर्मे अपुल्या भाळा ॥ मज अणिलें ज्या विधानें तो देउनि गेला टाळा ॥ चाल ॥ हें स्मरण कसें विसकटलें । करचरण तुझे हे तुटले । दिसे कपाळ माझें फुटलें ॥ पू०चाल ॥ सुटलें न देहापासुनिया आहे उरलें याचें कांहीं ॥ ३ ॥

धावा ( तारामती धावा करिते )

( विडा घ्याहो नारायणा )

धांव रे दिनानाथा, पाहा कष्टलें भारी ॥ नसेचि मज त्राता कोण संकट निवारी ॥ धृ॥ मागणें हेंचि आतां । तुजलागीं अनंता ॥ प्रति–भवीं हेंचि देई। मज हरिश्चंद्र भर्ता ॥ १ ॥ सुतही रोहिदास । असो गाधिज मागता ॥ वसिष्ठ गुरु राय । नित्य आशिर्वाद देता ॥ २ ॥ असें प्रार्थी तारामती । हरि पावला अंतीं ॥ प्रगट रूप केलें । खड्ग निवारिलें हातीं ॥ ३ ॥ दयाळु गिरिवासी । होतो निश्चय पाहिल्या ॥ स्मरणें जगा तारी कैंवि उपोक्षि गाईल्या ॥ ४ ॥

---

१ खणून काढूं म्हणजे नाहींसें करूं २ मरण. ३ चिता. ४ प्रति जन्मीं ५ हातानें ६ स्मरणें तारी; गाइल्या कैंवि उपेक्षी. जो नुसतें त्याचें स्मरण केलें असतां तारतो तो त्याचे गुणनुवादद गाइल्यास कसा उपेक्षा करील. ( न जाणतहि ये मुखा हरि तथापि पापें हरीं; हरि विषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां। करतळगत त्याला चारिही मोक्ष तेव्हां " वामन पंडित )

# श्रीदत्तचरित्र.

## आर्या.

ये नारद मुनि एक्या समयीं मुनिवर्य अत्रिच्या भुवना ।
पूजा करुनि यथोचित वंदी तत्पाद मस्तकीं भुवना ॥ १ ॥
अनसूया सतिनेंही पुसिलें पादांबुजासि पदरानें ।
वाढूनि षड्रसान्नें जेवाविलें मग यथेच्छ अदरानें ॥ २ ॥
होत्या गंगा यमुना तत्पर सेवेंत नित्य ज्या सतिच्या ।
करिती दास्य मुनीचें देतिल वचनासि कां न मान तिच्या ॥ ३ ॥
मुनिवर[2] ह्मणे न चळवा चित्त, अर्धी वृत्त, आपुलें कळवा ।
[3]तळवा मग तुम्हि मळवा हस्ताचा, संशया अर्धी पळवा ॥ ४ ॥
गंगा यमुना आम्ही असतों सेवेंत नित्य या सतिच्या ।
सर्वज्ञ तुम्ही पुसतां नाहीं महिम्यासि अंत कांहिं हिच्या ॥ ५ ॥
उमा रमा सावित्री त्रैमूर्तींच्या स्त्रिया अनादि सती ।
पायीं प्रतिमा त्यांच्या या सतिनें बांधिल्या पहा दिसती ॥ ६ ॥
वर्णावी किति ख्याती त्रिजगीं न दिसेचि हो हिच्या सरिलों[4] ।
यास्तव आम्हीं मोहित होउनि आश्रय असे हिचा धरिला ॥ ७ ॥
नारद मुनि वैकुंठीं पाहे सस्त्रीक हरिहरा विधिला ।
आधीं स्त्रियांसि निंदुनि मग तो त्यांच्याहि बोल लावि धिलों[5] ॥ ८ ॥
व्यर्थ जिणें हें तुमचें वागवितां कासयास देवपण ।
[6]श्मश्रुच्छल काशाला पाचारा नापिका करा वपन ॥ ९ ॥

---

१ आदरानें २ नारद त्या गंगायमुनादिकांना विचारूं लागला ३ नंतर तुह्मी आपले तळहात मळश. भावार्थ—गंगायमुनादि नद्या त्या सतीचिया येथें काम करीत होत्या, त्यांना नारद ह्मणतात, माझा संशय अगोदर पळवा व मग कामाला लागा. ४ बरोबरीला. ५ बुद्धीला. ६ भावार्थ—उगाच दाढीमिशा कशाला वाढवल्यात, काढून टाका. तुमच्यात पुरुषार्थाचें कांहींच लक्षण नाहीं.

पुसती देव तयातें झाला वृत्तांत काय तो कळवा ।
दूषण कां हो देतां संशय मनिंचा समूळ हा पळवा ॥ १० ॥
बोले मुनि अनसूया अत्रि ऋषीची असे सती भार्या ।
त्रिजगीं नसेचि दुसरी पतिव्रता योग्य तीच सत्कार्या[1] ॥ ११ ॥
उमा रमा सावित्री प्रतिमा यांच्या पदींच ती मिरवी ।
न दिसे साध्वी ऐसी त्रिजगीं गर्वासि जी इच्या जिरवी ॥ १२ ॥
ऐसें वदतां नारद चढला बहु कोप त्या तिघीं जणिला ।
ह्मणती मानवसातिचा या लोकीं पाड काय हो अणिला ॥ १३ ॥
नारद ह्मणे असत्यचि वाटे जाऊनि कां पहाना हो ।
सहजाचि कळेल महिमा तीचा मग तिजसवें पहा नाहो[2] ॥ १४ ॥
म्हणती निज पतिला त्या सत्वर जाऊनि सत्व हरवा हो ।
अनसूया कोण तिला त्रिजगीं असती असेंचि ठरवा हो ॥ १५ ॥
मग ते ब्राम्हणवेषें आले तत्काल अत्रिच्या सद्मीं[3] !
छद्मीं[4] असतांहि सती भ्रमरी झालीच विप्र-पद-पद्मीं ॥ १६ ॥
मुनिवर ध्यानस्थ म्हणुनि इच्छा कळवा असें सतीच वदे ।
म्हणती भोजन घालीं स्वकरसमुत्पन्न पाक तो चव दे ॥ १७ ॥
पाक करुनिया सतिनें अणिलें वाढावयासि जंव पात्रीं !
ते म्हणती नग्नचि हो वर्णिति त्रिजगांत एक तूं दात्री ॥ १८ ॥
कळवी जाउनि पतिला विप्र न हे छळक भासती स्वामी ।
सिंची उदक तयांवरि बाळें होतील आपुल्या धामीं[5] ॥ १९ ॥
दिधलें जळ आभिमंत्रुनि त्यावरि पडतांचि बाळकें झालीं !
मग निर्भय चित्तानें होउनिया नग्न ती सती आली ॥ २० ॥
मोहें पाजी पान्हा घालुनि हलवीत पालखामाजी !
चित्तीं ह्मणे प्रभूनें पुरवीली आजि कामना मांजी ॥ २१ ॥
पुनरपि नारद येउनि पाहे तों हालवीतसे बाळां[6] !
गुण गाउनि आनंदें अनुदिनिं संतोषवीतसे बाळां ॥ २२ ॥

---

१ सत्कार करण्याला २ नवरा ३ घरीं ४ कपटी. ५ माझी ६ अनुसूया

गांठी स्त्रियांसि त्यांच्या असती पतिराज कोणत्या गांवीं !
वाटे न कळे त्यांला सति असती कोण कोण त्यागावी ॥ २३ ॥
विनविति कर जोडुनिया लावा हो शोध अमुच्या पतिचा !
असतिल अनसूयेच्या सदनीं तरि शांतवाचि कोप तिचा ॥ २४॥
वाळें करुनि सतीनें निजवीलीं पाळखांत जा आणा !
सद्भावें शरणचि व्हा वाहणें तरि कासयास मग आणा ॥ २५ ॥
मग त्या तिघीहि सत्वर विनविति जाऊनि अनसुया सतिला;
द्यावे भ्रतार अमचे म्हणउनि करिती पुनःपुन्हा नतिला ॥ २६ ॥
ओळख न पुरे सहसा आंतुनि बाहेर त्या करिति जाया !
जाया स्वत्पुत्राच्या जालों पतिसह निरो दे जाया ॥ २७ ॥
सांगे पतीस यांतें देउनि पतिदान बोळवावें हो ।
करिती अज्ञ अपकृती सुज्ञें तरि त्या न पोळवावें हो ॥ २८ ॥
पुनरपि उदकाचि टाकुनि केले विधि विष्णु अणि सदाशिव ते !
सृष्टिस्थितिलय कर्ते झाले सस्त्रीक मुनिपदा शिवते ॥ २९ ॥
ह्मणती देवत्रय ते अनसूयेतें अभीष्ट वर मागे !
इच्छा नसोचि परिद्या खेळविलें म्या जसें तुह्मां मागें ॥ ३० ॥
दिधले अंश त्रयांनीं झाला तो योगिराज अवधूत !
त्रिजगीं सचार करी स्मरणें जन पातकें अनेव धूत ॥ ३१ ॥
शुद्ध चतुर्दशि दिवशीं मार्गेश्वर मास विर्भुति देवाची !
झाला अवतार जगीं दत्तचरित्रा विभूति दे वाची ॥ ३२ ॥

दिंडी—( देव नारदास विचारतात ]

म्हणति देवत्रय हेंचि नारदाला ॥ आलि शंका ही कळवितों तुम्हांला ॥ जशा अमुच्या या सत्या तिघी दिसती ॥ जगीं सांगा बरें कोण अशा असती ॥ १ ॥ मतें अमुच्या या पतिव्रता धन्या ॥ जगीं नसतिल यां समा कोणि अन्या ॥ जरी आढळली तुम्हां सती ऐसी ॥ तरी कळवा हो तिची स्थिती कैसी ॥ २ ॥

---

१ पाळण्यांत २ पूर्वी. जुनीं ३ ' मासानां मार्गशीर्षोहं ' यागीतावचानाला उद्देशून हें आहे. ४ दत्त चरित्र वाचील त्याला निरतीं संपत्ती वगैरे देतो.

झुलना ( नारद देवांस सांगतात- )
घनाक्षरी.

नारद मुनि कहत जात ॥ भूमंडलमें गई रात ॥
नजर आई जो बात ॥ कहुं वृतांत तूमसे ॥ १ ॥
सती जगतमों अनेक ॥ वामें अनसूया एक ॥
बडी पतिव्रता नेक ॥ राखत टेक पतीकी ॥ २ ॥

साकी

उमा रमा सावित्री तीनों दासी हैं उस कामिनकी ॥
गंगा जमुनाको मैं देखा, है बांदी दिन यामिनकी ॥ १ ॥

अंजनीगीत-देवस्त्रिया नारदास ह्मणतात-

झाल्या कोपाकुळ त्या नारी ॥ निर्भर्त्सुनिया वदती भारी॥ नारदा वर्णु नका थोरी ॥ पाड किती तिचा ॥ १ ॥ बरवें विचारावें चित्तीं ॥ मानवसतिचा लेखा किती ॥ कां हो दावितां तुह्मि भीति ॥ अनसूया सतिची ॥ २ ॥ मिथ्या गमती तुमचे बोल ॥ तीचि अमुची कांहितरी जोल ॥ पाहुनि वर्णिल्या समतोल ॥ मानूं वचनासी ॥ ३ ॥ साध्वी ह्मणावें कवणासी ॥ कळतें अवघें हें मुझासी ॥ रंभा मानीलें दासीसी ॥ पुरे वर्णन तुमचें ॥ ४ ॥

पद-देवस्त्रिया नारदास ह्मणतात-
जोगी

नारदा शोध करा पतिचा, झालों दीनाचि कीं ॥ ध्रु० ॥ पडला भ्रम कसा मतिला ॥ धाडिलें छळावया सतिला ॥ केलें काय तिनें पतिला ॥ हें मतिला अकळेना ॥ १ ॥ पहावी किती तरि आह्मी वाट ॥ झाले दिवस वाटती साठ ॥ न कळे अनसूयेचा कांट । नसे बोभाट आजवरी ॥ २ ॥ सांगा कसा धरावा धीर ॥ होइना क्षणभरि मन हें स्थीर ॥ सेविलें नाहीं कीं हो नीर ॥

---

१ बंदी, सेवेंत तत्पर. २ बरोबरी. ३ कराटाळपणा, कपट.

कसें रुचीर तें लागे ॥ ३ ॥ धांवें गिरिवासी प्रभुराय ॥ करावा यत्न कोणता काय ॥ नारदा धरितों तुमचे पाय ॥ शिणवा काय यासाठीं ॥ ४ ॥

लावणी–देवस्त्रिया विलाप करितात–

उमा रमा सावित्री ह्मणती येति न पति कां तरी ॥ जाळितो विरहानल अंतरीं ॥ धृ ॥ काय करावें अम्ही स्त्रियांनी वाट किती पाहवी ॥ कशीं हीं दुःखें तरि साहवीं ॥ शोध कसा लागेल पतीचा मार्ग कोण दाखवी ॥ सुखाची रुची कोण चाखवी ॥ करील सुटका कोण माउली चतुर सदय लाघवी ॥ कळेना कोण देह भागवी ॥ विलाप करिती तिघी जणी त्या दिवसनिशीं यापरी ॥ १ ॥ बहुधा पापें अम्ही अचरलों त्यांचें फळ हें असें ॥ भोगितों नाहिं म्हणावें कसें ॥ त्रयमुर्तीच्या भार्या आम्हीं जगीं जाहलें हंसें ॥ स्मरतां जिव व्याकुळ होतसे ॥ स्त्रिया अशा त्रिजगांतहि नसती पडले होते ठसे ॥ मनाला कां न अतां तें डसे ॥ कोठें जावें काय वदावें समय कठिण किति तरी ॥ २ ॥ सदनीं होतों सुखें आपल्या दुष्ट बुद्धि पहा कशी ॥ अठवली पडलों आतां फशीं ॥ जाणत जाणत वेड्या झालों व्यर्थ लाविलें धसी ॥ छळना केली हो भलतिसी ॥ त्याचा हा परिणाम पावलों केली करणी अशी ॥ ह्मणावें काय कोणा याविशीं ॥ गिरिवासी प्रभुराय धांवण्या धांव अतां लवकरी ॥ ३ ॥

लावणी–नारद देवस्त्रियांस ह्मणतात–

उमा–रमा–सावित्रीलागीं गांठी नारद मुनी ॥ वसलां स्वस्थ कशा आजुनी ॥ धृ ॥ ब्रह्माविष्णूमहेश बाळें केलीं सतिनें पहा ॥ तियेच्या चरणीं मस्तक वहा ॥ जरि कांहिं बोलली सतीचें वचन तुम्ही ते सहा ॥ यांतचि लाभ असे हो महा ॥ सती अशी त्रिज-

१ दांडगाई

गांत दिसना दिशा धुंडिल्या दहा ॥ छळिलें तिजला कां तुम्हि अहा ॥ नित्य पालखीं निजवी बाळा स्तनपान्हा पाजुनी ॥ १ ॥ चमत्कार पाहिला दृष्टिनें ऐका तो यावरी ॥ सांगतों मूत्रविसर्जन परी ॥ धार मुखावरि परस्परांच्या पडे कोण आवरी ॥ भिजलीं गात्रें अवघीं जरी ॥ पुरीष कारिती तिथे पालखीं निजवील्या ऊपरी ॥ मर्दिती अंगें विधि—हर—हरी ॥ रडती जंव आक्रोशें ये सति लगबग मग धांवुनी ॥ २ ॥ देवत्रयमूर्तिंच्या अवस्था केल्या यापरि जिनें ॥ कोठुनी इतरांचें मग जिणें ॥ पती न सुटती तुम्ही सतीचे पाय वंदिल्याविणें ॥ पडुं द्या, पडलें भाळीं किणें[1] ॥ धन्य माउली जगीं पाहिली अघटित केलें तिनें ॥ गोविले देव भक्तिच्या रिणें[2] ॥ गिरिवासी प्रभु करील सुटका राहुं नका लाजुनी ॥ ३ ॥

पद—( नारद देवस्त्रियांस ह्मणतो )

(गड्यांनो कृष्णगडी)

इच्छितां जरि अपुल्या पतिला ॥ शरण जा अनसूया सतिला ॥ धृ ॥ पाहुनी अलों तिन्हीं बाळें ॥ वाजती पांयिं खुळ-खुळ वाळे ॥ कारिती इतरांसम चाळे ॥ खेळवी सति बहु लाडिवाळें ॥ करुनिया सद्भावें नतिला ॥ १ ॥ पालखीं निजवुनिया बाळां ॥ हलविते क्षणोक्षणीं बाळा ॥ लागला हाचि तिला चाळा ॥ करिल कां मग ती कंटाळा ॥ सोडवा तुह्मि आपुल्या पतिला ॥ २ ॥ यापरि रिझवी बाळांसीं ॥ गुंतलें तेही तिजपाशीं ॥ कसे पति तुमचे गुणराशी ॥ अशी ही अली दशा त्यांसी । परोपरि विनवावेंच तिला ॥ ३ ॥ प्रभू गिरिवासी करिल कृपा ॥ धरितां व्यर्थचि कांहो त्रपा[3] ॥ अर्धी या कार्यालागिं जपा ॥ लटिक्या वरकड सर्व गपां[4] ॥ वळवा तुह्मि अपुल्या मतिला ॥ ४ ॥

---

१ घट्टे. २ ऋणानें, कर्जानें ३ लाज ४ गप्पा

# श्रीकृष्णांनीं एका गोपीचा गर्वपरिहार केला तें आख्यान.

एक नवी गोपी गोकुळांत राहण्यास आली होती. सर्व गोकुळांतल्या गोपी भ्रष्ट आहेत असें ती ह्मणत असे. इतर गोपींनी ही गोष्ट कृष्णास सांगितली, व तिचा गर्वपरिहार कर ह्मणून कृष्णास विनंति केली. कृष्णाचे धाकानें ती गोपी आपले माहेरास गेली. तेथें कृष्णानें तिचा गर्व फार चमत्कारिक रीतीनें हरण केला. ही कथा या आख्यानांत आहे.

## आर्या

आली होती तरुणी अति सुंदर एक गोकुळांत नवी ।
पाहुनि चरित्र हरिचें लावितसे बोल गोकुळा तन्वी ॥ १ ॥
झाल्या भ्रष्ट सकळही गोकुळिंच्या कामिनी असेंच वदे ।
हरिलाहि बोल लावी तरि इतरालागिं तें कसें चव दे ॥ २ ॥
घडि घडि असेंहि बोले हरिला येऊं न देचि सदनासी ।
दाखविना नख अपुलें तरि तो पाहील काय वदनासी ॥ ३ ॥
गोपी ह्मणती कृष्णा जरि तूं आहेसि सत्य पुतनारी ।
आणी वेढुनि तिजला ह्मणते सर्वांत मीच पुते नारी ॥ ४ ॥
अभिमान तुज असों दे कृष्णा आम्ही समस्त फसलों की ।
न चले उपाय यास्तव तीचे ऐकूनि बोल बसलों की ॥ ५ ॥
देव म्हणे स्वस्थ असा गर्व तिचा सर्व मीच हरि हरिन ।
राहिल काय प्रतिष्ठा मत्तेभाच्या मदासि हरि हरि न ॥ ६ ॥
कळलें तिजलाहि असें किं हरि अपणा धरावया जपतो ।
झाली चिंतातुर बहु वदनेंदु काय तो तिचा लपतो ॥ ७ ॥
चित्तीं विचार करि मग जाऊं कोठें अतां करूं काय ।
आहे अन्याय जरी तरि कवणाचे कसे धरूं पाय ॥ ८ ॥

---

१ सुंदरी २ पूत, पवित्र. ३ माजलेल्या हत्तीचा. ४ सिंह.

विहित पथें वर्तुनिया दैवें हा योग आणिला काय ।
न सुचे उपाय यास्तव अपघातें हारवीन हा काय ॥ ९ ॥
कळवी निज पतिलाही सांगा मजला उपया हो क.हीं ।
नाहीं तरि देहांतचि, दिधली पीडा बहूत लोकांहीं ॥ १० ॥
वर्तो स्वधर्ममार्गी रक्षिन जो का असी वदे वाचा ।
साचा बोल तयाचा निजला तो काय देव देवाचा । १ ॥
चिंता कां करितेसी लाविन शिक्षा यथार्थ मी हरिला ।
धरिला हट तरि जाराचि नाहीं येणार कायगे हरिला ॥ १२ ॥
कांता ह्मणे असें जरि आहे तरि तो प्रभूचि गोकुळिंचा ।
केलें भ्रष्ट व्रजातें ह्मणती त्याला समस्त दों कुळिंचा ॥ १३ ॥
भीतो काय तुह्मांला धीटपणा हा नयोचि कामातें ।
सुचली युक्ति करावी धाडा ना मातृसदनिं कां मातें ॥ १४ ॥
राहिन मासचतुष्टय तोंवरि सारा कसाहि गृहधंदा ।
विसरेल नंदनंदन देइल सोडूनि आमुच्या छंदा ॥ १५ ॥
द्या एक वृषभ मजला जातें बैसूनि आजि माहेरा ।
हेरा गृह निगुतीनें माहेरीं पाठवीत जा हेरा ॥ १६ ॥
ऐसा विचार योजुनि गेली गोपी त्वरीत त्या गांवा ।
कळलें अर्धींच हरिला गोपींनीं जो वृत्तांत सांगावा ॥ १७ ॥
नटणाराचि बहुरूपी तो हरि तीचा पतीच मग जाला ।
गेला श्वशुरगृहातें ह्मणतें अनपेक्ष सर्व जग जाला ॥ १८ ॥
कांहो त्वरितचि आलां करमेना काय आपुल्या धामीं ।
जा मी क्षिप्रचि येईन ठेवितसां चित्त कां असें कामीं ॥ १९ ॥

---

१ याला ' देहांतच बरा, असें अध्याहृत घ्यावें २ स्वधर्मानें वागा ह्मणजे मी तुमचें रक्षण करीन असें अभिवचन ज्यानें दिलें तो निजला काय ? ३ हार जाणार नाहीं काय ? ४ दोन कुळांचा. "एक ह्मणती वसुदेवाचा ॥ एक ह्मणती नंदाचा ॥ ठाव नाहीं बापाचा" ॥ ५ करा ६ सांभाळा ७ काळजानें ८ जासूद ९ ज्याला कशाची गरज नाहीं असा ' अनपेक्षः शुचिर्दक्षः विष्णुसहस्रनाम १० विषमाचे ठिकाणीं.

कृष्ण म्हणे होईना गृहकृत्यानेंचि कष्टलों कांते ।
जरि  आहेत स्त्रिया बहु पाचारूं काय भ्रष्ट लोकांतें ॥ २० ॥
तीहि म्हणे स्वस्थ असा काढूं येथेंचि हो दिवस कांहीं ।
त्यजिलें गृह भृत्यावरि त्याचें आतां असो कसें कांहीं ॥ २१ ॥
चातुर्मास्य प्रभुनें क्रमिले तेथें बहू अंनदानें ।
घे स्वाद रतिसुखाचा भ्रमर जसा नलिनिच्या अमोदा[2] ने ॥ २२॥
एके समयीं आला गोकुळिंचा ही भ्रतार त्या गांवीं  ।
त्यागांवी[3] कां त्याची झाली ती गोष्ट समुळ सांगावी  ॥ २३ ॥
वंदनं[4] करि सासूतें मग श्वशुरातें नमावया पाहे ।
ते म्हणती कां करितां वंदन अजि दिवस कोणता आहे ॥ २४ ॥
जामात ह्मणे आलों ग्रामाहुनि आज आपुल्या धामीं ।
यासाठीं पद नमितों कळलें नाहीं तुह्मां कसें मामी ॥ २५ ॥
झालें चकित उभयतां ह्मणती वंदन कशास जा वांया  ।
प्यालेत गमे हाला याहुनि वदतील काय जावाया ॥ २६ ॥
पुनरपि तो त्यासि ह्मणे पडला भ्रम कां तुह्मासि मामाजी ।
माझी कांता तुमची कन्या, विपरीत काय या माजीं ॥ २७ ॥
तरि ते नायकती वच ह्मणती कां व्यर्थ  तोंड दुखवावें  ।
जामातें निज सुगुणें आह्मां सर्वां न काय सुखवावें ॥ २८ ॥
परि दुर्घट दैवगती कन्येच्या दुर्दशा कपाळा ही  ।
आली सांगूं कवणा सदनीं अपुल्या तुह्मीच पाळा ही  ॥ २९ ॥
वेडावला ह्मणे तो पडला भ्रम एकदा कसा याला ।
पाचारितां स्त्रियेसी फाराचि ते लागले हंसायाला ॥ ३० ॥
कळतां वृत्तांत जनां आले धावूनिया पहायासी ।
जामाता गृहिं आहे दुसरा हा कोण हो पहा यासी ॥ ३१ ॥

---

१ भावार्थ—कोणाला मदतीला बोलावावें तर सर्वच गोकुळ भ्रष्ट झालेलें. २ सुगंध नेतो ३ वगळाशी ४ येथून सारूप्यापासून उत्पन्न होणाऱ्या भ्रांतिकृत चमत्कारास आरंभ होतो. ५ मादक पदार्थ.

झालें आश्चर्य जना ह्मणती नच पाहिलें असें कोठें ।
दिसती सम दोघेही वय तरि यांचें पहा लहान मोठें ॥ ३२ ॥
कोणी ह्मणती ऐसें अंगावरच्या खुणा अधीं पाहूं ।
कांहीं अंतर पडतां यांच्या स्त्रीला सर्वांचे मग बाहूं[1] ॥ ३३ ॥
कोणी वंशावळिचीं नामें याला पुसा असें कथिती ।
कोणी मांत्रीकातें आणायाचा विचारही ग्रंथिती[2] ॥ ३४ ॥
झाल्या सर्व परीक्षा अंतर तिळमात्रही दिसेना हो ।
पुसती स्त्रियेसि त्याच्या सांग तुझा कोणता असे नाहो[3] ! ॥ ३५॥
नामें वंशावळिचीं पुसतां सांगे भ्रतार बाप अजा ।
*पणजा पण ज्यासि नये कथितां सांगेल काय माप अजा ॥ ३६॥
श्रीकृष्ण म्हणे कथितों ऐका संपूर्ण वंश हा माजा ।
गेले श्रवण करुनिया जन, म्हणणें[4] लागलें न 'धामा जा' ॥ ३७ ॥
घालविलें दोघांतें कांतेला त्यांचिया तयांमागें ।
भेटे मार्गीं तिसरा तो कांता आपुली तयां मागे ॥ ३८ ॥
चौथा पुढेंचि होता तोहि दटावूनिया म्हणे कां रे ।
नेतां कांता माझी सत्वर येथें अतांचि टाका रे ॥ ३९ ॥
आधीं तंडुनिं[5] पुष्कळ मग त्यांनीं नेम हा उभा केला ।
ही कांता चवघांची सहसा सोडूं नयेचि भाकेला[6] ॥ ४० ॥
प्रतिदिनिं एक हिचा पति रक्षावें या अशाहि नेमातें ।
यासाठीं कथिलें अधिं न ह्मणावें कां न सुचविलें मातें ॥ ४१ ॥
नेली कांता तेथुनि पलंगिं[7] वाहूनि पांचवा वरती[8] ।
बघती वर चवघे तों आहे भोगीत पांचवा वर ती ॥ ४२ ॥
ऐसे भ्रतार पुष्कळ बघतां वेडावलीच ती कांता ।
देह कसा वागे हा माझ्या पावेल कोण आकांता ॥ ४३ ॥

---

१ बोलावूं ( ओळखण्याकरितां ) २ करूं लागले. ३ पति, नवरा. ४ घरी परत जा असे म्हणावें लागलें नाहीं. कारण श्रीकृष्णाच्या सांगण्यांत चूक होण्याचा संभव-च नाहीं. ५ भांडून ६ झालेल्या निश्चयाला. ७ पलंगावर ८ नवरा.

*पण त्यास पणजा सांगतां येईना, शेळीला वजनमाप सांगतां येईल काय ?

आली मग देहावरि कळलें हें कृत्य वासुदेवाचें ।
प्रभुजी क्षमा करावी नेणुनि दुःशब्द बोललें वाचें ॥ ४४ ॥
तो प्रभु दयाळ निजरूप दावुनियां अभयदान दे हातें ।
आवरिल्या मूर्ति सकळ गेली गोपी स्वकीय गेहातें ॥ ४५ ॥
भजतां अनन्य भावें जे देती लक्षही अशा चरितीं[1] ।
प्रभु गिरिवासी त्यांचें संकट वारील हो अशाच रिती ॥ ४६ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

### अंजनीगीत.

(गोपी कृष्णास सांगतात.)

कृष्णास गोकुळीं एक नारी ॥ आली तिजला ताठा भारी ॥ तिचा गर्व तूं परिहारी ॥ सांगतों एक ॥ १ ॥ ह्मणती भ्रष्टल्या कामिनी ॥ हरिसीं रतल्या दिनयामिनी[2] ॥ ऐशा कैशा गृहस्वामिनी ॥ वेश्यांहुन निंद्य ॥ २ ॥ नाहीं कोणाचाही धाक ॥ दिधली त्यांनीं हरिला भाक[3] ॥ ऐशी गाजली जरि हांक ॥ निर्लज्जा साऱ्या ॥ ३ ॥ तैसी नोहे मी भामिनी[4] ॥ आज्ञा दिधली जरि स्वामींनीं ॥ अथवा दावीली हामिनी[5] ॥ पाहींना तिकडे ॥४॥ येईल कृष्ण माझ्या घरीं ॥ तरि मी गोपी नाहीं बरी ॥ शिक्षा लावीन निज करीं ॥ सांगतें आतां ॥ ५ ॥ तिच्या तारुण्याचा भर ॥ ह्मणती मजहुनि कोण सुंदर ॥ लागो नेदी हरिचा कर ॥ अंगासी अपुल्या ॥ ६ ॥ मोडी हरि तूं तिची खोड ॥ अमुचें पुरवी इतुकें कोड[6] ॥ अन्नपाणी आह्मां गोड ॥ लागेना पाहीं ॥७॥ बोले प्रभू तो गिरिवासी ॥ नलगे कांहीं विलंब यासी ॥ करितों तिजला अपुली दासी ॥ कां करितां चिंता ॥ ८ ॥

---

१ चरित्रावर. अशा चरित्राचा जे विचार करतील त्यांचें संकट प्रभु सर्व हरण करतो. २ रात्रंदिवस. ३ वचन ४ संतापी, कोपिष्ठ, रागीट. ५ पैशानें भरलेली थैली. ६ इच्छा.

कटिबंध–गोपीच्या स्वरूपाचें वर्णन–

सुंदर नार गोकुळीं आली ॥ वाटे रंभेची ती आली[1] ॥ मंथन-समयीं काय निघाली ॥ अमृत स्वर्गीचें ही प्याली ॥ न कळे कोण हिला अशि व्याली ॥ वस्त्रें कनक भूषणें ल्याली ॥ वर्णितां नये जिच्या स्वरुपाला ॥ न मिळ कल्पांतींहि नृपाला ॥ झाली प्राप्त कशी गोपाला ॥ वाटतें नवल हेंचि मोपांला ॥ विधिनें रत्न निर्मिलें ताजें ॥ निढळीं[3] कुंकुम बहुतचि साजें ॥ पाहुनि वदन चंद्रमा लाजे ॥ पायीं पैंजण नूपुर वाजे ॥ पाहतां मदन शरीरीं डाजे ॥ नासिका सरळ शुकाची सारी ॥ बिंबाधरी निलंबीं भारी ॥ नारी अशी नसे निर्धारीं ॥ सागों काय तुला गिरिधारी ॥ वाटतें तेज पडेल अंधारीं ॥ म्हणती सुंदर किति राधेला ॥ परि ती नये इच्या समतेला ॥ म्हणतिल कोण घृतासम तेला ॥ कठिनता कोठुनि असि बेलांची ॥ त्यांहुनि अधिक स्तनयुगुलाची ॥ धम्मिल शिरीं नेटका पाहीं ॥ शोभती कर्ण बहू कांपांही ॥ वक्रता नसे जिच्या भांगातें ॥ असावा सुवासही अंगातें ॥ नसती सुंदर जन कां गाते ॥ असतां नार अशी सांगातें ॥ ढकालिल इंद्रपदासहि हातें ॥ लाविलि लाज तिनें आम्हांतें ॥ कसाही घालवितो दिन हातें ॥ रात्रीं लागेना हरि पातें ॥ सांगति गोपी हरिला ॥ श्रीकृष्णें त्या प्रमदेचा पहा कैसा गर्व हरीला ॥ १ ॥

( कृष्णाचा प्रश्न व गोपींचें उत्तर. )

जलद घनाक्षरी.

कां गे झाला ऐसा दंग ॥ आज आला काय प्रसंग ॥ आहे अमुचा तुह्मां संग ॥ कां गे घाबरलां, स्वस्थ कां बैसलां, केला कोणीं मनोभंग ॥ १ ॥ कोण ऐसा तो निःसंग ॥ कळुं द्या तुमचें अंतरंग॥

---

१ सखी. २ पुष्कळांना ३ कपाळीं ४ त्रास देतो. ५ राघूच्या नाकाप्रमाणें. ६ वेणी ७ कसातरी आम्ही दिवस घालवितों पण ८ रात्रीं मात्र डोळा लागत नाहीं. तिनें दिलेलें दूषण इतकें बाचतें की रात्रीं झोपसुद्धां येत नाहीं.

सांगा लवकरी, आहे काय तरी, काय घडलें ऐसें व्यंग ॥ २ ॥ कृष्णा सांगतों अह्मी वर्म[2] ॥ आहे तुझ्या संगें शर्म[3] ॥ परी उर्वलें अमुचें कर्म ॥ काय सांगों हरी, गति न दिसे बरी, राखीं अतां अपुलें शर्म[4] ॥ ३ ॥ कोण पुरविल अमुचें नर्म[6] ॥ तिनें काढिलें अमुचें वर्म[7] ॥ कथिलें तुज आतां, हिच आह्मां चिंता, पाहे दाटला अंगीं घर्म[8] ॥ १ ॥

पद–( गोपी आपुल्या भ्रतारास ह्मणते )

सांगे वृत्तांत निज पतिला ॥ करूं मी काय दैवगतिला ॥ धृ ॥ कळवितें तुह्मांसि ऐका मी ॥ गोकुळीं कोणि नसे स्वामी ॥ बदलें सहजाचि परवा मीं ॥ हरिला येउ न दे धामीं ॥ समजलें कसें गोपतीला[9] ॥ १ ॥ जपतो हरी धरायासी ॥ होणें येइल मज दासी ॥ कोणता उपाय करूं यासी ॥ तुह्मांविण सांगूं कवणासी ॥ पुसा हा विचार निज मतिला ॥ २ ॥ सोडिली लाज बाप आई ॥ पडल्या गोपी त्या डाई ॥ करिती नित्य हरिसि घाई । अणावें तिजला लवलाही ॥ येउं दे येइल कोप तिला ॥ ३ ॥ बोले भ्रतार हें तिजसी ॥ कां तूं व्यर्थचि घाबरसी ॥ कळवितों वृत्तांत नंदासी ॥ लाविन शिक्षा मग हरिसी ॥ नसे गिरिवासी प्रभु निजला ॥ ४ ॥

लावणी–गोपी आपले भ्रतारास ह्मणते–

म्हणे सुंदरा ऐका स्वामी विचार सुचला बरा ॥ सत्वर धाडा मज माहेरा ॥ धृ ॥ जपतो हरि मज धरावयासी त्याचि गोपिकामुळें ॥ बुडविलीं ज्यांनीं अपुलीं कुळें ॥ धाक नसे कवणाचा, उरलें स्वर्ग द्वय अंगुळें ॥ लागल्या पाठीं हरिच्या[10] बळें ॥ त्यजिले गृहसुत पती आपुले पापपुण्यहि न कळे ॥ अशांचें मन तरि कैसें वळे ॥ होइल कैसें काय गृहाचें[11] संशय हा नच धरा ॥ १ ॥

---

१ उणें. २ बीज, मूळ. ३ सुख. ४ उर्मे राहिलें. ५ नांव ६ कोड, कौतुक. ७ उणीव, गुह्य गोष्ट. ८ घाम. ९ मालक, राजा १० गोपाळकृष्णाला. ११ घराचें

क्षणोक्षणीं हरिलागीं कथिती सकळ गोपिका अशा ॥ भ्रष्टवीं तिजला आम्ही जशा ॥ अशा प्रसंगीं नसेचि सहसा नामकीर्तिची अशा[1] ॥ मळवूं[2] कांहो धवल कुलयशा ॥ नष्ट दुष्ट पापिष्ट अशा त्या राहातिल उगल्यां[3] कशा ॥ करितिल माझी बहू दुर्दशा ॥ यासाठीं मी ह्मणतें आतां वेळ नका करुं जरा ॥ २ ॥ दुःख नसे हरिनें जरि नेलें दहिंदुध अमुच्या घरून ॥ परि या कर्मे जाऊं मरून ॥ होइल कांहीं सौख्य गोकुळीं आलों आशा धरून ॥ पावलों फळ हें त्याचें भरून ॥ काय करावी सुरि सोन्याची ने ती काळिज चिरून ॥ मरावें व्यर्थ अशा कां करून ॥ गिरिवासी प्रभुनेंचि सुचविली हीच योजना करा ॥ ३ ॥

लावणी– ( सासूसासरे गोपींच्या नवऱ्यास ह्मणतात )

सासुसासरे ह्मणति लागलें काय तुह्मांला पिसें ॥ करितां वंदन कवण्या मिसें[4] ॥ धृ ॥ मासचतुष्टय क्रमिले येथें नाहिं वंदिले तधीं ॥ आह्मि काय नव्हतों सदनीं कधीं ॥ काय वाटलें आजि तुह्मांला सांगा होतें अधीं ॥ भ्रंशली अशी कशी काय धी[5] ॥ चतुर शाहाणे तुह्मांसि अजवर मानित होतों सुधी[6] ॥ दिसना लेशहि तुमच्या मधीं ॥ अह्मीच न ह्मणों पुसा भासतें सकळांसहि हें असें ॥ १ ॥ होती स्थिर धी परंतु गमतें मदिरा[7] अजि प्राशिली ॥ तिनें ही कृती तुह्मां दाविली ॥ करिती वेडचार असे ही दुर्गतिची[8] माउली ॥ ह्मणुनियां सुजनांही त्यागिली ॥ आज तुह्मां ही अनर्घ्य[9] वस्तू कोठें काशि घांवली[10] ॥ कराया पान बरी भावली[11] ॥ वारावें तरि किती अरडातां बसले अमुचे घसे ॥ २ ॥ जामाता बहु दंग जाहला ह्मणे सुचेना मला ॥ कसा हा घोर जिवीं लागला ॥ अलों व्रजांहुनि[12] असें सांगतां कंठ जरी शोषला ॥ कळेना वर्म

---

१ आशा २ पांढऱ्या अशा कुलाच्या कीर्तीला. ३ गुपचिप. ४ निमित्तानें. ५ बुद्धि ६ बुद्धिवान् ७ दारू, मद्य. ८ दुर्गतीची आईदुर्गतीची माउली सुरा मातीं–मोरोपंत ९ अमोल १० मिळाली ११ आवडली १२ गोकुळाहून.

कसें यांजला ॥ श्रम झाले अज पथीं म्हणुनिया देह बहू भागला ॥ क्षुधेनें जिव व्याकुळ जाहला ॥ गिरिवासी प्रभुवांचुनि येथें कोण अतां मज पुसे ॥ ३ ॥

पद- गोपी म्हणते-

जोगी-( माझा भरत देखिला काय )

म्हणें मी काय करूं देवा, अघटित कर्म कसें ॥ धु ॥ गेलें रक्षाया निज धर्म ॥ होइल यांतचि मजला शर्म ॥ अडवें अलें कोणतें कर्म ॥ नसे हें वर्म मज ठावें ॥ १ ॥ पतीविण स्पर्श मला नाहीं ॥ देतें मन माझें गाही ॥ घडला दोष इतर नाहीं ॥ अशी कां ही दशा माझी ॥ २ ॥ होता एक पती मजला ॥ दुसरा कोठुनि हा सजला ॥ तिसरा चौथाही दिसला ॥ जन्म कसला हा माझा॥३॥ धांवे गिरिवासी प्रभुराय ॥ शतशः पतीच माझे काय ॥ होइल कैसा तरणोपाय ॥ कसें हें काय वागावें ॥ ४ ॥

पद-गोपी निज मनीं खेद करिते.

( उद्धवाशांतघन )

कां क्षोभ ईश्वरें केला, मजवरि हें वर्म कळेना ॥ धृ ॥ पावलें जन्म मनुजाचा, हा निश्चय सुकृतठेवा ॥ वागलें सतत सन्मार्गें, कां हिं घडेल प्रभुची सेवा ॥ मानिला पती ईश्वरसा, नाहिं केला किंचित् हेवा ॥ चाल ॥ असें कर्म कसें वडवडलें, कोणतें पाप मज घडलें॥ काशि दुर्घट व्यसनीं पडलें ॥ पू०चाल ॥ रडलेंच निरंतर जरि मी, सहसा हें विघ्न टळेना ॥ १ ॥ वागती सतत दुर्मार्गें, त्या अखंड सौख्यामाजीं ॥ दुर्दशा अशी कां केली, प्रभुवर्यें न कळे माजी ॥ किति दुःखास्पद हें झालों, मज लांछन पिशुनसमा जी ॥ चाल ॥ म्यां काय करावें आतां ॥ कोणि दिसेच ना कीं त्राता ॥ आठवूं कशाला भ्राता ॥ पू०चाल ॥ माताच त्रासली जेथें, इतरांचा पाड कळेना ॥ २ ॥ हा विचार सांगूं कवणा, कोण रक्षिल आतां

१ पुण्याचा ठेवा. २ पिशुन हलकट. पिशुनसमा-हलकटासारखें. जी-अहो.

मजला ॥ सांडिलें मला स्वजनांही, कोणि नाहीं त्यांतुनि धजला ॥ या समयीं पावे ऐसा ईश्वर ही नाहीं पुजिला ॥ चाल ॥ हरपले यत्न अज अवघे ॥ पुढें प्रतार दिसती चवघे ॥ कोण कर्माची या चव घे ॥ धवं घेच ह्मणे गिरिवासी, तरि आझुनि शरिर जळेना ॥ ३ ॥

---

१ पति. भावार्थ प्रभु ह्मणतो जोंपर्यंत तुझें शरिर म्हणजे शरीरांतील अभिमान जळाला नाहीं तोंपर्यंत इतक्यानेंच झालें नाहीं तर आणखीहि पती पुष्कळ दिसतील.

# श्रीकृष्णांनीं अर्जुनास माया दाखविली तें आख्यान.

## कथा-सारांश.

कौरवपांडव यांचें युद्ध झाल्यानंतर धर्मराजास राज्याभिषेक झाला. सर्व काम आटपल्यामुळें 'आह्मांला घरीं जाण्यास परवानगी द्या' असें श्रीकृष्ण धर्मराजास ह्मणाले. श्रीकृष्णाचा वियोग होतो यामुळें धर्मराजास फार दुःख झालें. नंतर श्रीकृष्ण भीम व अर्जुन यांचा निरोप घेण्याकरितां गेले, व त्यांस ह्मणाले कीं 'तुह्मांला राज्य मिळवून दिलें आतां परवानगी द्या.' तेव्हां दोघेही ह्मणाले 'आम्हीं आपल्या पराक्रमानें राज्य मिळविलें, तुह्मी फक्त सारथ्याचें काम केलें; असें असून सर्व श्रेय तुम्ही घेतां हें मोठें नवल आहे, तेव्हां उभयतांसही गर्व झाला आहे असें श्रीकृष्णांनीं ओळखलें. नंतर श्रीकृष्ण नकुल व सहदेव यांकडे निरोप घेण्याकरितां गेले. ते ह्मणाले, आमचेकडे काय आहे ? तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले, भीमाला व अर्जुनाला गर्व झाला आहे, याजकरितां मी थोडा चमत्कार दाखविणार आहें.' नंतर श्रीकृष्ण द्वारकेस निघून आले. थोडे दिवसांनीं श्रीकृष्ण गारुडी बनून आले. त्यांनीं समागमें एक लहानसा सर्प व एक लांकडाचा घोडा आणिला होता. तो सर्प भीमाच्यानें उचलला नाहीं. अर्जुन घोड्यावर बसला. त्या घोड्यानें त्याला समुद्रांत नेलें. तेथें त्याला शंखिनी नांवाची राक्षसीण भेटली. तिच्याशीं अर्जुनानें लग्न केलें. तिला पांचशें मुलें व तितक्याच मुली झाल्या. अर्जुनाला सर्व कामें करावीं लागलीं. अर्जुन पाणी आणण्याकरितां समुद्रतीरीं आला, तेथें तो लांकडांचा घोडा त्यास दिसला. त्यावर तो बसला, व पुन्हां खेळ चालला होता तेथें आला. लागलीच पाठोपाठ शंखिनी आपले परिवारासह तेथें आली व तिनें आपली सर्व हकीकत सभेंत धर्मराजास सांगितली अशी कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं [1]विधिनें करवूनि धर्मराजाला ॥
झाला निवांत यदुविर स्तवनें संतोषवी धरा ज्याला ॥ १ ॥
देव ह्मणे मज पांडव होते प्रार्थीत संकटामाजीं ॥
आहे तीच मती कीं कांहीं करितात हेळणा माजी ॥ २ ॥

---

१ विधियुक्त.

एके दिवशीं यदुवीर विनवी येऊनि धर्मरायास ।
जावें द्वारवतीला आहे मानस, निरोप द्या यास ॥ ३ ॥
अजवरि अपुल्या धामीं केली सेवा मला जशी सुचली ।
झालें कार्य अतां परि न कळे प्रभुच्या मना कशी रुचली ॥ ४ ॥
धर्म ह्मणे देवाजी केलें रक्षण अखंड दासाचें ।
जा तरि ह्मणवेल कसें, चित्तीं आणूनि हें वदा साचें ॥ ५ ॥
अंतरिं गहिंवरुनि ह्मणे धर्मासम भक्त मज न आढळला ।
निर्वैर पृथ्विमंडळ आलें हातां तरी न हा ढळला ॥ ६ ॥
अन्य दिनीं भीमासहि गांठुनि मागे निरोप जायाचा ।
दिधलें राज्य तुह्मांला निशिदिनिं आठव करीत जयाचा ॥ ७ ॥
भीम वदे स्वबळानें मेळविलें सकळ राज्य देवाजी ।
केलें कार्य तुह्मीं तें खाजविले[1] सतत जिष्णुचे[2] वाजी ॥ ८ ॥
धरिलें शस्त्र कधीं तरि केलें युद्धांत काय तें कळवा ।
कळ वाढविली आह्मीं रिपु-गण केला रणांगणी पळवा[3] ॥ ९ ॥
दिधलीं वस्त्रें उत्तम अन्नहि सुग्रास नित्य खायाला ।
झालें वपु दृढ ऐसें संकट इतरांसि ओळखायाला ॥ १० ॥
उपकार काय मग तो बोलुनियां स्पष्ट मजसि दावाना ।
इच्छा विशेष याहुनि तरि धर्मासचि विशंक जा व.नां ॥ ११ ॥
यावरि धनंजयातें एकांतीं यदुपती वदे काय ।
दिधलें राज्य किती हें प्रिय भक्तांलागिं मी न दे काय ॥ १२ ॥
केलें रक्षण अजवरि याचा स्मर अंतरीं सदा राहो ॥
समयीं सर्व पुरविलें ह्मणणें लागों दिलें न दारां[6] हो ॥ १३ ॥
पार्थ ह्मणे यदुवर्या ह्मणतां हें जरि असत्यसें नाहीं ।
सांगा तुह्मींच वधिली किंवा आह्मीं समस्त सेना ही ॥ १४ ॥

---

१ अर्जुनाचे २ घोडे ३ दाणादाण ४ तुमचें शरीर इतके पुष्ट झालें आहे कीं इतरांना ओळखावयास संकटच पडेल. ५ स्तुति करा. ६ स्त्री. अर्जुनाकरितां कृष्ण एकदां सुभद्रा झाले होते त्याला उद्देशून हें वचन आहे.

दिधलें राज्य कसें मग ? केला विक्रमहि काय तो दावा ।
कांहींच नसे, तरि हा कैसा चित्तांत बोल नांदावा ॥ १५ ॥
गेला मुकुंद तेथुनि माद्रीतनयांसही पुसायास ।
वडिलीं आज्ञा दिधल्यां, नाहीं कारण अह्मां रुसायास ॥ १६ ॥
आहोंत पांडवांतचि परि अमुचा सर्वथा नसे केवा ।
सेवा करुनि तिघांची असतों अपणांसि ठाउकें देवा ॥ १७ ॥
देव ह्मणे मज करणें आहे लीला तुह्मांसि कळवीतों ।
भीमार्जुन अति उद्धत झाले त्यांच्या यशासि मळवीतों ॥ १८ ॥
श्रुत कवणांहि न करितां स्वस्थपणें कर्म जरि विलोकाल ।
त्रिजगीं सुकीर्ति तुमची होइल मन्नाम नित्य घोकाल ॥ १९ ॥
वदती माद्रेय विभो वडिलांचीं जरि अकीर्ति करवाल ।
तरि ती घातक आह्मां होईल अपवादरूप करवाल ॥ २० ॥
यासाठीं न धरावा आग्रह प्रभुंनीं असेंचि विनवीतों ।
असतें मनींच अमुच्या तरि मग अपणां न काय शिणवीतों ।२१॥
देव ह्मणे स्वस्थ असा होइल तें तें उगेंचि अवलोका ।
भीमार्जुन अति दुर्बळ हें श्रुत करणार मी सकळ लोकां ॥ २२ ॥
ऐसें बोलुनि यदुवीर आला तत्काल द्वारकेमाजीं ॥
बळिरामासि ह्मणे हो या समयीं साह्यता करा माजी ॥ २३ ॥
करणें खेळ असें मज अजवरि कोणी विलोकिला नाहीं ॥
वर्णूं काय स्वमुखें श्रुतही कवणा नसेल कानांहीं ॥ २४ ॥
होइन मी गारोडी सर्पाकृतिनें तुम्हीहि पेटारा ॥
बैसुनि चला मजसवें दाविन मग खेळ हा तुम्हां सारा ॥ २५ ॥
लघुतर रूप असावें परि तें जड मेरु पर्वतासि तुके ।
इतकेंचि द्या पुरे मज वरकड पुरवीन न्यून जें जितुकें ॥ २६ ॥
राम ह्मणे अहिचें रुप धरणें मजलागिं काय अवघड तें ।
अप्रतिम खेळ तुमचा अनयासें पाहणें अह्मां घडतें ॥ २७ ॥

---

१ पराक्रम २ तरवार. ३ तुलना करील असें.

मग तो हरि गारोडी भेटे येऊनि धर्मरायाला ।
सांगे खेळ अपूर्वाचि लोक चतुर्दश जमा करायाला ॥ २८ ॥
पत्रें धाडुनि धर्में चवदा भुवनेंहि करविलीं गोळा ।
भोळा यदुवीर ह्मणे न दिसे यदुनाथ यामधीं डोळां ॥ २९ ॥
आहे मर्मज्ञ प्रभु जरि तो येईल द्वारकावासी ।
होइल कीर्ति जगत्त्रयिं त्याच्या योगें चढेन नांवासी ॥ ३० ॥
धर्में चार प्रेषुनि जाणविले वृत्त द्वाराकापतिला ।
येतांचि यादवांसह करिती संपूर्ण एकदा नतिला ॥ ३१ ॥
धरिलें रूप शिवाचें नाहीं तिळमात्र भेद ज्या माजीं ।
वाहे गंगाहि शिरीं ते जळ लागे जनांचिया माजीं ॥ ३२ ॥
आकंठ जळ जनाला होतां झालेचि घावरे हो ते ।
ह्मणती खेळ कशाचा सदनीं असतों तरी बरें होतें ॥ ३३ ॥
आवरितां जळ झालीं वस्त्रें तत्काल शुष्क अवघ्यांचीं ।
आनंदले सकळ जन ह्मणती पाहूं विराम लव त्याची ॥ ३४ ॥
उघडुनि मग पेटारा हरिनें बाहेर काढिला नाग ।
सांगे धर्मासि अर्थी वदतों याचा धरूं नये राग ॥ ३५ ॥
हो पांडवांत कोणी स्वबळें अहिला धरुनि फिरवावें ॥
अश्वावरि बैसुनियां अंबरमार्गीं तयासि थिरवावें ॥ ३६ ॥
जरि हें न घडेल तरी द्वादश वर्षें वनांत राहून ।
अज्ञातवास वर्षचि यावें भुवनासि कष्ट साहून ॥ ३७ ॥
तोंवरि राज्य करिन मी कळवावें वृत्त हें स्वभावांला ॥
करितिल यत्न तसा ते, मी त्यांच्या जाणतों प्रभावाला ॥ ३८ ॥

---

१ श्रीकृष्णांनीं गारुड्याचें रूप धरिलें होतें खरें, पण धर्मराजाच्या निमंत्रण वरून कृष्णरूपानेंहि आले. २ लोकांच्या कमरेपर्यंत पाणी लागलें ३ विश्रांति ४ आकाशमार्गीं ५ स्थिर ठेवावें. ६ आपल्या भावांनां.

धर्म म्हणे देवा हा सुयोधनाचा सखाचि मजवाटे ।
नलगे खेळ, पुरे हा, लावावें द्वारकेसि या वाटे ॥ ३९ ॥
देव वदे कां भीतां भीमार्जुन वीर काय सामान्य ।
हा तरि गारोडी कीं याचा मग बोल कायसा मान्य ॥ ४० ॥
बोले भीम सगर्वचि वामकरानें अहीस उचलीन ।
बहुधा फिरवुनि यातें मुष्टिप्रहारें करुनि कुचेलीन ॥ ४१ ॥
तुचले अहिवर सहसा खिन्न-मनें मग उगाचि तो राहे ।
जन ह्मणती आजवरी मिरवित होते उगाचि तोरा हे ॥ ४२ ॥
अर्जुनही बहु गर्वें बैसे येऊनियां हयावरता ।
आवरितां धरणीवरि परि गगनीं जाहलाचि आंवरितां ॥ ४३ ॥
फिरला दिवस-निशि त्रय क्षणलव विश्राम तो न दे वाजी ।
चित्तीं म्हणे असें मज पडलें संकट कधीं न देवाजी ॥ ४४ ॥
रविमंडळासि तो हय जाउनि उतरे समुद्रतीरास ।
बुडतां जळींच जरि तो सांपडता वृक्षवट न वीरास ॥ ४५ ॥
हरिनेंहि योगमाया बोधुनियां धाडिली तयाजवळ ।
राक्षस रूपीं प्रगटे गमली आतां करील ही कवळ ॥ ४६ ॥
ती पार्थासि ह्मणें मज वरिल्या निःशंक प्राण वांचवितें ।
आजवरि अनुच्छिष्टा विषयसुखाच्या हि नित्य ज्या चवितें ॥४७॥
पाणिग्रहणावांचुनि अन्य दिसेना उपाय हो कांहीं ।
यास्तव रुकार दिधला कीं देवें धाडिली सुनौका हीं ॥ ४८ ॥
होतां संभोग तिशीं मानी कृतकार्य जाहलें धन्या ।
धारिला गर्भहि तत्क्षणिं प्रसवे सुत पांचशेत तशा कन्या ॥ ४९ ॥

---

१ प्रेक्षकांत असलेल्या कृष्णाला धर्म म्हाणाला. २ ठेंचून टाकीन. ३ घमेंड ४ ऐट, ५ पोकळ. ६ घास. ७ मी अद्यापि अभुक्त म्हणजे कुमारी आहें. ८ पांचशें मुलें व पांचशें मुली झाल्या.

सांगे प्रसूति होतां द्या घट जा जीवनासि तांतडिनें ।
धान्य दळुनि पाकाचें कृत्य तुह्मांविण कोणता तडिं ने ।। ५० ।।
जरि हें न कराल अहो पुसतें जाऊनि धर्मरायासी ।।
कां न करावीं कृत्यें पतिनें स्त्री लागली मरायासी ।। ५१ ।।
शय जोडुनि पार्थ म्हणे करितों संपूर्ण मीच गृहधंदा ।।
आहे फळ हें त्याचें आलें राशीस नष्ट ग्रह यंदा[2] ।। ५२ ।।
गर्भ प्रसूति जैसी बाळेंहीं वाढलींच त्यापरि तीं ।।
ओढिति पार्थासि बळें दे खाया ह्मणुनि रोदना करिती ।। ५३ ।।
कांडी कुटी तदुपरी दश-शत बाळांसि भोजनें करवी ।।
भरवी पुनःपुन्हा तरि माया अन्नांस तत्क्षणीं जिरवी ।। ५४ ।।
घाबरला पार्थ मनीं जाऊं कोठें अतां करूं काय ।।
पाय धरूं कवणाचे रक्षण होईल तरि कसा कांय[3] ।। ५५ ।।
पुनरपि हय सिंधुतटीं येतां अर्जुन तयावरि चढला ।
आला सभांगणांतचि नाहीं कोठेंहि तो पथीं अडला ।। ५६ ।।
पार्थ ह्मणे जरि झाले कष्ट जिवाला नसेचि हो परवा ।
श्रुत नाहीं कवणातें दैवें हा योग साधिला बरवा ।। ५७ ।।
झाला वेळ न कांहीं आली घेऊनि ती मुलें सारीं ।
झालें श्रुत धर्मातें हांसे चित्तांत फार कंसारी ।। ५८ ।।
धर्म ह्मणे देवाजी आधीं अणवूनियां समाचारा ।
जरि दुःखाकुल बहुताचि असेल तरि मग सभेंत पाचारा ।। ५९ ।।
पार्थ ह्मणे काय त्वरा होतो हा खेळ होउंद्या सारा ।
बैसुनियां स्वस्थपणें असेल व्यवहार तो उद्यां सारा ।। ६० ।।
देव ह्मणे दीनाचे कष्ट हराया विलंब कां तरि तो ।
जे जन पीडित त्यांच्या अखंड चित्तासि घोर कातरितो[5] ।।६१ ।।
वदली कृष्णासि असें फाल्गुन आधीं भ्रतार कां झाला ।
झाली प्रजा ह्मणुनियां जन त्यजिती काय हो स्वकाजाला ।।६२।।

---

१ शेवटास. २ यासालीं ३ शरीर ४ श्रीकृष्ण. ५ कातरतो, तोडतो.

देव ह्मणे जो अर्जुन फाल्गुन त्यालाचि ह्मणति जन पाहे ।
चाल सभेंत तुझें मी कळवीतों वृत्त सर्व जनपा हें ॥ ६३ ॥
येतां सभेंत धरितो बाळें कित्येक अर्जुनास करीं ।
ही युवती पार्थाची ऐसें श्रुत देवही जनांस करी ॥ ६४ ॥
गिरिवासी प्रभुनें तो नकुळाकरवीं भुजंग उचलीला ।
सहदेव अश्व फेरी ऐसी अनुपम्य दाविली लीला ॥ ६५ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

### पदे

दिंडी ( द्वारपाळ धर्मास सांगतात )

चरण वंदुनिया वृत्त द्वारपाळें ॥ समुळ कथिलें रायासि त्याचि वेळे ॥ उभा गारोडी एक द्वारदेशी ॥ नसे त्याच्या कोणीच साम्यतेसी ॥ १ ॥ नाहिं नाहीं देखिला पुरुष ऐसा ॥ अती तेजस्वी रमाकांत जैसा ॥ करिन ह्मणतो मी खेळ दिव्य राया ॥ अलों कीर्ती ऐकूनि याचि ठायां ॥ २ ॥ राय बोले आतांचि अणा त्यासी ॥ लोक सारे येथील ग्रामवासी ॥ अला गारोडी त्वरित सभेमाजी ॥ धर्म झाला पाहूनि त्यास राजी ॥ ३ ॥

साकी ( गारुडी म्हणतो )

बाजीगर हूं द्वारवतीका अजब खेल बतलावूं गा ॥ जैसी कीरत सुन आया हूं इनामभी फिर पावूंगा ॥ १ ॥ अरज हमारी सुनो महाराज लोक–चतुर्दश बुलवाना ॥ जिसमें नाम गरिबका होवे खिलात वैसी दिलवाना ॥ २ ॥

---

१ राजाला. २ प्रसन्न ३ गारोडी ४ इनाम.

पद ( धर्मराज कृष्णास ह्मणतो ) गड्यानो कृष्ण गडीअपुला.

युधिष्ठिर वदे देवराया ॥ कराविणें खेळाचि हा वांया ॥ धृ ॥ गारोडी म्हणों कसा यासी ॥ पाहातो राज्य हरायासी ॥ देउनि वचन कौरवांसी ॥ अला हा गमे छळायासी ॥ जाउ द्या येथुनि निजठायां ॥ १ ॥ त्यजुनियां कुलशिल नांवासी ॥ खेळलों द्यूत कौरवांसी ॥ जाहले कष्टहि जीवासी ॥ द्रौपदीसहित बांधवांसी ॥ होइल कारण हिणवाया ॥ २ ॥ पावलों राज्य सकल देवा ॥ हा तरि प्राक् संचित ठेवा ॥ नसे मज अतां तिळहि हेवा ॥ करूं कां व्यर्थ[5]चि निच-सेवा ॥ कष्टली अजवरि बहु कां[1]या ॥ ३ ॥ म्हणे मग गिरिवासी प्रभुराय ॥ भीतां भं[2]णगासी या काय ॥ नाशिला कुरुपतिचा तुह्मी काय ॥ तसा हा बलाढ्य तरि हो काय ॥ बोलणें याचें हें वांया ॥ ४ ॥

दिंडी--( स्त्री पार्थास ह्मणते )

ह्मणे झाले कीं प्रसुत[3] प्राणनाथा ॥ कोण घेइल हा भार शिरीं आतां ॥ नसे दुसरें कोणीच हो बहार्यां[4] ॥ तुह्मां ऐसी इतरांसि कुठुनि माया ॥ १ ॥ दळण कांडण जा करा नीर आणा ॥ बहू झालें मी क्षीण मनीं आणा ॥ पहा दिसतीं लेकुरें केविलवाणीं ॥ असुनि खाया त्यां करूं नका वाणी ॥ २ ॥

( पार्थ उत्तर देतो )

अंजनीगीत.

फाल्गुन ह्मणे वो सुंदरी ॥ घट तरि कैसा घेऊं शिरीं ॥ नीरहि कूपीं सिंधुतिरीं ॥ आणूं मी कैसा ॥ १ ॥ जातें ओढीतां मज नये ॥ पेषण[6] कैसें होइल प्रिये ॥ याचें वाटतें मज भय ॥

---

१ शरीर. २ दरिद्र्याला ३ प्रसूत, बाळंत ४ बोलावण्यास ५ कमती. ६ दळण

करूं तरी कैसें ॥ २ ॥ पांक करणें ठाउक नसे ॥ एकाएकीं येइल कसें ॥ संकट पडलें मजला ऐसें ॥ करूं गत मी कैशी ॥ ३ ॥ मुसळाचि धरितां नये आधीं ॥ कांडण तरि मग व्हावें कधीं ॥ व्यर्थचि जाइल आवधी ॥ करूं तरि काय ॥ ४ ॥ सहसा होइचना मज करीं ॥ कामें आपुलीं तूं आवरीं ॥ बाळें पिडितिल मजला तरी ॥ करूं मग कैसें ॥ ५ ॥

झुलना ( घनाक्षरी )

कांहीं कळो नदे कांट ॥ घेउनि निजली हो खाट ॥ पोरें करिती बोभाट ॥ धरिति हाट भलतसा ॥ १ ॥ काय ठेविल तो ट्रूक ॥ ह्मणती क्षणोक्षणीं भूक ॥ माया लावी जरि चूक ॥ सोशि मूक बधिरसा ॥ २ ॥ वाढि पात्रीं दहिभात ॥ खाउनि ओडवितां हात ॥ इतर करिती आकांत ॥ पाहे तात घाबरा ॥ ३ ॥ ह्मणे करूं आतां काय ॥ धरूं कवणाचे पाय ॥ दाविल कोण मज उपाय ॥ चुके अपाय हा कसा ॥ ४ ॥

पद ( अर्जुन म्हणतो ) उद्धवा शांतवन कर जा

घातलें संकटीं धर्में, सांगावें कवणापाशीं ॥ धृ० ॥ हा खेळ कशाचा रायें, घेतला प्राणाचि अमुचा ॥ अह्मि व्यर्थाचि कीं हो भुललों, हा बंधु तरी कवणाचा ॥ असे विदित जना सकळांसी, म्हणती हा पुत्र यमाचा ॥ चाल ॥ मग दया कुठुनि हो त्यासी ॥ गुंतलों अह्मीं मोहपाशीं ॥ हरविली द्रौपदी खासी ॥ पू० चाल ॥ दासीच दुर्जनें गणिली, नाहिं आला घाम तयांसीं ॥ १ ॥ काय आठवावें गुण त्याचें, कंठिल दिवस वनवासी ॥ अज्ञातवासही तैसा, बहु झाले कष्ट जिवासी ॥ क्लीबत्व स्वीकारुनिया, केली

---

१ स्वयंपाक. २ वेळ ३ कपट ४ बाज ५ हट्ट ६ व्यवस्था ७ द्रौपदी द्यूतांत हरविली त्याला उद्देशून हें आहे.

सेवा करुं नये तैसी ॥ चाल ॥ नाहिं सौख्य प्राप्त कधिं झालें ॥ घातलें रिपूंनीं घाले ॥ परि मैंद न हा तिळ हाले ॥ पू०चाल ॥ केलेंच हाल त्या सतिचे, कीचकें विदित सकळांसी ॥ २ ॥ हा प्रसंग त्याहुनि खोटा, कोणि दिसेचना मज त्राता ॥ काय समय तरी युद्धाचा, योजावें रिपुच्या घाता ॥ काहिं अंतर कामीं पडतां राक्षसी मारिल लाता ॥ चाल ॥ दळ दळुनी थकल्या बाह्या ॥ लागलों सतत निरवाह्या ॥ नसे दुसरें कोणी बाह्या ॥ पू०चाल ॥ साह्यास कवण पाचारूं, धांवे पावे प्रभु गिरिवासी ॥ ३ ॥

REFBK-0001052

---

१ बोलावण्यास.

म. ग्रं. सं. ठाणे. ६९४

विषय काव्य

सं. क्र. [illegible]

REFBK-0001052

REFBK-0001052

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५२४

# गिरिधारी काव्य

भाग १ला.